‘शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक आणि समाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध

संशोधक

वाघमारे जितेंद्र हिरामण/शकुंतला

रजि.नं.१९५१२००६०४४

मार्गदर्शक

डॉ. मीनल सुनिल नरवणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे -४११०३७

मार्च -२०२२

प्रतिज्ञापत्र

मी **श्री. जितेंद्र हिरामण वाघमारे** प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, 'शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन' या शीर्षकातंर्गत केलेले संशोधन कार्य मी स्वत: केलेले असून प्रस्तुत शोध प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्रातील पीएच.डी. पदवीच्या अंशत: पूर्तीसाठी सादर करीत आहे.

मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन, तसेच संदर्भ पुस्तकातील आणि पूर्व संशोधनातील संदर्भ याखेरीज अन्य कोणतीही बाब यात समाविष्ट केलेली नाही. अन्य संदर्भ ग्रंथातील संबंधित माहितीचा यथोचितपणे उल्लेख केलेला आहे. प्रस्तुत प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास वा संस्थेस; कोणत्याही अभ्यासक्रमासाठी किंवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे वाघमारे जितेंद्र हिरामण/शकुंतला

दिनांक : संशोधक

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. जितेंद्र हिरामण वाघमारे, यांनी 'शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन' या विषयावरील प्रस्तुत शोधप्रबंधाचा अभ्यास माझ्या निरीक्षणाखाली आणि मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रस्तुत शोध प्रबंध म्हणजे त्यांच्या स्वत:च्या कार्याची फलप्राप्ती असून तो (शिक्षणशास्त्र) विद्याशाखेतील पीएच.डी. पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे -३०

दिनांक :

डॉ. मीनल सुनिल नरवणे

मार्गदर्शक

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी प्रस्तुत संशोधन अहवाल सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. विद्यावाचस्पती पदवीकरीता करावयाचे संशोधन कार्य करणे ही एक अतिशय दीर्घ प्रक्रिया असते. मार्गदर्शक तसेच इतर सर्वांच्या सहकार्याशिवाय ती पूर्णत्वास येणे अशक्य असते. कुठल्याही विषयाचे अध्ययन करताना त्याला मार्गदर्शनाची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधन पूर्ण करताना मला ज्यांनी दिशा दाखवली आणि ज्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे हे कठीण कार्य मी पूर्ण करू शकलो; त्यांच्या ऋणांचा निर्देश करणे मी माझे कर्तव्य मानतो.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्याचे कठीण कार्य सोपे करण्यास मोलाचे सहकार्य करणा-या आदरणीय डॉ. मीनल नरवणे, (संचालक, मानव संसाधन विभाग, यशदा, पुणे) यांचा मी शतश: ऋणी आहे. मार्गदर्शकांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्यच केले. मार्गदर्शकांनी कधी ही वेळेचे बंधन न बाळगता कोणत्याही क्षणी येणाऱ्या शंकांचे समाधानपूर्वक निरसन करुन वेळोवेळी सहकार्य केले. त्यांच्या या सहकार्यामुळेच संशोधकास संशोधन कार्य पूर्ण करण्यास प्रोत्साहन मिळत गेले.

प्रस्तुत संशोधनासाठी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाचे माजी अधिष्ठाता डॉ. भूषण पाटील यांनी दिलेल्या अनमोल मार्गदर्शन व प्रेरणेबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. आमच्या प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील माझ्या सर्व सहकार्यांचा; विशेषत: डॉ. शैलजा नवाथे, डॉ. मीनाक्षी सूर्यवंशी, डॉ. किरण आबनावे यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे. मला या सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाले, तसेच ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील डॉ. अस्मिता खैरे यांनी संख्याशास्त्र प्रक्रिया कशी करावी? यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

हा शोधप्रबंध पूर्णत्वास नेण्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि शिक्षणशास्त्र व विस्तार विभागातील ग्रंथपाल, तसेच सर्व कर्मचारी वर्ग, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाच्या पुणे व मुंबई विभागातील

ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी वर्ग, प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी वर्ग, या सर्वाचे मोलाचे सहकार्य मला लाभले. या सर्वांच्या सहकार्याशिवाय संशोधन कार्य पूर्ण करणे शक्य झाले नसते; या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे संशोधन कार्यासाठी आवश्यक माहिती संकलनासाठी परवानगी देणारे सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य, तसेच प्रस्तुत संशोधनात सहभागी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षक या सर्वांचे देखील संशोधक मन:पूर्वक आभार मानतो.

ज्याच्या सहकार्याशिवाय हा प्रबंध शब्दरुपात येणे अशक्य होते त्या वर्षा लोखंडे व ज्योती सकाटे यांच्या उत्तम टंकलेखन कार्यासाठी मी निश्चित ऋणनिर्देश करू इच्छितो.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यामध्ये माझ्या घरातील सर्व व्यक्तींचा सिंहाचा वाटा आहे. त्या सर्वांनी जे सहकार्य केले, माझा आत्मविश्वास वाढविला त्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

या संशोधन कार्यासाठी अनेकांनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे मला मदत केली त्या सर्वांचे मी आभार व्यक्त करतो.

स्थळ : पुणे -३०

दिनांक :

वाघमारे जितेंद्र हिरामण/शकुंतला

संशोधक

अनुक्रमणिका

अ.क्र		तपशील	पृष्ठ क्र
I		मुखपृष्ठ	I
II		प्रतिज्ञापत्र	II
III		प्रमाणपत्र	III
IV		ऋणनिर्देश	IV-V
V		अनुक्रमणिका	VI-XV
VI		तक्ता यादी	XVI-XVIII
VII		सारणी यादी	XIX - XX
VIII		आकृत्यांची यादी आलेख यादी	XXI
IX		आलेख यादी	XXII
X		परिशिष्ट यादी	XXIII
XI		**सारांश**	०१-०५
१		**प्रकरण पहिले : संशोधन विषयाची ओळख**	
१.१		प्रस्तावना	६-८
१.२		संशोधन विषयाचे महत्त्व आणि तार्किक बैठक	८
	१.२.१	भारतासमोरील शैक्षणिक आव्हाने	९-१०
	१.२.२	शिक्षक-प्रशिक्षणाची उद्दिष्टे	१०-१२
	१.२.३	भारतातील शिक्षण-प्रशिक्षणाचा इतिहास	१२
	१.२.३.१	शिक्षक-प्रशिक्षणासंदर्भात स्वातंत्र्यपूर्व आयोगाच्या शिफारशी	१२-१४
	१.२.३.२	शिक्षक-प्रशिक्षणासंदर्भात स्वातंत्र्यानंतरच्या आयोगाच्या शिफारशी	१४-१७
	१.२.४	शिक्षक-प्रशिक्षणातील सद्यस्थिती	१७-१९
	१.२.५	शिक्षक-प्रशिक्षण	१९-२१

	१.२.६	शिक्षका- प्रशिक्षकांची बदलती भूमिका	२१-२२
	१.२.७	शिक्षक-प्रशिक्षकांची गुणवैशिष्ट्ये	२२-२५
	१.२.८	शिक्षक-प्रशिक्षणातील व्यावसायिक विकास	२५-२८
	१.२.९	व्यावसायिक बांधीलकीची व्याख्या,संकल्पना	२८-३०
	१.२.९.१	विद्यार्थ्यांच्याप्रति असलेली बांधीलकी	३०-३३
	१.२.९.२	समाजाप्रति बांधीलकी	३३-३५
	१.२.९.३	व्यावसायिक बांधीलकी	३६-३७
	१.२.९.४	श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकी	३७-३९
	१.२.९.५	जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकी	४०-४२
१.३		संशोधनाची गरज	४३-४४
१.४		संशोधन समस्या	४४
१.५		संशोधनाची उद्दिष्टे	४५
१.६		संकल्पनात्मक व्याख्या	४५-४०
	१.६.१	शिक्षक-प्रशिक्षक	
	१.६.२	व्यावसायिक बांधीलकी	
	१.६.३	प्रमाणित चाचणी	
	१.६.४	विकसन	
	१.६.५	कार्यात्मक व्याख्या	४६-४७
	१.६.५.१	शिक्षक-प्रशिक्षक	
	१.६.५.२	व्यावसायिक बांधीलकी	
	१.६.५.३	प्रमाणित चाचणी	
	१.६.५.४	विकसन	
१.७		संशोधनाची गृहीतके	४७
१.८		संशोधनाची व्याप्ती	४७
१.९		संशोधनाची मर्यादा	४७-४८
	१.९.१	संशोधनाची परिमर्यादा	४८
१.१०		सदर संशोधनाचे योगदान	४८-५०

१.११		संदर्भसूची	५१-५४
		प्रकरण दुसरे : संबंधित साहित्य व संशोधनांचा आढावा	
२.१		प्रस्तावना	५५
२.२		संदर्भ साहित्याच्या अभ्यासाचा संशोधकाला उपयोग	५५-५६
२.३		सैद्धांतिक साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्टे	५६
२.४		संबंधित साहित्याचा आढावा	५६-५७
	२.४.१.	संबंधित ग्रंथांचा आढावा	५७
२.५		व्यावसायिक बांधीलकी संबंधित मराठी साहित्याचा आढावा.	५८-८४
२.६		व्यावसायिक बांधीलकी संबंधित मराठी नियतकालिकेतील साहित्याचा आढावा	८४-९६
२.७		व्यावसायिक 'बांधीलकी' व 'अभिक्षमता' संबंधित मराठी आणि हिंदी कसोट्यांचा आढावा .	९६-९९
२.८		व्यावसायिक बांधीलकी संबंधित भारतीय संशोधनाचा आढावा.	९९-११७
२.९		व्यावसायिक बांधीलकी संबंधित पूरक साहित्त्याचा व संशोधनाच्या आढाव्यावरुन संशोधनास प्राप्त दिशा.	११७-११८
२.१०		व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजी साहित्याचा आढावा.	११८-१२०
२.११		व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजी आंतरराष्ट्रीय नियतकालिकेतील साहित्याचा आढावा	१२०-१३५
२.१२		व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजी कसोट्यांचा आढावा .	१३६-१४९

२.१३	२.१३.१	व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजीतील भारतीय संशोधनाचा आढावा.	१४४-१५९
	२.१३.२	व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजीतील पाश्चिमात्य संशोधनाचा आढावा.	१६०-१७२
	२.१३.३	व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजीतील इतर क्षेत्रातील संशोधनाचा आढावा.	१७३
२.१४		व्यावसायिक बांधीलकी संबंधित इंग्रजीतील पूरक साहित्त्याचा व संशोधनाच्या आढाव्यावरुन संशोधनास प्राप्त दिशा.	१७४-१७५
२.१५		प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण	१७५-१७७
२.१६		संदर्भसूची	१७८-१८१
		प्रकरण तिसरे : संशोधनाची कार्यपद्धती	
३.१		प्रास्ताविक	१८२
३.२		संशोधनाची पद्धती	१८२-१८३
३.३		न्यादर्श निवडीची प्रक्रिया	१८४-१८६
३.४		संशोधन साधनांची निर्मिती	१८६-१८८
	३.४.१	मतावली साधनाचा वापर	
	३.४.२	प्रश्नावली साधनाचा वापर	
३.५		संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग	१८९
३.६		संशोधनाची कार्यवाही	१९०
३.७		१. प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा अ) चाचणीचे प्रत्यक्ष नियोजन	१९१
	३.७.१.१	बांधीलकी क्षेत्र	१९१-१९२
	३.७.१.२	शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्राच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम व भारांश ठरविणे.	१९३
	३.७.१.३	क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे	१९३-१९५

	३.७.२	उद्दिष्टे व त्यांची स्पष्टीकरणे तसेच त्यांना द्यावयाचा भारांश	१९५
	३.७.२.१	चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणीचे नियोजन	१९५-१९७
	३.७.२.२	चाचणी क्रमांक २ - व्यावसायिक बांधीलकी चाचणीचे नियोजन	१९८-२००
	३.७.२.३	चाचणी क्रमांक ३ - सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणीचे नियोजन	२०१-२०८
	३.७.२.४	चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांच्या प्रति असलेली बांधीलकी चाचणीचे नियोजन	२०४-२०६
	३.७.२.५	चाचणी क्रमांक ५ - समाजाच्या प्रति बांधीलकी चाचणीचे नियोजन	२०७-२०९
	३.७.३	क्षेत्रनिहाय विधान संख्या निश्चित	२१०
	३.७.४	१. प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा ब) चाचणीचे विकसन	२११
	३.७.४.१	विधानांचे विकसन आणि लेखन	२११-२१२
	३.७.४.२	चाचणीचे संपादन	२१२-२१३
	३.७.४.३	विधानांना क्रमांकन	२१३
	३.७.४.४	वेळेचे नियोजन	२१३
	३.७.४.५	प्रतिसादक सूचना	२१४
	३.७.४.६	गुणदान योजना आणि उत्तरसूचीचे आयोजन	२१४
	३.७.४.७	चाचणीचे पुनरावलोकन व संपादन	२१५
३.८		प्रारंभिक टप्पा २ - प्रतिसादकाचे मूल्यांकन	२१५
	३.८.१	चाचणीचा प्रारंभिक पडताळा	२१५-२१६
	३.८.२	वेळेचे नियोजन	२१६-२१७
	३.८.३	निरीक्षणे	२१७-२१८
३.९		अंतिम टप्पा ३ - चाचणीचे प्रमाणीकरण	२१८
	३.९.१	प्रश्न पृथक्करण प्रक्रिया	२१८-२३२

	३.९.१.२	चाचणीनिहाय प्रत्येक चाचणीतील प्रश्नांचा एकूण मूल्यभार	२३२-२३३
	३.९.२	अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन	२३४
	३.९.२.१	गुणदान योजना व उत्तरसूचीचे नियोजन	२३४-२३५
	३.९.३	उत्तरचाचणी घेणे	२३५
	३.९.३.१	चाचणीचा अंतिम पडताळा घेण्याचा हेतू	२३५
	३.९.३.२	चाचणीच्या अंतिम पडताळ्यासाठी न्यादर्शाची निवड	२३५-२३८
	३.९.३.३	प्रत्यक्ष चाचणीचा अंतिम पडताळा घेण्याची पद्धती	२३८-२३९
	३.९.४	चाचणी तपासणे व मूल्यांकन	२३९-४०
३.१०		संदर्भसूची	२४१-२४२
		प्रकरण चौथे -संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन	
४.१		प्रास्ताविक	२४३
४.२		अ) माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण	२४४
	४.२.१	१.केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलता	२४४-२४५
	४.२.२	२.गुणांकाचे वितरण विषमितता	२४५-२४९
४.३		ब) उत्तम चाचणीची गुणवैशिष्ट्ये	२५०
	४.३.१	१.चाचणीची सप्रमाणता	२५०
	४.३.२	२.चाचणीची विश्वसनीयता	२५०-२५२
४.५		चाचणीची इतर गुणवैशिष्ट्य	२५२
	४.५.१	चाचणीची वस्तुनिष्ठता	२५२-२५४
४.६		चाचणीची भेदभाव क्षमता	२५४
४.७		प्रमाणकांची निर्मिती	२५४
	४.७.१	शततमक प्रमाणके	२५४-२५६
	४.७.२	प्रमाणित गुण	२५६-२५९

	४.७.३	स्टॅनाईन गुणांक	२६०-२६२
	४.७.४	चाचणीच्या वापराच्या सुलभतेसाठी वापरलेले प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान	२६२-२६६
४.८		चाचणीच्या वापरातील सुलभतेसाठी मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे.	२६६-२६७
४.९		संदर्भसूची	२६८
		प्रकरण पाचवे-पडताळा अभ्यास	
५.१		प्रास्ताविक	२६९
५.२		चाचणीचा पडताळा घेण्याचा हेतू	२६९
५.३		प्रत्यक्ष पडताळा अभ्यास प्रक्रिया	२६९
५.४		संकलित माहितीचे वर्गीकरण	२७०
	५.४.१	पडताळा अभ्यास गटाची केंद्रिय प्रवृत्ती, विचलनशीलत आणि विषमितता	२७०-२७१
	५.४.२	पडताळा अभ्यासात प्राप्त गुणांचे 'झेड' व 'टी' गुणांत केलेले रूपांतर	२७१-२७३
	५.४.३	पडताळा अभ्यास गटाच्या गुणांचे प्रमाणित चाचणीतील गुणांशी तुलना	273-275
	५.४.४	शततमक प्रमाणके	२७६-२७७
	५.४.५	चाचणीच्या वापराच्या सुलभतेसाठी वापरलेले प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान	२७७-२८१
५.५		प्रमाणित चाचणीची वैशिष्ट्ये	२८२-२८३
	५.५.१	विश्वसनीयता	
	५.५.२	भेदभावक्षमता	
	५.५.३	वस्तुनिष्ठता	
	५.५.४.	सप्रमाणता	
	५.५.५	पर्याप्तता	

	५.५.६	उपयोगिता	
		प्रकरण सहावे : सूचना, शिफारशी व सारांश	
६.१		प्रास्ताविक	२८४
६.२		सारांश	२८४
	६.२.१	संशोधनाची गरज	२८४-२८८
६.३		संशोधन समस्या	२८८
६.४		संशोधन शीर्षकाचे स्पष्टीकरण	२८८-२८९
६.५		संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या	२८९-२९०
६.६		संशोधनाची ध्येये आणि उद्दिष्टे	२९०
६.७		संशोधनाची गृहीतके	२९०-२९१
६.८		संशोधनाची व्याप्ती	२९१
६.९		संशोधनाची मर्यादा	२९१
६.१०		संशोधनाची परिमर्यादा	२९१-२९२
६.११		संबंधित संशोधनाचा आढावा	२९२
६.१२		प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण	२९३-२९४
६.१३		संशोधनाची पद्धती	२९५
६.१४		संशोधनाची कार्यपद्धती	२९६
	६.१४.१	प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा क्रमांक -१	२९७=२९८
	६.१४.२	प्रतिसादकांचे मूल्यांकन	२९८-२९९
	६.१४.३	चाचणीचे प्रमाणिकरण करणे -	२९९-३२३
६.१५		काही निवडक निष्कर्ष	३२४-३२६
६.१६		सूचना आणि शिफारशी	३२७-३२८
६.१७		पुढील संशोधनाच्या दिशा	३२८-३२९
६.१८		प्रस्तुत संशोधनामुळे ज्ञानात पडलेली भर	३२९-३३०
७		**संदर्भ ग्रंथ सूची**	३३१-३४९
८		**परिशिष्ट**	

		अनुक्रमणिका	३५०
१		विनंती पत्र	३५१
२		मतावली	३५२-३५७
३		प्रतिसादक बी.एड. प्राध्यापकांची यादी (मतावली)	३५८-३६०
४		विषय तज्ज्ञ व्यक्तींची यादी	३६१
५		प्रतिसादक बी.एड. प्राध्यापकांची यादी (पथदर्शी अभ्यास)	३६२-३६३
६		अंतिम चाचणी व पडताळा चाचणी साठी निवडण्यात आलेली महाविद्यालय व प्रतिसादकांची यादी	३६४-३८४
७		अंतिम चाचणीसाठी स्वीकारलेल्या प्रश्नांचे पृथ्यक रण चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी	३८५-३८९
		चाचणी क्रमांक २ - व्यवसायाशी बांधीलकी चाचणी	
		चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी	
		चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी	
		चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी	
८		शिक्षक प्रशिक्षकांसाठी चाचणी संच	३९०-४२४
		चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी	
		चाचणी क्रमांक २ - व्यवसायाशी बांधीलकी चाचणी	
		चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी चाचणी	
		चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी	

		चाचणी	
		चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी	
		बांधीलकी चाचणी संच : उत्तर सूची	
९		चाचणीसाठी मार्गदर्शिका	४२५-४५५
१०		महाविद्यालयाचे माहिती संकलना संदर्भातील पत्र	४५६-४६६

तक्ता यादी

तक्ता क्रमांक	तपशील	पृष्ठ क्र
२.१	संबंधित संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा दर्शविणारा तक्ता	५७
२.२	शिक्षण शिक्षणांची गुणवत्ता दर्शविणारा तक्ता	८४
२.३	शिक्षण शिक्षणांची गुणवत्ता दर्शविणारा तक्ता	८५
२.४	शिक्षकाच्या समाजसापेक्ष भूमिकेतील बदल दर्शविणारा तक्ता	८५
२.५	प्रश्नाचे घटक दर्शविणारा तक्ता	८७
३.१	उद्दिष्टांनुसार संशोधन पद्धती	१८३
३.२	सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत अध्यापक महाविद्यालय जनसंख्या आणि न्यादर्शीची संख्या यांचा तपशील दर्शविणारा तक्ता	१८५
३.३	न्यादर्शाबाबतची तपशील दर्शविणारा तक्ता	१८६
३.४	संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग दर्शविणारा तक्ता	१८९
३.५	संशोधनाची कार्यवाही दर्शविणारा तक्ता	१९०
३.६	बांधीलकीची क्षेत्रे- पाच चाचण्यांचा चाचणीसंच	१९२
३.७	विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणी संविधान तक्ता	१९७
३.८	व्यावसायिक बांधीलकी चाचणी संविधान तक्ता	२००
३.९	सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणी संविधान तक्ता	२०३
३.१०	मानवी मूल्यांच्या प्रति बांधीलकी चाचणी संविधान तक्ता	२०६
३.११	समाजाप्रति बांधीलकी चाचणी संविधान तक्ता	२०९

३.१२	प्रारंभिक चाचणीत चाचणीनिहाय प्रश्नसंख्येचा भारांश दर्शविणारा तक्ता	२१०
३.१३	प्रारंभिक नमुन्यासाठी प्रश्नांच्या काठिण्य पातळीचे प्रमाण दर्शविणारा तक्ता	२१३
३.१४	प्रारंभिक पडताळ्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांनी वापरलेला वेळ दर्शविणारा तक्ता	२१७
३.१५	पर्यायाची विकर्षकता दर्शविणारा तक्ता	२१९
३.१६	अंतिम चाचणीसाठी प्रश्न निवडण्याचा दिग्दर्शन तक्ता	२२१
३.१७	भेदभाव क्षमता, काठिण्य पातळी दर्शविणारा तक्ता	२२२
३.१८	अंतिम चाचणीसाठी चाचणीनिहाय प्रश्नसंख्या दर्शविणारा तक्ता	२३२
३.१७	शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी संच अंतिम पडताळ्यासाठी वापर दर्शविणारा तक्ता	२३३
३.१८	अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन दर्शविणारा तक्ता	२३४
३.१९	स्वीकारता येण्यायोग्य मापन त्रुटीचे कसोटीनिहाय प्रमाणल दर्शविणारा तक्ता	२३८
४.१	'प्रणऊ' गुणांकाचे अर्थनिर्वचन दर्शविणारा तक्ता	२६०
६.१	संबंधित संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा दर्शविणारा तक्ता	२९२
६.२	उद्दिष्टांनुसार संशोधन पद्धती	२९५
६.३	संशोधनाची कार्यवाही दर्शविणारा तक्ता	२९६
६.४	पर्यायाची विकर्षकता दर्शविणारा तक्ता	३००
६.५	अंतिम चाचणीसाठी प्रश्न निवडण्याचा दिग्दर्शन तक्ता	३०१
६.६	अंतिम चाचणीसाठी चाचणीनिहाय प्रश्नसंख्या दर्शविणारा तक्ता	३०१

६.७	अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन दर्शविणारा तक्ता	३०२
६.८	'झेड' आणि 'टी' गुणांचा निश्चित वर्गांतरातील विस्तार दर्शविणारा तक्ता	३०८

सारणी यादी

सारणी क्रमांक	तपशील	पृष्ठक्र
३.१	चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री दर्शविणारी सारणी	२२३-२२४
३.२	चाचणी क्रमांक २ - व्यवसायाप्रति बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री दर्शविणारी सारणी	२२५-२२६
३.३	चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री दर्शविणारी सारणी	२२७-२२८
३.४	चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री दर्शविणारी सारणी	२२९-२३०
३.५	चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री दर्शविणारी सारणी	२३१-२३२
४.१	केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलता दर्शविणारी सारणी	२४४
४.२	गुणांकाचे वितरण दर्शविणारी सारणी	२४५
४.४	विश्वसनीयता गुणांक दर्शविणारी सारणी	२५२
४.५	शततमक प्रमाणके दर्शविणारी सारणी	२५५
४.६	चाचणीच्या कच्च्या गुणांकांचे 'झेड' व 'टी' गुणांत केलेले रूपांतर दर्शविणारी सारणी	२५७-२५८
४.७	'झेड' व 'टी' गुणांचा निश्चित वर्गांतरातील विस्तार दर्शविणारी सारणी	२५९
४.८	'प्रणऊ'शलाकेतील प्रत्येक विभाजनात येणारे गुण दर्शविणारी सारणी	२६१
५.१	पडताळा अभ्यास गटाची केंद्रिय प्रवृत्ती, विचलनशीलता व विषमितता दर्शविणारी सारणी	२७०
५.२	पडताळा अभ्यासात प्राप्त गुणांचे 'झेड' व 'टी' गुणांत	२७२-२७३

	केलेले रूपांतर दर्शविणारी सारणी	
५.३	पडताळा अभ्यास गटाच्या गुणांचे प्रमाणित चाचणीतील गुणांशी तुलना दर्शविणारी सारणी	२७४
५.४	संपूर्ण चाचणीची काही निवडक शततमक प्रमाणके दर्शविणारी सारणी	२७६
५.५	प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान दर्शविणारी सारणी	२७८
६.१	केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलता दर्शविणारी सारणी	३०३
६.२	गुणांकाचे वितरण व विषमितता दर्शविणारी सारणी	३०४
६.३	गुणांकाचे वितरण व विषमितता दर्शविणारी सारणी	३०५
६.४	विश्वसनीयता गुणांक दर्शविणारी सारणी	३०७
६.५	शततमक प्रमाणके दर्शविणारी सारणी	३१०
६.६	'प्रणऊ'(स्टॅनाईन) शलाकेतील प्रत्येक विभाजनात येणारे गुण दर्शविणारी सारणी	३१२
६.७	पडताळा अभ्यास गटाच्या गुणांचे प्रमाणित चाचणीतीलगुणांशी तुलना दर्शविणारी सारणी	३१६
६.८	संपूर्ण चाचणीची काही निवडक शततमक प्रमाणके दर्शविणारी सारणी	३१८
६.९	प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान दर्शविणारी सारणी	३२०

आकृत्यांची यादी

आकृती क्रमांक	तपशील	पृष्ठ क्र
२.१	अध्यापकाच्या व्यावसायिक विकासातील घटक	८०
२.२	मानवी मूल्यों के विविध पैलू	९२
२.३	शिक्षक गुणवत्ता विकास	९५
२.४	वर्तन क्षेत्र व बांधीलकी क्षेत्र	९५

आलेखांची यादी

आलेख क्रमांक	तपशील	पृष्ठ क्र
४.१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	२९१
४.१	व्यवसायाप्रति बांधीलकी	२९१
४.१	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२९२
४.१	मूल्यांप्रति बांधीलकी	२९३
४.१	समाजाप्रति बांधीलकी	२९३

परिशिष्ट यादी

परिशिष्ट क्रमांक	तपशील	पृष्ठ क्र
१	विनंती पत्र	३५१
२	मतावली	३५२-३५७
३	प्रतिसादक बी.एड.प्राध्यापकांची यादी (मतावली)	३५८-३६०
४	विषय तज्ज्ञ व्यक्तींची यादी	३६१
५	प्रतिसादक बी.एड.प्राध्यापकांची यादी (पथदर्शी अभ्यास)	३६२-३६३
६	अंतिम चाचणी व पडताळा चाचणी साठी निवडण्यात आलेली महाविद्यालय व प्रतिसादकांची यादी	३६४-३८४
७	अंतिम चाचणीसाठी स्वीकारलेल्या प्रश्नांचे पृथ्थकरण चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी	३८५-३८९
	चाचणी क्रमांक २ - व्यवसायाशी बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी	
	चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी	
८	शिक्षक प्रशिक्षकांसाठी चाचणी संच	३९०-४२४
	चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक २ - व्यवसायाशी बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी	
	चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी	
	बांधीलकी चाचणी संच : उत्तर सूची	
९	चाचणीसाठी मार्गदर्शिका	४२५-४५५
१०	महाविद्यालयाचे माहिती संकलना संदर्भातील पत्र	४५६-४६६

१ संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

१.१ शिक्षक-प्रशिक्षक :- अध्यापक महाविद्यालयात अध्यापनाचे काम करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण असणारा शिक्षक म्हणजे शिक्षक- प्रशिक्षक.

१.२ व्यावसायिक बांधीलकी :- विद्यार्थ्यांच्या प्रति, समाजाच्या प्रति, व्यवसायाच्या प्रति, श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी, जुनी मानवी मूल्ये यांच्या प्रति व्यवसायात उत्कृ ष्टता आणण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करणे म्हणजे व्यावसायिक बांधीलकी.

१.३ प्रमाणित चाचणी : खालील निकषांचा वापर करून तयार केलेली शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी म्हणजे प्रमाणित चाचणी होय.

१. चाचणीच्या प्रश्नावर पृथक्करण करने.

२. त्याची काठिण्यपातळी व भेदनक्षमता निश्चित करणे आणि त्याच्या आधारे योग्य काठिण्य मूल्याचे भेदनक्षम प्रश्न निवडून अंतिम चाचणी तयार करणे.

३. या अंतिम चाचणीची सप्रमाणता व विश्वनीयता ठरविणे तसेच चाचणीची वस्तुनिष्ठता, चाचणीची पर्याप्तता, चाचणीची उपयोगिता निश्चित करणे,

४. मार्गदर्शिका तयार करणे.

सारांश

शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी मूल्यमापनातून तपासता येत नाही म्हणून प्रमाणित चाचणी विकसित करने गरजेचे होते. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे अचूक मापन करणाच्या दृष्टीने प्रमाणित चाचणीचे विकसन करण्यात आले. प्रस्तुत संशोधनासाठी तीन उद्दिष्ट मांडण्यात आले.

१. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणी विकसित करणे.

२. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.

३. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन पद्धत निश्चित करताना उद्दिष्टंचा विचार करून आशय पृथक्करण पद्धत , सर्वेक्षण पद्धत आणि अनुधावन पद्धत वापरण्यात आली. प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांशी संबंधित आहे. चाचणी विकसित करण्यासाठी चाचणी प्रमाणिकरणाच्या पाय-यांचा उपयोग केला गेला. यात प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्प्यात 'Competency based and commitment oriented teacher education for quality school education' आणि 'Curriculum frame work for quality Teacher Education' या सन १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात अध्यापकाच्या व्यावसायिक विकासासाठी दिलेल्या तीन क्षेत्रांपैकी बांधीलकी हे क्षेत्र निवडण्यात आले. तसेच शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी संदर्भात जी NCTE 98/36 (1998, 30-43) ने आपल्या दस्तऐवजामध्ये पाच प्रकारच्या व्यावसायिक बांधीलकीची उपक्षेत्रे निश्चित केलेली आहेत. खाली दिलेल्या उपक्षेत्रांचा समावेश प्रमाणित चाचणी विकसित करण्यासाठी करण्यात आला.

१. विद्यार्थ्यांशी बांधीलकी
२. व्यवसायाशी बांधीलकी
३. सर्वोत्कृष्टतेसाठी बांधीलकी
४. मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी
५. समाजाशी बांधीलकी

निवडलेल्या बांधीलकीच्या उपक्षेत्रानुसार उपयोगितेच्या दृष्टीने क्रम व भारांश ठरवण्यसाठी वर नमूद केलेल्या कार्यक्षेत्रातील ६० शिक्षक-प्रशिक्षकांची निवड असंभाव्यतेवर आधारित पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली. मतावली साधनाचा वापर करुन त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरुन शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्राच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम व भारांश ठरवण्यातआला. प्रत्येक क्षेत्रासाठी स्वतंत्र चाचणी तयार करुन पाच चाचण्यांचा चाचणीसंच तयार करण्याचे संशोधकाने ठरवले.

प्रस्तुत संशोधनात शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या विविध उपपैलूंशी संबंधित घटकांची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्दयाला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले. संविधान तक्त्यात प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला गेला व क्षेत्रानुसार चाचणीसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांची निर्मिती केली. प्रारंभिक चाचणीसाठी एकूण - २६५ प्रश्नांची निर्मिती करण्यात आली. ही प्रश्नावली २५ तज्ज्ञ व्यक्तींकडून तपासून घेण्यात आली. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार काही कठीण व सोपे प्रश्न किंवा संदिग्ध प्रश्न रद्द करण्यात आले व प्रारंभिक चाचणीत चाचणीनिहाय समान प्रश्नसंख्येची निर्मिती करण्यात आली. मतावलीच्या आधारे चाचणी निहाय प्रारंभिक पडताळ्यासाठी भारांश निश्चित केला गेला .

शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या पथदर्शी अभ्यासासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण ५० शिक्षक- प्रशिक्षकांची असंभाव्यतेवर आधारित पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने निवड करुन चाचणी घेण्यात आली. प्रश्न पृथक्करण प्रक्रियापूर्ण करुन अंतिम चाचणीसाठी एकूण २०० प्रश्नांची निश्चिती केली.

बांधीलकीच्या पाचही चाचणी संच्याची अंतिम चाचणी घेण्यासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील एकूण ३६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची निवड संभाव्यतेवर आधारित पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने केली. या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २४९ शिक्षक-प्रशिक्षकांवर चाचणीचा अंतिम पडताळा

घेण्यात आला आणि प्रतिसादांचे मूल्यांकन केले. प्रश्न पृथक्करण प्रक्रियापूर्ण करुन अंतिम चाचणीसाठी प्रश्न निश्चिती केली. यासाठी रॉबर्ट ऐबेल,(१९९१),पान क्र.२३२ यांच्या भेदनमूल्य आणि प्रश्नांची काठिण्य पातळीच्या सारणीचा आधार घेण्यातआला.

संख्याशास्त्रीय विश्लेषण :-

१. मध्यमान - हे पाचही चाचण्यांत मध्यांकापेक्षा मोठे दिसून आले

२.गुणांकाचे विभाजन- बांधीलकीच्या पाचही चाचण्यांचा शिखर दोष अनुक्रमे ०.०५, ०.१४, ०.०४, ०.१८, ०.२१ आहे. म्हणजे Ku= ०.२६४ पेक्षा या पाचही चाचण्यांचे शिखरदोष मूल्य लहान असल्याने पाचही चाचण्यांचा मिळणारा वक्र हा उच्चशिखरी असल्याचे दिसते. पाचही चाचण्यांत गुणांकाचे विभाजन हे केंद्रिय प्रवृत्तीच्या मध्यावर केंद्रित झालेले दिसते.

३.आशय सप्रमाणता : प्रस्तुत संशोधनात आशय सप्रमाणतेच्या दृष्टीने बांधीलकी क्षेत्रांच्या उपपैलूंची निश्चिती उपपैलूंच्या केलेल्या कार्यात्मक व्याख्या व उद्दिष्टांची निश्चिती तसेच उद्दिष्टांना दिलेला भारांश व उद्दिष्टानुसार बांधीलकीचे मोजमाप करणारी प्रश्नावलीची रचना पाहता चाचणी ही आशय सप्रमाण आहे. आशय सप्रमाणता सिद्ध करण्यासाठी तयार केलेली चाचणी २५ तज्ज्ञ व्यक्तींना तपासण्यास दिली होती.

४. विश्वसनीयता - प्रस्तुत संशोधनात विश्वसनीयता काढण्यासाठी 'कुडर रिचर्डसन' के आर - २०, 'क्रोनबाक अल्फा' फॉर्म्यूला यांचा वापर केला आहे. चाचणीची सरासरी विश्वसनीयता ही ०.७६५ ते ०.७७५ या गुणांका दरम्यान आलेली दिसते.

५. 'झेड' आणि 'टी' गुणांचा निश्चित वर्गांतरातील विस्तार - ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण चाचणीत १ ते ४० इतके कच्चे गुण मिळाले आहेत आणि त्यांच्या गुणांचा विस्तार १९.६५ ते ४२.५९ या दरम्यान आहे त्यांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीपेक्षा कमी असल्याचे लक्षात येते. ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण चाचणीत ७६ ते १०० इतके कच्चे गुण मिळाले आहेत आणि त्यांच्या 'टी' गुणांचा विस्तार ६३.७६ ते ७७.८८ या दरम्यान आहे त्यांची व्यावसायिक बांधीलकी ही उच्च आहे.

६. शततमक प्रमाणके - संपूर्ण कसोटीचे शततमक गुणांत रूपांतर करण्यात आलेले आहे. $P_{२५}$= ३४.६० म्हणजे २५% शिक्षण-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही ३४.६०

या गुणांकाखाली आहेत. म्हणजेच उरलेल्या ७५% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी एकूण ३५% पेक्षा जास्त गुणांक आहे. या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीच्या जवळपास आहे. P_{90}= ७२.४० म्हणजे ९०% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ७२.४० या गुणांकाखाली येतात. या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही उच्च असल्याचे दिसते.

७.'प्रणऊ शलाका'(स्टॅनाईन)- एकूणच 'प्रणऊ' (स्टॅनाईन) गुणांक १ ते ५ मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चाचणीतील गुणांकाच्या सरासरीचा विचार करता ३४ च्या दरम्यान येत असल्याने शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरी अथवा सरासरीपेक्षा कमी असल्याचे दिसते. तर सहा ते नऊ या 'प्रणऊ' (स्टॅनाईन) मध्ये येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ८३ च्या दरम्यान येत असल्याने सरासरीपेक्षा जास्त आणि उच्च असल्याचे दिसते.

पडताळा अभ्यासाचे विश्लेषण :- प्रमाणित चाचणी संच्याचा पडताळा घेण्यासाठी एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ - मुंबई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - औरंगाबाद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ - नांदेड, शिवाजी विद्यापीठ - कोल्हापूर, आणि सोलापूर विद्यापीठातील प्रत्येकी तीन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची असंभाव्यतेवर आधारित पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली आणि त्या त्या अध्यापक महाविद्यालयातील अशा एकूण १२६ शिक्षक-प्रशिक्षकांवर चाचणी घेण्यात आली.

१. बांधीलकीच्या पाचही चाचण्यांचा शिखरदोष अनुक्रमे ०.०१, ०.०१, ०.०२, ०.१४, ०.०१ आहे म्हणजेच ky = ०.२३ पेक्षा या बांधीलकीच्या पाच चाचण्याच्या शिखरदोषाचे मूल्य लहान असल्याने पाचही चाचण्यांचा मिळणारा वक्र ही उच्चशिखरी असल्याचे दिसते. म्हणजेच या पाच ही चाचण्यात गुणांकाचे विभाजन हे केंद्रिय प्रवृत्तीच्या मध्यावर केंद्रित झालेले दिसते.

२. पडताळा अभ्यासात प्राप्त गुणांचे 'झेड' आणि 'टी' गुणांत केलेले रूपांतर - शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत ७६ ते १०० इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी 'टी' मूल्य ७८ आहे तर पडताळा अभ्यासात याच गटाचे

सरासरी 'टी' मूल्य ९१ आहे. यावरून ७६ ते १०० इतके म्हणजे चाचणीत सरासरीपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी प्रमाण हे पडताळा गटात १३ इतक्या 'टी' गुणांनी जास्त आहे. या वरुन शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत उच्च गुण असल्याचे दिसून येते.

प्रमाणित चाचणीतून प्राप्त 'टी' गुणांशी पडताळा अभ्यास गटात प्राप्त शिक्षक-प्रशिक्षकांच्या 'टी' गुणांशी तुलना करता 'टी' मूल्य यात काही अंतर दिसून येत नाही म्हणजेच प्रमाणित चाचण्यांचा निकष पडताळा गटास तंतोतंत लागू होतो. यावरून **चाचणीची सप्रमाणता ही उच्च** असल्याचे दिसते.

३.शततमक प्रमाणके - $P_{१००}$ = ८८ म्हणजेच १००% शिक्षक-प्रशिक्षक हे ८८ या गुणांकाखाली आहेत. याचाच अर्थ या चाचणीत ८८ पेक्षा अधिक गुण कुणालाही मिळालेले नाहीत. अत्युच्च गुण हे ८८ इतकेच मिळाल्याचे दिसते. पडताळा अभ्यासात प्राप्त 'टी' गुणांचा विचार करता १०० इतके कच्चे गुण मिळविणाऱ्या शिक्षक- प्रशिक्षकांचा 'टी' गुणांक ८९ इतका आहे. थोडक्यात शंभरावे शततमक व अत्युच्च प्राप्त 'टी' गुण यात फारसा फरक आढळत नाही. त्यावरून आलेले निष्कर्ष हे **सप्रमाण** असल्याचे दिसते.

४. प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान- ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. त्यांना 'A1' ही अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण ०.८१ म्हणजेच १ इतके आहे. ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'A' वर्णन श्रेणी दिली.या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी अति उच्च असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

सदर चाचणीची सप्रमाणता आणि विश्वसनीयता उच्च असल्याने शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणीचे विकसन योग्य झाल्यचे दिसून येते. प्रस्तूत संशोधनामुळे शिक्षणक्षेत्रात भर पडेल. व्यावसायिक बांधीलकीची प्रमाणित चाचणी आणि मार्गदर्शिका तयार झाल्यामूळे शिक्षक-प्रशिक्षक निवडण्यासाठी एक साधन उपलब्ध झाले.

प्रकरण पहिले

संशोधन विषयाची ओळख

१.१ प्रस्तावना

सध्या आपल्या देशापुढे शिक्षणाचा विस्तार, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकीकरण, उच्चशिक्षणाची सर्वंकष गुणवत्ता ही महत्त्वाची आव्हाने आहेत. परिणामत: शिक्षणाची गुणवत्ता. शिक्षकांचा दर्जा, आणि शिक्षक-प्रशिक्षण प्रणाली यांचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे.

विसाव्या शतकाच्याअखेरपर्यंत ज्ञानासाठी ज्ञान असे म्हल्ले जात होते. २१ व्या शतकात ज्ञान जर उपयोगी पडत नसेल तर ते कशासाठी संपादन करायचे? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आणि त्यातून शिक्षणाच्या उपयुक्ततेचा विचार अस्तित्वात आला. शिक्षण हे शाळेच्या चार भिंतीत शिक्षकांच्या माध्यमातून संपादन करावयाची बाब आहे ही शिक्षणाविषयीची धारणा कालबाह्य होऊ लागली. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासनामार्फत राबविल्या गेलेल्या योजनांमुळे शिक्षणाचे महत्त्व पल्ले. सांप्रत काळी शिक्षणाच्या या प्रसाराबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे महत्त्वाचे ठरले. कारण शिक्षणाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी जशी शिक्षकांची आहे, तशीच ती शिक्षक तयार करणा-या शिक्षक-प्रशिक्षण संस्थांची आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीसाठी प्रयोगशील, प्रगतीशील, उपक्रमशील शिक्षक तयार होणे गरजेचे आहे[१] यासाठी शिक्षक-प्रशिक्षण आवश्यकच आहे.

२१ व्या शतकातील ज्ञानाच्या विस्फोटमुळे ज्ञान-विज्ञानाच्या कक्षा मोठ्या प्रमाणात विस्तारल्या. सहाजिक त्यामुळे शिक्षणात आणि शिक्षणपद्धतीत बदल होणे अपरिहार्य झाले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या क्षमतांचा विकास करणे, त्यांना ज्ञान आणि माहिती देणे, त्यांच्यातील कौशल्ये शोधून त्यांचा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे[२]. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा आधारस्तंभ आहे. शिक्षणावर देशाची भावी पीढी अवलंबून आहे. विद्वान, वर्तणूकीचा आदर्श, स्वविषयात पारंगत असलेला, विविध अध्यापन पद्धती, तंत्रे वापरण्यात जागरूक आणि विद्यार्थी मानसशास्त्राची

जाण असणारा, आपल्या व्यवसायाशी बांधीलकी असणारा शिक्षक; शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयातून बाहेर पडावा अशी अपेक्षा असते. शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी त्यामुळेच उच्च दर्जाची असणे गरजेचे वाटते; तरच तो शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम, समर्पणवृत्ती, ध्येयनिष्ठा, प्रामाणिकपणा, मूल्याधिष्ठितता हे गुण प्रतिबिंबित करू शकेल[३]. सृजनशीलतेचा विकास, उदात्तकार्य, उच्च ध्येयाशी बांधीलकी, सर्वगुण संपन्नता निर्माण करण्याचे सामर्थ्य या शिक्षकांमध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी उच्च असणे गरजेचे आहे.

वर उल्लेख केलेली आव्हाने पेलणे आणि ज्ञान शाखेचा गुणात्मक दर्जा सुधारण्याची जबाबदारी ही त्यांच्याशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येकाचीच आहे. प्राचीनकाळी नालंदा, तक्षशीला, विक्रमशीला, कांची ही विद्यापीठे भारतातीलच नव्हे तर परदेशातील शिक्षण प्रेमींना उच्च शिक्षणासाठी आकर्षित करीत होती. उत्तम गुरू-शिष्य संबंध, ज्ञानाचा अखंड शोध, विचारांचे प्रभावी आदान-प्रदान, जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने आणि यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न प्राचीन काळातील या विद्यापीठातून केला जात होता. ही विद्यापीठे सूर्याप्रमाणे ज्ञानाचा प्रकाश संपूर्ण विश्वात अखंड आणि अहोरात्र पसरवित होती[४]. ब्रिटीश काळात 'वुडच्या' खलित्याने भारतीयांना जन्माने भारतीय परंतु वृत्तीने कारकून बनविण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात केले[५]. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा काही काळ ह्या ब्रिटीशांच्या मानसिक गुलाम बनवून ठेवणाऱ्या शिक्षण संकल्पनेने भारतीयांचा पाठलाग केल्याचे निदर्शनास येते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र १९६४-६६ चा 'कोठारी' आयोग आला. त्याने स्पष्टपणे बदलत्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, व्यावसायिक इत्यादी क्षेत्रात नेतृत्वाचा पुरवठा करणारे शिक्षण देणे गरजेचे मानले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये नेतृत्वाचा विकास करणे - ज्यात शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, अभिरूची, अभिवृत्ती विकासाचे प्रतिमान स्वीकारून तसे संपूर्ण उद्दिष्ट स्पष्ट केले[६].

शिक्षक-प्रशिक्षकांना व्यवसायाशी बांधीलकी राखताना भिन्न भिन्न कार्ये पार पाडावी लागतात. ही कार्ये पार पाडताना कधी-कधी काही अंतर्गत आणि बाह्य

घटकांचा त्यांच्यावर परिणाम होऊ शकतो. अध्यापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडतानाच; त्यांना आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य ही सांभाळावे लागतेच पण समायोजन ही सांभाळावे लागते. शिक्षण प्रक्रियेत जसा भविष्यकालीन शिक्षक तसाच शिक्षक-प्रशिक्षक हा ही एक महत्त्वाचाच आधारस्तंभ मानावा लागेल किंबहुना भविष्यकालीन शिक्षकापेक्षा शिक्षक-प्रशिक्षक अधिक जबाबदार, अधिक अनुभवी, प्रभावी, ज्ञानी, तत्त्वज्ञानी, समाजसेवी, मार्गदर्शक, समुपदेशक अशी शिक्षक-प्रशिक्षकाची प्रतिमा असणे अपेक्षित आहे. कारण तो भावी पीढी तयार करणाऱ्या शिक्षकांना घडवित असतो. म्हणूनच शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे अचूक मापन करणाच्या दृष्टीने प्रमाणित चाचणीचे विकसन करणे गरजेचे वाटते. चाचणीच्या अंमलबजावणीतून प्राप्त झालेल्या निकषांवरू न काही बदल घडवून आणता आले तर शिक्षक-प्रशिक्षणास एक नवी दिशा प्राप्त होईल असा विश्वास नक्की वाटतो.

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व आणि तार्किक बैठक

शिक्षण हा सर्वांगीण विकासाचा पाया आहे. यातून शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक विकास केला जातो[७]. मनुष्य प्राणी आजीवन शिक्षण घेतच असतो. शिकणाऱ्याला सशक्त बनविण्याचे काम शिक्षण प्रक्रियेतून झाले पाहिजे. उच्चतम आणि दर्जेदार अशा जीवनाची प्राप्ती करून घेण्यासाठीच मानवाने शिक्षणाची सुरवात केली. म्हणूनच महात्मा गांधीजींनी शिक्षणाची केलेली, "मानवाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास आणि अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय."[८] ही व्याख्या जगमान्य झाली. मानवामध्ये अशा प्रकारचा बदल घडविण्याची जबाबदारी शिक्षण पद्धतीची आहे; तर असा बदल घडविणारी सक्षम व्यक्ती म्हणून समाज 'शिक्षक' या व्यक्तीकडे पाहत असतो. शिक्षण पद्धतीतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे 'शिक्षक' आणि त्यांना घडविण्याचे काम करणारा तो शिक्षक-प्रशिक्षक होय.

१.२.१ भारतासमोरील शैक्षणिक आव्हाने[९]

१. प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता विकसित करणे.

२. शालेय शिक्षणाचे व्यावसायिकरण करणे.

३. शैक्षणिक सोई-सुविधा उपलब्ध करून देणे.

४. शिक्षणातील भ्रष्टचार कमी करणे.

५. दुर्लक्षित समाजाला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

६. स्त्री शिक्षणाचा विकास करणे.

७. शिक्षणाच्या गुणवत्ता विकासासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे.

८. शिक्षक-प्रशिक्षणाचा कार्यक्रम आणि सामाजिक गरजा यांचा संबंध प्रस्थापित करणे.

९. भविष्यकालीन समाजाचे चित्र किंवा दृष्टिकोन शिक्षकांमध्ये विकसित करणे.

१०. शिक्षकांमध्ये सेवाभावी वृत्ती विकसित करणे.

११. शिक्षकांमध्ये व्यावसायिक आत्मनिर्भरता विकसित करणे.

१२. शिक्षकांमध्ये लोकशाही मूल्यांची रूजवणूक करणे.

१३. शिक्षकांमध्ये भारतीय संविधान, तत्त्वज्ञान, संस्कृतीनुसार राष्ट्रीय भावना निर्माण करणे.

१४. शिक्षकांचा समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभाग वाढविणे.

१५. शिक्षकांमध्ये कृती, निरीक्षण, अनुमान, सामान्यीकरण या मानसिक शक्तींची क्षमता वाढविणे.

१६. भारतीय शिक्षणाचा विकास करणे.

१७. शिक्षकांमध्ये व्यक्तिविषयक प्रवृत्तींच्या मानसशास्त्रीय तत्त्व विकसित करणे.

१८. शिक्षकांमध्ये संघटनात्मक व व्यवस्थापनात्मक कौशल्य विकसित करणे.

१९.आंतरराष्ट्रीय सामंजस्य, सामाजिक सहिष्णुता, मानवी हक्क सुरक्षा आणि बालकांचे सामाजिक हक्क संरक्षण याबाबत शिक्षकांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे.

२०. पर्यावरण, लोकसंख्या, लिंगसमानता इत्यादी विषयी जाणीव निर्माण करणे.

२१. शैक्षणिक अनुभव निर्माण करावयाचे कौशल्य विकसित करणे.

२२. ज्ञानातील नव्या संशोधनाची शिक्षकांना ओळख करून देणे.

२३. वर्गात आणि वर्गाबाहेर संक्रमित करावयाच्या अभ्यासक्रमातील मूल्यांचे एकात्मिकरण करण्याची क्षमता विकसित करणे.

२४. शिक्षकांमध्ये आजीवन अध्ययन करण्याची क्षमता विकसित करणे.

२५. शिक्षकांमध्ये विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी अध्यापन पद्धती त्याच बरोबर अध्ययन साहित्य निर्मिती करण्याची क्षमता विकसित करणे.

२६. शिक्षकांमध्ये निरंतर, सातत्यपूर्ण, सर्वसमावेशक आणि नैदानिक मूल्यमापन क्षमता आणि उपचारांच्या संघटनाची क्षमता विकसित करणे.

२७. अध्यापनशास्त्र, अभ्यासक्रम निर्मिती, अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांमध्ये संक्रमण करणे.

२८. अध्ययन अध्यापन साहित्य निर्मिती करण्याची क्षमता विकसित करणे.

२९. निरंतर सेवांतर्गत क्षमताधिष्ठित व कृती कौशल्यपूर्ण व्यावसायिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याची कुवत निर्माण करणे.

१.२.२ शिक्षक-प्रशिक्षणाची उद्दिष्टे[१०]

१. अध्यापन व्यवसायासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या संकल्पना, पद्धती, कौशल्य, तंत्रे यांचे महत्त्व विशद करून सांगणे.

२. शिक्षणातील नवविचार प्रवाह, नवीन ज्ञान, संबोध, संज्ञा या बाबत माहिती करून देणे.

३. भावी शिक्षकांना त्यांच्या कार्याप्रती तात्त्विक, मानसशास्त्रीय, सामाजिक आणि व्यावहारिक अधिष्ठान प्राप्त करून देणे.

४. शाळेमध्ये अभ्यासपूरक आणि अभ्यासेत्तर कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौशल्य विकसित करणे.

५. अभ्यासक्रम, मूल्यमापन तसेच शैक्षणिक उद्दिष्टांच्या सफलतेसाठी नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्याचा विकास करणे.

६. स्वतःचे ज्ञान, अद्ययावत ठेवण्यास प्रवृत्त करणे.

७. शिक्षकामध्ये लोकशाहीनिष्ठा, सहकार्याची भावना आणि सौंदर्यात्मक वृत्तींचा विकास करणे.

८. बालकाच्या वर्तनाचे सामाजिकरण करण्यासाठी शिक्षकांची मानसिक तयारी करणे.

९. शिक्षकामध्ये सुसंगत व न्यायिक दृष्टिकोनाचा विकास करणे.

१०.शिक्षकामध्ये संशोधन व प्रायोगिक वृत्तीचा विकास करणे.

- **एन.सी.टी.ई या संस्थेने १९८८ मध्ये अभ्यासक्रम चौकट या नावाने अहवाल तयार केला होता. त्यामध्ये शिक्षक-प्रशिक्षणाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.[११]**

१. आपल्या अध्यापन विषयासंदर्भात अद्ययावत ज्ञान मिळविण्यास सक्षम बनविणे.

२. अध्ययन-अध्यापन परिणामकारकतेसाठी अध्यापन क्षमता विकसित करणे.

३. भारतीय घटनेने अपेक्षिलेला एकसंघ भारत निर्माण करण्यासंदर्भात शिक्षणाची उद्दिष्टे समजावून घेणे.

४. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भावनिक, सामाजिक व वैयक्तिक समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे कौशल्य विकसित करणे.

५. विद्यार्थ्यांशी सकारात्मक आंतरक्रिया करण्यासाठी संभाषण कौशल्य, शारीरिक आणि मानसिक क्षमतांचा विकास करणे.

६. अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील समस्या जाणून त्या समस्या सोडविण्यासाठी संशोधन करण्यास प्रेरणा देणे.

७. विद्यार्थ्यांची आकलनक्षमता, दृष्टिकोन, अभिरूची आणि कौशल्य यांचा विकास करण्याची क्षमता निर्माण करणे.

८. शिक्षकांची सामाजिक भूमिका समजून घेण्याची क्षमता निर्माण करणे.

९. समाज परिवर्तनातील शिक्षकाची भूमिका प्रभावीपणे पार पाडण्यास सक्षम करणे.

१०.गांधीजींनी प्रतिपादित केलेल्या मानवतावादी मूल्यांचा विकास करणे.

११.ऐतिहासिक स्मारके पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा यांचे संरक्षण, संवर्धन करण्याची जाणीव निर्माण करणे.

वरील शिक्षक-प्रशिक्षणाची उद्दिष्टे पाहता आजच्या शिक्षक-प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांमधून यातील काही उद्दिष्टे तरी साध्य केली जातात का ? हा ऐरणीवरचा प्रश्न आहे. शिक्षणाची गुणवत्ता हा शिक्षकांचा दर्जा आणि शिक्षक-प्रशिक्षण प्रणालीचा प्रत्यक्ष परिचय यांची निष्पत्ती आहे. शिक्षक-प्रशिक्षण व्यवस्थेत गुणात्मक बदल घडवून आणणे हेच मोठे आव्हानात्मक काम आहे. परंपरागत शिक्षक-प्रशिक्षण व्यवस्थेत गरजानुवर्ती बदल करण्याचे गेल्या पाच दशकांत अनेक प्रयत्न झाले परंतु आज ही व्यवस्था कमी अधिक प्रमाणात त्याच तत्त्वांवर कार्यरत आहे.

१.२.३ भारतातील शिक्षक-प्रशिक्षणाचा इतिहास

ज्यातून मानवी मने घडविण्याचे कार्य होते त्यासाठी तर प्रशिक्षणाची गरज निर्विवादच आहे. "Teachers are born, not made"[12] हे काही अंशी खरे असले तरी त्यामुळे शिक्षक-प्रशिक्षणाचे महत्त्व कमी होत नाही. प्राचीन तसेच मध्ययुगीन भारतात शिक्षण हे धार्मिक कार्य मानले जात होते. गुरूकुल पद्धतीतून ऋषीमुनीच मुलांना शिक्षण देण्याचे कार्य करीत त्यामुळे आजच्यासारख्या शिक्षक-प्रशिक्षणाची गरज नव्हती. पुढे युरोपियांनी भारतात शिक्षक-प्रशिक्षणाची पद्धत रूढ केली. भारतातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, वैचारिक आणि सांस्कृतिक विचारांना साजेसे शैक्षणिक धोरण तयार करून त्याप्रमाणे शिक्षक-प्रशिक्षण देणे सुरू झाले.

१.२.३.१ शिक्षक-प्रशिक्षणासंदर्भात स्वातंत्र्यपूर्व आयोगाच्या शिफारशी [१३]

१. माध्यमिक शिक्षक-प्रशिक्षणाच्या संदर्भात सन १८२६ मध्ये गव्हर्नर सर थॉमस मन्रो यांना प्रशिक्षित शिक्षकांची गरज लक्षांत आली. त्यांनी केंद्रिय शाळेची शिफारस केली.

२. सन १८२९ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी 'नॉर्मल स्कूल्स' स्थापण्यात आली. प्रत्येक तालुक्यातील शिक्षक म्हणून निवडलेल्या उमेदवारांनी त्या भागातील विद्वान शिक्षकांच्या हाताखाली ३ वर्षे शिकावे व त्यानंतर त्या शिक्षकाला जिल्ह्यात प्रशिक्षण विद्यालयात पाठवावे.

३. सन १८५४ मध्ये वुडच्या खलित्याने प्रत्येक इलाक्यामध्ये 'नॉर्मल स्कूल्स' स्थापण्याची शिफारस केली.

४. शिक्षक संचालक हार्वर्ड याने १८५५ मध्ये इंग्लिश शाळेतील अप्रशिक्षित शिक्षकांसाठी नियमित प्रशिक्षण विद्यालय सूचविले.

५. १८५६ साली सुरू केलेल्या शासकिय नॉर्मल स्कूलला १८८६ साली विद्यापीठाचा दर्जा देऊन शिक्षक विद्यालय सुरू करण्यात आले.

६. १८८१ मध्ये माध्यमिक शिक्षकांसाठी दुसरे प्रशिक्षण विद्यालय उघडले. जे बी. टी. पदवीसाठी सुरू करण्यात आले; परंतु या काळात शिक्षकाला पुरेसे विषय ज्ञान असेल तर उत्तम शिक्षक होण्यासाठी प्रशिक्षणाची जरूरी नाही असे मत होते, म्हणजेच त्यावेळी प्रशिक्षणाची संकल्पना स्पष्ट नव्हती.

७. सन १८८२ च्या 'हंटर' आयोगाच्या शिफारसीनुसार शासकिय किंवा अशासकिय प्राथमिक शाळांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन नॉर्मल स्कूल्स या त्या भागात सुरू कराव्यात असे ठरले. प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावा. माध्यमिक शिक्षकांसाठी अध्यापन शास्त्राची तत्त्वे आणि प्रात्यक्षिक अध्यापन कार्य यांची परीक्षा सुरू करावी. मॅट्रिक, आणि पदवीधर शिक्षकांच्या प्रशिक्षणात व्यावसायिक आणि विषय ज्ञान अभ्यासक्रम वेगळे असण्याची गरज सूचविली. सर्व शिक्षक-प्रशिक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थांनी स्वीकारावी अशा शिफारसी करण्यात आल्या.

८. १९०४ च्या जाहीरनाम्यात पदवीधारकांसाठी १ वर्षाचा तर पदवीधारक नसणाऱ्यांसाठी दोन वर्षाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम सूचविला. तसेच प्रत्येक प्रशिक्षण विद्यालयास एक प्रात्यक्षिक शाळा जोडलेली असावी.

९. १९१७ च्या 'कलकत्ता विद्यापीठ आयोगानुसार' बी.ए. व एम.ए. या पदवी परीक्षांमध्ये शिक्षणशास्त्र विषयाचा समावेश असावा. तेथे शिक्षण या विषया विषयी अध्यापन तंत्रे व पद्धती यांचे संशोधन व्हावे असे सूचविण्यात आले.

१०. सन १९२९ मध्ये 'हरटॉग' समितीनुसार शिक्षक-प्रशिक्षणाचा कालावधी वाढवावा. प्रशिक्षण संस्थाना पुरेसा सेवकवर्ग पुरवावा. शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची सोय करावी असे सूचविण्यात आले.

११. १९३७ मध्ये 'मूलोद्योगी' शिक्षणाचा समावेश शिक्षक-प्रशिक्षणात करावा अशी सूचना आली.

११. सन १९४४ मध्ये 'सार्जंट' नॅननेनुसार पूर्व प्राथमिक २ वर्ष, प्राथमिक २ वर्ष, माध्यमिक १ वर्ष शिक्षक-प्रशिक्षणाचा कालावधी असावा. अशा विविध शिफारसी करण्यात आल्या.

१.२.३.२ शिक्षक-प्रशिक्षणासंदर्भात स्वातंत्र्यानंतरच्या आयोगाच्या शिफारसी [१४]

१. १९४८ च्या 'विद्यापीठ' आयोगाच्या शिफारसीनुसार शालेय अध्यापनाच्या सरावाला महत्त्व, शालेय अध्यापनाचा अनुभव असणाऱ्यांची शिक्षक-प्रशिक्षक म्हणून निवड करावी. अभ्यासक्रम स्थानिक गरजांनुसार लवचिक असावा असे सूचविण्यात आले.

२. 'शिक्षण' आयोग १९५२-५३ नुसार अध्यापन शास्त्राच्या विविध पैलूंवर संशोधन व्हावे यासाठी महाविद्यालयाच्या नियंत्रणाखाली एक प्रायोगिक अथवा प्रात्यक्षिक शाळा असावी असे सूचविण्यात आले.

३. सन १९५७ च्या 'स्त्री प्रशिक्षण' समितीच्या शिफारशीनुसार स्त्रियांसाठी शिक्षक-प्रशिक्षण संस्था स्थापन कराव्यात. शिष्यवृत्ती योजना असावी अशी सूचना आली.

४. १९६४ चा 'कोठारी' आयोगानुसार सहकारी शाळांना सहकार्याबद्दल अनुदान द्यावे. पदवी विषय अध्यापन पद्धतीसाठी निवडावेत. टपाली अभ्यासक्रम द्यावा अशी सूचना आली.

५. 'राष्ट्रीय' आयोग १९८३ नुसार चार वर्षाच्या एकात्म अभ्यासक्रम व्यावसायिक पूर्वतयारी करून घेतली जावी. शिक्षणांतर्गत सेवाकाल तिसऱ्या वर्षी चार आठवड्यांचा आणि चौथ्या वर्षी आठ आठवड्यांचा असावा असे सूचविण्यात आले.

६. १९९० 'राममूर्ती' आयोगानुसार इंटर्नशिप मॉडेल स्वीकारावे.

७. १९९२ च्या 'कृती कार्यक्रमा' नुसार किमान अध्ययन पातळीबाबत प्रशिक्षण द्यावे अशी सूचना आली.

८. १९९५ साली सेवांतर्गत शिक्षकांसाठी 'पत्राद्वारे बी.एड्.' अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

९. १९९६ च्या 'प्रा. डेलॉर्स' आयोगानुसार शिक्षणाचे चार स्तंभ Learning to know, Learning to do, Learning to leave Together, Learning to be याचे शिक्षण-शिक्षकांना द्यावे.

१०. २००५ मध्ये 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' शिक्षणाच्या माध्यमातून मनुष्यबळाचे ज्ञानात्मक आणि कौशल्यात्मक मूल्य वाढविणे असे सूचविण्यात आले.

११. २०१० मध्ये 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयात' शिक्षकाची भूमिका - माहिती पुरविणारा अशी न ठेवता अध्ययनास प्रेरक, मार्गदर्शक, दिशादर्शक, कृती धडवून आणणारा आयोजक अशी बनविणे इत्यादी शिफारसींसह निरनिराळ्या आयोगांनी शिक्षकाच्या बदलत्या भूमिकेबद्दल आपले विचार मांडले आहेत. 'राष्ट्रीय शैक्षणिक

धोरण' १९८६ मध्ये संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांचा सामाजिक दर्जा वाढविण्यावर भर दिला. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू असून चांगले शिक्षक घडविण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. म्हणून शिक्षक-प्रशिक्षण हे प्रामुख्याने तीन स्तरावर देण्यात येते.[५]

१) प्राथमिक शिक्षक-प्रशिक्षण

२) माध्यमिक शिक्षक-प्रशिक्षण

३) उच्च-माध्यमिक शिक्षक-प्रशिक्षण

शिक्षणतज्ज्ञ डॉ. दवे यांच्या शिक्षकांविषयीच्या विचारमंथनाचा सदर संशोधनासाठी उपयोग करण्यात आला. त्यांनी शिक्षकाला अपेक्षित असणारी तीन महत्त्वाची क्षेत्र सांगितलेली आहेत ती पुढीलप्रमाणे :[१५]

१) क्षमता क्षेत्र २) कामगिरी क्षेत्र ३) बांधीलकी क्षेत्र

याबाबतची माहिती संशोधकाने वाचली. तेव्हा एका उत्तम शिक्षकाकडे हव्या असणाऱ्या गुणांची माहिती सहजतेने मिळाली त्या माहितीचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी आणि त्यांनी दिलेल्या प्रतिमानाचा आधार क्षेत्र निवडण्यासाठी संशोधकाला झाला.

सन १९९५ मध्ये 'एन.सी.टी.ई' वैधानिक संस्था (Statutory body) म्हणून अस्तित्वात आल्यावर प्रामुख्याने हाती घेतलेल्या कामामध्ये 'अध्यापक शिक्षण शिक्षणक्रमाची पुनर्रचना' या विषयाचा समावेश होता. नामवंत शिक्षक तज्ज्ञांच्या दोन-अडीच वर्षे झालेल्या विस्तृत आणि देशव्यापी विचार मंथनाचे प्रतीक म्हणून 'Competency based and commitment oriented Teacher Education for Quality School Education' आणि 'Curriculum frame work for quality Teacher Education' या सन १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. राज्य स्तरावर काम करणाऱ्या अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने त्यांचाच आधार घेतला आहे आणि प्रत्येक राज्याची परिस्थिती लक्षात घेऊन इष्ट ते बदल सूचविलेले दिसतात.

१.२.४ शिक्षक-प्रशिक्षणातील सद्यस्थिती

पूर्वी पुणे विद्यापीठांतर्गत मर्यादित शिक्षणशास्त्र महाविद्यालये होती. २००४ नंतर शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या संख्येत ९८ ने वाढ झाली. महाराष्ट्रात शासकीय १२ , अनुदानित ३८ आणि विनाअनुदानित ३१२ शिक्षणशास्त्र महाविद्यालये आहेत. या बी.एड् महाविद्यालयात देण्यात येणारे प्रवेश हे विद्यापीठ विभागानुसार केंद्रीय पद्धतीने देण्यात यावे.त्याच बरोबर हे प्रवेश सामाईक प्रवेश परीक्षा (CET) घेऊन गुणवत्तेनुसार देण्यात यावे असे दिनांक १६ फेब्रुवारी २००४ रोजी शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार अनिवार्य झालेले दिसते. तरीही महाराष्ट्रात एकूण ३६२ शिक्षणशास्त्र महाविद्यालये असून मागील दोन ते तीन वर्षापासून प्रवेश घेणाऱ्यांच्या संख्येत मात्र मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे दिसून येते. २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी ३५,६६० जागांपैकी १३,०९१ (४०%) जागा रिक्त राहिल्या. २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी ३५,६६० जागांपैकी ८,३६८(२८%) जागा रिक्त राहिल्या[१६] प्रत्येक विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयास पुरेशी विद्यार्थी संख्या न मिळाल्याने 'शिक्षण संचालक' (उच्च शिक्षण विभाग) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेमुळे सामाईक प्रवेश परीक्षा (CET) न दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्रवेश संख्येत वाढ झाली .

बी.एड्. अभ्यासक्रमाचा कालावधी २०१४ पर्यत एक वर्षाचा होता. २०१५ पासून दोन वर्षाचा आहे. वास्तविक प्रवेश प्रक्रिया जून महिन्यात होणे अपेक्षित असते. पण ही प्रवेश प्रक्रिया जुलै, ऑगस्ट महिन्यात सुरू होते. ऑक्टोंबर महिन्यापर्यंत चालते. एकंदरीत बी.एड्. अभ्यासक्रमाची व्याप्ती विचारात घेता उशीरा होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमुळे बी.एड्. अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची खऱ्या अर्थाने पूर्ती होत नाही. शिक्षकांकडून ज्या सर्वांच्याच अपेक्षा आहेत त्या पूर्ण होण्यासाठी बी.एड्. अभ्यासक्रमांतर्गत असणारे सर्व विषय, त्याला अनुसरून असणारी प्रात्यक्षिक कार्ये यांची रचना चांगलीच आहे. पण राबविण्यासाठी उपलब्ध कालावधी खूपच कमी आहे. हा अभ्यासक्रम राबविताना शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी पणाला लागते.

२००४ नंतर विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या संख्येत ३१२ ने वाढ झाली[१७]. 'एन.सी.टी.ई.' ची मान्यता घेताना अनेक विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये भौतिक सुविधा होत्या. मान्यता मिळाल्यानंतर अचानक या सुविधांमध्ये कमतरता होताना दिसून आल्या.

बी.एड्. अभ्यासक्रमांतर्गत २०१४ पूर्वी अंतर्गत मूल्यमापनासाठी (६००) ६०% तर बाह्यमूल्यमापनासाठी (४००) ४०% असा भारांश होता. २०१५ पासून बी.एड् अभ्यासक्रमांतर्गत प्रथम वर्षासाठी अंतर्गत मूल्यमापनासाठी (५२०) ५२% तर बाह्यमूल्यमापनासाठी (४८०) ४८%, द्वितीय वर्षासाठी (६००) ६०% आणि (४००) ४०% असा भारांश आहे[१८] . अंतर्गत मूल्यमापन होताना बऱ्याच वेळा व्यक्ति निष्ठता दिसून येते.

विद्यापीठामार्फत बाह्यमूल्यमापन केले जाते. विद्यापीठामार्फत जी परीक्षा घेतली जाते त्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करता प्रश्नांची पुनरावृत्ती झाल्याची दिसून येते.

"Central Assessment Programme" अंतर्गत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन केले जाते. येथे देखील पुरेसे अनुभव नसणारे प्राध्यापक पेपर तपासण्याचे काम करताना दिसून येतात.

शिक्षक-प्रशिक्षणातून मोठ्या प्रमाणात संशोधन झाले पाहिजे. ज्ञानाच्या कक्षा सातत्याने विस्तारत असलेल्या दिसत आहेत. त्या दृष्टीने त्या विस्तारित कक्षांवर संशोधन होणे आवश्यक आहे. २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाताना भारतीय शिक्षक-प्रशिक्षणात अशा प्रकारच्या संशोधनांची कमतरता चिंतेची बाब वाटते. आज देशात २०० संशोधन संस्था आहेत. त्यापैकी २०% संस्थांना शासकीय साहाय्य उपलब्ध आहे. दरवर्षी विविध विषयातील संशोधनासाठी अंदाजे २६०० विद्यार्थ्यांना 'विद्यावाचस्पती' पदवी देण्यात येते[१९]. व्यावसायिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो पण अनेक संस्थांत संशोधनात्मक गुणवत्तेत असमतोल दिसून येते.

शेवटी 'शिक्षक-प्रशिक्षणाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील, याबाबतची जबाबदारी कोणाची ?' हा प्रश्न निर्माण होतो. संशोधकाच्या मते शिक्षक-प्रशिक्षणाशी संबंधित

अशा सर्व घटकांची ही जबाबदारी आहे. अर्थात् प्रत्येक घटकाच्या जबाबदारीचे स्वरूप भिन्न असणे स्वाभाविक आहे. घर, समाज, विद्यार्थी, मित्रमंडळी, प्राचार्य, प्राध्यापक, संस्था चालक, प्रशासन, प्रसारमाध्यम, हे ते घटक होत. प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तर शिक्षक-प्रशिक्षणातील गुणवत्ता सुधारणेतील आव्हाने पेलणे सोपे होईल.

१.२.५ शिक्षक-प्रशिक्षण

शिक्षक-प्रशिक्षणाच्या काही व्याख्या खालील प्रमाणे आहेत

१. **सर अष्ट्रयू बेल यांच्या मते,** 'ज्या अभ्यासक्रमाद्वारे आणि अनुभवाच्या माध्यमाने एखाद्या व्यक्तीला अध्यापकीय व्यवसायासाठी व कार्यासाठी घडविले जाते त्या शिक्षणाला व अभ्यासकाला शिक्षक-शिक्षण असे म्हणतात'[२०].

२. **सी. व्ही. गूड्स यांच्या मते,** 'शिक्षक-प्रशिक्षणात सर्व अनुभव औपचारिक आणि अनौपचारिक क्रियांचा समावेश होतो की ज्या व्यक्तीला शिक्षण व्यवसायाची जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्यता प्रदान करतात'[२१].

३. **एन.सी.टी.ई. ने दिलेली सर्वसमावेशक व्याख्या :**

"Teacher Education means programmes of Education, research or training of persons for equipping them to teach at pre-primary, primary, secondary and senior secondary stages in schools and includes non-normal education, part time education, adult education and correspondence education.[22]"

वरील सर्व व्याख्यांवरून आपणास असे सांगता येईल की शिक्षक-प्रशिक्षणात सर्वच शैक्षणिक क्रियांचा समावेश होतो ज्या व्यक्तीला शाळेत शिकविण्यासाठी स्वयंपूर्ण बनवतात. त्यामध्ये अध्यापनशास्त्रीय तात्त्विक, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अधिष्ठान, अध्यापन-अध्यापनासाठी नवनवीन पद्धती, तंत्रे, कौशल्य, संस्कार या सर्वांचा समावेश होतो.

शिक्षकांमध्ये अष्टपैलूत्व निर्माण करण्याचे कार्य शिक्षक-प्रशिक्षणातून केले जाते. शिक्षकांच्या परिणामकारक प्रशिक्षणाशिवाय कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी होऊ शकत नाही. कोणत्याही देशातील शिक्षण पद्धतीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे शिक्षक-प्रशिक्षणातून प्रशिक्षणार्थ्यांच्या क्षमताधिष्ठित विकास होणे महत्त्वाचे असते.

समाजविकासासाठी शिक्षणामध्ये गतिशीलता असावी आणि गुणवत्ता असावी. शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षक-प्रशिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून आहे. सम्पूर्ण शिक्षण प्रक्रियेत गुणवत्ता, संरक्षण आणि संवर्धन महत्त्वाचे आहे. पूर्वी शिक्षक-शिक्षणासाठी, 'शिक्षक-प्रशिक्षण' ही संकल्पना वापरली जात होती. या संकल्पनेत केवळ वर्गाध्यापनाची कौशल्य विकसित करण्यावरच भर दिला जात असे; परंतु शिक्षकी पेशाचे पावित्र्य टिकविण्यासाठी केवळ प्रशिक्षण पुरेसे नव्हते त्यामुळे शिक्षक-प्रशिक्षणाची जागा शिक्षक-शिक्षणाने घेतली आहे[२३].

आजच्या भौतिकवादी संस्कृतीमुळे शिक्षकाचे कार्य केवळ ज्ञानदानाचेच राहिले नाहीतर ज्ञानदानासोबत मूल्यसंस्कार, जीवन कौशल्य हे सुद्धा विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवावे लागतील म्हणजे पूर्वीपेक्षा आज समाजामध्ये शिक्षकाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते आहे. आजचा शिक्षक खऱ्या अर्थाने शिक्षण व्यवस्थेचा कणा आहे. त्याला विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कधी कुंभाराची, तर कधी माळ्याची भूमिका स्वीकारावी लागणार आहे. वर्गामध्ये केवळ ज्ञान देऊन चालणार नाही तर ज्ञानाची निर्मिती, संवर्धन, संरक्षण व संक्रमणाचे काम करावे लागणार आहे, त्यामुळे या सर्व कार्यासाठी शिक्षकांना जर स्वयंपूर्ण बनवायचे असेल तर त्यांना क्षमताधिष्ठित शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

शिक्षक-प्रशिक्षणातील गुणवत्तेच्या चाललेला ऱ्हासाला स्वत: शिक्षक पूर्णत: जबाबदार नसून समाजाच्या मूल्यावस्थेतील बदल, राजकीय गट, राजकीय दबाव आणि शिक्षण क्षेत्रातील राजकारणाचा प्रभाव हे घटक सुद्धा कारणीभूत आहेत. आज समाजाच्या शिक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी अनेक स्तरावर शिक्षक-प्रशिक्षणाचे कार्य चालू आहे. त्यामुळे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून दोन वर्षाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. तसेच पदव्युत्तर शिक्षक-शिक्षण, एकात्म शिक्षक-शिक्षण, मुक्त

विद्यापीठाद्वारे पत्राद्वारे शिक्षक-शिक्षण अशा अनेक प्रकारे शिक्षक-प्रशिक्षणाचे कार्य चालू आहे. त्यामध्ये सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षण अशा दोन्ही प्रकारे शिक्षकांना आपला विकास साधण्यास संधी दिली जाते.

राष्ट्रीय शिक्षणाच्या उद्दिष्टांच्या सफलतेसाठी शालेय पाठ्यक्रमाची आखणी केलेली असते. या पाठ्यक्रमाच्या आखणीनुसार शिक्षक-प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले जाते आणि त्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना अध्ययन अध्यापनासाठी लागणारी सर्व कौशल्य, तंत्रे, पद्धती, वृत्ती यांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

१.२.६ शिक्षकांची बदलती भूमिका

आधुनिक ज्ञानकेंद्री समाज व्यवस्थेमध्ये पूर्वीपेक्षा शिक्षकाचे कार्य वाढलेले दिसून येते. कारण ज्ञानाचा प्रस्फोट व ज्ञानाची वाढती गरज यामुळे प्रत्येक क्षणी चांगल्या मार्गदर्शकाची मागणी वाढत आहे. ज्यांच्या जवळ ज्ञान, कौशल्य, क्षमता व मार्गदर्शनासाठी आवश्यक योग्यता आहेत अशांना बाहेरील देशातसुद्धा शिक्षक म्हणून खूप मागणी वाढत आहे. सद्यस्थितीत समताधिष्ठित, गरजाधिष्ठित शिक्षक-शिक्षणाच्या निर्मितीला फार महत्त्व प्राप्त झाले आहे[२४].

शिक्षक-प्रशिक्षणात अत्यंत गतिशीलपणे सुधारणा होणे गरजेचे आहे. कारण, भविष्यातील समस्या व जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने पेलण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक विद्यालये, अध्यापक विद्यालये, शिक्षणशास्त्र महाविद्यालये या विविध स्तरावर असलेली शिक्षकांची मागणी आणि पुरवठ्यात समतोल प्रस्थापित करणे महत्त्वाचे आहे. एकविसाव्या शतकाला सामोरे जाताना सर्व क्षेत्रात होणाऱ्या बदलास शिक्षक-प्रशिक्षणसुद्धा अपवाद ठरू शकत नाही. शिक्षक-प्रशिक्षण प्रक्रियेलासुद्धा जुनी कात टाकून सज्ज राहावे लागणार आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आवश्यक सक्षम मनुष्यबळ तयार करण्याची जबाबदारी शिक्षक-प्रशिक्षणाला पेलावी लागणार आहे. प्रशिक्षित शिक्षकांची संख्या मागणीनुसार पुरेशी असेल तर मागणी आणि पुरवठा या अर्थशास्त्रीय तत्त्वानुसार समीकरण संतुलित होईल आणि शिक्षणाची योग्य ती

फलनिष्पती दृष्टिपथास येईल. शिक्षक-प्रशिक्षणाच्या मागणीचा विचार करताना फक्त संख्यात्मक विचार करून भागणार नाही तर गुणात्मक बाबींचा विचार सुद्धा महत्त्वाचा आहे. शिक्षक-प्रशिक्षणाची गुणवत्ता टिकविण्यासाठी, संवर्धनासाठी शिक्षणसंस्थेतील भौतिक सुविधा, अभ्यासक्रम, मूल्यमापन, प्रवेशप्रक्रिया, अध्यापकांची शैक्षणिक व्यावसायिक पात्रता या गोष्टींचा सुद्धा विचार होणे महत्त्वाचे आहे. वरील सर्व घटकांसोबत प्रशिक्षणार्थ्यांच्या आवश्यक क्षमतांच्या उच्चविकासाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

आजचा शिक्षक-प्रशिक्षणार्थी केवळ परीक्षार्थी राहता कामा नये तर तो ज्ञानाचा निर्माता, उपयोजन करणारा, संवर्धन करणारा बनायला हवा. त्यासाठी त्याला स्वत: ज्ञानाचे मुक्त स्त्रोत शोधावे लागतील. आत्मविश्वासपूर्वक स्वक्षमतांचा विकास साधावा लागेल. प्रभावी संप्रेषणकला अवगत करावी लागेल तरच शिक्षक-प्रक्षिणाला महत्त्व प्राप्त होऊन भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर शिक्षक-प्रशिक्षणाची मागणी वाढेल.

१.२.७ शिक्षक-प्रशिक्षकाची गुणवैशिष्ट्ये

खालील विविध स्तरावर शिक्षक-प्रशिक्षकाची व्यावसायिक वैशिष्ट्ये आहेत.

१. शिक्षक-प्रशिक्षकाची अध्ययनार्थ्यांबाबतची गुणवैशिष्ट्ये

विद्यार्थ्यांची बौद्धिक, शारीरिक ,भावनिक ,मानसिक ,सामाजिक विक ासाची जाण असणारा, विद्यार्थी अभिरूचीची माहिती असणारा, विद्यार्थ्यांप्रति निष्ठा असणारा , विद्यार्थ्यांविषयी प्रेम असणारा, विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देणारा, सहशालेय उपक्रमांची योजना आखणारा, विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, अनुभूतीचे अध्ययन, शैक्षणिक स्वातंत्र्य देणारा, योग्य मूल्यमापक, कृतिसंशोधक, कृतीयुक्त अध्यापन क रणारा, अध्ययन संक्रमण क रणारा, स्वतंत्र्यविचारांना चालना देणारा, श्रेष्ठ दर्जाचे गुरू शिष्य संबंध जोपासणारा, निदानात्मक व उपचारात्मक अध्यापन करणारा, तसेच मानसव्यापार, स्वचैतन्याचे संक्रमण, प्रश्नपद्धती, शिक्षण संक्रमण कौशल्य, प्रेरक, व्यक्ती विकासात आत्मसाक्षात्कार घडवून आणणारा, नि:पक्षपाती, स्वयम-अध्ययनाला प्रेरणा, मनोरंजन विवेक अनुयायित्व असणारा, अभिरूची निर्मिती करणारा.

२. शिक्षक-प्रशिक्षकाची व्यवसायाप्रतिची गुणवैशिष्ट्ये

प्रयोगशीलता, चिंतनशीलता, स्पष्टवक्तापणा, विषय व्यासंग, रसिकता व सहृदयता, सृजनशीलता, वक्तृत्त्व, उपक्रमशीलता, छंद जोपासणारा, कृतिसत्र आणि चर्चासत्रात सहभाग, पाठ्यक्रमाचे ज्ञान, नेतृत्वगुण, तात्त्विकवाद, आदर्शवादी दृष्टिकोन, निरीक्षण क्षमता, प्रभावी व्यक्तित्व निःस्पृहता, ज्ञानसंपन्नता, समस्या विमोचनाचे कौशल्य, कल्पक, मूल्यमापन व मूल्यनिर्धारणात तज्ज्ञ, नवप्रवाहांचे ज्ञान, वैकासिक प्रवाहांची जाण, सद्यस्थितीचे ज्ञान, सामाजिकता, संशोधक, व्यक्ती अभ्यास, विश्लेषणात्मक कार्य, कार्यवादी विचारवंत, शिस्तबद्धता, वेळेचा सदुपयोग करणारा, व्यावसायिक नीतिमत्ता जोपासणारा, शिक्षणाप्रति निष्ठा, संघटन कौशल्य, व्यवहारवादी, समर्पण वृत्ती, वैचारिक योगदान, कर्तव्यदक्ष, गुणग्राहकता, कर्मयोगी, प्रयत्नवादास महत्त्व देणारा, नवनिर्मितीक्षमता असणारा, सजग मूल्यांकन क्षमता, उच्च विद्याविभूषित विद्यापरायण, ज्ञाननिष्ठा, ध्येयनिष्ठा, उपयुक्ततावादी, संयोजक, वस्तुनिष्ठता बाळगणारा, मार्गदर्शक, योजकता, तत्त्वज्ञ, शैक्षणिक कार्याचा खरा सूत्रधार, कष्टाळूवृत्ती, स्वसामर्थ्यांवर श्रद्धा व निष्ठा असणारा, यथार्थज्ञान देणारा, कर्तव्यतत्पर, विद्याभिरूची, व्यावसायिक गोपनीयता पाळणारा, तत्परता, व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण घेणारा, पात्रता संपादन, अस्मिता, व्यावसायिक मूल्य, भविष्याभ्यास, मितभाषित्व, गुणग्राहकता, सत्यनिष्ठा, निर्भीडपणा, तार्किकता, सेवा देणे, नीतितत्त्वे, विश्लेषक प्रवृत्ती, आचार-विचारात साधर्म्य, बदलत्या संकल्पनेबाबत विचार करण्याची क्षमता असणारा, कर्तव्य, सहकार्य, न्याय, नीती, समता, नियम व्यवस्थेचा आदर करणारा.

३. शिक्षक-प्रशिक्षकाची उत्कृष्ट कार्याप्रतिची गुणवैशिष्ट्ये

आशयज्ञान असणारा, आशय नियोजन करणारा, भाषा शुद्धता, लेखन शुद्धता, भाषा प्रभुत्व, ज्ञानाचा अद्ययावतपणा असणारा, भाषांचा परिचय, अध्ययन उद्दिष्टांची जाण असणारा, वाङ्मय व्यासंग, नाट्यीकरण, साहित्याचा अभ्यासक , अध्यापन तंत्राचे ज्ञान असणारा, साहित्याचा उपासक, भूगोलाचे अद्ययावत ज्ञान, आकृत्यांचे ज्ञान, प्रयोगशीलता, संशोधनवृत्ती, शैक्षणिक साहित्यांचा वापर, अध्यापनाची आवड,

श्रवण, भाषण, लेखनातील योग्यता, (मास्टरी ऑफ द इंग्लिश लँग्वेज) प्रोफेशियन्सी इन द इंग्लिश लँग्वेज, ग्रास ओव्हर द मेयड, लिपिंग अप प्रोफेशनली, प्रात्यक्षिक कौशल्याचे ज्ञान, प्रयोगाबाबत जागरूक माहिती, तंत्रज्ञानाचा स्त्रोत, स्थानिक इतिहासाचे ज्ञान, बुद्धिमत्ता असणारा, नीटनेटकेपणा, ज्ञानप्राप्ती, संधीची समानता मिळवून देणारा, ज्ञानपिपासू, स्वत:च्या सुप्तशक्तींचा योग्य अविष्कार करणारा , अंत:प्रवृत्तीची अभिव्यक्ती असणारा, कार्यकुशल, स्वाध्यायशीलता, अध्ययनशीलता, आत्मविश्वास, विचारक्षमता, अभ्यासुवृत्ती, लेखनकला असणारा.

४. शिक्षक-प्रशिक्षकाची समाजिक गुणवैशिष्ट्ये :-

आपल्या देशाची संस्कृती व त्याचा विकास घडवून आणण्याची तयारी असणारा, चांगले मानवी संबंध घडवून आणण्यासाठीचे तत्त्वज्ञान असणारा, शिक्षणातून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगती साधणारा, अद्ययावत प्रगतीचा परिचय, परंपरेला अनुकूल शैक्षणिक उद्दिष्टांची जाणीव ठेवणारा, शाळा समाज संबंध दृढ करणारा, व्यावसायिक अस्मिता राखणारा, कार्यक्रमांची आखणी करणारा व सुसंवादाचे कौशल्य, लोकशाही दृष्टिकोन, वैज्ञानिक पद्धतीने सामाजिक समस्या सोडविणारा. समाजनिष्ठा, मानवतावादी, सौंदर्याविष्कार, कलाविष्कार, संस्कृतिसंवर्धन, सामाजिक अभियंता, सकारात्मक नेतृत्व गुण, परिवर्तनवादी विचारसरणी, सत्यशोधक, सम्यक शिक्षण, विश्व बंधुत्वाची भावना, लोकहितवादी, राष्ट्रीय जागृती, प्रसिद्धीविन्मुखता, मृदुभाषी, विज्ञाननिष्ठा, अध्यात्मनिष्ठा, सदाचार, मानविसंस्कृतीचा विकास, आदर्शवाद, कल्पकता, समाजशास्त्रज्ञ, समाजहितदक्षता असणारा, राजकीय परिवर्तन, वैज्ञानिक परिवर्तन, व्यक्ती परिवर्तन, नैतिक परिवर्तन, धार्मिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन घडविणारा, सहज प्रेरणांचे नियमन करणे व उदात्तीकरण करणे, नागरिकत्वाचे शिक्षण देणारा, समंजसपणा, सूज्ञपणा, जीवनध्येयनिष्ठा, उत्सुकता, जिज्ञासा, संघप्रवृत्ती, निर्व्यसनी, व्यक्तीच्या प्रतिष्ठेविषयी जाणीव, राष्ट्रीय संपत्तीच्या महत्त्वांची जाणीव, निरीक्षणक्षमता, अवधान क्षमता, मर्मदृष्टी, दूरदृष्टी, शिस्तबद्ध वर्तन, समाजशीलतेची जाणीव, व्यवसाय अभिवृत्ती, समायोजनक्षमता, एकात्मिकरण

क्षमता, चालू घडामोडींचे ज्ञान, नागरी कर्तव्याची जाणीव, वैश्विक धर्म, साम्यवादी विचार असणारा.

५.शिक्षक-प्रशिक्षकाची नैतिक मूल्य संदर्भात गुणवैशिष्ट्ये

मातृभाषेचा अभिमान , गाभा तत्त्वांची माहिती असणारा, आंतरराष्ट्रीय सामंजस्याची जाणीव असणारा, वैज्ञानिक पद्धतीने तर्क व विचारकरणारा, सहिष्णुता, राष्ट्राभिमान, परस्परावलंबित्वाची जाणीव, भयमुक्तता, चारित्र्यसंपन्नता, सद्विचार व नैतिक गुणांची प्राप्ती, निस्वार्थी, सत्यप्रिय, लोकशाही जीवननिष्ठा, मूल्याधिष्ठितता, संस्कृती संवर्धन, स्वनियंत्रण व स्वार्थत्याग, आत्मसंयम, आदरभाव, आध्यात्मिक द्रष्टेपणा, क्षमाशीलता, सहनशीलता, शीलसंवर्धन स्थितप्रज्ञ वृत्ती, अनासक्त जीवनप्रणाली, सदाचार संपन्नता, प्रामाणिकता, त्याग, सेवा, सहानुभूती, श्रद्धा, सद्गुणी, सारासारविवेक, सत्यता, वक्तशीरपणा, सोशिकता, शुचिता, सचोटी, स्वाभिमान, निर्भयता, मानवी हक्कांबाबत आदरभाव, करारीपणा, परधर्मसहिष्णुता, संयम, शांती, शील, त्याग, क्षमा, सेवा, प्रेम, बंधुत्त्व जोपासणारा.

१.२.८ शिक्षक-शिक्षणातील व्यावसायिक विकास

व्यवसाय म्हणजे शिक्षणाचा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर एखाद्या विशिष्ट व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन पारंगत होऊन व्यवसाय करणे होय. व्यवसाय या शब्दात व्यवसायाशी बांधीलकी, एकनिष्ठता, प्रामाणिकपणा या बाबींचा समावेश होतो.

१. खालील प्रमाणे शिक्षक-शिक्षणातील व्यावसायिक विकासच्या काही व्याख्या आहेत.

१. **वेबस्टरचे न्यु वर्ड डिक्शनरी** : 'व्यवसायामध्ये काही उदात्त कला किंवा विज्ञान याबाबतचे अद्ययावत प्रशिक्षण आवश्यक असून त्यामध्ये बौद्धिक कार्यापेक्षा हस्तकौशल्य समाविष्ट असतात जसे अध्यापन,स्थापत्यशास्त्र आणि लेखन इत्यादी.'

"A profession is a vocation or occupation requiring advanced training in some liberal art or science and usually involving mental rather than manual work as teaching engineering and writing etc.[25]" **Webster's New World Dictionary of true American Language.**

2."A professional occupation requires a long training, involves theoryas background to practice, has its own code of behavior and a high degree of autonomy" **Dean (1991)**

3." Profession is a relationship between ignorant client and an expert practitioner" **T.H.Marshal**

4." As Profession is not simply a collection of individual who gets lining for themselves by the same kind of work ,not is it a merely group which is organized exclusively to the economic protection of its members, through that is normally among its purposes .its essence it that it assumes certain responsibilities for the competence of its members or the quality of its waves, and that is deliberately prohibits certain kinds of conduct on the grounds that though they may be profitable to the individual they are calculated to bring into disrepute the organization to which its beings". **R.H.Towney**

२. विविध स्तरावर शिक्षकांच्या व्यवसायिक तयारीची गरज [२६]

१. **बौद्धिक उद्दिष्टे** (Cognitive Objective)

२. **कार्य उद्दिष्टे** (Performance Objective)

३. **आनुगिषंक उद्दिष्टे** (Consequences Objective)

४. **भावात्मक उद्दिष्टे** (Affective Objective)

अ. अद्ययावत ज्ञानसंपादन

ब. विद्यार्थ्यांचा विकास

क. ध्यापनशास्त्रातील आधुनिक तंत्राचा वापर

इ. शिक्षकांचा व्यवसायिक विकास

५. सामाजिक बांधीलकी

३. व्यवसायाची वैशिष्ट्ये [२७]

१. व्यवसायाला समाजिक बांधीलकी असते.

२. व्यवसायाचे मुख्य प्रयोजन मानवी घटकांना सेवा पुरविणे.

३. सेवा पुरवितांना विधायक दृष्टिकोन ठेवणे.

४. एका विशिष्ट मानवी गरजेवर सेवा केंद्रित झालेली असते.

५. व्यवसायाचे सेवाकार्य हे विशिष्ट ज्ञान व कौशल्यावर आधारित असते.

६. व्यवसायिकांना त्यांच्या सेवाकार्यात निर्णय घेण्याची स्वायत्तता असते.

७. व्यवसायाच्या नीतितत्त्वांचे पालन करावे लागते.

८. व्यवसाय समूहाशी जोडलेला असावा लागतो.

'अध्यापन' हा एक व्यवसाय म्हणत असताना डोळ्यासमोर अनेक व्यवसाय येतात; परंतु अध्यापन या पेशाची इतर व्यवसायाशी तुलना करताच येणार नाही. कारण हा व्यवसाय अत्यंत निरलसपणे केला जातो. याची व्याप्ती फार मोठी आहे. अमर्याद आहे. यात खऱ्या अर्थाने कुठल्याच अपेक्षा नाहीत. हा केवळ व्यवसाय नाही तर ही एक वृत्ती आहे. त्यामुळे व्यावसायिक बांधीलकीचे सर्वच नियम या अध्यापन पेशाला लागू पडतील असे नाही. कारण ती नुसती वृत्तीच नसून आजीवन चालणारी प्रक्रिया आहे.

प्रत्येक व्यवसायाला सकारात्मक व नकारात्मक बाजू असतात. व्यक्ती आपण करत असेल्या कामाकडे किंवा व्यवसायाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहते हे त्या व्यक्तीच्या अपेक्षा, मूल्ये, अभिरूची आणि अभिवृत्ती यावर अवलंबून असते. व्यक्तीला आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ असणे गरजेचे असते. आपण जो व्यवसाय करतो त्या व्यवसायाशी बांधील असणे गरजेचे असते.

१.२.९ व्यावसायिक बांधीलकी

व्यावसायिक बांधीलकीच्या काही व्याख्या खालील प्रमाणे आहेत

१. बांधीलकीची व्याख्या : 'एखादी गोष्ट महत्त्वाची आहे किंवा योग्य आहे यावर

तुमचा विश्वास असल्यामुळे तिच्याकडे जास्त लक्ष देण्याची किंवा तिच्यावर जास्त वेळ खर्च करण्याची असलेली तुमची तयारी म्हणजे बांधीलकी'

"Being Prepared to give a lot of your time and attention to something because your believe it is right or important"[28]

२.'एखादी गोष्ट करण्याचे दिलेले वचन किंवा दिलेली सहमती, आश्वासन; म्हणजे बांधीलकी' "A promise or agreement to do something;a responsibility."[29]

३. एस.के.राव यांच्या मते, "परिणामकारक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, यासाठी योग्य वातावरण निर्मिती व ती प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी शिक्षकाची आपल्या व्यवसायावर निष्ठा असणे यालाच व्यावसायिक बांधीलकी असे म्हणतात."

४. पी.आर.शर्मा यांच्या मते, "शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या कामगिरीचे स्वरूप, निष्ठा यातून वक्त होणारे व्यावसायिक अंग म्हणजे बांधीलकी होय."

५. शिक्षणतज्ज्ञ मॅग्डुगल यांच्या मते, "भावनिक अनुभवाला सहजप्रवृत्तीचा गाभा म्हटले आहे. ते शिक्षकांच्या बांधीलकीच्या दृष्टिकोनातून योग्यच आहे. "

6. According to the Cambridge International Dictionary of English (1995)[30], "It is a means to promise or give your loyalty or money to particular principle, person or plan of action. Commitment depicts the stiff and not changing point of reference in support of one's belief in his/her ideology."

7. According to Lodahl and Kejner (1965) "Professional commitment is the degree to which a person's work performance affects his self-esteem".

8. According to Salancki (1978), "the concept of commitment is attitudinal in nature. It reflects how much closeness an individual feels with his organization or

relationship."

9. **Morrow and Goetz (1988) defined professional commitment as** "The extent to which one identifies with one's profession and accepts its values".

10. **Whereas according to Morrowand Wirth (1989)** "Professional commitment can be defined as apsychological state that includes an individual's belief in and acceptance of the value of his or her chosen job, and a willingness to maintain membership in that job."

11. **O'Reilly (1991) said** "Commitment is typically conceived of as an individual's psychological bond to the organization including a sense of job-involvement, loyalty and belief in the values of the organization."

12. **According to Dave (1998),** "Well-trained and effective teachers are those who are both competent as well as committed professional practitioners." According to him "there are following five commitment areas of a teacher, (i) Commitment to the learner, (ii) Commitment to the society, (iii) Commitment to the profession, (iv) Commitment to achieve excellence, (v) Commitment to basic human values."

13. **Mariados (2000) explained that** "Commitment is a deep and profound value of emotional intelligence. It means aligning with the goals of a group or organization and applying oneself completely for a cause."

'ज्ञानम् मनुजस्य तृतीय नेत्रम्' अर्थात् ज्ञान हा मानवाचा तिसरा डोळा आहे. आज २१ व्या शतकात उत्तम नागरिक निर्माण करण्याची महत्त्वाची जबाबदारी शिक्षकाची आणि पर्यायाने शिक्षक-प्रशिक्षकांची आहे. म्हणून शिक्षक-प्रशिक्षकाची व्यावसायिक बांधीलकी उच्च असावी अशी समाजाची अपेक्षा असते. शिक्षकाने व्यवसायात येताच विश्वबंधुत्वाची व्यापक शिकवण देणाऱ्या भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगावा. पाश्चात्त्य ज्ञान, कल्पना शक्ती, भारतीय विकासासाठी उपयुक्त असल्या तरीदेखील शिक्षकाने आपल्या समाजासाठी आपल्या अंतरंगातून नवनिर्मिती

करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. वक्तशीरपणा, संवेदनशीलता, नीटनेटकेपणा, स्त्री-पुरूष समानता, श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रभक्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता आणि सौजन्यशीलता या प्रमुख मूल्यांच्या आधारे अध्यापकास समाजाची सांस्कृतिक जडणघडण करता येईल. ही सर्व मूल्ये संवर्धित करण्याचे कार्य शिक्षकच करू शकतात. यासाठी 'एन.सी.टी.ई' ने व्यावसायिक बांधीलकीला महत्त्व दिले आहे. 'एन.सी.टी.ई.' ने खालील प्रमाणे बांधीलकीचे प्रकार दिलेले आहेत.[३१]

१) विद्यार्थ्यांच्या प्रति असलेली बांधीलकी .

२) समाजाच्या प्रति असलेली बांधीलकी .

३) व्यवसायाच्या प्रति असलेली बांधीलकी .

४) श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकी .

५) जुनी मानवी मूल्ये यांच्या प्रति असलेली बांधीलकी .

१.२.९.१ विद्यार्थ्यांच्याप्रति असलेली बांधीलकी

शिक्षकांच्या सुरक्षित हाताखाली तयार होणे हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आनंददायक, समाधानकारक अनुभव आहे.

उत्तम अध्यापन हे वर्गातील सहकार्य आणि शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील प्रभावी आंतरक्रियांचा परिपाक असतो. शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशित प्रशिक्षणार्थी 'उदयाचे शिक्षक' म्हणून काम करणारे असतात. त्यामुळे भावी शिक्षक निष्ठावान असावा याचा सतत विचार करून त्या निष्ठा निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांशी बांधीलकी असावी लागते. शाळा, महाविद्यालयात किंवा घरी सतत विद्यार्थ्यांच्या विकासाचा विचार समर्पित भावनेने करणे म्हणजे विद्यार्थी बांधीलकी होय.

विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांच्या भावनांची दखल, त्यांच्या विकासाची ओढ आणि सहकार्याची उर्मी या सर्व गोष्टी मनापासून करणे म्हणजे विद्यार्थ्यांविषयी बांधीलकी होय.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे, मानवजातीला घडविणारा शिल्पकार आहे. सुसंस्कारित मन घडविणारा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकाने जर आपले कार्य समर्पित भावनेने केले नाही तर त्याला बांधीलकी म्हणता येणार नाही.

विद्यार्थ्यांवरील प्रेम, अडचणीच्या वेळी त्यांना मदत करावयाची तत्परता, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड इत्यादी गोष्टींमधून विद्यार्थ्यांशी असलेली बांधीलकी व्यक्त होते. विद्यार्थी अध्ययनास प्रवृत्त होणे म्हणजे यशस्वी अध्यापन होय. विद्यार्थी अध्ययनानुकूल होऊन त्याचा विकास होईल तर शिक्षकांचे शिक्षक म्हणून अस्तित्व लक्षात राहील. अध्ययन ही एक वृत्ती आहे. शालेय जीवनातच ही वृत्ती विकसित होते. आयुष्यभर ती पुरते, टिकून राहते. विद्यार्थी असणे ही आनंददायी प्रक्रिया आहे असे विद्यार्थ्याला वाटले तरच त्याची अध्ययनवृत्ती टिकून राहील. अध्ययनवृत्ती वाढेल हा आनंद केवळ विद्यार्थ्यालाच मिळतो असे नाही तर शिक्षकालाही तो प्राप्त होतो. आपण शिक्षकांच्या सान्निध्यात सुरक्षित आहोत याची जाणीव विद्यार्थ्याला होत असते. शिक्षकाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थी-बांधीलकी म्हणजे विद्यार्थी प्रेम, विद्यार्थ्यांच्या चुका आणि खोड्या याबाबत सहिष्णुवृत्ती, त्यांच्या प्रगतीबाबत शिक्षकाची असलेली बांधीलकी, अध्यापनशास्त्राच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या वर्तनाची जाण आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरील त्यांच्या जीवनाचा उच्चतम दर्जा निश्चित होत असतो. शिक्षकाची भूमिका या बांधीलकीमुळे अधिक प्रभावी होत जाते.

शिक्षक-प्रशिक्षणात शैक्षणिक मानसशास्त्राचा समावेश आहे. विद्यार्थ्यांबद्दल जिव्हाळा आणि सहिष्णुवृत्ती यांचा संबंध शैक्षणिक मानसशास्त्राच्या अध्यापनाशी आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकाने सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षकांची ही विद्यार्थी विकास-निष्ठा शिक्षकाच्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान प्रदान करते. विद्यार्थ्यांशी शिक्षकांचे वर्तन आक्रमक असेल तर अशा शिक्षकांनी आपल्या आक्रमक वर्तनाचे पृथःकरण करावे, चिंतन करावे त्यातून नक्कीच त्यांना सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून चांगला मार्ग सापडेल.

विद्यार्थ्यांबाबत आत्मीयता असणारा, प्रत्येकाचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती असणारा, अध्ययनार्थ्यांमधील व्यक्तिभेद ओळखून त्यांना आपला विकास करण्याची

संधी उपलब्ध करून देणारा शिक्षकच विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणण्यास बांधील असतो, वचनबद्ध असतो. शिक्षकामध्ये सहिष्णुता असेल तर तो आपल्या विद्यार्थ्यांशी सहिष्णुतेने वागेल आणि आपल्या स्वत:च्या अशा वर्तनातून नकळत त्यांच्यावर मूल्यसंस्कार करू शकेल.

'NCTE' च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकांची अध्ययनार्थ्यांच्या संदर्भात असलेली बांधीलकी पुढील मुद्यांद्वारे मांडण्यात आली.[३२]

१. अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनविषयक गरजा भागविण्यासाठी त्यांच्याशी प्रेमाने आणि संवेदनशीलतेने वागणारा.

२. प्रत्येक अध्ययनार्थ्यांची वैयक्तिक ओळख करून घेऊन त्याच्या गरजेनुसार त्याच्याकडे वैयक्तिक लक्ष पुरवून अध्ययनास प्रोत्साहन देणारा.

३. अध्ययनार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांची बौद्धिक क्षमता, महत्त्वाकांक्षा, भावना आणि स्वभाव यांची ओळख करून घेणारा.

४. अध्यापक व अध्ययनार्थ्यांमध्ये विश्वासाचे नाते प्रस्थापित करणारा.

५. स्वयंविकास साधण्यासाठी विद्यार्थ्यांशी असलेले नाते आणि वागणूक/आंतरक्रिया याबाबत स्वमूल्यमापन करणारा आणि सुधारणेसाठी आवश्यक ते प्रत्याभरण घेणारा.

६. अध्ययनार्थ्यांच्या खोड्या आणि चेष्टा यांकडे दुर्लक्ष करून त्यांना विषयाचे ज्ञान करून घेण्यास मदत करणारा.

७. अध्ययनार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची रूजवणुक करणारा.

८. अध्ययनार्थ्यांची प्रगती आणि मनुष्यबळ विकास यासाठी कार्यरत असणारा.

९. अध्ययनार्थ्यांमध्ये "अध्ययन म्हणजे आनंददायी कृती" (Learning is a joyful activity) ही संकल्पना रुजविणारा.

अशा सर्व क्षमता असणारा शिक्षक आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहून अध्ययनार्थ्यांचा विकास हे ध्येय साध्य करतो. अध्ययनार्थ्यांबाबत असलेली बांधीलकी शिक्षकाचे मूल्यमापन करण्यास सहाय्यक ठरते.

१.२.९.२ समाजाप्रति बांधीलकी

शिक्षकाला समाज बांधीलकीचे, समाजाच्या जडणघडणीचे काम करावयाचे असते. ''If you educate a boy, you educate one individual. If you educate a girl you educate the family and if you educate a teacher, you educate the whole community. ''[33]

सामाजिक बांधीलकीची जाण असणारा शिक्षक तयार केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य संवेदना तो निर्माण करू शकेल. त्यामुळे सामाजिक बांधीलकीची खरी भावना निर्माण होऊ शकेल.

समाजातील विविध कुटुंबाचा प्रगतीतील असलेला सहभाग, समाजाच्या व देशाच्या विकास कार्यातील सक्रिय सहभागातून सामाजिक बांधीलकीचे दर्शन घडते.

समाजाच्या अपेक्षापूर्तीसाठी शाळा असतात. समाजाच्या गरजा व अपेक्षांप्रमाणे शाळांमध्ये अभ्यासक्रम व अभ्यासेतर उपक्रम राबविले जातात. शाळेने पालकांशी संपर्क ठेवल्याने त्यांच्या गरजा व अपेक्षा कळत असतात. समाजाच्या, पालकांच्या समस्या कळाव्यात यासाठी पालक-शिक्षक संघाची स्थापना सर्वत्र केली आहे. समाजाकडूनच अनेकदा भौतिक साधनसंपत्तीसाठी मदत मिळत असते तसेच अनेक कार्यक्रम, उपक्रमांमधून सहभाग आणि सहकार्य मिळत असते. समाजाशी जेवढी बांधीलकी असेल तेवढी शाळा प्रगतीपथावर जाते.

स्थानिक समाजाचे अंतरंग शिक्षकाला जाणून घेता आले पाहिजे. विद्यार्थी, कुटुंब, स्थानिक समाज आणि व्यापक समाज यांच्या विकासासाठी शिक्षकाला समाजाशी बांधीलकी ठेवणे गरजेचे, समाजनिष्ठ कार्यक्षमतेचा उपयोग करून समाजहिताची कामे करता येतील. स्थानिक समाजाशी आपला वैयक्तिक आणि सामूहिक संबंध असतो. आपण त्या समाजाशी बांधील असतो याची जाणीव शिक्षकांना असावी. भूतकाळात ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला, जे शिक्षणापासून वंचित राहिले त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मुलामुलींकडे विशेष लक्ष देऊन विविध योजनांचा लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी त्यांना पुरेपूर मदत करणे शिक्षकांचे आद्यकर्तव्य आहे. शिक्षित समाजाच्या रांगेत बसण्यासाठी अशा वंचित घटकांना उद्युक्त केल्याने

त्यांचाच फायदा होईल असे नाही तर संपूर्ण समाजाचे हित होऊन समाज विकसित अवस्थाकडे झेप घेईल. सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी आणि उंचावण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्यांचा व अभिवृत्तींचा चांगला उपयोग करून घेता येईल.शिक्षणापासून वंचित समाजातील प्रौढांना प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे.

शिक्षकांची सामाजिक बांधीलकी विद्यार्थ्यांमध्ये समतेची भावना निर्माण करणारी ठरावी. हे विद्यार्थी निरक्षर व दरिद्री पालकांची असतील तरीही त्यांना शिक्षण आपले वाटले पाहिजे. समाजाचा सहभाग असेल तर पटनोंदणीची प्रक्रिया यशस्वी होईल. समाजनिष्ठ शिक्षक समाजाच्या सर्व घटकांमध्ये आपुलकीचे वातावरण निर्माण करू शकेल. ज्या समाजात शिक्षक काम करीत असेल त्या समाजात मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ म्हणून त्याला सन्मानाने स्थान प्राप्त होते. संपूर्ण समाजासाठी शिक्षकाचा दृष्टिकोन विधायक असेल तर समाज त्याचे कौतुक करतो. स्थानिक समाजनिष्ठेचे परिवर्तन विशाल व व्यापक समाजनिष्ठेत होणे गरजेचे आहे.

शिक्षकांना राष्ट्राचे शिल्पकार म्हटले जाते. शिल्पकाराची भूमिका पार पाडण्यासाठी शिक्षक-शिक्षणाच्या, प्रशिक्षणाच्या कालावधीतच समाजनिष्ठेची रूजवणूक विद्यार्थी शिक्षकांमध्ये झाली पाहिजे. हे प्रशिक्षणार्थीच समाजविकासाठी भविष्यात अर्थपूर्ण काम करू शकतील. विद्यार्थ्यांच्या, शाळेच्या विकासात पालकांचे सहकार्य, योगदान महत्त्वाचे ठरते. पालकांशी पर्यायाने समाजाशी संपर्क साधून शाळा विकासाच्या विविध योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करता येईल.

शिक्षण आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण समाजाच्या सहयोगाने शिक्षणाचे कार्य चालते. तर समाजाचा विकास शिक्षणातून होतो. अध्यापक हा शिक्षण प्रक्रियेतील विद्वान घटक असल्यामुळे तो समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शकतो. शिक्षकाने सामाजिक प्रक्रिया समजून घेऊन सामाजिक विकासात आपले योगदान देणे अपेक्षित असते. समाजाचा एक घटक म्हणून शिक्षकाला समाजाविषयी आपुलकी असेल सामाजिक प्रक्रियांबाबत आदर असेल तर तो सामाजिक विकास करण्यास सक्षम करू शकेल.

'NCTE' च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकांची समाजाप्रति असलेली बांधीलकी पुढील मुद्यांद्वारे मांडण्यात आली.[३४]

१. शाळा, महाविद्यालय आणि समाज यात आंतरक्रिया प्रस्थापित करणारा.

२. समाजातील साधनस्त्रोतांचा उपयोग करून शिक्षणाचा विकास आणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विकास साधणारा.

३. समाजातील समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी स्वत:चे योगदान देणारा.

४. अध्ययनार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळा आणि समाज यांच्यात सामंजस्यपूर्ण संबंध निर्माण करणारा.

५. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा कोणत्याही बाबतीत भेदभाव न करता समाजामध्ये आणि अध्ययनार्थ्यांमध्ये समानतेची भावना निर्माण करणारा.

६. समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या उन्नतीची काळजी घेणारा.

७. समाजाचा उत्तम मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि वर्तन असणारा.

८. समाजाप्रति जबाबदारी असणारा.

९. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, बालमजुरी यांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करून समाजाचा विकास करणारा.

१०. स्थानिक समाजाच्या आणि शाळेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविणारा.

११. पर्यावरण संरक्षणासाठी समाजाला मदत करणारा. असे समाजाप्रति वर्तन असणारा शिक्षक आपल्या व्यवसायात प्रभावी होतो आणि समाजात आपली उच्च प्रतिमा निर्माण करतो.

१.२.९.३ व्यावसायिक बांधीलकी

भारतात अध्यापन हा व्यवसाय एक उमदा व्यवसाय समजला जातो. शिक्षकाला समाजात मानाचे स्थान आहे. बांधीलकीच्या या क्षेत्रात दोन घटक महत्त्वपूर्ण ठरतात.

अ) स्वत:च्या व्यवसायाचा अभिमान

ब) व्यावसायिक विकासाची प्रबळ इच्छा

कुठलाही व्यवसाय निष्ठापूर्वक करणे त्यात बाजारूपणा येऊन देणे, हीच व्यावसायिक बांधीलकी होय. शिक्षकी व्यवसायामध्ये सतत वाचन, लेखन, शोधन व ज्ञानाचा शोध या गोष्टी सातत्याने कराव्या लागतात. व्यवसायातील आचारसंहिता, नैतिकता, मूल्ये यातूनच व्यावसायिक बांधीलकी निर्माण होते. शिक्षकी व्यवसायात पावित्र्य, प्रामाणिकपणा, तत्परता, जबाबदारीची जाण, विद्यार्थ्यांविषयी आस्था, सहकार्य, वर्तननियमांवर निष्ठा या सर्व गोष्टींचा समावेश असेल तर व्यावसायिक बांधीलकी आपोआपच निर्माण होते.

शिक्षकी व्यवसायाचे तात्त्विक आणि व्यावसायिक गुणवैशिष्ट्यांच्या संदर्भात समन्वय साधला जात असेल तर त्यातून व्यावसायिक बांधीलकी निर्माण होते. प्रत्येक शिक्षक पूर्ण सामर्थ्यशाली गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी बांधीलकी जपणारा, निर्णय प्रक्रियेत स्वायत्ततेची मागणी करणारा, आशयज्ञानावर पूर्ण प्रभुत्व असणारा, अध्यापन कौशल्य असलेला, विकासाची कास धरणारा असेल तर व्यावसायिक बांधीलकी अधिक यशस्वी ठरेल.

व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रामध्ये दोन घटक :

अ) अध्यापन व्यवसायात असण्याचा सार्थ अभिमान,

ब) व्यावसायिक विकासाची तीव्र तळमळ

वास्तविक: 'शिक्षकी व्यवसाय' हा एक 'उदात्त व्यवसाय' आहे. सर्वात पवित्र व पुण्यकर्माचा व्यवसाय आहे. समाज आपल्या हाती मुलांना सोपवितो. हे करीत असताना समाजाचा फार मोठा विश्वास शिक्षकांवर असतो. ही फार मोठी जबाबदारी समाजाने आपल्यावर सोपविलेली आहे याची जाणीव शिक्षकांना असावयास हवी. अध्ययनातील मूलतत्त्व शिकविणे हा शिक्षकांच्या कर्तव्यातील एक भाग झाला; परंतु हे कर्तव्य मर्यादित स्वरूपाचे असते. शिक्षकांनी समाजाच्या प्रगतीसाठी संपूर्णपणे गुंतून जाणे, समाजाशी एकरूप होणे हे व्यापक स्वरूपाचे कार्य आहे ते शिक्षकांनी स्वीकारावे. आपल्या सहकाऱ्यांबरोबर जुळवून घेण्याची व कार्य करण्याची क्षमता, सहकार्य भावना आणि एकता प्रस्थापित करण्याची क्षमता, विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शिक्षकांचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न, आपल्या विषयावर

प्रभुत्व, प्रभावी अध्यापन, मानवी संबंध हाताळण्याचे कौशल्य या सर्व बाबी शिक्षकाच्या व्यवसायनिष्ठेचे निदर्शक आहेत.

'NCTE 'च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकाच्या आपल्या व्यवसायाप्रति असलेल्या बांधीलकी नमूद केल्या आहेत.[३५]

१. अध्यापन हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे. त्याचा सार्थ अभिमान बाळगणे आणि व्यावसायिक विकास करणे.
२. अध्यापन व्यवसायाला आणि शिक्षकांच्या प्रतिमेला बाधा आणणारे घटक ओळखून त्यांचा बिमोड करण्यासाठी प्रयत्न करणारा.
३. अध्ययनार्थ्यांना अध्ययनासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि समाजाला उत्तम नागरिक पुरविण्यासाठी स्वत:चा आत्मविश्वास वाढवून व्यावसायिक कार्य पार पाडणे.
४. अभ्यासपूरक आणि अभ्यासेतर कार्यक्रमांचे आयोजन करणे त्यात सक्रिय सहभाग घेणे.
५. संस्थेच्या परिणामकारकतेसाठी विविध उपयांचा अवलंब करणे.
६. व्यावसायिक नीतिमत्ता आणि आचारसंहितेचे पालन करणे.
७. व्यवसायाप्रति एकनिष्ठ राहून शिक्षणाचे ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे.
८. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि व्यावसायिक विकास साधण्यासाठी विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, चर्चा यामध्ये सहभागी होणे.

१.२.९.४ श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकी

व्यावसायिक दृष्ट्या बांधिल असलेला शिक्षक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतो. अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान शिक्षकांमध्ये त्यांची व्यक्तिगत आणि व्यावसायिक बांधीलकी दृढ केली जाऊ शकते.

"शाळा/महाविद्यालय, वर्ग आणि समाजात वावरताना त्यांच्याविषयी आस्था वाटणे आणि जे काही करीत ते सर्वोत्कृष्टच असेल या जिद्दीने केलेली कृती म्हणजेच सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी होय." [३६]

व्यवसायनिष्ठ शिक्षक ज्ञान आणि उत्कृष्टता यांचा सुरेख संगम साधणारा असतो. आपल्या विद्यार्थ्यांनीही ज्ञान प्रेमी व उत्कृष्टतेची आवड यांचा ध्यास घ्यावा असे शिक्षकाला वाटते. ज्ञान संपादन, ज्ञान संक्रमण याविषयी शिक्षक या नात्याने उत्कृष्ट तेच आपण साध्य करू असे त्याला वाटते. शब्द आणि कृती यात सुसंगतता असते. या दोहोंद्वारे तो सर्वोत्कृष्टतेपर्यंत जाण्याचा प्रयत्न करतो. अध्ययन-अध्यापन कार्यक्रमात दिवसेंदिवस अधिकाधिक चांगले क से होता येईल अशी विचारसरणी असावी. शिक्षक-शिक्षणातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये ज्ञान आणि उत्कृष्टता यांबद्दल प्रेम निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षकाची व्यावसायिक आणि वैयक्तिक संस्कृती म्हणजे प्रेम होय.

शिक्षक-प्रशिक्षणातून सर्वोत्कृष्टतेचा ध्यास असणारे गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊ शकणारेच शिक्षक तयार होतील असे प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी नवनवीन प्रयोग आणि उपक्रमांना शास्त्रीय बैठक देणे अपेक्षित आहे. 'परस्पर सहकार्यातून गुणवत्तेकडे' हे तत्त्व स्वीकारून क्षमताधिष्ठित, उत्कृष्ट कामगिरी करू शकणारे व बांधीलकी जपणारे शिक्षक तयार झाल्यास गुणवत्तेची हमी प्रत्यक्षात साकारेल. शिक्षक-प्रशिक्षणातील साचेबंदपणा व परंपरागत स्वरूप बदलणे आवश्यक आहे. आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कल्पनेतील इ. स. २०२० चा सामर्थ्यशाली भारत निर्माण करावयाचा असेल तर शिक्षक-प्रशिक्षणामध्ये सर्वोत्कृष्टतेचा ध्यास घेतलेले, ध्येयाने वेडे झालेले शिक्षकच हे काम करू शकतील.

समाज, अध्ययनार्थी यांच्यासाठी शिक्षक हा ज्ञानाचा स्त्रोत असतो. शिक्षकाने आपली ही प्रतिमा कायम देऊन आपला व्यवसाय उत्कृष्टपणे करण्यासाठी सातत्याने अध्ययनार्थी असावे. यासाठी शिक्षकाने अध्यापन व्यवस्थेसाठी आवश्यक असणारी मूल्ये, क्षमता गुणवैशिष्ट्ये आणि कौशल्ये प्राप्त करून आपली ज्ञानाचा स्त्रोत ही प्रतिमा कायम टिकवावी. ज्ञानाचे संक्रमण हे केवळ शब्दांनी होत नाही तर त्यासाठी कृती, वर्तन आणि चारित्र्य यांचीही आवश्यकता असते. शिक्षकांनी आपली उक्ती आणि कृती यात साम्य ठेऊन कार्य करावे. व्यावयायिक उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी शिक्षकाने एक वचन नेहमी लक्षात ठेवावे. "There is better way to do than what I have

done today"[22] हे वचन एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून अंमलात आणल्यास व्यवसायाची उत्कृष्ट पातळी गाठता येईल.

'NCTE 'च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकाच्या श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकी नमूद केल्या आहेत.[३७]

१. आपल्या व्यवसायाला उत्कृष्टता प्रदान करण्यासाठी आणि शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी उच्च ज्ञान मिळविणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

२. आदर्श अध्यापक होण्यासाठी केवळ शब्दांची नव्हे तर कृती, वर्तन आणि चारित्र्याची आवश्यकता असते. उत्तम चारित्र्य व वर्तन आणि उत्कृष्ट कृती या माध्यमांतून व्यावसायिक उत्कृष्टता गाठता येते.

३. ज्ञानी समाजाचा मार्गदर्शक, तत्त्वज्ञ व मित्र म्हणून कार्य करण्यासाठी उत्तम माणूस होण्यासाठी प्रयत्न करावा.

४. आपल्या कार्याप्रति प्रामाणिकपणा असावा. सचोटीने आपले कार्य पूर्ण करावे.

५. सर्व अध्ययनार्थी सर्व विषयांमध्ये उत्कृष्टता प्राप्त करतील याबाबतची जाणीव असावी. त्यासाठी हेतुपुरस्सर प्रयत्न करावेत.

६. कृतिसंशोधन कार्याच्या माध्यमातून नवनवीन अध्यापन पद्धतींची आणि शैक्षणिक साधनांची निर्मिती तसेच उपयुक्तता तपासणे.

७. प्रत्येक कृती उत्कृष्ट करण्याची सवय स्वत:ला लावून घ्यावी.

८. कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले आणि अध्ययन अकार्यक्षम असलेले अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन कृतींचा संच तयार करावा. त्याद्वारे अध्यापन उत्कृष्टता प्राप्त करावी.

१.२.३.५ जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकी

भारतीय संविधानात नमूद केलेली आणि मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांच्याशी निगडीत असणारी मूल्ये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केलेली दहा गाभाभूत घटक आणि मूल्ये अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित झालेली आहेत. ती मूल्य आचार विचारातून, वागण्या बोलण्यातून सतत प्रतिबिंबित झाली पाहिजे कारण मूल्ये ही मुद्दाम

शिकविली जात नाही. आपली जर मूल्यांशी बांधीलकी असेल तर विद्यार्थी शिक्षकांच्या प्रत्येक कृतीच्या अनुकरणातून गाभामूल्ये जोपासण्याचा प्रयत्न करतात. शिक्षकाने वर्गात, शाळेत व सर्वत्र मूल्याधिष्ठित वातावरण निर्माण केले पाहिजे. मूल्यनिष्ठा असेल, मूल्यांविषयी बांधीलकी असेल तरच हे शक्य आहे. कोठारी शिक्षण आयोगाचेही 'वर्गावर्गातून चारित्र्याची निर्मिती होत असते' असे मत मांडलेले आहे. मूल्याधिष्ठित बांधीलकी ही केवळ प्राचार्यांनी जपून चालणार नाही. तर संबंधित सर्वच घटक जागरूक असले पाहिजे. विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यवस्थापकीय मंडळ, परिसरातील लोक, संस्था या सगळ्यांची मूल्यांविषयी बांधीलकी असावी.

प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी हा शिक्षण-प्रशिक्षणातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. या घटकाशी प्राचार्य व प्राध्यापकांचे संबंध कशा प्रकारे आहेत यावर शैक्षणिक वातावरण अवलंबून असते. प्रशिक्षणार्थ्यांचे अध्यापन गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी बांधीलकी महत्त्वाची असते. अध्ययन-अध्यापन महत्त्वाची प्रक्रिया आहे असा संदेश प्राचार्यांच्या मार्फत विद्यार्थी, प्राध्यापकांना सतत पोहोचणे गरजेचे असते. अध्यापन कार्यासंबंधी प्रशिक्षणार्थींच्या गरजा, आकांक्षा समजून घेतल्या पाहिजे. सतत वाचन, अभ्यास यातून बौद्धिकदृष्ट्या ताजेपणा ठेवता आला पाहिजे. प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यातील घडणारी आंतरक्रिया विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारी व विकासाला कारणीभूत ठरणारी असावी.

नि:पक्षपातीपणा, वस्तुनिष्ठता, बौद्धिक प्रामाणिकपणा, राष्ट्रनिष्ठा इत्यादी व्यावसायिक मूल्यांचे सातत्याने प्रकटीकरण होणे म्हणजे मूल्यांविषयी बांधीलकी जपणे होय. आधुनिक युगातील ढासळत्या मूल्यमापनाच्या काळात शिक्षकांची मूल्यनिष्ठा ही इतर निष्ठांप्रमाणेच महत्त्वाची आहे. मूल्यव्यवस्था ही नेहमीच दिशादर्शकाचे काम करते. कसे वागावे, काय करावे हे ही मूल्यव्यवस्था शिकविते. प्रामाणिकपणा, सहकार्य, प्रेम, सत्य, वस्तुनिष्ठता, नियमितपणा, वक्तशीरपणा या सर्वमान्य मूल्यांचा स्वीकार शिक्षकांनी करावा. त्यांच्या भूमिकेतून ही मूल्य व्यक्त व्हावीत अशी अपेक्षा असते. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनांवर या मूल्यांचा स्वीकार व्हावा. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अविभाज्य अंग म्हणजे ही मानवी मूल्ये होत.

वर्तन परिवर्तन हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या वर्तनाला योग्य वळण लावता येते. त्यासाठी शिक्षकांनी काही नीतिमूल्यांचा स्वीकार केला पाहिजे. चारित्र्यसंपन्नता, आत्मविश्वास, सचोटी, समायोजन, विषयज्ञान प्रभुत्व, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उपक्रमशीलता, सत्यव्रताची कास व्यवसायाबद्दल आदर इत्यादी गुणांचा स्वीकार केल्यास मानवी मूल्यांविषयीची बांधीलकी विकसित होईल. शिक्षकाच्या वर्तनाची छाप विद्यार्थ्यांवर पडून आपोआपच निकोप पिढी उदयास येईल.

संपूर्ण जगभर मूल्यसंवर्धन, मूल्यविकास आणि मूल्यशिक्षण हे मुद्दे सतत चर्चेत राहणारे मुद्दे आहेत. शैक्षणिक धोरणांनी मूल्यशिक्षण, मूल्यरूजवणुक करणे हे शिक्षणाचे ध्येय असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार विविध महाविद्यालयातून मूल्यशिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षणासाठी आजपर्यंत अनेक पद्धती उदयास आल्या; परंतु अगदी खेदाने नमूद करावे लागते की त्यापैकी एक ही पद्धती मूल्यशिक्षणासाठी उपयुक्त किंवा उत्कृष्ट पद्धती ठरली नाही शिक्षकाने स्वत: मूल्याधिष्ठित आचरणा करून विद्यार्थ्यांमध्ये शब्दांद्वारे नव्हे तर वर्तन व कृतींद्वारे मूल्यांची रूजवण करावी. मूल्यनिष्ठेकरिता अध्यापकांमध्ये पुढील बाबतीत बांधीलकी असणे आवश्यक आहे.[२३]

'NCTE 'च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकाच्या जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकी नमूद केल्या आहेत.[३८]

१. संपूर्ण मानवी विकासाकरिता अध्यापन व्यवसायाची मूल्ये समजून घेणे.
२. भारतीय घटनेमध्ये नमूद केलेली आणि मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांच्याशी निगडीत असणारी मूल्ये समजून घेणे.
३. विविध शैक्षणिक धोरणांनी ठरविलेली शैक्षणिक मूल्ये समजून घेऊन त्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.
४. अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन आणि शिक्षकांचे वर्तन याद्वारे अध्ययनार्थ्यामध्ये मूल्ये रूजविणे.
५. मूल्यसंवर्धन करणारे विविध कार्यक्रम आयोजित करून त्याद्वारे विद्यार्थ्यामध्ये मूल्यांची रूजवण करणे, विकास करणे, उदा. कथन, प्रश्नमंजूषा, भूमिकापालन, नाट्य इत्यादी.
६. लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.

७. समाजातील अनिष्ट गोष्टींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

८. विद्यार्थ्यांसाठी शिक्षक आदर्श असतो ही जाणीव ठेऊन आपले वर्तन ठेवणे/मूल्यधिष्ठित वर्तन असावे.

९. सहकार्य आणि बंधुभाव या मूल्यांची रूजवणुक आणि विकास करण्यासाठी सहली, प्रदर्शने, संग्रहालये यांना भेटी असे विविध उपक्रम राबविणे.

अशा विविध कृती आणि उपक्रमांचे आयोजन करून मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी प्रयत्न करणारा शिक्षक खऱ्या अर्थाने मूल्यनिष्ठेने कार्य करतो आणि आपल्या व्यवसायाला उत्कृष्टता मिळवून देतो. व्यावसायिक बांधीलकी जपण्यासाठी व्यवसायाशी संबंधित या सर्व निष्ठा जपणारा अध्यापक आपल्या व्यवसायावर प्रेम करून व्यवसायाचा अधिकाधिक विकास करण्यासाठी बांधील असतो. एक प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून अध्यापन व्यवसायाला ओळख निर्माण करून देतो. शिक्षक हे समाजाचे आदर्श असतात. शिक्षकात प्रामाणिकपणा, प्रेम, सत्यता, वक्तशीरपणा या मूल्यांचा विकास झालेला असावा.

वरील विवेचनावरून शिक्षक-प्रशिक्षकांचे विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्व पटते. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षक हा माध्यमिक शिक्षकास घडवित असतो आणि हेच माध्यमिक शिक्षक भावी पिढी घडवित असतात. त्यामुळेच या भावी पिढ्यांना अप्रत्यक्षरित्या घडविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास करण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन होणे संशोधकास आवश्यक वाटले. म्हणून प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक बांधीलकी या चलाचा समावेश करण्यात आला आहे.

१.३ संशोधनाची गरज

भारताचे भवितव्य हे शाळांमध्ये घडविले जाते असे कोठारी आयोगात सांगण्यात आले.[३९] राष्ट्राची गरज ही त्या राष्ट्रातील तरूणांवर किंवा विद्यार्थ्यांवर अवलंबून असते. ते राष्ट्राचे पुढील आदर्श नागरिक असतात. देशाच्या भवितव्यास म्हणजेच विद्यार्थ्यांस घडविण्याचे मोलाचे कार्य शिक्षकच करत असतात. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या क्षमतांचा विकास करणे, विचार करायला लावणे, ज्ञान व माहिती देणे, अंगभूत कौशल्य

विकसित करणे इत्यादी गोष्टी शिक्षकाला निर्माण करावयाच्या असतील तर शिक्षकात काही पूर्वी नमूद केलेले गुण आणि कौशल्य यांची आवश्यकता असते आणि शिक्षका मधील हे गुण व ही कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षकाला प्रशिक्षण दिल्यास तो उत्तमपणे आत्मविश्वासाने आणि उत्साहाने काम करू शकतो. हे कार्य शिक्षक-प्रशिक्षक -प्रामाणिकपणे करत असतात. शिक्षकाने जर व्यावसायिक क्षमता आणि निष्ठा संपादन केल्या आणि शाळेतील वर्गामध्ये त्याला ज्या बहुविध भूमिका कराव्या लागतात; त्यासाठी त्याला सशक्त बनविले तर एक शृंखलाबद्ध प्रक्रिया तयार होईल. तिची सुरूवात उत्तम कार्यप्रवणतेतून होते आणि शेवट विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात होतो.

१. शिक्षक-शिक्षणातून सामाजिक व राष्ट्रीय बांधीलकीच्या भावनेने, आवश्यक त्या समस्यांचे समाधान शोधून काढण्याच्या हेतूने, संशोधनाच्या उत्कृष्टतेसंबंधी कोणतीही तडजोड न करता संशोधन करुन राष्ट्राचे व समाजाचे हित साधून विकासाच्या कार्यात मदत होण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.
२. शिक्षक-शिक्षणातून समाजाच्या प्रगतीच्या प्रक्रियेचे पृथक्करण करून कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम समाजाला भविष्यकाळात प्रगतिपथावर नेतील याचा विचार करून शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी विकसित करणे.
३. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांना व्यवसायाशी बांधीलकी असणे गरजेचे आहे.
४. जेव्हा शिक्षक-प्रशिक्षक व्यावसायिक क्षमता विकसित करेल तेव्हाच तो यशस्वी होईल. म्हणूनच माध्यमिक शिक्षक घडविणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या सद्यस्थितीचा अभ्यास होणे आवश्यक वाटले.
५. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास करुन त्यांच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे व त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे गरजेचे वाटल्याने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.
६. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी मूल्यमापनातून तपासता येत नाही म्हणून प्रमाणीत चाचणी विकसित करने गरजेचे आहे.

७. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित प्रमाणीत चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

८. ज्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्रत शिक्षक-प्रशिक्षकाची बांधीलकी क मीआहे त्यात सुधारणा करता येईल.

९. सुसमायोजन व्यक्तिमत्त्व विकसन इत्यादी गुणांच्या विकासासाठी, सहकार्यांशी नाते संबंध कशा स्वरूपाचे आहेत हे जाणून घेण्यासाठी, व्यक्तीच्या वर्तनातील भावना अविष्कार जाणून घेण्यासाठी, स्वत:शी असलेल्या व इतरांशी असलेल्या व्यक्तीच्या आंतरक्रिया कशा आहेत हे जाणून घेण्यासाठी, व्यक्तीचे निर्णय विचार करण्याची पद्धती, दृष्टिकोन इत्यादी विषयी माहिती घेणे. शिक्षक हा केवळ स्वत:साठी नसतो तर तो समाजासाठी असतो हे समजावून घेण्यासाठी, वैयक्तिक सामाजिकमूल्य विकासासाठी म्हणजे थोड्क्यात, शिक्षक-प्रशिक्षकांमधील सामर्थ्य, प्रसन्नता, प्रगल्भता, संवेदनशीलता, समायोजनशीलता इत्यादी गुण जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

१.४ संशोधन समस्या

'शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन'

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

१) शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणी विकसित करणे.

२) शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.

३) शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

१.६ संकल्पनात्मक व्याख्या

१.६.१ शिक्षक-प्रशिक्षक :-'शिक्षक आणि चिंतनशील व्यवसायी म्हणून त्यांच्या व्यावसायिक भूमिकेसाठी प्रतिबिंबित शिक्षक तयार करणारा एक शिक्षक-प्रशिक्षक'

"An instructor preparing preservice teachers for their professional role as a teacher and reflective practitioner"[40]

१.६.२ व्यावसायिक बांधीलकी :-'व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि प्रतिकूल परिस्थितीमध्येही व्यक्त होणाऱ्या व्यक्तीच्या स्वप्रतिमेशी सुसंगत अशा वैशिष्ट्यपूर्ण लक्षणांचे संघटन म्हणजे व्यावसायिक बांधीलकी होय'.

'Professional commitment - was defined as "the extent to which one identifies with one's profession and accepts its values" [41]**(Morrow & Goetz, 1988, p. 93).**

व्यावसायिक : 'ज्यासाठी पैसे मिळतात. विशेषत: एखाद्या विषयातील दीर्घ प्रशिक्षकआणि योग्यता मिळविल्यानंतर असा उपजीविकेचा व्यवसाय'.[४२]

बांधीलकी :' शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या कामगिरीचे स्वरूप, निष्ठा यातून व्यक्त होणारे व्यावसायिक अंग म्हणजे बांधीलकी होय.'[४३]

१.६.३ प्रमाणित चाचणी : 'प्रमाणीक रण म्हणजे एक अशी चाचणी जिच्यासाठी आशयाची अनुभवजन्य निवड आणि तपासणी के ली गेली आहे.जिच्यासाठी मानके प्रस्थापित के ली गेली आहेत. जी राबविण्यासाठी आणि गुणदान क रण्यासाठी एक समान पद्धत विकसित करण्यात आली आहे. जी सापेक्ष पणे अधिक उच्च वस्तुनिष्ठता राखते'.(गुड .सी.बी,१९६३)[४४]

'विशिष्ट व्यवसाय, त्या व्यवसायास अपेक्षित क ाही गुण आणि त्यावर आधारित प्रश्नसंच म्हणजे चाचणी' (कदम वि.सा,१९९८)[४५]

१.६.४ विकसन :- 'एक किंवा काही चले प्रतिबिंबित होणारी बहु विधान प्रश्नावली किंवा शोधिकेची रचना म्हणजे मापिकेचे विकसन होय. अशा मापिकांमध्ये सामान्यपणे प्रतिसाधकांकडून उत्तर येणारे प्रश्न किंवा प्रतिसाधकांकडून त्यांच्या सहमतीची मात्रा दर्शविण्यासाठी विधाने समाविष्ट असतात'.
(निकम विभावरी,२०१३)[३१]

१.६.२ संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

१.६.२.१ शिक्षक-प्रशिक्षक :- अध्यापक महाविद्यालयात अध्यापनाचे काम करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण असणारा शिक्षक म्हणजे शिक्षक-प्रशिक्षक.

१.६.२.२ व्यावसायिक बांधीलकी :- विद्यार्थ्यांच्या प्रति, समाजाच्या प्रति, व्यवसायाच्या प्रति, श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी, जुनी मानवी मूल्ये यांच्या प्रति व्यवसायात उत्कृष्टता आणण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करणे म्हणजे व्यावसायिक बांधीलकी.

१.६.२.३ प्रमाणित चाचणी : खालील निकषांचा वापर करून तयार केलेली शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी म्हणजे प्रमाणित चाचणी होय.

१. चाचणीच्या प्रश्नावर पृथक्करण करने.
२. त्याची काठिण्यपातळी व भेदनक्षमता निश्चित करणे आणि त्याच्या आधारे योग्य काठिण्य मूल्याचे भेदनक्षम प्रश्न निवडून अंतिम चाचणी तयार करणे.
३. या अंतिम चाचणीची सप्रमाणता व विश्वनीयता ठरविणे तसेच चाचणीची वस्तुनिष्ठता, चाचणीची पर्याप्तता, चाचणीची उपयोगिता निश्चित करणे,
४. मार्गदर्शिका तयार करणे.

१.७ संशोधनाची गृहीतके

१. शिक्षकी व्यवसाय दर्जेदारपणे करण्यासाठी शिक्षकाची व्यवसायाप्रति बांधीलकी असणे खूप गरजेचे आहे. (Fifth survey of educational research : 1988-92, Volume 1. (1997), New Delhi : National Council of Educational Research and Training.).[46]

२. शिक्षक-प्रशिक्षकांची निवड बांधीलकीच्या निकषावर करणे इष्ट असते. (National curriculum Framework-2005).[47]

१.८ संशोधनाची व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रातील अध्ययनार्थ्यांबाबत बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी, उत्कृष्ठ कार्याबाबत बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्याप्रति बांधीलकी, समाजाप्रति बांधीलकी, या उपक्षेत्रांशी संबंधित आहे.

३. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित केलेल्या चाचणीशी संबंधित आहे.

१.९. संशोधनाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे शिक्षक-प्रशिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाच्या विश्लेषणावर आधारित आहे.

२. प्रस्तुत संशोधनातून शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रातील अध्ययनार्थ्यांबाबत बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी , उत्कृष्ट कार्याबाबत बांधीलकी , मूलभूत मानवी मूल्याप्रति बांधीलकी , समाजाप्रति बांधीलकी , या पाच उपक्षेत्रांचेच मापन केले जाणार आहे. 'बांधीलकीची' इतरही अनेक उपक्षेत्र आहेत. त्या सर्व उपक्षेत्रांचा सदर संशोधनात विचार केलेला नाही.

१.९.१ संशोधनाची परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ३६ अध्यापक महाविद्यालयातील २५२ शिक्षक-प्रशिक्षकांचा विचार केला आहे.

२. चाचणीचा पडताळा घेताना सहा विद्यापीठातून प्रत्येकी तीन अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांचा समावेश केला आहे. इतर अध्यापक महाविद्यालयांचा विचार केला जाणार नाही.

१.१० सदर संशोधनाचे योगदान

१. आजच्या स्पर्धेच्या युगात योग्य बांधीलकी असणाऱ्या शिक्षकांची गरज आहेच. त्याहष्टीनेही ही चाचणी उपयोगी ठरेल.

२. शिक्षक भरतीच्या वेळी शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी पडताळण्यासाठी या चाचणीचा उपयोग होईल.

३. अध्यापक महाविद्यालयात शिक्षक-प्रशिक्षकांची निवड करताना त्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी पडताळण्यासाठी या चाचणीचा उपयोग होईल.

४. शिक्षकांची, शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक निष्ठा , सामाजिक निष्ठा, विद्यार्थ्यांबाबतची निष्ठा, मूल्यांप्रति निष्ठा तपासताना या प्रकारच्या चाचणीचा वापर केल्यास योग्य शिक्षकांची, शिक्षक-प्रशिक्षकांची निवड करणे शक्य होईल.

५. शिक्षकी व्यवसाय मार्गदर्शन करण्यासाठी या चाचणी संचाचा उपयोग करता येऊ शकेल.

६. एन्.सी.टी.ई, एस्.सी.ई.आर.टी. आणि अभ्यासक्रम तयार करणाऱ्या संस्थांनी शिक्षक शिक्षण प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करताना बांधीलकी क्षेत्रांचा विचार करून त्या प्रकारचा आशय, उपक्रम, प्रात्यक्षिक यांचा अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी याचा उपयोग होईल.

७. संबंधित चाचणी ही शिक्षक-प्रशिक्षक महाविद्यालये, त्यातील विद्यार्थी शिक्षक, माध्यमिक शाळांत सेवा देणारे शिक्षक इत्यादींच्या दृष्टीने बांधीलकी मापनासाठी उपयुक्त ठरणार आहे.

८. या चाचणीच्या आधारे शिक्षक-प्रशिक्षकांची निवड केली जाईल. तसेच ज्या व्यक्तींना शिक्षकी व्यवसायाविषयी खरोखर तळमळ आहे, अशा व्यक्तींचीच निवड झाली तर निश्चितच शिक्षणक्षेत्रातल्या अनेक समस्या दूर होणार आहेत. नोकरीचे प्रमाण कमी होऊन योग्य व्यक्तीच या क्षेत्रात कार्यान्वित होतील आणि शिक्षणक्षेत्राचा विकास होईल. यादृष्टीने या संशोधनाचे महत्त्व सांगता येते.

९. अशा प्रकारची शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी चाचणी तयार केल्याने स्थानिक स्तरावर ती उपलब्ध होईल. याचा वापर करून बी.एड्. (सीईटी) साठी त्याचा उपयोग करणे शक्य होईल.

१०. या संशोधनाचे प्रत्यक्ष लाभार्थी शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालये असतील. तेथे योग्य पात्रता, रूची असणारे, कौशल्य असणारे शिक्षक-प्रशिक्षक असेच विद्यार्थी शिक्षक येतील. विद्यार्थी शिक्षक त्यांचे प्रशिक्षणपूर्ण झाल्यानंतर त्यांच्या भविष्यात शाळांमधील विद्यार्थ्यांना अभिरूची तसेच बांधीलकी असणारे शिक्षक अध्यापनास लाभतील.

११. तसेच प्रस्तुत संशोधनाचा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनाही लाभ होणार आहे. या संशोधनाचा लाभ अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांची बांधीलकी पडताळण्यासाठीही काही प्रमाणात होणार आहे. तसेच अध्यापक महाविद्यालयात नोकरी करणारा शिक्षक-प्रशिक्षकाची बुद्धिमत्ता, अभियोग्यता आणि बांधीलकी ही या चाचणीच्या माध्यमातून पडताळता येणे शक्य होईल.

१२. प्रत्यक्षात कोणत्या घटकाबाबत शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी नकारात्मक आहे आणि बांधीलकी कमी वाटते, त्याद्दष्टीने उपाय योजना करणेही शक्य होईल.

१३. शिक्षक-प्रशिक्षकांचे अनुभव समृद्ध करता येतील. कारण ज्ञानाने आणि अनुभवाने परिपक्वता आली की द्दष्टिकोन विशाल होतो. नवीन ज्ञानाचा, जुन्या अनुभवाच्या संदर्भात पुनर्विचार केला जातो. लहान वयात अनेक व्यवसायाविषयी असलेला द्दष्टिक़ोन मोठेपणी बदलतो तो यामुळेच. या द्दष्टिकोनातून या चाचणीचा वापर उपयुक्त ठरणार आहे.

१४. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार हे मान्य केल्यानंतर समाजातील विविध अपप्रवृत्ती नष्ट करून समाजास दिशा दिग्दर्शनाचे काम आणि त्यासाठी सुयोग्य, सुशिक्षित, सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे काम शिक्षकांचेच आहे आणि अशाच या शिक्षक-प्रशिक्षकांची निवड करण्याच्या द्दष्टीने या संशोधनाचे योगदान महत्त्वाचे ठरावे.

१५. शिक्षक भरतीच्या वेळी शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी पडताळण्यासाठी या चाचणीचा उपयोग होईल.

संदर्भसूची :

१) बर्वे, बी. एन. व नरके , एच. जे. (२००८). ***मनोमापन*** . नागपूर : श्रीविद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक ८९.

२) दांडेकर, वा. ना. (२००४). ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र***. नागपूर : श्री विद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक १००.

३) पेंडके, प्रतिभा.(२००६). ***उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण*** . नागपूर : श्री. मंगेश प्रकाशन. पृष्ट क्रमांक ७.

४) दाणे, हेमंत. (जुलै २००७). ***विज्ञान अध्यापन पद्धती***. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशस. पृष्ट क्रमांक २७-२९.

५) दांडेकर, वा. ना. (२००४), शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र. नागपूर : श्रीविद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक २७४-२७५.

७) देसले, भदाणे. (२००९). ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र***. पुणे : रेशमाई पब्लिकेशन. पृष्ट क्रमांक ५२-५६.

८) बर्वे, बी. एन. व नरके , एच. जे. (२००८). ***मनोमापन*** . नागपूर : श्रीविद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक ८२-८७.

१०) बापट, भा.गो. (२००२). ***मूल्यमापन आणि संख्याशास्त्र***. पुणे : व्हिनस प्रकाशन. पृष्ट क्रमांक ५१-५९.

११) भांडारकर, के. म. (१९९८). ***सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र***. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ४७-५६.

१२) भदाणे, चव्हाण, जाधव, के. (२००४). ***शिक्षक प्रशिक्षण***. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ट क्रमांक ७१-७७.

१३) भालेराव, चव्हाण,. (२००६). ***शिक्षणशास्त्र***. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ट क्रमांक ६५-७२.

१४) कुंडले,म. बा. (१९८८).***शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र***. नागपूर : श्री विद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक ८.

१५) जोशी, सुप्रिया. (२००४). ***शिक्षकांच्या सेवापूर्व प्रशिक्षणात भावनिक विकासाची गरज***. भारतीय शिक्षण, पृष्ट क्रमांक ४७.

१६) www.eric.ed.gov.

१७) कानडे, मुकुंद.(२००४). ***५- सप्टेंबर शिक्षकदिनानिमित्त एक अनावृत्त पत्र***. भारती शिक्षण, पृष्ट क्रमांक ३४९-३५०.

१८) www.unipune.ac.in

१९) बागची, सुखोतो. (२००९). ***मैत्री व्यावसायिकतेशी***. पुणे : रोहन प्रकाशन.

२०) गिरी, अरूणा. (१९९९). ***भारतातील प्राथमिक शिक्षकप्रशिक्षण***. शिक्षकआणि समाज. पृष्ट क्रमांक ५-९.

२१) चांडक, संपतकुमार. (२००२). ***शिक्षकांच्या हृदयातील स्पंदने***. भारतीय शिक्षण, पृष्ट क्रमांक २६-२८.

२२) तारे, कृ. वा. (१९८२). ***सामाजिक बांधिलकी तुम्ही आम्ही शिक्षक***. शिक्षणसंक्रमण. पृष्ट क्रमांक ६-८.

२३) दवे, आर. एच. (डिसेंबर २००१-जानेवारी). ***परिणामकारक शिक्षकव शिक्षण***. शिक्षकसमीक्षा. पृष्ट क्रमांक १६२-१६९.

२४) https://m.timesofindia.co

२५) पोंक्षे, द. बा.(सप्टेंबर २००७). शैक्षणिक मानसशास्त्र आणि प्रायोगिक कार्य. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ७६-९१.

२६) भालेराव, सुभाष . चव्हाण, कदम, शिंदे, प्रतिभा. (२००२). ***शालेय व्यवस्थापन***. नाशिक : गणेशपूजा प्रकाशन. पृष्ट क्रमांक २३-८९.

२७) पेंडके, प्रतिभा सुधीर. (प्रथमावृत्ती २००६). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. नागपूर : श्री. मंगेश प्रकाशन. पृष्ट क्रमांक ६७-६९.

२८) जाधव, के. के. (मे २००७). ***आधुनिक काळाचे शिक्षक तत्वज्ञान. उदयोन्मुख भारतीय ज्ञान, समाजाचे शिक्षक- भाग -१***. नाशिक : मन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ४४-५६.

२९) नानकर, म. ल., शिरोडे, संगीता. (तिसरी आवृत्ती २०००). ***सुबोध शैक्षणिक व प्राथमिक मानसशास्त्र***. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ४७.

३०) वीरकर, प्र. कृ., वीरकर, प्रतिभा. (पाचवी आवृत्ती,२००४). शालेय शैक्षणिक

व्यवस्थापन. पुणे : पुणे विद्यार्थी गृह, रोहन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ५५-६७.

३२) नरवणे, मीनल. (२०१६). ***संशोधन पद्धती : शैक्षणिक व सामाजीक***. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ट क्रमांक ४१.

३३) बेलेकर, आर.डी. (२००१).***आदर्श व्यावसायिक होण्यासाठी.*** पुणे : नूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक २२६.

३४) पाटील, अनिल. (नोव्हेंबर २००८). ***मानसशास्त्रीय चाचण्या.*** पुणे : डायमंड पब्लिकेशन. पृष्ट क्रमांक १३७.

३५) कळकेकर, महेश. (१९९७). ***शिक्षक-विद्यार्थी संबंध***. शिक्षकसंक्रमण. पृष्ट क्रमांक ३७.

३६) मुळावकर, संतोष. मुळावकर, कल्पना. (४ ऑक्टोंबर २००५). ***मूल्यशिक्षण-संवाद.*** नागपूर : विद्या प्रकाशन. पृष्ट क्रमांक ६८.

३७) अलोणी, अर्चना. (जून २००९). ***शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन***. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशस. पृष्ट क्रमांक ११८.

३८) गटकळ, रंजना. संतोष. (ऑगस्ट २००७). ***माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास.*** नाशिक : प्राजक्ता प्रकाशन. पृष्ट क्रमांक १२६.

३९) पवार, ना. ग. (जुलै २००८). ***मूल्यशिक्षण; आजच्या संदर्भात***. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ९६.

४०) भालेराव, चव्हाण, जाधव, (जानेवारी -२००६). ***शिक्षक***. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ट क्रमांक १६६.

४१) भालेराव, सुभाष .चव्हाण,कदम, शिंदे,प्रतिभा.(२००६). ***शालेय व्यवस्थापन***, नाशिक : गणेशपूजा प्रकाशन. पृष्ट क्रमांक १४८.

४२) पेंडके, प्रतिभा. (प्रथमावृत्ती २००६). ***उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण*** . नागपूर : श्री. मंगेश प्रकाशन. पृष्ट क्रमांक १३६.

४३) भिंताडे , वि.रा. (प्रथमावृत्ती २००६).***उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण***. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक ९८.

४४) वीरकर, प्र. कृ.वीरकर, प्रतिभा. (२००४).***शालेय शैक्षणिक व्यवस्थापन***. पुणे : पुणे विद्यार्थी गृह, रोहन प्रकाशन. पृष्ट क्रमांक १७८.

४५) दुनाखे , अरविंद..(प्रथमावृत्ती २००६). *शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन.* पुणे : नित्यनूतन प्रकाशन. पृष्ट क्रमांक १५४.

४६) Fifth survey of educational research : 1988-92, Volume 1. (1997), New Delhi : ***National Council of Educational Research and Training.***

४७) ***National curriculum Framework-2005.***

४८) येवले, समी. सप्रे, निलिमा. डागे, सुनिता. भोसले, रमा. (२००७) . *शिक्षक होण्यासाठी.* कोल्हापूर : फडके प्रकाशन. पृष्ट क्रमांक १३२.

प्रकरण दुसरे

संबंधित साहित्य व संशोधनांचा आढावा

२.१ प्रास्ताविक

एकदा समस्या निश्चित झाली की, वेगवेगळ्या प्रकारची संशोधने कशी होतात? आपल्या समस्येशी मिळती जुळती संशोधने या आधी कधी झाली आहेत? किती झाली आहेत? याचा आढावा घ्यावा लागतो. ही माहिती घेण्याचे स्त्रोत अनेक आहेत. 'एम.बी. बुच' यांचे शैक्षणिक संशोधन विषयक खंड, या विषयाशी संबंधित पुस्तके, लेख, इंटरनेटवरील संशोधन इत्यादी या सर्वांच्या अभ्यासावरून आपल्याला स्वतःची संशोधन समस्या व इतरांची समस्या यांची तुलना करता येते. त्यात असणारे साम्य लक्षात घेता येते व आपल्या संशोधनाची आवश्यकता समजते.

थोडक्यात संदर्भ साहित्याचा खालीलप्रमाणे उपयोग होतो.

२.२ संदर्भ साहित्याच्या अभ्यासाचा संशोधकाला उपयोग

नरवणे, मीनल. (२०१६).संशोधन पद्धती : शैक्षणिक व सामाजीक. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. सदर पुस्तकात खालील माहिती मिळाली.

१. यापूर्वी उपलब्ध असलेल्या पुराव्यांच्या मदतीने आपली (संशोधन समस्या) वर्तमान समस्या सुटू शकेल का ? याचा अंदाज बांधता येतो. निरर्थक द्विरूक्ती टळते.

२. समस्येचा आराखडा किंवा सुसूत्रीकरण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या

कल्पना, विचार, सिद्धांत, गृहीतके आणि स्पष्टीकरणे प्राप्त होतात.

३. आपल्या संशोधनासाठी योग्य पद्धती समजते.

४. जमा झालेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी, निष्कर्ष प्रस्थापित करण्यासाठी

तौलनिक माहिती उपलब्ध होते.

५. संशोधकाची संशोधनाबद्दलची समज वाढुन त्यात अधिक सखोलता येते.

संबंधित सैद्धांतिक साहित्याचे 'सर्वेक्षण' या अत्यावश्यक टप्प्याची पूर्तता या प्रकरणातून केली आहे. त्यासाठी 'संबंधित साहित्य' या शब्द समूहाचा अर्थ प्रस्तुत संशोधनासाठी मार्गदर्शक ठरणारे, योग्य आकलन करुन देणारे, रूपरेषा व दिशा देणारे सैद्धांतिक साहित्य आणि पूर्ण झालेली संशोधने असा घेणे इष्ट ठरते. त्यातून सिद्धांताचे आकलन आणि संबंधित सिद्धांताचे पूर्ण झालेल्या संशोधनातून केलेले उपयोजन या दोहोतून योग्य मर्मदृष्टी प्राप्त झाली.

२.३ सैद्धांतिक साहित्याच्या आढाव्याची उद्दिष्टे

सैद्धांतिक साहित्याचा आढावा घेण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. व्यावसायिक बांधीलकी ही संकल्पना समजावून घेणे.

२. व्यावसायिक विकासाची तत्वे व तंत्रे जाणून घेणे.

३. व्यावसायिक बांधीलकीबाबत असणारी मूलभूत गृहीतके जाणून घेणे.

४. 'व्यवसाय आणि शिक्षक-शिक्षण व्यवसाय' या संकल्पना समजून घेणे.

५. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकीची व्याख्या जाणून घेणे.

६. शिक्षक -प्रशिक्षकांमध्ये आवश्यक असलेली व्यावसायिक गुणवैशिष्ट्ये समजून घेणे.

७. अधिव्याख्यात्याच्या व्यावसायिक विकासाचे प्रमुख घटक समजून घेणे.

८. शिक्षक निर्मित्त वर्ग चाचणी व प्रमाणित चाचणीची संकल्पना समजावून घेणे.

९. पाश्चिमात्य आणि भारतीय संशोधकांनी प्रमाणित केलेल्या चाचण्यांची माहिती मिळविणे.

२.४ संबंधित साहित्याचा आढावा : हा आढावा घेताना व्यावासायिक बांधीलकीची संकल्पना, बांधीलकीबाबतची मूलभूत गृहीतके तसेच पाश्चात्य आणि

भारतीय तज्ज्ञांनी प्रमाणित केलेल्या व्यावसायिक बांधीलकी संदर्भात तयार केलेल्या चाचण्यांचा विचार करणे उपयुक्त ठरते. याच बरोबर प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला.

अ.क्र. संदर्भ प्रकार

१. संबंधित ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, मासिक, वर्तमानपत्रे

२. विविध बांधीलकीच्या कसोट्या-पाश्चिमात्य आणि भारतीय संशोधकाच्या चाचण्या.

३. संबंधित संशोधनाचे सारांश - 'एम.बी.बूच' यांचे खंड.

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेले संशोधन सारांश.

५. इंटनेटवरील संशोधने.

२.४.१. संबंधित ग्रंथांचा आढावा

शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्रे निश्चित करण्यासाठी लागणारे संदर्भ ग्रंथ म्हणजे त्या त्या विषयाची (अध्यापन विषयक) पुस्तके आणि त्या प्रत्येक पुस्तकात त्या त्या विषयासाठी त्या विषय शिक्षकापाशी असणाऱ्या बांधीलकीचा उहापोह केलेला असतो.

तक्ता क्रमांक २.१ : संबंधित संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा

अ.क्र.	पुस्तक		नियतकालिके		भारतीय आणि पाश्चिमात्य चाचण्या		भारतीय, पाश्चिमात्य आणि इतर पूर्वसंशोधने	
माध्यम	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी
संख्या	३०	०९	१६	१५	५	८	२२	८+१४+१
एकूण	३९		३१		१३		४५	

तात्विक माहितीसाठी घेण्यात आलेल्या संदर्भ पुस्तकांची यादी प्रकरणाच्या शेवटी देण्यात आली आहे.

२.५ व्यावसायिक बांधीलकी संबंधित मराठी साहित्याचा आढावा

२.५.१ तारे, कृ. व. (प्रथम आवृत्ती २००५). शिक्षणातील मूल्यसाधना, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन. सदर माहितीचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांच्या व्याख्या ठरविण्यासाठी झाला.

शिक्षण ही कृती नसून प्रकृत्ती आहे आणि त्याही पलीकडे जाऊन ती प्रवृत्ती आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी घडत असतात. शिक्षकांच्या प्रत्यक्ष कौशल्यावर आणि प्रत्यक्ष कृती आणि अभ्यासावर भावी पिढ्यांचे भवितव्य अवलंबून असते. स्वत:च्या आचरणातून उत्तम संस्कार करणारा शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी एक मूल्य असते.स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद, योगी अरविंद, कविवर्य रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे, डॉ. राधाकृष्णन, सानेगुरूजी या सर्व शिक्षणतज्ज्ञ व लोकशिक्षकांनी हाच दृष्टिकोन ठेवलेला आहे. माणसातील पशुत्व घालवून त्यांच्यातील माणुसकी जे जागविते आणि त्याला उत्तम व्यक्तित्व प्रदान करते तेच खरे शिक्षण होय. शिक्षणाने मानसिक आणि नैतिक चारित्र्य बनते असे जॉन ड्युई या शिक्षणतज्ज्ञाने सांगून ठेवले आहे.शिक्षणच मुळी नीती, धर्म आणि मूल्य रूजविणे याकरिता जन्मास आले.सर्व शिक्षणप्रक्रिया जर दूध समजले ना तर दूधाचे दही, दह्याचे ताक, लोणी तापवले की तूप हे त्यांचे अंतिम फलित आहे. पुन्हा तुपाचे दूध काही होत नाही. तसेच सधन शिक्षणप्रक्रियेतून संस्कार निर्माण होतात ते पुन्हा मिटत नाहीत इतके ते दृढतर असतात.

२.५.२ पवार, ना. ग. (एप्रिल २००८). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

सदर पुस्तकात शिक्षकाच्या बांधीलकी संदर्भात खालील शब्दांचा उल्लेख केलेला दिसून येतो. बांधीलकीच्या उपक्षेत्रात सदर शब्दांची विभागणी क रुन त्या त्या बांधीलकीच्या उपक्षेत्रातील उद्दिष्टंमध्ये यांचा समावेश करण्यातआला.

ज्ञानप्राप्ती, चारित्र्यसंपन्नता, सद्विचार व नैतिक गुणांची प्राप्ती, श्रेष्ठ दर्जाचे गुरू शिष्य संबंध, निदानात्मक आणि उपचारात्मक अध्यापन, विश्लेषणात्मक कार्य (संशोधक वृत्ती), कार्यवादी विचारवंत, शिस्तबद्धता, राष्ट्रप्रेमी, निस्वार्थी, सत्यप्रिय,

संधीची समानता मिळवून देणारा, लोकशाही जीवन निष्ठा, चिंतनशील वृत्ती, मूल्याधिष्ठित, समाजनिष्ठ, ज्ञानपिपासू, वेळेचा सदुपयोग करणारा, सौंदर्यविष्कार, कलाविष्कार, संस्कृतिसंवर्धन करणारा, मानवतावादी, व्यावसायिक नीतिमत्ता, वैज्ञानकि दृष्टिकोन, स्वत:च्या सुप्त शक्तींचा योग्य अविष्कार करणारा, वातावरण निर्मिती करणारा, सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.३ तांबोळी, शमसुद्दिन. तांबोळी, बेनझीर.(२४ मे २००९). प्रभावशाली शिक्षणतज्ज्ञ. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

सदर पुस्तकात शिक्षकांच्या गुणवैशिष्ट्ये संदर्भात खालील शब्दांचा उल्लेख केलेला दिसून येतो. बांधीलकीच्या उपक्षेत्रात सदर शब्दांची विभागणी क रुन त्या त्या बांधीलकीच्या उपक्षेत्रातील उद्दिष्टंमध्ये यांचा समावेश करण्यातआला.

सामाजिक अभियंता, सकारात्मक नेतृत्व गुण, समाज निष्ठा, परिवर्तनवादी विचारसरणी, सत्यशोधक, सृजनशीलता, अंत:प्रवृत्तीची अभिव्यक्ती, शिक्षणाप्रती निष्ठा, सम्यक शिक्षण, विश्वबंधुत्वाची भावना, मानसव्यापार, कार्यकुशल, संघटन कौशल्य, लोकहितवादी, राष्ट्रीय जागृती घडविणारा, स्वनियंत्रण व स्वार्थत्याग, व्यवहार वादी, आत्मसंयम, आदरभाव, समर्पण वृत्ती, स्वचैतन्याचे संक्रमण, आध्यात्मिक द्रष्टे, वैचारिक योगदान, कर्तव्यदक्ष, क्षमाशीलता, गुणग्राहकता, प्रसिद्धिविन्मुखता, सहनशीलता, कर्मयोगी, प्रयत्नवादास महत्त्व देणारा, नवनिर्मितीक्षम, सजग मूल्यांकन क्षमता, विद्याविभूषित असावा. मृदुभाषी, विद्यापरायण, शरीरसंपदा, शीलसंवर्धन, सामाजिक बांधीलकी, ज्ञान निष्ठा, विद्यार्थी निष्ठा, विज्ञान निष्ठा, सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.४ वीरकर, प्रतिभा. (सप्टेंबर २००९). नवोदित काळासाठी शिक्षण व शिक्षक. पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन. सदर पुस्तकात शिक्षकाच्या बांधीलकी संदर्भात

खालील शब्दांचा उल्लेख केलेला दिसून येतो. बांधीलकीच्या उपक्षेत्रात सदर शब्दांची विभागणी करुन त्या त्या बांधीलकीच्या उपक्षेत्रातील उद्दिष्टंमध्ये यांचा समावेश करण्यातआला.

समाज परिवर्तन करणारा, राजकीय परिवर्तन करणारा, वैज्ञानिक परिवर्तन, व्यक्ती परिवर्तन, नैतिक परिवर्तन, धार्मिक परिवर्तन, आर्थिक परिवर्तन, व्यक्तिविकासात आत्मसाक्षात्कार घडवून आणणारा, सहज प्रेरणांचे नियमन करणे व उदात्तीकरण करणे, नागरिकत्वाचे शिक्षण देणारा. यथार्थ ज्ञान देणारा, समंजसपणा, सारासारविवेक, सूज्ञपणा, कर्तव्यतत्पर, नि:पक्षपातीपणा, जीवन ध्येयनिष्ठा, व्यवसाय निष्ठा, स्वाध्यायशीलता, विद्याभिरूची, स्वयम अध्ययनाला प्रेरणा देणारा, व्यावसायिक गोपनीयता पाळणारा. सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.५ बोंदार्डे, कैलास. बोंदार्डे, अश्विन. कदम, चारूदत्त. (मार्च २००८). शास्त्र अध्यापन पद्धती व आशययुक्त अध्यापन. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

सदर पुस्तकात शिक्षकाच्या व्यवसायाप्रतिची गुणवैशिष्ट्यासंदर्भात खालील शब्दांचा उल्लेख दिसून येतो. बांधीलकीच्या उपक्षेत्रात सदर शब्दांची विभागणी करुन त्या त्या बांधीलकीच्या उपक्षेत्रातील उद्दिष्टंमध्ये यांचा समावेश करण्यातआला.

उत्सुकता, जिज्ञासा, तत्परता, सत्यता, वक्तशीरपणा, प्रयोगशील व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण, प्रयोगशीलता, चिंतनशीलता, स्पष्टवक्ता, विषय व्यासंग, रसिकता व सहृदयता, सृजनशीलता, वक्तृत्त्व, उपक्रमशीलता, छंद जोपासणारा, कृतीसत्र आणि चर्चासत्रात सहभाग, पाठ्यक्रमाचे ज्ञान, नेतृत्वगुण, तात्त्विकवाद, आदर्शवादी दृष्टिकोन, निरीक्षण क्षमता, प्रभावी व्यक्तित्व नि:स्पृहता, ज्ञानसंपन्नता, समस्या विमोचनाचे कौशल्य, कल्पक, मूल्यमापन व मूल्यनिर्धारणात तज्ज्ञ, नवप्रवाहांचे ज्ञान, वैकासिक प्रवाहांची जाण, सद्यस्थितीचे ज्ञान, सामाजिकता, संशोधक, व्यक्ती अभ्यास, विश्लेषणात्मक कार्य, कार्यवादी विचारवंत, शिस्तबद्धता, वेळेचा सदुपयोग करणारा, व्यावसायिक नीतिमत्ता जोपासणारा, शिक्षणाप्रति निष्ठा, संघटन कौशल्य, व्यवहारवादी, समर्पण वृत्ती,

वैचारिक योगदान, कर्तव्यदक्ष, गुणग्राहकता, कर्मयोगी, प्रयत्नवादास महत्त्व देणारा, नवनिर्मितीक्षमता असणारा, सजग मूल्यांकन क्षमता, उच्च विद्याविभूषित विद्यापरायण, ज्ञान निष्ठा, ध्येय निष्ठा, उपयुक्ततावादी, संयोजक, वस्तुनिष्ठता बाळगणारा, मार्गदर्शक, योजकता, तत्त्वज्ञ, शैक्षणिक कार्याचा खरा सूत्रधार, कष्टाळूवृत्ती, स्वसामर्थ्यांवर श्रद्धा आणि निष्ठा असणारा, यथार्थज्ञान देणारा, कर्तव्यतत्पर, विद्याभिरूची, व्यावसायिक गोपनीयता पाळणारा, तत्परता, व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण घेणारा, पात्रता संपादन, अस्मिता, व्यावसायिक मूल्य, भविष्याभ्यास, मितभाषित्व, गुणग्राहकता, सत्यनिष्ठा, निर्भीडपणा, तार्किकता, सेवा देणे, नीतितत्त्वे, विश्लेषक प्रवृत्ती, आचार-विचारात साधर्म्य, बदलत्या संकल्पनेबाबत विचार करण्याची क्षमता असणारा, कर्तव्य, सहकार्य, न्याय, नीती, समता, नियम व्यवस्थेचा आदर करणारा.

२.५.६ मुळावकर, संतोष. मुळावकर, कल्पना. (४ ऑक्टोंबर २००५). मूल्यशिक्षण-संवाद, नागपूर : विद्या प्रकाशन.

सदर पुस्तकात उल्लेखिलेल्या शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला. बांधीलकीच्या उपक्षेत्रात सदर शब्दांची विभागणी क रुन त्या त्या बांधीलकीच्या उपक्षेत्रातील उद्दिष्टंमध्ये यांचा समावेश क रण्यात आला.

संघ प्रवृत्ती, निर्व्यसनी, सोशिकता, शुचिता, सचोटी स्वाभिमान, चिंतन, व्यक्तीच्या प्रतिष्ठेविषयी जाणीव, राष्ट्रीय संपत्तीच्या महत्त्वांची जाणीव, निर्भयता, मानवी हक्कांबाबत आदरभाव, पात्रता संपादन, अस्मिता, निरीक्षणक्षमता, अवधानक्षमता, अध्ययनशीलता, आत्मविश्वास, विचारक्षमता, निर्णयक्षमता, मर्मदृष्टी, अभ्यासुवृत्ती, दूरदृष्टी, शिस्तबद्ध वर्तन, मनोरंजन विवेक, व्यावसायिक मूल्य, भविष्याभ्यास, समाजशीलतेची जाणीव, व्यवसाय अभिवृत्ती, करारीपणा, मितभाषित्व, गुणग्राहकता, लेखनकला, सांघिक भावना, समायोजन क्षमता, अनुयायित्व, सत्य निष्ठा, निर्भीडपणा, तार्किकता, बहुभाषित्व सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.७ अलोणी, अर्चना.(जून २००९). शैक्षणिक तंत्रविज्ञान व व्यवस्थापन. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशस.

सदर व्याख्येचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकीची कार्यात्मक व्याख्या तयार करताना झाला.

"A profession is not simply a collection of individual who gets living for themselves by the same kind of work, nor is it a merely group which is organized exclulsively for the economic protection of its members, though that is normally among its purposes its essence is that it assumes certain responsibilities for the competence of its members or the quality of its wares and that is deliberately prohibits certain kinds of conduct on the grounds that though they may be profitable to the individual, they are calculated to bring into disrepute the organization to which it belongs." Towney.

२.५.८ दाणे, हेमंत.(जुलै २००७). विज्ञान अध्यापन पद्धती. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशस. सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

व्यवसायाची वैशिष्ट्ये : शिक्षक म्हणून त्याला सामाजिक बांधीलकी असते, सेवा देणे, नीतितत्त्वे असतात, व्यवसायाबद्दल ज्ञान व प्रशिक्षण आवश्यक, व्यवसाय हा त्या त्या व्यावसायिक समूहाशी जोडलेला असतो.

२.५.९ पाटील, संदीप.(५ सप्टेंबर २००८). इतिहास शिक्षण एक आधुनिक दृष्टिकोन. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.

सदर पुस्तकात लेखकाने शिक्षक कसा असावा याबद्दल सांगितलेले दिसून येते. सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

नि:पक्षपाती, वस्तुनिष्ठ दृष्टिकोन, विश्लेषक प्रवृत्ती, एकात्मिकरण क्षमता, आचार-विचारात साधार्म्य, मानवतावादी दृष्टिकोन वर्गात वातावरण निर्मिती कौशल्य, समवाय कौशल्य, बदलत्या संकल्पनेबाबत विचार करण्याची क्षमता, आधारांची माहिती, मानसशास्त्रीय ज्ञान, शिक्षणातील नवविचार प्रवाहांचे ज्ञान, चालू

घडामोडींचे ज्ञान. सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.१० गटकळ, रंजना संतोष. (ऑगस्ट २००७). माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास, नाशिक : प्राजक्ता प्रकाशन.

प्रश्नपद्धती व प्रश्नतंत्रविषयक, सदर शब्दांचा व संकल्पनाचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.११ पवार, ना. ग. (जुलै २००८). मूल्यशिक्षण; आजच्या संदर्भात. पुणे : नित्यनूतन प्रकाशन. सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला. सद्गुणी, व्यक्तिमत्त्वाचा संतुलित विकास, नागरिक कर्तव्याची जाणीव, वैश्विक धर्म, साम्यवादी विचार, शुचिता स्वच्छता, निर्भयता, स्पृश्यास्पृश्य संकल्पना, कर्तव्यदक्षता.

२.५.१२ नागतोंडे, किरण. (१ सप्टेंबर २००६). नैतिक मूल्य शिक्षण. नागपूर : विद्या प्रकाशन. परधर्मसहिष्णुता, व्यावसायिक जागरुकता, कर्मयोग्याबद्दल आदर, सदर शब्दांचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी चाचणी तयार करताना झाला.

२.५.१३ भालेराव, चव्हाण, जाधव,. (जानेवारी -२००६). शिक्षक. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. सदर पुस्तकात लेखकाने शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीचा अर्थ सांगितलेले दिसून येते. याचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकीचा अर्थ समजण्यसाठी झाला.

शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीचा अर्थ

१) आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी समर्पित वृत्तीने श्रम करणे व पुरेसा वेळ देण्याची शिक्षकाची तयारी.

२) शिक्षकी व्यवसायाशी आवश्यक तो त्याग करण्याची भावना असणे.

३) शिक्षकी व्यवसायात बांधीलकीने काम करण्याची निश्चित वेळ नसते.

४) बांधीलकी हे मूल्य जोपासणारा शिक्षक सतत आपल्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन करून नवनवीन संदर्भ शोधत असतो.

२.५.१४ **भालेराव, सुभाष .चव्हाण,कदम, शिंदे,प्रतिभा.(२००६). शालेय व्यवस्थापन. नाशिक : गणेशपूजा प्रकाशन.** सदर पुस्तकात शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीच्या खालील व्याख्या दिलेल्या आहे. सदर व्याख़्येचा उपयोग संशोधकाला व्यावसायिक बांधीलकीची कार्यात्मक व्याख़्या तयार करताना झाला.

१.'परिणामकारक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, यासाठी योग्य वातावरण निर्मिती व ती प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी शिक्षकाची आपल्या व्यवसायावर निष्ठा असणे यालाच व्यावसायिक बांधीलकी असे म्हणतात'.

२.'शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या कामगिरीचे स्वरूप, निष्ठा यातून व्यक्त होणारे व्यावसायिक अंग म्हणजे बांधीलकी होय'

३. **शिक्षणतज्ज्ञ मॅग्डुगल यांच्या मते,** 'भावनिक अनुभवाला सहजप्रवृत्तीचा गाभा म्हटले आहे. ते शिक्षकांच्या बांधीलकीच्या दृष्टिकोनातून योग्यच आहे'

यशस्वी शिक्षक होण्यासाठी आपल्या कामाचे नेमके आकलन होणे गरजेचे आहे. या आकलनाचे प्रकटीकरण प्रत्यक्ष वर्तनातून दिसायला हवे असे अपेक्षित आहे. शिक्षकाची नीतीमत्ता, मूल्ये आणि तत्त्वे यांच्याशी बांधीलकी असेल तरच त्याच्या व्यवसायाला अर्थ उरणार आहे. बांधीलकी ही हळूहळू विकसित होत जाणारी प्रक्रिया आहे.

२.५.१५ **पेंडके, प्रतिभा.(प्रथमावृत्ती २००६). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. नागपूर : श्री. मंगेश प्रकाशन.** सदर पुस्तकात शिक्षकाची विद्यार्थ्यांच्याप्रति असलेली व्यावसायिक बांधीलकी संदर्भात माहिती मिळाली.

विद्यार्थ्यांच्याप्रति असलेली बांधीलकी (Commitment to the Learners)

शिक्षकांच्या सुरक्षित हाताखाली तयार होणे हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आनंददायक, समाधानकारक अनुभव आहे. उत्तम अध्यापन हे वर्गातील सहकार्य आणि शिक्षक

आणि विद्यार्थी यांच्यातील प्रभावी आंतरक्रियांचा परिणाम असते. शिक्षक-प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशित प्रशिक्षणार्थी 'उदयाचे शिक्षक' म्हणून काम करणारे असतात. त्यामुळे भावी शिक्षक निष्ठावान असावा याचा सतत विचार करून त्या निष्ठा निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांशी बांधीलकी असावी लागते. शाळा, महाविद्यालयात किंवा घरी सतत विद्यार्थ्यांच्या विकासाचा विचार समर्पित भावनेने करणे म्हणजे विद्यार्थी बांधीलकी होय.

'विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांच्या भावनांची दखल, त्यांच्या विकासाची ओढ आणि सहकार्याची उर्मी या सर्व गोष्टी मनापासून करणे म्हणजे विद्यार्थ्यांविषयी बांधीलकी होय'.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे, मानवजातीला घडविणारा शिल्पकार आहे. सुसंस्कारित मन घडविणारा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकाने जर आपले कार्य समर्पित भावनेने केले नाही तर त्याला बांधीलकी म्हणता येणार नाही.

विद्यार्थ्यांवरील प्रेम, अडचणीच्या वेळी त्यांना मदत करावयाची तत्परता, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड इत्यादी गोष्टींमधून विद्यार्थ्यांशी असलेली बांधीलकी व्यक्त होते. विद्यार्थी अध्ययनास प्रवृत्त होणे म्हणजे यशस्वी अध्यापन होय. विद्यार्थी अध्ययनानुकूल होऊन त्याचा विकास होईल तर शिक्षकांचे शिक्षक म्हणून अस्तित्व लक्षात राहील. अध्ययन ही एक वृत्ती आहे. शालेय जीवनातच ही वृत्ती विकसित होते. आयुष्यभर ती पुरते, टिकून राहते. विद्यार्थी असणे ही आनंददायी प्रक्रिया आहे असे विद्यार्थ्याला वाटले तरच त्याची अध्ययनवृत्ती टिकून राहील. अध्ययनवृत्ती वाढेल हा आनंद केवळ विद्यार्थ्यालाच मिळतो असे नाही तर शिक्षकालाही तो प्राप्त होतो. आपण शिक्षकांच्या सान्निध्यात सुरक्षित आहोत याची जाणीव विद्यार्थ्याला होत असते. शिक्षकाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थी-बांधीलकी म्हणजे विद्यार्थी प्रेम, विद्यार्थ्यांच्या चुका आणि खोड्या याबाबत सहिष्णुवृत्ती, त्यांच्या प्रगतीबाबत शिक्षकाची असलेली बांधीलकी, अध्यापनशास्त्राच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या वर्तनाची जाण आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरील त्यांच्या जीवनाचा उच्चतम दर्जा निश्चित होत असतो. शिक्षकाची भूमिका या बांधीलकीमुळे अधिक प्रभावी होत जाते.

शिक्षक-प्रशिक्षणात शैक्षणिक मानसशास्त्राचा समावेश आहे. विद्यार्थ्यांबद्दल जिव्हाळा आणि सहिष्णुवृत्ती यांचा संबंध शैक्षणिक मानसशास्त्राच्या अध्यापनाशी आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकाने सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षकांची ही विद्यार्थी विकास-निष्ठा शिक्षकाच्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान प्रदान करते. विद्यार्थ्यांशी शिक्षकांचे वर्तन आक्रमक असेल तर अशा शिक्षकांनी आपल्या आक्रमक वर्तनाचे पृथःकरण करावे, चिंतन करावे त्यातून नक्कीच त्यांना सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून चांगला मार्ग सापडेल.

विद्यार्थ्यांबाबत आत्मीयता असणारा, प्रत्येकाचा स्वीकार करण्याची प्रवृत्ती असणारा, अध्ययनार्थ्यांमधील व्यक्तिभेद ओळखून त्यांना आपला विकास करण्याची संधी उपलब्ध करून देणारा शिक्षकच विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणण्यास बांधील असतो, वचनबद्ध असतो. शिक्षकामध्ये सहिष्णुता असेल तर तो आपल्या विद्यार्थ्यांशी सहिष्णुतेने वागेल आणि वर्तनातून त्यांच्यावर मूल्यसंस्कार करू शकेल.

२.५.१६ भिंताडे ,वि.रा. (प्रथमावृत्ती २००६). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.सदर पुस्तकात 'NCTE' च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकांची अध्ययनार्थ्यांच्या संदर्भात असलेली बांधीलकी पुढील मुद्यांद्वारे मांडण्यात आली. सदर मुद्यांचा उपयोग शिक्षकांची अध्ययनार्थ्यांच्या संदर्भात असलेली बांधीलकीची उद्दिष्टे ठरविण्यासाठी झाला.

१. अध्ययनार्थ्यांच्या अध्ययन विषयक गरजा भागविण्यासाठी त्यांच्याशी प्रेमाने आणि संवेदनशीलतेने वागणारा.
२. प्रत्येक अध्ययनार्थ्यांची वैयक्तिक ओळख करून घेऊ न त्याच्या गरजेनुसार त्याच्याकडे वैयक्तिक लक्ष पुरवून अध्ययनास प्रोत्साहन देणारा.
३. अध्ययनार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी त्यांची बौद्धिक क्षमता, महत्त्वाकांक्षा, भावना आणि स्वभाव यांची ओळख करून घेणारा.
४. अध्यापक व अध्ययनार्थ्यांमध्ये विश्वासाचे नाते प्रस्थापित करणारा.

५. स्वयंविकास साधण्यासाठी विद्यार्थ्यांशी असलेले नाते आणि वागणूक/आंतरक्रिया याबाबत स्वंय:मूल्यमापन करणारा आणि सुधारणेसाठी आवश्यक ते प्रत्याभरण घेणारा.

६. अध्ययनार्थ्यांच्या खोड्या आणि चेष्टा यांकडे दुर्लक्ष करून त्यांना विषयाचे ज्ञान करून घेण्यास मदत करणारा.

७. अध्ययनार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची रूजवणुक करणारा.

८. अध्ययनार्थ्यांची प्रगती आणि मनुष्यबळ विकास यासाठी कार्यरत असणारा.

९. अध्ययनार्थ्यांमध्ये 'अध्ययन म्हणजे आनंददायी कृती' (Learning is a joyful activity) ही संकल्पना रुजविणारा.

अशा सर्व क्षमता असणारा शिक्षक आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहून अध्ययनार्थ्यांचा विकास हे ध्येय साध्य करतो. अध्ययनार्थ्यांबाबत असलेली बांधीलकी शिक्षकाचे मूल्यमापन करण्यास सहाय्यक ठरते.

२.५.१७. वीरकर, प्र. कृ.वीरकर, प्रतिभा.(२००४). शालेय शैक्षणिक व्यवस्थापन, पुणे : पुणे विद्यार्थी गृह, रोहन प्रकाशन. सदर पुस्तकात शिक्षकाची समाजाप्रति असलेली व्यावसायिक बांधीलकी संदर्भात माहिती मिळाली.

समाजाप्रति बांधीलकी (Commitment to the society)

शिक्षकाला समाज बांधीलकीचे, समाजाच्या जडणघडणीचे काम करावयाचे असते. ''If you educate a boy, you educate one individual. If you educate a girl you educate the family and if you educate a teacher, you educate the whole community. ''[7]

सामाजिक बांधीलकीची जाण असणारा शिक्षक तयार केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य संवेदना तो निर्माण करू शकेल. त्यामुळे सामाजिक बांधीलकीची खरी भावना निर्माण होऊ शकेल. समाजातील विविध कुटुंबाचा प्रगतीतील सहभाग, समाजाच्या व देशाच्या विकास कार्यातील सक्रिय सहभागातून सामाजिक बांधीलकीचे दर्शन घडते.

समाजाच्या अपेक्षापूर्तीसाठी शाळा असतात. समाजाच्या गरजा व अपेक्षांप्रमाणे शाळांमध्ये अभ्यासक्रम व अभ्यासेतर उपक्रम राबविले जातात. शाळेने पालकांशी

संपर्क ठेवल्याने त्यांच्या गरजा व अपेक्षा कळत असतात. समाजाच्या, पालकांच्या समस्या कळाव्यात यासाठी पालक-शिक्षक संघाची स्थापना सर्वत्र केली आहे. समाजाकडूनच अनेकदा भौतिक साधनसंपत्तीसाठी मदत मिळत असते तसेच अनेक कार्यक्रम, उपक्रमांमधून सहभाग आणि सहकार्य मिळत असते. समाजाशी जेवढी बांधीलकी असेल तेवढी शाळा प्रगतीपथावर जाते.

स्थानिक समाजाचे अंतरंग शिक्षकाला जाणून घेता आले पाहिजे. विद्यार्थी, कुटुंब, स्थानिक समाज आणि व्यापक समाज यांच्या विकासासाठी शिक्षकाला समाजाशी बांधीलकी ठेवणे गरजेचे आहे आणि समाजनिष्ठ कार्यक्षमतेचा उपयोग करून समाजहिताची कामे करणे अपेक्षित आहे. स्थानिक समाजाशी आपला वैयक्तिक आणि सामूहिक संबंध असतो. आपण त्या समाजाशी बांधील असतो याची जाणीव शिक्षकांना असावी. भूतकाळात ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला, जे शिक्षणापासून वंचित राहिले त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरविणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या मुलामुलींकडे विशेष लक्ष देऊन विविध योजनांचा लाभ त्यांना मिळवून देण्यासाठी त्यांना पुरेपूर मदत करणे शिक्षकांचे आद्यकर्तव्य आहे. शिक्षित समाजाच्या रांगेत बसण्यासाठी अशा वंचित घटकांना उद्युक्त केल्याने त्यांचाच फायदा होईल असे नाही तर संपूर्ण समाजाचे हित होऊन समाज विकसित अवस्थाकडे झेप घेईल. सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी आणि उंचावण्यासाठी त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्यांचा व अभिवृत्तींचा चांगला उपयोग करून घेता येईल.शिक्षणापासून वंचित समाजातील प्रौढांना प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे.

शिक्षकांची सामाजिक बांधीलकी विद्यार्थ्यांमध्ये समतेची भावना निर्माण करणारी ठरावी. हे विद्यार्थी निरक्षर व दरिद्री पालकांचे पाल्य असतील तरीही त्यांना शिक्षण आपले वाटले पाहिजे. समाजाचा सहभाग असेल तर पटनोंदणीची प्रक्रिया यशस्वी होईल. समाजनिष्ठ शिक्षक समाजाच्या सर्व घटकांमध्ये आपुलकीचे वातावरण निर्माण करू शकेल. ज्या समाजात शिक्षक काम करीत असेल त्या समाजात मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ म्हणून त्याला सन्मानाने स्थान प्राप्त होते. संपूर्ण समाजासाठी शिक्षकाचा दृष्टिकोन विधायक असेल तर समाज त्याचे कौतुक

करतो. स्थानिक समाजनिष्ठेचे परिवर्तन विशाल व व्यापक समाजनिष्ठेत होणे गरजेचे आहे.

शिक्षकांना 'राष्ट्राचे शिल्पकार' म्हटले जाते. शिल्पकाराची भूमिका पार पाडण्यासाठी शिक्षक-शिक्षणाच्या, प्रशिक्षणाच्या कालावधीतच समाजनिष्ठेची रूजवणूक विद्यार्थी शिक्षकांमध्ये झाली पाहिजे. हे प्रशिक्षणार्थीच समाजविकासाठी भविष्यात अर्थपूर्ण काम करू शकतील. विद्यार्थ्यांच्या, शाळेच्या विकासात पालकांचे सहकार्य, योगदान महत्त्वाचे ठरते. पालकांशी पर्यायाने समाजाशी संपर्क साधून शाळा विकासाच्या विविध योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करता येईल.

शिक्षण आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण समाजाच्या सहयोगाने शिक्षणाचे कार्य चालते. तर समाजाचा विकास शिक्षणातून होतो. अध्यापक हा शिक्षण प्रक्रियेतील विद्वान घटक असल्यामुळे तो समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊ शकतो. शिक्षकाने सामाजिक प्रक्रिया समजून घेऊन सामाजिक विकासात आपले योगदान देणे अपेक्षित असते. समाजाचा एक घटक म्हणून शिक्षकाला समाजाविषयी आपुलकी असेल, सामाजिक प्रक्रियांबाबत आदर असेल तर तो सामाजिक विकास करण्यास सक्षम ठरू शकेल.

२.५.१८ पेंडके, प्रतिभा.(प्रथमावृत्ती २००६). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, नागपूर : श्री. मंगेश प्रकाशन. सदर पुस्तकात 'NCTE' च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकांची समाजाप्रति असलेली बांधीलकी पुढील मुद्यांद्वारे मांडण्यात आली. सदर मुद्यांचा उपयोग शिक्षकांची समाजाप्रति असलेली बांधीलकीची उद्दिष्टे ठरविण्यासाठी झाला.

१. शाळा, महाविद्यालय आणि समाज यात आंतरक्रिया प्रस्थापित करणारा.
२. समाजातील साधनस्त्रोतांचा उपयोग करून शिक्षणाचा विकास आणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विकास साधणारा.
३. समाजातील समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी स्वत:चे योगदान देणारा.
४. अध्ययनार्थ्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शाळा आणि समाज यांच्यात सामंजस्यपूर्ण संबंध निर्माण करणारा.

५. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा कोणत्याही बाबतीत भेदभाव न करता समाजामध्ये आणि अध्ययनार्थ्यांमध्ये समानतेची भावना निर्माण करणारा.

६. समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या उन्नतीची काळजी घेणारा.

७. समाजाचा उत्तम मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि वर्तन असणारा.

८. समाजाप्रति जबाबदारी असणारा.

९. समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, बालमजुरी यांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करून समाजाचा विकास करणारा.

१०. स्थानिक समाजाच्या आणि शाळेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविणारा.

११. पर्यावरण संरक्षणासाठी समाजाला मदत करणारा आणि असे समाजाप्रति वर्तन असणारा शिक्षक आपल्या व्यवसायात प्रभावी होतो आणि समाजात आपली उच्च प्रतिमा निर्माण करतो.

२.५.१९ दुनाखे , अरविंद.(प्रथमावृत्ती २००६). शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन, पुणे : नित्यनूतन प्रकाशन. सदर पुस्तकात शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी संदर्भात माहिती मिळाली.

व्यावसायिक बांधीलकी (Professional Commitment)

भारतात अध्यापन हा व्यवसाय एक उमदा व्यवसाय समजला जातो. शिक्षकाला समाजात मानाचे स्थान आहे. बांधीलकीच्या या क्षेत्रात दोन घटक महत्त्वपूर्ण ठरतात.

अ) स्वत:च्या व्यवसायाचा अभिमान

ब) व्यावसायिक विकासाची प्रबळ इच्छा

कुठलाही व्यवसाय निष्ठापूर्वक क रणे त्यात बाजारूपणा येऊ न देणे, हीच व्यावसायिक बांधीलकी होय. शिक्षकी व्यवसायामध्ये सतत वाचन, लेखन, शोधन आणि ज्ञानाचा शोध या गोष्टी सातत्याने कराव्या लागतात. व्यवसायातील आचारसंहिता, नैतिकता, मूल्ये यातूनच व्यावसायिक बांधीलकी निर्माण होते.

शिक्षकी व्यवसायात पावित्र्य, प्रामाणिकपणा, तत्परता, जबाबदारीची जाण, विद्यार्थ्यांविषयी आस्था, सहकार्य, वर्तननियमांवर निष्ठा या सर्व गोष्टींचा समावेश असेल तर व्यावसायिक बांधीलकी आपोआपच निर्माण होते.

शिक्षकी व्यवसायाचे तात्त्विक आणि व्यावसायिक गुणवैशिष्ट्यांच्या संदर्भात समन्वय साधला जात असेल तर त्यातून व्यावसायिक बांधीलकी निर्माण होते. प्रत्येक शिक्षक पूर्ण सामर्थ्यशाली गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी बांधीलकी जपणारा, निर्णय प्रक्रियेत स्वायत्ततेची मागणी करणारा, आशयज्ञानावर पूर्ण प्रभुत्व असणारा, अध्यापन कौशल्य असलेला, विकासाची कास धरणारा असेल तर व्यावसायिक बांधीलकी अधिक यशस्वी ठरेल.

व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रामधील दोन घटक :

अ) अध्यापन व्यवसायात असण्याचा सार्थ अभिमान,

ब) व्यावसायिक विकासाची तीव्र तळमळ

वास्तविक: 'शिक्षकी व्यवसाय' हा एक 'उदात्त व्यवसाय' आहे. सर्वात पवित्र व पुण्यकर्माचा व्यवसाय आहे. समाज आपल्या हाती मुलांना सोपवितो. हे करीत असताना समाजाचा फार मोठा विश्वास शिक्षकांवर असतो. ही फार मोठी जबाबदारी समाजाने आपल्यावर सोपविलेली आहे याची जाणीव शिक्षकांना असावयास हवी. अध्ययनातील मूलतत्त्व शिकविणे हा शिक्षकांच्या कर्तव्यातील एक भाग झाला; परंतु हे कर्तव्य मर्यादित स्वरूपाचे असते. शिक्षकांनी समाजाच्या प्रगतीसाठी संपूर्णपणे गुंतून जाणे, समाजाशी एकरूप होणे हे व्यापक स्वरूपाचे कार्य आहे ते शिक्षकांनी स्वीकारावे. आपल्या सहकाऱ्यांबरोबर जुळवून घेण्याची व कार्य करण्याची क्षमता, सहकार्य भावना आणि एकता प्रस्थापित करण्याची क्षमता, विविध कार्यक्रमांचे आयोजन करून शिक्षकांचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न, आपल्या विषयावर प्रभुत्व, प्रभावी अध्यापन, मानवी संबंध हाताळण्याचे कौशल्य या सर्व बाबी शिक्षकाच्या व्यवसायनिष्ठेच्या निदर्शक आहेत.

२.५.२० शिवणेकर, ल. मा. (नोव्हेंबर २००४). अध्यापक भूमिका व कार्ये, पुणे : नूतन प्रकाशन. सदर पुस्तकात 'NCTE' च्या दस्तऐवजांमध्ये शिक्षकाच्या आपल्या

व्यवसायाप्रति असलेल्या बांधीलकी नमूद केल्या आहेत. सदर मुद्यांचा उपयोग शिक्षकाच्या आपल्या व्यवसायाप्रति असलेली बांधीलकीची उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी झाला.

१. अध्यापन हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे. त्याचा सार्थ अभिमान बाळगणे आणि व्यावसायिक विकास करणे.
२. अध्यापन व्यवसायाला आणि शिक्षकांच्या प्रतिमेला बाधा आणणारे घटक ओळखून त्यांचा बिमोड करण्यासाठी प्रयत्न करणारा.
३. अध्ययनार्थ्यांना अध्ययनासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि समाजाला उत्तम नागरिक पुरविण्यासाठी स्वतःचा आत्मविश्वास वाढवून व्यावसायिक कार्य पार पाडणे.
४. अभ्यासपूरक आणि अभ्यासेत्तर कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि त्यात सक्रिय सहभाग घेणे.
५. संस्थेच्या परिणामकारकतेसाठी विविध उपायांचा अवलंब करणे.
६. व्यावसायिक नीतिमत्ता आणि आचारसंहितेचे पालन करणे.
७. व्यवसायाप्रति एकनिष्ठ राहून शिक्षणाचे ध्येय प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे.
८. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि व्यावसायिक विकास साधण्यासाठी विविध चर्चासत्रे, कार्यशाळा, चर्चा यामध्ये सहभागी होणे.

२.५.२१ येवले, समी, सप्रे, निलिमा. डागे, सुनिता. भोसले, रमा. (२००७) . शिक्षक होण्यासाठी. कोल्हापूर : फडके प्रकाशन. सदर पुस्तकात शिक्षकाची श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकी संदर्भात माहिती मिळाली. तसेच खालील मुद्यांचा उपयोग शिक्षकाची श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी असलेली बांधीलकीची उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी झाला.

व्यावसायिक दृष्ट्या बांधिल असलेला शिक्षक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारक करण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतो. अध्यापक

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान शिक्षकांमध्ये त्यांची व्यक्तिगत आणि व्यावसायिक बांधीलकी दृढ केली जाऊ शकते.

"शाळा/महाविद्यालय, वर्ग आणि समाजात वावरताना त्यांच्याविषयी आस्था वाटणे आणि जे काही करीत ते सर्वोत्कृष्टच असेल या जिद्दीने केलेली कृती म्हणजेच सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी होय." व्यवसायनिष्ठ शिक्षक ज्ञान आणि उत्कृष्टता यांचा सुरेख संगम साधणारा असतो. आपल्या विद्यार्थ्यांनीही ज्ञान प्रेमी व उत्कृष्टतेची आवड यांचा ध्यास घ्यावा असे शिक्षकाला वाटते. ज्ञान संपादन, ज्ञान संक्रमण याविषयी शिक्षक या नात्याने उत्कृष्ट तेच आपण साध्य करू असे त्याला वाटते. शब्द आणि कृती यात सुसंगतता असते. या दोहोंद्वारे तो सर्वोत्कृष्टतेपर्यंत जाण्याचा प्रयत्न करतो. अध्ययन-अध्यापन कार्यक्रमात दिवसेंदिवस अधिकाधिक गुणवत्तापूर्ण बदल कसे करता येतील अशी विचारसरणी असावी. शिक्षक-शिक्षणातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये ज्ञान आणि उत्कृष्टता यांबद्दल प्रेम निर्माण करणे आवश्यक आहे. शिक्षकाची व्यावसायिक आणि वैयक्तिक संस्कृती म्हणजे प्रेम होय.

शिक्षक-प्रशिक्षणातून सर्वोत्कृष्टतेचा ध्यास असणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊ शकणारेच शिक्षक तयार होतील असे प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी नवनवीन प्रयोग आणि उपक्रमांना शास्त्रीय बैठक देणे अपेक्षित आहे. 'परस्पर सहकार्यातून गुणवत्तेकडे' हे तत्त्व स्वीकारून क्षमताधिष्ठित, उत्कृष्ट कामगिरी करू शकणारे व बांधीलकी जपणारे शिक्षक तयार झाल्यास गुणवत्तेची हमी प्रत्यक्षात साकारेल. शिक्षक-प्रशिक्षणातील साचेबंदपणा व परंपरागत स्वरूप बदलणे आवश्यक आहे. आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कल्पनेतील इ. स. २०२० चा सामर्थ्यशाली भारत निर्माण करावयाचा असेल तर शिक्षक-प्रशिक्षणामध्ये सर्वोत्कृष्टतेचा ध्यास घेतलेले, ध्येयाने वेडे झालेले शिक्षकच हे काम करू शकतील.

समाज, अध्ययनार्थी यांच्यासाठी शिक्षक हा ज्ञानाचा स्त्रोत असतो. शिक्षकाने आपली ही प्रतिमा कायम देऊन आपला व्यवसाय उत्कृष्टपणे करण्यासाठी सातत्याने अध्ययनार्थी असावे. यासाठी शिक्षकाने अध्यापन व्यवस्थेसाठी आवश्यक असणारी मूल्ये, क्षमता गुणवैशिष्ट्ये आणि कौशल्ये प्राप्त करून आपली ज्ञानाचा स्त्रोत ही

प्रतिमा कायम टिकवावी. ज्ञानाचे संक्रमण हे केवळ शब्दांनी होत नाही तर त्यासाठी कृती, वर्तन आणि चारित्र्य यांचीही आवश्यकता असते. शिक्षकांनी आपली उक्ती आणि कृती यात साम्य ठेऊन कार्य करावे. व्यावयायिक उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी शिक्षकाने एक वचन नेहमी लक्षात ठेवावे. "There is better way to do than what I have done today" **हे वचन एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून अंमलात आणल्यास व्यवसायाची उत्कृष्ट पातळी गाठता येईल.**

१. **आपल्या व्यवसायाला उत्कृष्टता प्रदान करण्यासाठी आणि शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यासाठी उच्च ज्ञान मिळविणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.**
२. **आदर्श अध्यापक होण्यासाठी केवळ शब्दांची नव्हे तर कृती, वर्तन आणि चारित्र्याची आवश्यकता असते. उत्तम चारित्र्य व वर्तन आणि उत्कृष्ट कृती या माध्यमांतून व्यावसायिक उत्कृष्टता गाठता येते.**
३. **ज्ञानी समाजाचा मार्गदर्शक, तत्त्वज्ञ व मित्र म्हणून कार्य करण्यासाठी उत्तम माणूस होण्यासाठी प्रयत्न करावा.**
४. **आपल्या कार्याप्रति प्रामाणिकपणा असावा. सचोटीने आपले कार्य पूर्ण करावे.**
५. **सर्व अध्ययनार्थी सर्व विषयांमध्ये उत्कृष्टता प्राप्त करतील याबाबतची जाणीव असावी. त्यासाठी हेतुपुरस्सर प्रयत्न करावेत.**
६. **कृती संशोधन कार्याच्या माध्यमातून नवनवीन अध्यापन पद्धतींची आणि शैक्षणिक साधनांची निर्मिती तसेच उपयुक्तता तपासणे.**
७. **प्रत्येक कृती उत्कृष्ट करण्याची सवय स्वत:ला लावून घ्यावी.**
८. **कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले आणि अध्ययन अकार्यक्षम असलेले अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन कृतींचा संच तयार करावा. त्याद्वारे अध्यापन उत्कृष्टता प्राप्त करावी.**

२.५.२२ पारसनीस. न. रा. (२००८). शिक्षकांच प्रशिक्षण. पुणे : नूतन प्रकाशन,

सदर पुस्तकात शिक्षकाची जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकी संदर्भात माहिती दिलेली आहे. तसेच खालील मुद्यांचा उपयोग शिक्षकाची जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकीची उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी झाला.

जुन्या मानवी मूल्यांप्रती असलेली बांधीलकी

भारतीय संविधानात नमूद केलेली आणि मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांच्याशी निगडीत असणारी मूल्ये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद केलेली दहा गाभाभूत घटक आणि मूल्ये अभ्यासक्रमातून प्रतिबिंबित झालेली आहेत. ती मूल्य आचार विचारातून, वागण्या बोलण्यातून सतत प्रतिबिंबित झाली पाहिजे कारण मूल्ये ही मुद्दाम शिकविली जात नाही. आपली जर मूल्यांशी बांधीलकी असेल तर विद्यार्थी शिक्षकांच्या प्रत्येक कृतीच्या अनुकरणातून गाभामूल्ये जोपासण्याचा प्रयत्न करतात. शिक्षकाने वर्गात, शाळेत व सर्वत्र मूल्याधिष्ठित वातावरण निर्माण केले पाहिजे. मूल्यनिष्ठा असेल, मूल्यांविषयी बांधीलकी असेल तरच हे शक्य आहे. कोठारी शिक्षण आयोगाचेही 'वर्गावर्गातून चारित्र्याची निर्मिती होत असते' असे मत मांडलेले आहे. मूल्याधिष्ठित बांधिलकी ही केवळ प्राचार्यांनी जपून चालणार नाही. तर संबंधित सर्वच घटक जागरूक असले पाहिजे. विद्यार्थी, शिक्षक, पालक, व्यवस्थापकीय मंडळ, परिसरातील लोक, संस्था या सगळ्यांची मूल्यांविषयी बांधीलकी असावी.

प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी हा शिक्षण-प्रशिक्षणातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. या घटकाशी प्राचार्य व प्राध्यापकांचे संबंध कशाप्रकारे आहेत यावर शैक्षणिक वातावरण अवलंबून असते. प्रशिक्षणार्थ्यांचे अध्यापन गुणवत्ता पूर्ण व्हावे यासाठी बांधीलकी महत्त्वाची असते. अध्ययन-अध्यापन महत्त्वाची प्रक्रिया आहे असा संदेश प्राचार्यांच्या मार्फत विद्यार्थी, प्राध्यापकांना सतत पोहोचणे गरजेचे असते. अध्यापन कार्यासंबंधी प्रशिक्षणार्थीच्या गरजा, आकांक्षा समजून घेतल्या पाहिजे. सतत वाचन, अभ्यास यातून बौद्धिकदृष्ट्या ताजेपणा ठेवता आला पाहिजे. प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यातील घडणारी आंतरक्रिया विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारी व विकासाला कारणीभूत ठरणारी असावी.

नि:पक्षपातीपणा, वस्तुनिष्ठता, बौद्धिक प्रामाणिकपणा, राष्ट्रनिष्ठा इत्यादी व्यावसायिक मूल्यांचे सातत्याने प्रकटीकरण होणे म्हणजे मूल्यांविषयी बांधीलकी जपणे होय. आधुनिक युगातील ढासळत्या मूल्यमापनाच्या काळात शिक्षकांची मूल्यनिष्ठा ही इतर निष्ठांप्रमाणेच महत्त्वाची आहे. मूल्यव्यवस्था ही नेहमीच दिशादर्शकाचे काम करते. कसे वागावे, काय करावे हे ही मूल्यव्यवस्था शिकविते. प्रामाणिकपणा, सहकार्य, प्रेम, सत्य, वस्तुनिष्ठता, नियमितपणा, वक्तशीरपणा या सर्वमान्य मूल्यांचा स्वीकार शिक्षकांनी करावा. त्यांच्या भूमिकेतून ही मूल्य व्यक्त व्हावीत अशी अपेक्षा असते. विद्यार्थ्यांच्या संस्कारक्षम मनांवर या मूल्यांचा स्वीकार व्हावा. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक अविभाज्य अंग म्हणजे ही मानवी मूल्ये होत.

वर्तन परिवर्तन हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या वर्तनाला योग्य वळण लावता येते. त्यासाठी शिक्षकांनी काही नीतीमूल्यांचा स्वीकार केला पाहिजे. चारित्र्यसंपन्नता, आत्मविश्वास, सचोटी, समायोजन, विषयज्ञान प्रभुत्व, प्रभावी व्यक्तिमत्त्व, उपक्रमशीलता, सत्यव्रताची कास, व्यवसायाबद्दल आदर इत्यादी गुणांचा स्वीकार केल्यास मानवी मूल्यांविषयीची बांधीलकी विकसित होईल. शिक्षकाच्या वर्तनाची छाप विद्यार्थ्यांवर पडून आपोआपच निकोप पिढी उदयास येईल.

संपूर्ण जगभर मूल्यसंवर्धन, मूल्यविकास आणि मूल्यशिक्षण हे मुद्दे सतत चर्चेत राहणारे मुद्दे आहेत. शैक्षणिक धोरणांनी मूल्यशिक्षण, मूल्यरूजवण करणे हे शिक्षणाचे ध्येय असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार विविध महाविद्यालयातून मूल्यशिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षणासाठी आजपर्यंत अनेक पद्धती उदयास आल्या; परंतु अगदी खेदाने नमूद करावे लागते की त्यापैकी एक ही पद्धती मूल्यशिक्षणासाठी उपयुक्त किंवा उत्कृष्ट पद्धती ठरली नाही शिक्षकाने स्वत: मूल्याधिष्ठित आचरण करून विद्यार्थ्यांमध्ये शब्दांद्वारे नव्हे तर वर्तन व कृतींद्वारे मूल्यांची रूजवण करावी. मूल्यनिष्ठेकरिता अध्यापकांमध्ये पुढील बाबतीत बांधीलकी असणे आवश्यक आहे.

१. संपूर्ण मानवी विकासाकरिता अध्यापन व्यवसायाची मूल्ये समजून घेणे.
२. भारतीय घटनेमध्ये नमूद केलेली आणि मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांच्याशी निगडीत असणारी मूल्ये समजून घेणे.

३. विविध शैक्षणिक धोरणांनी ठरविलेली शैक्षणिक मूल्ये समजून घेऊन त्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.

४. अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन आणि शिक्षकांचे वर्तन याद्वारे अध्ययनार्थ्यामध्ये मूल्ये रूजविणे.

५. मूल्यसंवर्धन करणारे विविध कार्यक्रम आयोजित करून त्याद्वारे विद्यार्थ्यामध्ये मूल्यांची रूजवण करणे, विकास करणे, उदा. कथन, प्रश्नमंजूषा, भूमिकापालन, नाट्य इत्यादी.

६. लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे.

७. समाजातील अनिष्ट गोष्टींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

८. विद्यार्थ्यांसाठी शिक्षक आदर्श असतो ही जाणीव ठेऊन आपले वर्तन ठेवणे/मूल्यधिष्ठित वर्तन असावे.

९. सहकार्य आणि बंधुभाव या मूल्यांची रूजवणुक आणि विकास करण्यासाठी सहली, प्रदर्शने, संग्रहालये यांना भेटी असे विविध उपक्रम राबविणे.

अशा विविध कृती आणि उपक्रमांचे आयोजन करून मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी प्रयत्न करणारा शिक्षक खऱ्या अर्थाने मूल्यनिष्ठेने कार्य करतो आणि आपल्या व्यवसायाला उत्कृष्टता मिळवून देतो. व्यावसायिक बांधीलकी जपण्यासाठी व्यवसायाशी संबंधित या सर्व निष्ठा जपणारा अध्यापक आपल्या व्यवसायावर प्रेम करून व्यवसायाचा अधिकाधिक विकास करण्यासाठी बांधील असतो. एक प्रतिष्ठित व्यवसाय म्हणून अध्यापन व्यवसायाला ओळख निर्माण करून देतो. शिक्षक हे समाजाचे आदर्श असतात. शिक्षकात प्रामाणिकपणा, प्रेम, सत्यता, वक्तशीरपणा या मूल्यांचा विकास झालेला असावा.

वरील विवेचनावरून शिक्षक-प्रशिक्षकांचे विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्व पटते. अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षक हा माध्यमिक शिक्षकास घडवित असतो आणि हेच माध्यमिक शिक्षक भावी पिढी घडवित असतात. त्यामुळेच या भावी पिढ्यांना अप्रत्यक्षरित्या घडविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास करण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन होणे संशोधकास

आवश्यक वाटले. म्हणून प्रस्तुत संशोधनात व्यावसायिक बांधीलकी या चलाचा समावेश करण्यात आला आहे.

२.५.२३ **बागची, सुखोतो. (२००९).मैत्री व्यावसायिकतेशी. पुणे : रोहन प्रकाशन.** सदर पुस्तकात अध्यापकाची सचोटी/ व्यावसायिक प्रामाणिकपणा संदर्भात माहिती मिळाली.

अध्यापकाची व्यावसायिक सचोटी/प्रामाणिकपणा

समाज आणि अध्ययनार्थ्यांना अध्यापन व्यवसायाचे महत्त्व पटवून देणारा आणि समाजामध्ये एक प्रामाणिक व्यवसाय म्हणून ओळख करून देणारा शिक्षक प्रामाणिक असतो, सचोटीने आपला व्यवसाय करतो.

शिक्षकाला वर्ग, संस्थांतर्गत, शाळा बाह्य कार्यक्रम, पालकांबाबत, समाजाबाबत सचोटी या सर्वांसोबत प्रामाणिकपणे कार्य करावे लागते. त्यावरून अध्यापकाची व्यावसायिक सचोटी सिद्ध होते.


१. **वर्गाध्यापन :** वर्गाध्यापनात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया वर्गातील कृतीचे किंवा अध्यायनार्थ्यांचे आणि पर्यायाने स्वत:चे मूल्यमापन, वर्गव्यवस्थापन यांचा समावेश होतो या सर्व कृती सचोटीने करण्यासाठी सक्षम अध्यापकाची आवश्यकता असते. अध्यापनावर व आपल्या विषयावर प्रभुत्व असणारा, विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी मदत करणारा, विविध कृतींचा अवलंब करून वर्गात अध्ययनप्रसंग निर्माण करणारा अध्यापक आपले कार्य सचोटीने करतो. त्याच्या कार्यातून त्याचा प्रामाणिक हेतू निदर्शनास येतो. वर्गाला आपले आदर्श स्थान समजणारा आणि अध्ययनार्थ्यांला दैवत समजणारा अध्यापक सचोटीने वागणारा असतो.
२. **संस्थेशी प्रामाणिकपणा :**आपल्या महाविद्यालयाने ठरविलेले व्रत आणि ध्येये साध्य करण्यासाठी संस्थास्तरावर विविध कार्य करताना सचोटीने करणे. यासाठी शिक्षकाने आपल्या क्षमता आणि निष्ठा यांचा समन्वय साधून उत्कृष्ट कार्य करणे. आपल्या संस्थेचे नियम व आचारसंहिता यांचे काटेकोरपणे पालन

करून संस्थेची समाजात प्रतिमा उजळ करणारा शिक्षक आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक असतो.

३. **शाळाबाह्य कार्यक्रम :** अध्यापक हा समाजाचा अविभाज्य घटक असून त्याला 'Social Engineer' म्हणतात. याचाच अर्थ असा की, समाजाची जडण-घडण शिक्षक करतो.

४. **पालकांशी प्रामाणिकपणा :** शिक्षक हा विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारा दूत असल्यामुळे विद्यार्थी व पालकांचा त्याच्यावर गाढा विश्वास असतो. पालकांचा विश्वास आणि बालकांचा आदर टिकवून ठेवण्यासाठी शिक्षकाने आपली प्रतिमा स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही सामाजिक प्रलोभनाला बळी न पडता त्याने प्रामाणिकपणे आपला व्यवसाय करावा. व्यवसाय करताना पालकांचे सहकार्य मिळवावे याकरीता पालकांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करावे आणि त्यांचे ज्ञान व अनुभव यांचा उपयोग बालकांच्या विकासासाठी आणि महाविद्यालयाच्या व्रतविधानाला अनुसरून कार्य करता यावे.

५. **समाजाप्रति प्रामाणिकपणा :** समाजातून महाविद्यालयाच्या विकासाकरिता भौतिक आणि मानवी असे दोन्ही प्रकारचे स्त्रोत आवश्यक असतात. समाजाने हाती घेतलेल्या रचनात्मक कार्यात शिक्षक ही आपले योगदान देऊन सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवू शकतो. शिक्षकाचा प्रामाणिकपणा महाविद्यालय आणि समाज यांच्यात अतूट नाते निर्माण करून सामाजिक विकासासाठी शिक्षणाचे माध्यम तर सामाजिक वातावरणाचा आणि स्त्रोतांचा शिक्षणाच्या कार्यात उपयोग करून घेण्यास सक्षम ठरतो. समाजाशिवाय अध्यापक किंवा संस्था नाही आणि महाविद्यालय किंवा संस्थेविना समाजाची प्रगती नाही. हे दोन्ही घटक परस्परावलंबी असून त्यांचे परस्परावलंबन लक्षात घेऊन कार्य करण्याची क्षमता व दृष्टी असणारा शिक्षकच आपला व्यवसाय सचोटीने करतो आणि भ्रष्टाचार, लाचलुचपत, फसवेगिरी, लबाडी यापासून अलिप्त राहतो.



आकृती क्र.२.१ अध्यापकाच्या व्यावसायिक विकासातील घटक

अध्यापकाच्या व्यावसायिक विकासासाठी या तीन ही बाबी आवश्यक आहेत. या तिघांच्या मापनाने शिक्षकाची परिणामकारकता/प्रभाव किंवा अध्यापन परिणामकारकता मापन करता येते आणि त्याद्वारे व्यावसायिक विकासाचे ही मापन करता येते.

२.५.२४ **बेलेकर, आर.डी. (२००१). आदर्श व्यावसायिक होण्यासाठी. पुणे : नूतन प्रकाशन.** सदर पुस्तकातून 'प्रोफेशनल' चा व्यापक अर्थ समजला.

'प्रोफेशनल' चा व्यापक अर्थ :

१.डिक्शनरी कॉम मध्ये 'प्रोफेशन' या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे

'उपजीविकेसाठी अथवा काही प्राप्त करण्यासाठी केलेला व्यवसाय' त्यासाठी कोणत्याही विशिष्ट शाखेचं अथवा शास्त्राचं ज्ञान आवश्यक असतं.

२. द ऑक्सफर्ड डिक्शनरी ऑफ इंग्लिशच्या व्याख्येनुसार

'ज्यासाठी पैसे मिळतात. विशेषत: एखाद्या विषयातील दीर्घ प्रशिक्षण आणि योग्यता मिळविल्यानंतर असा उपजीविकेचा व्यवसाय'

'एखाद्या व्यवसायाशी संबंधित असतो तो व्यावसायिक.' 'प्रोफेशन' हा शब्द खूप प्राचीन काळापासून आहे. त्याचं मूळ इ.स. ११७५-१२२५ मधील 'प्रोफेसिओ' या **लॉटिन** शब्दामध्ये आढळतो.

३. प्रोफेसिओ म्हणजे दू प्रोफेस - शपथ घेणे. धर्मासाठी शपथ घ्यायच्या संकल्पनेवरून हा शब्द आला. आदर्श व्यावसायिक होण्यासाठी व्यवसायाविषयी भक्ती असावी लागते. तो तुमचा धर्म बनायला हवा. धर्माविषयी तुमच्या मनात भक्तिभाव असतो. तोच भाव व्यवसायाविषयी बाळगायला पाहिजे. व्यवसाय करताना भक्तिभावाने काम केलं तर तुमचं जीवन सफल झालं असं समजा.

२.५.२५ **बेलेकर, आर.डी.(२००१). आदर्श व्यावसायिक होण्यासाठी. पुणे : नूतन प्रकाशन.** सदर पुस्तकात आदर्श व्यावसायिकाचे गुण व व्यावसायिकतेची लक्षणे समजली.

कोणाच्याही मार्गदर्शनाविना, स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता आणि हाती घेतलेले काम कोणत्याही परिस्थितीमध्ये पूर्ण करण्याचा निश्चय असणारा आदर्श व्यावसायिक असतो. प्रत्येक व्यवसायाचे लिखित आणि अलिखित नियम असतात. ते नियम, तत्त्व कोणती आणि त्या दोघांमधील फरक काय आहे हे समजू शकणारच आदर्श व्यवसायिक म्हणण्यास पात्र ठरेल. आदर्श व्यवसायिकांच्या वर्तुळामध्ये प्रवेश मिळण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रामाणिकपणा, प्रशिक्षित व्यावसायिकामध्ये सचोटी, निष्ठा, क्षमता, प्रामाणिकपणा नसेल तर तो समाजाला घातक ठरू शकतो. जी वस्तू आपली नाही ती वापरण्याचा आपल्याला हक्क नाही.

व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि व्यावसायिक प्रगती या दोन गोष्टींचा योग्य समन्वय साधणे.

व्यावसायिकतेची लक्षणे

१. तन, मन आणि वेळ यांचे नियोजन.
२. कमी वेळात जास्त काम, ज्ञानप्राप्तीसाठी नवनवीन मार्ग आणि साधनांच्या शोधात रहा.
३. कामांची यादी करा.
४. नाही कसं म्हणू? न आवडणारी गोष्ट वा काम अजिबात करू नका.

५. कुरकुरणं बंद करा - व्यवसायामुळे समाधान मिळावं अशी अपेक्षा धरू नका. तुम्ही कोण आहात? तुमच्या इच्छा अपेक्षा काय आहेत? हे जाणून त्या तुमच्या मानसिक समाधानाची जबाबदारी व्यवसायावर ढकलू नये.

६. दूरदृष्टी - व्यावसायिक संबंध दृढ करताना दूरवरचा विचार करावा.

७. तज्ज्ञ, विशेषज्ञ आणि महातज्ज्ञ - उच्चशिक्षित, प्रशिक्षित व्यावसायिकांचे, मेव्हन, कनेक्टर आणि इव्हॅन्जलिष्ट असे तीन भाग करा.

८. मेव्हन - एखाद्या विषयातील ज्ञानी, माहितगार तज्ज्ञ असतो. अशा अनेक तज्ज्ञ लोकांच्या गटांना मार्गदर्शन करणारा, स्पष्टीकरण आणि मदत देणारा एक विशेषज्ञ असतो. (कनेक्टर) हा कनेक्टर विविध तज्ज्ञांना जोडणारा आणि या सर्वांच्या तर एक 'इन्हॅन्जलिस्ट' असतो.

९. मुक्त अवकाश - व्हाईड स्पेस.

१०. पुनर्वापर - निबंध, प्रबंध, पीपीटी, धोरणात्मक पत्रकांचा पुनर्वापर करता आला पाहिजे.

११. तुमचा परिवर्तन बिंदू कोणता आहे. TQM - टच टाईम - कच्च्या मालाचं उत्पादकतामध्ये रूपांतर होत ती वेळ महत्त्वपूर्ण असते. आत्मजागृतीमधून नेतृत्व गुण कसे आत्मसात करावे.

१२. मार्ग बदलतात तेव्हा - व्यक्ती आणि संस्था या दोघांमध्ये समन्वय साधला तर उत्तम कामगिरी होते.

१३. काम आणि कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन.

१४. दूरदृष्टीमधील सामर्थ्य.

१५. आदरात्मक नीतिमूल्य- अमेरिकन हेरिटेज सायन्स डिक्शनरी मध्ये मूल्य व्यक्ती अथवा सामाजिक गटाची जिथे भावनात्मक गुंतवणूक आहे, अशा श्रद्धा आणि विश्वास म्हणजे मूल्ये, मूल्य वैयक्तिक असतात ती तुमची भावनात्मक गुंतवणूक असते. मूल्य म्हणजे प्रभावी आदर दाखविणे.

१६. पूर्ण तयारीनिशी.

१७. समर्पक प्रश्न विचारा.

१८. लक्षपूर्वक ऐकण्याची कला.

१९. सर्वात महत्त्वाची माणूसकी :- प्रत्येकाशी आदरपूर्वक वागण्याची कला अवगत असणं ही चांगल्या व्यावसायिकाची लक्षण आहे. केवळ व्यावसायिक कौशल्य असून फायदा होत नाही. त्याचबरोबर सहानुभूती, सहृदयता, माणुसकी हे गुण ही असायला हवेत.

२०. पारदर्शक व्यवहाराचे फलित :- क्षमता, कौशल्य कमावता येत पण विश्वास, प्रामाणिकपणा हा मूळातच असावा लागतो.

२१. बांधीलकीशी बांधीलकी.

२.५.२६ बर्वे, बी.एन. नरके , एच. जे. (१५ जानेवारी २००८). मनोमापन. नागपूर : श्री विद्या प्रकाशन. सदर पुस्तकात मनोमापनाची संकल्पना,कार्यपद्धती समजण्यास उपयोग झाला.

२.५.२७ दांडेकर, वा. ना. (२००४) . शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र. पुणे : श्री विद्या प्रकाशन. सदर पुस्तकात मतावली साधनाचा वापर, प्रश्नावली साधनाचा वापर. केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलतेचे मापन, चाचणीतील गुणांचे विस्तरण, विषमितता व शिखरदोष या संदर्भात माहिती मिळाली.

२.५.२८ देसले, भदाणे,. (२००९). शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र. नाशिक : रेशमाई पब्लिकेशन. सदर पुस्तकात 'प्रमाणित' गुण, 'झेड' गुण, 'टी' गुण, 'प्रणऊ' गुण तसेच शततमक प्रमाणक आणि प्रमाणित गुणांवर संख्याशास्त्री प्रक्रिया कशी क रावी तसेच चाचणीची सप्रमाणता व विश्वसनीयता क शी निश्चित क रावी या संदर्भात माहिती मिळाली.

२.५.२९ पाटील, अनिल. (नोव्हेंबर २००८). मानसशास्त्रीय चाचण्या, पुणे : डायमंड पब्लिकेशन. सदर पुस्तकात मानसशास्त्रीय चाचण्या कशा तयार केल्या जातात या संदर्भात माहिती मिळाली.

२.५.३० नरवणे, मीनल. (२०१६).संशोधन पद्धती :शैक्षणिक व सामाजीक. पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. सदर पुस्तकातून संबंधित साहित्याचेअवलोकन,संशोधन समस्या, परिकल्पना व कार्यात्मक व्याख्या निश्चिती, सप्रमाणता, माहिती संकलन साधने,नमुना निवड, माहितीचे विश्लेषण या संदर्भात माहिती मिळाली.

२.६व्यावसायिक बांधीलकी संबंधित मराठी नियतकालिकेतील साहित्याचा आढावा


२.६.१. तांबे ,संदीप. कडूभाऊ. (Vol 5th, Issue – 3rd Quarterly, Oct 2013 to Dec2013, ISBN – 0976-0385). **शिक्षणातील मर्मदृष्टी . शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता, नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ क्र : १२ ते १६.**

या लेखामुळे संशोधकास शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता अंतर्गत शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी संदर्भात जे NCTE ने पाच घटक बांधिलकी संदर्भात सांगितले आहे. याचा उपयोग त्यावर आधारित प्रश्नांची निर्मिती करण्यासाठी झाला.

शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता अंतर्गत

गुणवत्ता अंतर्गत	भावात्मक	क्रियात्मक
विषयज्ञान क्षमता	सहानुभूती	न्यायप्रियता
अध्यापनावर प्रभुत्व	उत्साह	प्रयोगशिलता
मूल्यमापनाचे ज्ञान	श्रमनिष्ठता	वर्गनियंत्रक
मानसशास्त्र ज्ञान	समाजनिष्ठता	नियोजन
व्यासंग	मार्गदर्शक	नेतृत्व
नियोजन क्षमता	व्यावसायिक दृष्टिकोन	उपक्रमशीलता

तक्ता क्र-२.२ शिक्षक-शिक्षणाची गुणवत्ता



तक्ता क्र-२.३ शिक्षक-शिक्षणाची गुणवत्ता

२.६.२ मिस्त्री, प्रतिभा .(मासिक - मार्च २०१२ ,अंक -१०). शिक्षण संक्रमण. समाज विकासासाठी शिक्षकाची भूमिका. पुणे : प्रकाशन- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृष्ठ क्र : ३० ते ३१.

काळ	प्राचीन	स्वातंत्र्यपूर्व	स्वातंत्र्यानंतर	आज
भूमिका	गुरू	तत्त्वज्ञानी कार्यकर्ता	आदर्शवादी सर्व कौशल्ये साधणारा	मार्गदर्शक
प्रतिमा	साधू	सुधारणावादी	भविष्यनिर्माता	प्रतिमारहित
मार्गदर्शक तत्त्वे	ध्येयाला समर्पित + भौतिक सुखांचा त्याग	ध्येयनिष्ठा + त्याग	ध्येयनिष्ठा + परिश्रम, कष्ट	व्यावसायिक + कार्यकुशल

तक्ता क्र-२.४ शिक्षकाच्या समाजसापेक्ष भूमिकेतील बदल

आज शिक्षक आपल्या स्वत:च्या भूमिकेकडे समाजातील इतर भूमिकांसमवेतच पाहतो मी माझी व्यावसायिक निष्ठा जास्तीत जास्त कुशलतेने जपणे, त्यासाठी वेळोवेळी स्वत:मध्ये परिवर्तन करणे व शिक्षक म्हणून माझी भूमिका यशस्वीपणे निभावून नेणे, यापलीकडे जे असेल ते माझ्या इच्छेवर राहील; त्याची माझ्यावर सक्ती नसेल अशा स्वरूपाची ही मानसिकता आहे. ती अशी असावी किंवा नसावी याबद्दल चर्चा होऊ शकते. पण आज ती तशी मानसिकता झाली आहे. हे वास्तव आहे. शिक्षक या संभ्रमावस्थेत स्वत:ची पारंपारिक प्रतिमा व भूमिका हरवून बसला आहे तो थोडासा अलिप्त, असहिष्णु, आत्मविश्वास हरवलेला, स्वत:ची संवेदनशीलता गमावलेला, स्वत:ची योग्यता सुधारण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद न देणारा बनला आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत कमालीची अस्थिरता निर्माण झाली आहे. या अस्थिरतेचे चटके शिक्षण व्यवस्थेला, विद्यार्थ्यांना, संस्थांना व परिणामी समाजालाही आज बसत आहेत.

सदर लेखातून शिक्षक-प्रशिक्षकाची सामाजिक निष्ठा ठरविताना त्यातील विविध घटकांची माहिती झाली त्यामुळे त्यावर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.६.३ जोशी, अनंत . (अंक १ जानेवारी २००९ त्रैमासिक). शिक्षणातील मर्मदृष्टी. अध्यापक-शिक्षण : काही मूलभूत घटकांचा विचार. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ क्र. : ८.

'चांगला शिक्षक हा चांगला माणूस असावा',अशीच आपली नेहमी अपेक्षा असते. अन्य व्यवसायांना मात्र हे इतके तंतोतंत लागू होत नाही. डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट यांना व्यावसायिक आचारसंहिता पाळावी लागते. पण त्या पलीकडील नैतिकतेचा अभाव असेल तर त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अध्यापक व्यवसायाबाबत मात्र तसे घडत नाही. आपल्याकडे अध्यापन व्यवसाय हा 'गुरू' या संकल्पनेशी जोडलेला आहे. (किंबहुना मूळात अध्यापन हा व्यवसाय आहे हेच स्वीकारलेले नाही) त्यामुळे ज्ञानदानाबरोबरच आध्यात्मिकतेशी गुरूचा संबंध जोडला जातो. गुरू हा विचार, आचाराचा आदर्श आहे. सद्गुणांचा समुच्चय आहे.

सदर लेखातून शिक्षक प्रशिक्षकाची व्यावसायिक निष्ठा ठरविताना त्यातील विविध घटकांची माहिती झाली त्यामुळे त्यावर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.६.४ साळी, व. झा.(Vol-2, Quartely Jan 2011 to Mar 2011).**शिक्षणातील मर्मदृष्टी. प्रश्नपेढी : संबोध, विकसन व उपयोग. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ क्र : २७ ते ३२**

'प्रश्न' या संज्ञेचा अर्थ New Webstar Dictionary of English Language (1981) या शब्द कोशानुसार - "A question is an interrogative sentence soliciting an answer, a querry, an inquiry, a subject or a matter of investigation or discussion a subject of debate, a point of doubt of difficulty a controversy, the act of inquiry or to challenge. म्हणजे, 'समस्या, चौकशी, शोधावयाची माहिती, वादविवाद विषय, शंका, अडचण, मतभेद, चौकशीची क्रिया किंवा आव्हान यांचे उत्तर मिळण्यासाठी प्रश्नार्थक वाक्य म्हणजे प्रश्न होय'.

प्रश्नाची गुणवैशिष्ट्ये : चौकशीसाधन, शाब्दिक अथवा अशाब्दिक चेतना विशिष्ट संदर्भात तयार केलेले प्रश्नार्थक विधान, निवडलेल्या विषय घटकावर आधारित, प्रतिसादकाच्या अध्ययनावर आधारित घटक आशयाला निश्चित आकार देणारा, विशिष्ट आकृतिबंधाची शाब्दिक रचना, प्रतिसादासाठी प्रश्नांतर्गत चेतना, प्रतिसादासाठी आवश्यक दिशादर्शक, प्रतिसादाच्या स्पष्ट मर्यादा, प्रतिसादकाच्या विषय संपादणुकीची पडताळणी, संपादणूक पडताळणीसाठी जास्तीत जास्त वस्तुनिष्ठता, विषय आशय संपादणुकीची माहिती देणारा, विषय आशय संपादणुकीची उपयोजन क्षमता मोजणारा, प्रत्याभरण मिळविणारा.

रचनात्मक घटक	कार्यात्मक घटक
प्रश्न प्रकार	उद्दिष्ट मापन
प्रश्नाचा आकृतिबंध	विषय आशय
प्रश्नाची शब्दरचना	परिस्थितीजन्यता
प्रश्न लेखन तंत्र	अपेक्षित प्रतिसाद

तक्ता क्र-२.५ प्रश्नाचे घटक

प्रश्न लेखनाच्या ठळक बाबी :

१) प्रश्नाचा आशय- विषय आशय निश्चित करण्यासाठी विषय आशयाचे पाठ्यांश विश्लेषण करावे लागते.

२) प्रश्नाची काठिण्यता म्हणजे सुकरता

३) भेदनक्षमता

४) प्रश्नविकसन - प्रश्न लेखन, प्रश्नांची पूर्वचाचणी, प्रश्न विश्लेषण, सुकरता मूल्य $\frac{H+L}{N+N}\times 100\%$

5) भेदाभेद - Discrimination Index

$$D = \frac{H-L}{N}$$

६) प्रश्नांची निवड

सदर लेखातून 'प्रश्न' या संज्ञेचा अर्थ व संबोध स्पष्ट झाला. तसेच प्रश्नाचे घटक, प्रश्न लेखनाच्या ठळक बाबी समजण्यास मदत झाली.

२.६.५ तांबोळी, एन. एस. (Vol - 5th, monthly – 5th may 2014). **शिक्षण तरंग. विद्यार्थ्यांप्रती शिक्षकाची भूमिका. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ .क्र : १८**

सदर लेखातून विद्यार्थ्यांप्रती शिक्षक-प्रशिक्षकाची निष्ठा ठरविताना त्यातील विविध घटकांची माहिती झाली त्यामुळे त्यावर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.६.६ मगरे, सुनिता. मगर, ज्ञानेश्वर. गोविंद. (Vol - 5th, quarterly 2013 to Dec 2013).**शिक्षणातील मर्मदृष्टी.(संशोधनात्मक लेख). 'माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान त्यांची व्यावसायिक बांधीलकी आणि संघटनात्मक स्वास्थ्य यातील सहसंबंधाचा अभ्यास'. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ . क्र : ३६ ते ४१.**

संशोधनाची उद्दिष्टे : १. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीची खालील गटांमध्ये तुलना करणे. पुरूष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका, अनुदानित

शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी भागातील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक, पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

२. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांची व्यावसायिक बांधीलकीशी सहसंबंधाचा खालील गटांमध्ये अभ्यास करणे. पुरूष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका यांच्या व्यवसाय समाधानाचा आणि त्यांच्या

अ) व्यावसायिक बांधीलकी आणि

ब) संघटनात्मक स्वास्थ्य यामधील सहसंबंधाची तुलना करणे.

संशोधनाची कार्यपद्धती :- प्रस्तुत संशोधनात सहसंबंध, कारणमीमांसा व तुलनात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला.

संशोधनाचे निष्कर्ष :- माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीत अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक आणि कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांमध्ये लक्षणीय फरक नाही ही शून्य परिकल्पना स्वीकारार्ह नाही.

सदर संशोधनात्मक लेखातून संशोधनाची उद्दिष्ट, कार्यपद्धती, निष्कर्षाची मांडणी कशी करावी या संदर्भात माहिती झाली.

२.६.७ चौधरी, शोभा. महारू.(Vol - 3, monthly 5th Dec 2011). **शिक्षण तरंग. 'माध्यमिक शिक्षकांची अभिवृत्ती व परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास'. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स. पृष्ठ क्र : ५१ ते ५३.**

डॉ. एस. पी अहलुवालिया - प्रमाणित अध्यापन अभिवृत्ती शोधिका. डॉ. प्रमोदकुमार आणि डी. एन. मुथा - प्रमाणित शिक्षक परिणामकारकता मापन श्रेणीचा वापर. धन सहसंबंध आला - ०.०५ स्तरावर, अनुकूल अध्यापन अभिवृत्ती असलेल्या व्यक्तीचा विद्यार्थी व शिक्षकविषयक दृष्टिकोन अनुकूल असतो. त्यांची शिक्षकी व्यवसायावर निष्ठा असते.

सदर संशोधनात्मक लेखातून सहसंबंधाचे मापन कसे करावे या संदर्भात माहिती झाली.

२.५.८ पुजारी, सहदेव. यशवंत. (२०१५). शिक्षण समीक्षा. शिक्षकाची क्षमता, परिणामकारकता आणि व्यवसाय समाधान : गरज आणि महत्त्व, नागपूर :सृष्टी प्रकाशन. पृष्ठक्र : ३८ ते ४४.

सदर लेखातून शिक्षकाच्या अध्यापनासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांची माहिती झाली. उदा. अध्यापन कार्याची उद्दिष्टे विद्यार्थी अपेक्षित वर्तन बदलाच्या संदर्भात मांडण्याची क्षमता, अध्ययन-अध्यापनात अध्ययनार्थींचा सहभाग वाढविण्याची क्षमता, अध्ययन अनुभव निवडीची क्षमता, अध्ययनाला अनुकूल ठरविण्याची क्षमता, विद्यार्थ्याला अनुक्रम ठरविण्याची क्षमता, प्रश्न कौशल्याची क्षमता, परस्परसंबंध विकास कौशल्य क्षमता, विद्यार्थी व पालक संपर्क मूल्यमापन क्षमता, वस्तुनिष्ठ मूल्यमापन क्षमता, स्वयंमूल्यमापन क्षमता, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास करण्याची क्षमता

चांगल्या शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये

अ) कार्ल रॉजर्स यांच्या मते, वातावरण निर्मिती करणारा, सुसंवाद साधणारा, विद्यार्थ्यांच्या गरजांची जाणीव ठेवणारा, हेतू स्पष्ट मांडणारा, स्वयं अध्यायनाची प्रेरणा देणारा, स्वत:कडे लवचिक साधन म्हणून पाहणारा, शैक्षणिक साधनांचे संघटन करणारा, बौद्धिक, भावनिक जाणिवा जपणारा, सतर्कता बाळगणारा, स्वत:च्या मर्यादा ओळखून त्याचा स्वीकार करणारा, स्वत:च्या कल्पना विचार यात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणारा,

ब) फ्लैडर यांच्या मते, शिक्षक विद्यार्थ्यांना तीन प्रकारे घडवत असतो.

१) विद्यार्थ्यांला पूर्ण स्वातंत्र्य देऊन

२) विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य न देता

३) विद्यार्थ्यांचे स्वातंत्र्य सीमित करून

अध्यापन मनोरंजक आणि प्रेरक असावे. विविध पद्धतींचा उपयोग करणारा, विषयावर प्रभुत्व, अद्ययावत ज्ञान, विषय व्यासंग विषयाची आवड, इतर विषयांचे ज्ञान, दैनंदिन समस्येची जाणीव, सुस्वभावी, प्रेमळ, दयाळू सहकार्यवृत्ती, स्फूर्तीदायक, कृती करावयास लावणारा, प्रभावी अध्ययन तंत्राचा अवलंब करणारा,

शिक्षक कर्तव्याची जाणीव ठेवणारा, वक्तशीर, पूर्वग्रहरहित दृष्टिकोन, वैयक्तिक, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन करणारा असावा.

क) एन.सी.टी.ई. भोपाळ १९८२ येथील संशोधनामधील संशोधकांनी दिलेली गुणवैशिष्ट्ये :- जीवनाबद्दलचे समायोजन, विधायक/सकारात्मक दृष्टिकोन, परिश्रम क्षमता, श्रवण वाचन, भाषण व लेखन कौशल्ये, संशोधनवृत्ती व नवीनता, समर्पण भाव.

ड) युनेस्को :- १९६८ शिक्षकांच्या भूमिकेचा ठराव, सामान्यज्ञान, आपल्या देशाची संस्कृती व त्याचा विकास घडवून आणण्याची तयारी, चांगले मानवी संबंध घडवून आणण्यासाठीचे तत्त्वज्ञान, शिक्षणातून सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रगती साधणारा, अद्ययावत प्रगतीचा परिचय, अभिरूची व अभिवृत्ती कौशल्ये यांचा समतोल विचार करणारा, परंपरेला अनुकूल शैक्षणिक उद्दिष्टांची जाणीव ठेवणारा, शाळा समाज संबंध दृढ करणारा, व्यावसायिक अस्मिता राखणारा, कार्यक्रमांची आखणी करणारा व सुसंवादाचे कौशल्य, लोकशाही दृष्टिकोन, वैज्ञानिक पद्धतीने समस्या सोडविणारा.

इ) बार.ए.एस :- बार.ए.एस यांनी शिक्षकाचे ज्ञान, कौशल्य व अभिवृत्ती यांच्या संदर्भात पुढील गुणवैशिष्ट्ये दिली - चांगली सांस्कृतिक पार्श्वभूमी, व्यावसायिक प्रत्यक्षकृती आणि पद्धती यांचे समग्र ज्ञान, मानवी विकास आणि अध्ययन प्रक्रिया यांचे समग्र ज्ञान, कार्य करण्याच्या परिणामकारक सवयी, व्यावसायिक सहकार्याची आवड व पात्रता वाढविणेबाबत रस असणारा.

वरील शिक्षकांच्या क्षमता व गुणवैशिष्ट्यांचा उपयोग संशोधकास घटकांची उद्दिष्टे ठरविण्यासाठी व त्यानुसार बहुपर्यायी प्रश्न तयार करण्यासाठी झाला.

२.६.९ पाटील, अजयकुमार.(ऑगस्ट-सप्टेंबर २०१३). शिक्षण समीक्षा. शिक्षक दिनाच्या निमित्तान. नागपूर :सृष्टी प्रकाशन. पृष्ठ क्र : २६ ते २८.

सदर लेखातून शिक्षकांसमोर नवनवीन येणारी आव्हाने कोणती ? व ती पेलण्यासाठी शिक्षकांनी स्वत:मध्ये बदल घडवून आपल्या व्यवसायाशी कशी निष्ठा राखावी याविषयी संशोधकाला माहिती मिळाली.

२.६.१० भोसले, द.ता.(जून २०१२), भारतीय शिक्षण. शिक्षकही जन्मावा लागतो. मुंबई : प्रकाशन- महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ. पृष्ठ .क्र : ३३ ते ३६.


अथक साधना, दुर्दम्य इच्छाशक्ती, जिद्द आणि परिश्रम या चार गोष्टी निष्ठेने आजीवन आचरणात आणल्यास शिक्षकांमध्ये व्यावसायिक बांधिलकी निर्माण होईल. त्यातूनच ज्ञाननिष्ठ, ध्येयनिष्ठ, तत्त्वनिष्ठ, जननिष्ठ, मूल्यनिष्ठ, उत्कृष्ट कार्यनिष्ठतेचा उगम होईल. शिक्षणाचे सामर्थ्य त्याच सर्वस्पर्शित्व आणि त्याची अभ्युदयक्षमता ओळखणारा शिक्षक असेल तरच शिक्षणाची सफलता दृश्यस्वरूपात आपणाला जाणवेल.

सदर लेखाचा उपयोग संशोधकाला शिक्षकांमध्ये कोणते गुण निष्ठेने जोपासले तर उत्कृष्ट शिक्षक तयार होण्यास अनुकूल वातावरण निर्माण होईल या विषयी माहिती मिळाली.

२.६.११ जोशी, न.म.(५ सप्टेंबर २०१४). शिक्षण संक्रमण, पंचनिष्ठा (शिक्षक दिनानिमित्त). पुणे : प्रकाशन- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृष्ठ . क्र : ४४ ते ४६.

विद्यार्थीनिष्ठा, ज्ञाननिष्ठा, व्यवसायनिष्ठा, समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा या पंचनिष्ठांची सखोल माहिती सदर लेखातून संशोधकास मिळाली.

२.६.१२ शर्मा, आशा .(अंक २, अक्तूबर २०११ त्रैमासिक पत्रिका). भारतीय आधुनिक शिक्षा. मानवीय मूल्यों से समन्वित अध्यापक शिक्षा की आवश्यकता. दिल्ली : राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद. पृष्ठ . क्र : ५२ ते ५८.



आकृती क्र - २.२ मानवी मूल्यों के विविध पैलू

आत्मखोज : स्वस्थ जीवन, परिश्रम का महत्त्व, समय का उपयुक्त प्रबंधन, कार्य के प्रति समयबद्धता, स्व-सहायता, आत्मविश्वास, आज्ञाकारी, कर्तव्य के प्रति निष्ठा, सादा जीवन, ईमानदारी, समन्वयशीलता, दूरदर्शिता, दूसरों के प्रति सम्मान, दूसरों के प्रति सेवाभाव, साधनपूर्णता, प्रोत्साहन नेतृत्व की क्षमता, न्याय, समूह भावना, समानता, त्याग, अनुशासन.

१) शांति : चिंतन की शुद्धता, धैर्य, आत्म नियंत्रण, आत्म सम्मान, ध्यान.

२) प्रेम : निष्ठा, सहानुभूति, मित्रवत व्यवहार, देशभक्ति, समर्पण, सहिष्णुता, मानवीयता, शिष्टाचार.

३) अहिंसा : सभी जीवों के प्रति दया, सहयोगीवृत्ती, दूसरों को दुःख न पहुँचाना, सहायता के लिए तैयार, दूसरों की संस्कृति की प्रशंसा व सम्मान, नागरिकों में उत्तरदायित्व के प्रति सजगता, प्रजातंत्र, सामाजिक न्याय, अस्पृश्यता का निषेध.

सदर लेखातून 'मूल्यनिष्ठा' या संदर्भात माहिती मिळाली. मानवी मूल्यांचे विविध पैलू समजण्यास मदत झाली.शिक्षक प्रशिक्षकांच्या मूल्यनिष्ठेच्या संदर्भात अभ्यास करताना कोण-कोणत्या मानवी मूल्यांच्या अंर्तभाव होऊ शकतो हे समजले.

२.५.१३ पाटील, अमित. (नोव्हेंबर २०१०). शिक्षण संक्रमण. 'विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास'. पुणे : प्रकाशन -महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृष्ठक्र : ४८ ते ५६.

सदर लेखातून 'विद्यार्थ्यांप्रति निष्ठा' या घटकाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासात कोण-कोणत्या घटक व उपघटकांचा समावेश होऊ शकतो हे समजले. सदर अंकात 'विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास' अभ्यासण्यासाठी ३१ घटकांचा समावेश करण्यात आला आहे यावर आधारित २१५ Check 'List' स्वरूपातील प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.


२.६.१४ गुरव, देवकांत. (जून २०१२). भारतीय शिक्षण, शिक्षकांची बांधीलकी. मुंबई : महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ. पृष्ठक्र : ३३ ते ३६.

सदर लेखातून शिक्षकांच्या ५ बांधीलकीच्या क्षेत्रांची माहिती मिळाली.

२.६.१५ चव्हाण, विवेक. गु. (सप्टेंबर २०११). शिक्षण संक्रमण. अशी वाढवू शिक्षकांची गुणवत्ता. पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृष्ठ क्र : १९ ते २६.


सदर लेखात शिक्षकांची गुणवत्ता म्हणजे शिक्षणातील सर्वोतम, शिक्षणात मूल्यवर्धित, प्रत्यक्ष उपयोगासाठी निष्पत्तीची योग्यता व अनुभव, शिक्षणाची ध्येये, वैशिष्ट्यांचा तपशील व गरजा यांच्या संदर्भात निष्पत्तीची अनुरूपता, शिक्षण प्रक्रियेतील त्रुटी टाळणे, ग्राहकाच्या शिक्षणाबाबतच्या अपेक्षांची पूर्ती व त्यापेक्षा जास्त काही, बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी निगडीत बाब विषयज्ञान प्रभुत्व, अध्यापन कौशल्यांचा सतत विकास, शैक्षणिक व पूरक साहित्यनिर्मिती, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर/नाविन्याचा सतत स्वीकार, प्रयोगशीलता, उपक्रमशीलता व सर्जनशीलता विकास, संशोधन वृत्तीचा विकास, व्यावसायिकतेचा विकास, प्रशिक्षण, गुणांचा आणि क्षमतांचा परिपूर्ण विकास, भाषाप्रभुत्व, उत्साह व विनोदबुद्धी, शिस्त व वक्तशीरपणा, चारित्र्य व नैतिक विकास, कलांची जोपासना, योगासने व प्राणायामाचा अंगिकार, विद्यार्थी सक्षमता व गुणवत्ता, समाज व संदर्भ सेवा, आजन्म विद्यार्थी

वरील क्षमता म्हणजे शिक्षकाला स्वत:ची भूमिका योग्य प्रकारे बजावण्यासाठी त्याच्या अंगी असलेल्या शक्तीचे किंवा पात्रतेचे पुरेसे प्रमाण होय. क्षमता शिक्षकांना स्वप्रयत्नाने कमवता येतात. क्षमता ही बांधीलकी व आत्मविश्वास या दोन्हींवर अवलंबून आहे हे समजते. तसेच शिक्षकांनी आपली गुणवत्ता आपल्या क्षमतेद्वारे, कठोर परिश्रमांद्वारे, अचल निष्ठेद्वारे सिद्ध करणे ही काळाची गरज आहे.



आकृती क्र - २.३ शिक्षक गुणवत्ता विकास

बांधीलकी-कृती कार्यक्रम-क्षमता यांच्या त्रिकोणाच्या साहाय्याने शिक्षकाला आपली गुणवत्ता वाढविता येते हे समजले.



आकृती क्र - २.४ वर्तन क्षेत्र व बांधीलकी क्षेत्र

२.६.१६ हमचे, प्राची. गागरे, अमितकुमार. (सप्टेंबर २०११). शिक्षण संक्रमण. शिक्षकाची सामाजिक जबाबदारी. पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. पृष्ठ क्र : ४३ ते ४५.

सदर लेखातून शिक्षकांची समाजनिष्ठा अभ्यासताना शिक्षकांच्या सामाजिक जबाबदाऱ्या कोण-कोणत्या आहेत हे समजले. (सामाजिकरण-प्रेम, सहकार्य, त्याग, सेवा)

१) बौद्धिक विकास- सदगुणांचा विकास करणे, चिंतनशील बनविणे, तार्किक विचार

२) सामाजिक अभियंता - सामाजिक व्यक्तिमत्त्वाचा विकास

३) समाजनियंत्रक

४) समाज परिवर्तक, नवसामाजिक पद्धतींचा विकासक, संस्कृती, संवर्धक, संक्रमक व हस्तांतरक, सामाजिक अनुकूलनात सहकार्य, मानवाला सभ्य व सुसंस्कृत बनविण्यास सहायक, समाजहित साधणारा, सहकार्य भावनेवर विश्वास ठेवणारा, सेवाभावीवृत्तीचा आदर्श नागरिक घडविणारा समाजप्रबोधक, लोकशिक्षक

शिक्षकी व्यवसाय आपण स्वीकारला आहे या व्यवसायाविषयी बांधीलकी असणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांशी समरस व्हायचे आहे. त्यांची मने घडवायची आहेत. सुसंस्कारित करावयाची आहेत. हे सर्व काम करताना शिक्षकाला आनंद झाला पाहिजे तरच त्याच्या व्यावसायिक बांधीलकीविषयी समाजमनामध्ये शंका राहणार नाही.

२.७ . व्यावसायिक 'बांधीलकी' व 'अभिक्षमता' संबंधित मराठी आणि हिंदी कसोट्यांचा आढावा .

बांधीलकी चाचणी हे एक प्रमाणित मापन साधन असते. कौशल्याचे विकसन करण्याच्या आणि ज्ञान प्राप्त करण्याच्या व्यक्तीच्या क्षमतांचे, प्रामाणिकपणाचे, बांधीलकीचे मापन करण्यासाठी कसोटींची रचना केली जाते.

व्यावसायिक बांधीलकीशी संबंधित व्याख्या :-'व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि प्रतिकूल परिस्थितीमध्येही व्यक्त होणाऱ्या व्यक्तीच्या स्वप्रतिमेशी सुसंगत अशा वैशिष्ट्यपूर्ण लक्षणांचे संघटन म्हणजे व्यावसायिक बांधीलकी होय'

व्यावसायिक बांधीलकीशी संबंधित कसोट्या तयार करण्यासाठी अनेक भारतीयांनी तसेच पाश्चिमात्य संशोधकांनी काम केले आहे.

भारतामध्ये बांधीलकी आणि अभिक्षमता कसोटीच्या प्रमाणिकरणाचे कार्य जसे संशोधकांनी व्यक्तिगत स्तरावर केले आहे. तसेच अनेक संस्थांनी संस्थास्तरावर विविध बांधीलकी आणि अभिक्षमता कसोट्या विकसित केल्या आहेत. असा उल्लेख बुच, एम. बी. (१९७४) यांनी शिक्षणातील संशोधनाचे सर्वेक्षण-सातव्या सर्वेक्षण खंडात केला आहे.

भारतीय संशोधकांनी विकसित केलेल्या बांधीलकी आणि अभिक्षमता कसोट्या खालील प्रमाणे आहेत. यात

१. विशाल सोद : व्यावसायिक बांधीलकी चाचणी
२. रवींद कौर,सरबजित कौर,सर्वजीत कौर : व्यावसायिक बांधीलकी चाचणी
३. नूरजहान गनीहार : शिक्षक बांधीलकी चाचणी
४. पांड्ये, के. पी. : अध्यापन अभिक्षमता कसोट्या
५. अमिता भटनागर : अध्यापक शैक्षिक विमुखता मापनी.
६. डॉ. आर. पी. भटनागर : नेतृत्व प्रश्नावली
७. एन. पी. कौशिक : इन्स्टिट्यूशनल इफेक्टिव्हनेस स्केल
८. अलका अग्रवाल : स्टाईल्स ऑफ लिडरशिप क्वेश्चनायर
९. नरेंद्र कुमार गर्ग : शिक्षक व्यावसायिक उत्तरदायित्व
१०. अमिता भटनागर : प्रशासनिक शैली प्रश्नावली
११. प्रकाश शर्मा : अध्यापक संघर्षवाद मापनी
१२. ओमप्रकाश शर्मा : छात्र उग्रतावाद मापन
१३. आ.पी. सिंग आणि एस. एन. शर्मा : अध्यापन अभिक्षमता
१४. सन्तोष कुमार दीक्षित : कार्य संपादन पर सहयोग एवं स्पर्धा का प्रभाव
१५. S. P. Ahluwalia/Harbhajan L. Singh : Teachers Values Inventory
१६. Amar Singh & T. R. Sharma : Job satisfaction scale.
१७. Mrs. Umme Kulsum : Teachers Effectiveness Scale

१८. Mrs. Haseen Taj : Leadership Effectiveness Scale

वरील पैकी संशोधकास काही उपलद्ध मराठी व हिंदी बांधीलकी व अभिक्षमता कसोट्यांचे विस्तृत वर्णन सदर विभागात दिले आहे आणि इग्रजी मधील बांधीलकी व अभिक्षमता कसोट्यांचे विस्तृत वर्णन पुढीलप्रमाणे :

सदर कसोट्यांची मार्गदर्शिका (मॅन्युअल)अभ्यासल्यामुळे संशोधकास शिक्षक -प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी तयार क रण्यात येणा-या प्रमाणित चाचणीची मार्गदर्शिका (मॅन्युअल)तयार करण्यासाठी मदत मिळाली.

अ. पांड्ये, के. पी. (१९६८) : शिवाजी विद्यापीठात यांनी अध्यापन अभिक्षमता कसोटी प्रमाणित केली. उत्तर प्रदेशातील प्राथमिक स्तरावरील शिक्षकांची निवड करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणार्थींची निवड करण्यासाठी तिचा वापर केला जातो. तसेच हिंदी भाषिक राज्यातूनही ती कसोटी वापरली जाते. त्या कसोटीत एकूण आठ उपकसोट्या आहेत. १. व्यावसायिक ज्ञान, २. शब्दसंग्रह, ३. अन्वेषणात्मक विमर्शना, ४. अंकमालिका, ५. सांख्यिकीय विमर्शना, ६. तर्कशुद्ध निवड, ७. सामान्य माहिती आणि ८. वाचन आकलन या कसोट्यांच्या विकसनासाठी प्रथमतः अध्यापन कार्याचे विश्लेषण केले आणि १९९० प्रशिक्षणार्थीच्या न्यादर्शाचा वापर करून मानके तयार केली.

ब. पांड्या, जे. बी. (१९७२) : मुंबई विद्यापीठातून या संशोधकांनी अभिक्षमता कसोटी विकसित व प्रमाणित केली. 'शिक्षकांसाठी व्यावसायिक कसोटी' असे तिचे नाव आहे. अध्यापन क्षेत्रातील एक चांगला व्यावसायिक होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणवैशिष्ट्यांचे मापन या कसोटीद्वारे करता येते.

क. जयप्रकाश आणि श्रीवास्तव,आर.पी. (१९८५) यांनी प्रमाणित केलेल्या अध्यापन अभिक्षमता कसोटीत एकूण १५० प्रश्न आहेत. त्याद्वारे अध्यापन अभिक्षमतेच्या एकूण दहा आवश्यक पैलूंचे मापन करून अध्यापन क्षमतेबाबतचा एक संकलित गुणांक आपणास प्राप्त होतो. त्या कसोटीला पूर्णपणे प्रतिसाद देण्यास ४५ मिनिटे पुरेशी

ठरतात. अठरा वर्षे व अधिक वयोगटातील व्यक्तींसाठी या कसोटीला वापर करता येतो, ही कसोटी हिंदी भाषेत आहे.

ड. शाह एम. एम.(१९८८): अध्यापन अभिक्षमता परीक्षणासाठी या संशोधकांनी एक कसोटी प्रमाणित केली. त्यासाठी प्रथमतः अध्यापन कार्याचे विश्लेषण केले त्या विश्लेषणासाठी संशोधकांचा व्यक्तिगत अनुभव शासकीय अधिकारी, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, ज्येष्ठ शिक्षक आणि यशस्वी व अयशस्वी शिक्षकांच्या मतांचा आधार घेतला. मानसिक क्षमता, विद्यार्थ्याबाबत अभिवृत्ती, अनुकूलन क्षमता, व्यावसायिक ज्ञान आणि शिक्षकी व्यवसायातील अभिरूची या पाच उपकसोट्या त्या समग्र कसोटीत आहेत. एकूण प्रश्नांची संख्या १२० आहे. या कसोटीची विश्वसनीयता ०.८० ते ०.८७ च्या दरम्यान आहे. व सप्रमाणता ०.५० आहे.

इ. शर्मा एस. एन. (१९९८): प्राथमिक विद्यालयातील अध्यापकांच्या अध्यापन अभिक्षमतेचे मापन करण्यासाठी हिंदी भाषेत शर्मा, एस. एन. यांनी हिंदी भाषिक अध्यापकांसाठी कसोटी प्रमाणित केली. या कसोटीत एकूण पाच उपकसोट्या आहेत. मानसिक क्षमता, विद्यार्थ्याबाबत अभिवृत्ती, अनुकूलन क्षमता, व्यावसायिक ज्ञान व व्यावसायिक अभिरूची पूर्ण कसोटी विकसित करण्यासाठी अध्यापक विद्यालयातील १०९० प्रशिक्षणार्थींचा न्यादर्श घेऊन मानके विकसित केली आहेत.

२.८ व्यावसायिक बांधीलकी संबंधित भारतीय संशोधनांचा आढावा.

२.८.१ महाजन, के. एम. (१९९३). 'शिक्षक अभिवृत्ती मापन साधनाचे विकसन करणे व त्याच्या आधारे शिक्षकांची अध्यापन व्यवसायाप्रति असणाऱ्या अभिवृत्तीचे मापन करून त्याचा बी.एड्. स्तरावर वापर करणे'.

संशोधनाची उद्दिष्टे : १. अभिवृत्ती मापन साधन विकसित करण्यासाठी सुयोग्य तंत्राची निवड करणे. २. विद्यार्थी शिक्षकांची अध्यापन व्यवसायाप्रति असणाऱ्या अभिवृत्तीचे मापन करण्यासाठी साधन विकसित करणे. ३. काही निवडक महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांची प्रशिक्षणापूर्वी व प्रशिक्षणानंतर अध्यापन व्यवसायाप्रतिच्या अभिवृत्तीत झालेल्या बदलाचे मापन करणे. ४. संस्थानिहाय

विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीत झालेल्या बदलाचे मापन करणे. ५. संस्थानिहाय विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीत विकसनच्या बदलाचा अभ्यास करणे. शून्य परिकल्पना मांडली.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण व प्रायोगिक पद्धतीचा वापर केला. पूर्वचाचणी व उत्तर चाचणी या प्रायोगिक पद्धतीचा वापर केला. मतावली व प्रश्नावली 'टी' टेस्ट,'काय' टेस्ट, शततमक क्रम , प्रमाणविचलन आणि मध्यमान यांचा वापर केला. संख्यात्मक आणि गुणात्मक दोन्ही पद्धतीचा वापर केला.

न्यादर्श : असंभाव्यता नमुना निवड पद्धतीने पुणे, अहमदनगर, नाशिक, जळगाव व धुळे या पाच जिल्ह्यातील १००० विद्यार्थी शिक्षक सहेतूक नमुना निवड पद्धतीने निवडले.

निष्कर्ष : १. विद्यार्थी शिक्षकांत उच्च व निम्न अशा दोन्ही अभिवृत्ती असलेली मुले प्रशिक्षकांना आढळून आली त्यांच्यातला हा फरक लक्षात घेण्याजोगा होता. म्हणून असे सूचविण्यात आले की, अध्यापन व्यवसायाप्रतिची अभिवृत्ती विकसनासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे आवश्यक आहे. २. अध्यापन व्यावसायाप्रति अभिवृत्ती विकसन करण्यासाठी सूक्ष्म अध्यापन कौशल्ये आवश्यक ठरतात. तसेच मानसशास्त्रीय तज्ज्ञांचा सल्लाही आवश्यक ठरतो. तसेच सरावपाठ हेही आवश्यक असतात. ३. समाजकार्य, समाजसेवा यासारखी कार्यक्रमही अध्यापन व्यवसायाची अभिरूची विकसित करण्यासाठी मदत करतात. ४. समाजोपयोगी वस्तू जसे मेणबत्ती, खडू व शाई बनविणाऱ्या व्यवतींच्या अभिवृत्तीचा अध्यापन व्यवसायाप्रति अभिवृत्तीशी तसा संबंध आढळत नाही. ५. सहशालेय व इतर काही कार्यक्रम हेही अध्यापन अभिवृत्ती विकसित करण्यास मदत करतात. विशेषतः सहशालेय कार्यक्रमांचा यात समावेश होतो.

उपयोग : सदर संशोधनातून अशा काही क्रिया यातून निदर्शनास आणल्या. ज्यांचा उपयोग अध्यापन व्यवसायाप्रति अभिवृत्ती विकसित करण्यासाठी होतो. या गोष्टी बी. एड्. अभ्यासक्रमात समाविष्ट नसल्यास त्यांचा समावेश करता येईल. तसेच शिक्षक व्यवसायाप्रतिची अभिवृत्ती विकसित करण्यासाठीच्या महत्वपूर्ण घटकांची माहिती मिळाली. ज्याच्या प्रस्तुत संशोधनात विधान विकसनात उपयोग झाला.

२.८.२ तपन, विजया. (१९८७) . मुंबई विद्यापीठ. 'माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचा व्यावसायिक बांधीलकी आणि अध्यापन परिणामकारकतेशी असलेल्या संबंधाचा अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचा अभ्यास करणे. २. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास करणे. ३. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेच्या स्वयंमूल्यमापनाचा अभ्यास करणे. ४. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचा व्यावसायिक बांधीलकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची शिक्षक अभिवृत्ती उच्च असून त्याचबरोबर व्यावसायिक बांधीलकी ही उच्च आहे. २. ज्या शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी उच्च आहे त्यांचे अध्यापन जास्त प्रमाणात परिणामकारक दिसून आले. ३. अनुभवी शिक्षकांची शिक्षक अभिवृत्ती अनुभवी शिक्षकांपेक्षा जास्त आहे. ४. अनुभवी शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी अनुभवी शिक्षकांपेक्षा जास्त आहे.

उपयोग : सदर संशोधनातून माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचा अभ्यास, माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास, माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन परिणामकारकतेच्या स्वयंमूल्यमापनाचा अभ्यास , माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचा व्यावसायिक बांधीलकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास याची सविस्तर माहिती झाली. त्यामुळे व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.३ विसारिया, एस. (१९९९).'उच्च माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि चलनशीलतेचा आकृतीबंध : पथदर्शक अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. दिल्ली येथील उच्च माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि चलनशीलतेचा आकृतीबंध तपासण्यासाठी चौकट तयार करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. सामान्यपणे एका शाळेतून दुसऱ्या शाळेत काही कालावधीनंतर बदली केल्याने व्यावसायिक बांधीलकीस पोषक वातावरण मिळत नाही. सतत होणारी बदली आणि चलनशीलतेचा आकृतीबंध यांचा व्यावसायिक बांधीलकीशी असणारा सहसंबंध ऋणात्मक आहे. म्हणून चांगले धोरण राबविताना शिक्षकांच्या कार्याचे मूल्यामापन करूनच बदल्या कराव्यात. **२.** उर्ध्वगामी चलनशीलता व्यावसायिक बांधीलकीस पोषक ठरते. परंतु खाली जाणाऱ्या आणि समतोल चलनशीलतेचा व्यावसायिक बांधीलकीशी ऋणात्मक संबंध आढळून आला.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, सामान्यपणे एका शाळेतून दुसऱ्या शाळेत काही कालावधीनंतर बदली केल्याने व्यावसायिक बांधीलकीस पोषक वातावरण मिळत नाही. सतत होणारी बदली आणि चलनशीलतेचा आकृतीबंध यांचा व्यावसायिक बांधीलकीशी असणारा सहसंबंध ऋणात्मक आहे. व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.४ कुलकर्णी, योगिता. (२०००).'प्राथमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा काही पूर्वसूचक घटकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी व शिक्षक अभिवृत्तीच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे. **२.** शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी व व्यावसायिक समाधानाच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे. **३.** शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी व संपादन प्रेरणेच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे. **४.** शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीतील फरकाचा अभ्यास करणे. **५.** शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीतील फरकाचा अभ्यास करणे. **६.** शाळा प्रकारानुसार शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानातील फरकाचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. विनाअनुदानित व महानगरपालिका शाळेतील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि शिक्षक अभिवृत्ती यामधील सहसंबंध उच्च आहे. २. शाळा प्रकारानुसार व्यावसायिक बांधीलकी आणि व्यावसायिक समाधान यामधील सहसंबंध लक्षणीय परंतु निम्न आहे. ३. विनाअनुदानित आणि महानगरपालिका शाळेतील शिक्षकांची व्यावसायकि बांधीलकी आणि संपादन प्रेरणा यामधील सहसंबंध मध्यम आहे. ४. खाजगी शाळेतील शिक्षकांच्या अभिवृत्तीत फरक आढळत नाही. ५. महानगरपालिका शाळेतील शिक्षकांचे व्यावसायकि समाधान खाजगी शाळेतील शिक्षकांच्या तुलनेत जास्त आहे.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, शाळा प्रकारानुसार व्यावसायिक बांधीलकी आणि व्यावसायिक समाधान यामधील सहसंबंध लक्षणीय परंतु निम्न आहे. या माहितीचा उपयोग व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.५ शिंदे, प्रणिता. (२००१).'कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा काही पूर्वसूचक घटकांशी असलेल्या संबंधाचा अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे मापन करणे. २. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या शिक्षक अभिवृत्तीचे मापन करणे. ३. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचे मापन करणे. ४. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि त्यांची शिक्षक अभिवृत्ती यातील संबंधाचा अभ्यास करणे. ५. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि त्यांना मिळणारे व्यावसायिक समाधान यातील संबंधाचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि शिक्षक अभिवृत्ती यांच्यात लक्षणीय सहसंबंध आहे. २.कनिष्ठ

अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि व्यावसायिक समाधान यांच्यात लक्षणीय सहसंबंध नाही. ३.कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी, व्यावसायिक समाधान, आणि शिक्षक अभिवृत्ती यांच्यात लक्षणीय सहसंबंध नाही.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, कनिष्ठ अध्यापक महाविद्यालयील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी, व्यावसायिक समाधान, आणि शिक्षक अभिवृत्ती यांच्यात लक्षणीय सहसंबंध नाही. या माहितीचा उपयोग व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.६ केवट, गोमती. (२००२).'शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा काही मनो-सामाजिक चलांच्या संदर्भात अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा समायोजन, संपादन प्रेरणा, सामाजिक, आर्थिक स्तर या चलांच्या संदर्भात अभ्यास करणे.२. विद्याशाखेनुसार शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीतील फरक अभ्यासणे.३. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि संपादन प्रेरणा यातील संबंधांचा अभ्यास करणे.४. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि समायोजन यातील संबंधांचा अभ्यास करणे.५. शिक्षकांच्या विद्याशाखेनुसार व्यावसायिक बांधीलकी आणि सामाजिक आर्थिक स्तर यातील संबंधांचा अभ्यास करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. शिक्षकांचे व्यावसायिक समाधान, संपादन प्रेरणा, आणि सामाजिक आर्थिक स्तर यात लक्षणीय फरक नाही. २. स्त्री शिक्षकांचा सामाजिक आर्थिक स्तर पुरूष शिक्षकांच्या तुलनेत चांगला आहे. ३. शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी, संपादन प्रेरणा, समायोजन, यात लिंगानुसार लक्षणीय फरक नाही. ४. शिक्षकांच्या अनुभवानुसार व्यावसायिक बांधीलकी , सामाजिक आर्थिक स्तर आणि समायोजन

यात लक्षणीय फरक नाही. ५. जास्त अनुभव असणाऱ्या शिक्षकांचा सामाजिक आर्थिक स्तर चांगला आहे. ६. व्यावसायिक बांधीलकी आणि समायोजन संबंध धन व उपेक्षणीय आहे. ७. वाणिज्य शाखेचे शिक्षक आणि पुरूष शिक्षक यांची व्यावसायिक बांधीलकी आणि समायोजन यातील संबंध ऋण आणि कमी आहे. ८. १५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि समायोजन यातील संबंध ऋण स्वरूपाचा आणि जास्त आहे.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, १५ वर्षापेक्षा कमी अनुभव असणाऱ्या शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि समायोजन यातील संबंध ऋण स्वरूपाचा आणि जास्त का। आहे. या माहितीचा उपयोग व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.७ पाटील, कल्पना. (२००२).'कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा व्यक्तिमत्वाच्या काही घटकांच्या संदर्भात अभ्यास'

संशोधनाची उद्दिष्टे : १. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा व्यावसायिक बांधीलकी , सांघिक बांधीलकी , स्वयंमूल्यमापन यांचा अभ्यास करणे.२. शिक्षकांच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी यातील संबंधांचा अभ्यास करणे.३. शिक्षकांच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि शिक्षकांची सांघिक बांधीलकी यातील संबंधांचा अभ्यास करणे.४. शिक्षकांचे स्वयंमूल्यमापन, शिक्षक परिणामकारकता आणि व्यावसायिक बांधीलकी यातील संबंधांचा अभ्यास करणे.५. शिक्षकांच्या विद्याशाखेनुसार खालील चलांची तुलना करणे, स्वतःच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन, शिक्षक परिणामकारकता, व्यावसायिक बांधीलकी , सांघिक बांधीलकी , स्वयंप्रभाव बदलाकडे पाहण्याचा दृष्टीकोन.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. शिक्षकांचे स्वतःच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि शिक्षक परिणामकारकता यात धन व फारच कमी संबंध आहे.२. लिंगानुसार शिक्षकांच्या

कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन, शिक्षक सांघिक बांधीलकी आणि सामाजिक आर्थिक स्तर यात लक्षणीय फरक नाही.३. एकूण शिक्षकांचे स्वतःच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि व्यावसायिक बांधीलकी यात धन व फारच कमी संबंध आहे. ४. पुरूष शिक्षकांचे स्वतःच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि व्यावसायिक बांधीलकी यात धन व उपेक्षणीय संबंध आहे. ५. शिक्षकांचे स्वतःच्या कार्यक्षमतेचे स्वयंमूल्यमापन आणि सामाजिक आर्थिक स्तर यात धन संबंध आहे. ६. शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि स्वयंमूल्यमापन व शिक्षक परिणामकारकता यात धन व कमी संबंध आहे. ७. शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि स्वयंमूल्यमापन व शिक्षक परिणामकारकता यात ऋण व उपेक्षणीय संबंध आहे.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी आणि स्वयंमूल्यमापन व शिक्षक परिणामकारकता यात ऋण व उपेक्षणीय संबंध आहे. या माहितीचा उपयोग व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.८ तौरण अली, रूखसाना. (२००२). 'माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या निरनिराळ्या नेमणूकीनुसार काही पूर्वसूचक चलांच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास'

उद्दिष्टे : १. शिक्षकांच्या विविध प्रकारच्या नेमणूकीनुसार व्यावसायिक समाधानाची तुलना करणे. २. शिक्षकांच्या नेमणूकीनुसार व्यावसायिक बांधीलकीची तुलना करणे. ३. शिक्षकांच्या विविध प्रकारच्या नेमणूकीनुसार शिक्षक अभिवृत्तीची तुलना करणे. ४. शिक्षकांच्या विविध प्रकारच्या नेमणूकीनुसार संपादन प्रेरणेची तुलना करणे.

संशोधनाची पद्धती : सर्वेक्षण

निष्कर्ष : १. शिक्षकांच्या नेमणूकीनुसार कंत्राटी आणि कायम, तात्पुरती आणि कायम नेमणूका असलेल्या शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानात लक्षणीय फरक आहे. २. तात्पुरती आणि कंत्राटी नेमणूक असलेल्या शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानात लक्षणीय फरक नाही. ३. तात्पुरती आणि कंत्राटी नेमणूक असलेल्या

शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीत लक्षणीय फरक नाही. ४. शिक्षकांच्या कायम आणि कंत्राटी, कंत्राटी आणि तात्पुरत्या नेमणूकीनुसार संपादक प्रेरणेत लक्षणीय फरक नाही. ५. तात्पुरती आणि कायम स्वरूपी नेमणूक असणाऱ्या शिक्षकांच्या संपादन प्रेरणेत लक्षणीय फरक नाही.

उपयोग : सदर संशोधनातून असे समजले की, तात्पुरती आणि कंत्राटी नेमणूक असलेल्या शिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीत लक्षणीय फरक नाही. याची कारणे समजली, या माहितीचा उपयोग व्यावसायिक बांधीलकी च्या क्षेत्रांवर आधारित प्रश्न तयार करताना तसेच बहुपर्याय देण्यासाठी याचा उपयोग झाला.

२.८.९ शाह, एम. एम. (१९९२).'माध्यमिक शाळा शिक्षकांसाठी अभियोग्यता चाचणीचे विकसन आणि प्रमाणीकरण'

संशोधनाचे उद्दिष्टे : अध्यापन अभिक्षमता मापन साधनाचा विकास करणे व ते साधन प्रमाणित करणे.

संशोधनाची पद्धती : चाचणी विकसित करताना प्रथम व्यवसाय पृथक्करण करण्यात आले. त्यासाठी शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षण विस्तार विभागातील प्राध्यापक, माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, काही यशस्वी व अयशस्वी शिक्षक यांच्याकडून ही माहिती घेण्यात आली. वरील माहितीचे पाच उपकसोट्यात विभाजन करण्यात आले. त्या म्हणजे १. मानसिक क्षमता, २. विद्यार्थ्यांप्रती अभिरूची, ३. समायोजन क्षमता, ४. व्यावसायिक ज्ञान, ५. व्यावसायिक रूची. सदर चाचणीसाठी एकूण १८३ बहुपर्यायी प्रश्न तयार करण्यात आले.

न्यादर्श : १ चाचणीचा प्रारंभिक पडताळा १५३ विद्यार्थ्यांवर घेण्यात आला. पथदर्शक चाचणी ही पुणे, मुंबई व बडोदा येथील पाच प्रशिक्षण संस्थातील ३७१ विद्यार्थी प्रशिक्षणार्थींवर घेण्यात आली. प्रश्न पृथक्करण करून १२० प्रश्नांची निवड अंतिम चाचणीसाठी करण्यात आली. चाचणीचा अंतिम पडताळा बडोदा, अहमदाबाद, पोरबंदर मुंबई, पुणे येथील सहा शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये घेतला गेला. यासाठी ५३०

विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली. संख्याशास्त्रीय संस्करणासाठी केंद्रिय प्रवृत्तीची मापने व 'काय' टेस्ट वापरण्यात आली.

निष्कर्ष : १. सदर चाचणीची सप्रमाणता ०.५०२ इतकी होती. २. चाचणीची विश्वसनीयता ०.८०२ ते ०.८७८ इतकी होती. ३. अंतिम चाचणीचा मल्टीपल आर ०.५३३ इतका आहे. ४.चाचणीची भाकित क्षमता १६ % इतकी आहे.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास चाचणी प्रमाणिकरणाची प्रक्रिया कशी केली जाते ते लक्षात आले. संख्याशास्त्रीय संस्करणासाठी वापरावयाचे तंत्रेही लक्षात घेता आली.

२.८.१० पंड्या, बी. जी.(१९७२). 'शिक्षकांसाठी एक व्यावसायिक चाचणी विकसित करणे'

संशोधनाचे उद्दिष्टे : शिक्षकांसाठी व्यावसायिक चाचणी विकसित करणे.

संशोधनाची कार्यपद्धती : ४० शिक्षणतज्ज्ञांची मते विचारात घेऊन या चाचणीचे ७ उपकसोट्यात विभाजन करण्यात आले. माध्यमिक शाळा मुंबईतील ५ अनुभवी मुख्याध्यापकांच्या मतानुसार विधानांचे संपादन करण्यात आले.

न्यादर्श : चाचणीचा प्राथमिक पडताळा उल्हासनगर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ३५० विद्यार्थ्यांवर घेतला. मार्गदर्शक चाचणी ही ४०० बी. एड्. प्रशिक्षणार्थींवर घेण्यात आली व प्रश्न पृथक्करण करण्यात आले. यानंतर चाचणीचा अंतिम पडताळा १५०० बी. एड्. प्रशिक्षणार्थींवर घेण्यात आला. संख्याशास्त्रीय संस्करणासाठी मध्यमान, मध्यांक, बहुलक, प्रमाण विचलन, शततमक, प्रणऊ गुणांक, झेड गुण व टी गुण काढण्यात आले.

निष्कर्ष : चाचणी-पुनर्चाचणी पद्धती व अर्धसमांतर पद्धतीच्या सहाय्याने चाचणीची विश्वसनीयता काढण्यात आली. चाचणीची सप्रमाणता काढण्यासाठी समवर्ती समप्रमाणता पद्धतीचा वापर केला गेला.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास व्यावसायिक चाचणी तयार करण्याची पद्धती समजली. प्रारंभिक पडताळा ते अंतिम पडताळा घेण्याची प्रक्रिया लक्षात आली. मध्यमान, मध्यांक, बहुलक तसेच प्रमाणित गुण काढण्याच्या संख्याशास्त्रीय तंत्राचे ज्ञान झाले.

२.८.११ पांडे, के. पी. (१९६८) .'प्राथमिक शाळेतील शिक्षक निवड हेतूने अभिक्षमता चाचणीचे विकसन व प्रमाणीकरण'

संशोधनाचे उद्दिष्टे : अध्यापन अभिक्षमता मापन करण्यासाठी प्रमाणित साहित्याचा विकास करणे.

संशोधनाची कार्यपद्धती : या संशोधनात चाचणीचे एकूण ८ उपकसोट्यात विभाजन केले. त्या पुढीलप्रमाणे १. व्यावसायिक ज्ञान, २. शब्दसंपदा, ३. अनुमानात्मक तर्क, ४. संख्यात्मक ज्ञान. ५. तार्किक निवड. ६. सामान्य ज्ञान, ७. वाचन क्षमता, ८. तार्किक कार्यकारणभाव. चाचणीचा प्राथमिक पडताळा घेतल्यावर प्रश्न पृथक्करण केले.

न्यादर्श : चाचणीचा अंतिम पडताळा १९९० इतक्या विद्यार्थ्यांवर घेतला ज्यात ६५० पुरूष व ५४० स्त्रिया होत्या. संख्याशास्त्रीय तंत्रासाठी विषमितता व शिखरदोष निश्चित केला. विषमितता ही ०.४०८ व शिखरदोष ०.२२७.

निष्कर्ष : १. थोडा ऋण विषमित वक्र आढळतो. **२.**शततमक प्रमाणके, टी गुण हेही काढण्यात आले. **३.** चाचणीची सप्रमाणता ०.४९ ही पर्यवेक्षकांच्या मते आली तर विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या गुणानुसार ही विश्वसनीयता ०.६२ आली.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास चाचणीचा सहसंबंध गुणक काढण्याच्या संख्याशास्त्रीय तंत्राचे ज्ञान झाले. चाचणी प्रमाणिकरणासाठी विषमितता व शिखरदोष या संख्याशास्त्रय तंत्राचे महत्व कळले.

२.८.१२ उपाध्याय, बी. एन.(२००१). 'माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी शिक्षक अभिक्षमता चाचणी विकसन व प्रमाणिकरण'

संशोधनाचे उद्दिष्टे : १. गुजराथी माध्यमातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी शिक्षक अभिक्षमता चाचणीचे नियोजन, विकसन व प्रमाणिकरण करणे. २. लिंग, सामाजिक, आर्थिक स्थिती, शैक्षणिक शिस्त व पूर्वीचा अनुभव यांच्याशी अभिक्षमतेचा असणारा सहसंबंध शोधून काढणे.

संशोधनाची पद्धती : १. पूर्व चाचणीसाठी दोन महाविद्यालयातील एकूण १३० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली. २. प्रश्न पृथक्करण करून प्रश्नाची काठिण्य पातळी व भेदनक्षमता निश्चित केली व २१० प्रश्नांची निवड केली.

न्यादर्श : यादृच्छिकरित्या निवडण्यात आलेल्या ७७१ विद्यार्थ्यांवर या चाचणीचा पडताळा घेतला. यानंतर पुन्हा प्रश्नपृथक्करण करण्यात आले व १२५ प्रश्न अंतिम चाचणीसाठी निवडले. चाचणीच्या प्रमाणिकरणासाठी एकूण १८ महाविद्यालयातील १४०९ विद्यार्थ्यांचा न्यादर्श म्हणून उपयोग केला.

निष्कर्ष : १. चाचणी-पुनर्चाचणी पद्धतीने चाचणीचा स्थिरता गुणांक ०.७७ इतका आला. २. चाचणीचा सहसबंध गुणक हा ०.३२ ते ०.४८ इतका आला. ३. चाचणीसाठी प्रमाणके तयार करताना शततमक प्रमाणके, प्रमाणित गुण, प्रणऊ गुण व श्रेणी मूल्यांकन यांचा वापर करण्यात आला. ४. लिंग व आर्थिक, सामाजिक स्थिती यांचा अध्यापन अभिक्षमतेशी कोणताही संबंध आढळून आला नाही. ५. शैक्षणिक शिस्त व पूर्वीचा अनुभव यांचा अध्यापन अभिक्षमतेशी असणारा संबंध लक्षात घेण्याजोगा आहे, असा निष्कर्ष आला.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधक ास चाचणीतील अंतिम प्रश्नांची निवड करण्याचे तंत्र लक्षात आले. मानके तयार करण्याची पद्धती समजली.

२.८.१३ पटेल, डी. पी. (१९८०).'गुजरात राज्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी अभिक्षमता चाचणीचे विकसन व प्रमाणिकरण'

संशोधनाची उद्दिष्टे : १. गुजरात राज्यातील प्राथमिक शिक्षकांसाठी अभिक्षमता चाचणीचे विकसन करणे. २. त्या चाचणीचे प्रमाणिकरण करणे.

संशोधनाची पद्धती : पटेल यांनी गुजराती भाषेतून ही चाचणी तयार केली. त्यात शिक्षकांच्या अभिक्षमतेचे मापन करण्यासाठी पुढील घटकांचा विचार केला. १. शिक्षकांची व्यावसायिक अभिरूची २. समुदायाबाबतची अभिवृत्ती ३. मानसिक क्षमता ४. व्यावसायिक ज्ञान ५. विद्यार्थ्याबाबतची वृत्ती ६. अध्यापनाचे कौशल्य ७. शिस्त राखण्याची क्षमता. ८. शिक्षकाचे आरोग्य. ९. वाचनाची आवड.

वरील घटकांचे एकत्रीकरण करून ४ उपकसोट्या तयार करण्यात आल्या. चाचणीच्या अंतिम नमुन्यात १२५ प्रश्नांचा समावेश असून, ०.२० व त्यापेक्षा अधिक भेदभाव क्षमता असणारेच प्रश्न स्वीकारले गेले.

न्यादर्श : १७०० विद्यार्थी प्रशिक्षकांचा न्यादर्शात समावेश केला. ज्यात ८५० मुले व ८५० मुली होत्या. संख्याशास्त्रीय संस्करणासाठी मध्यमान व मध्याकांचा वापर केला.

निष्कर्ष : १. चाचणीचे मध्यमान व ८.२५ व मध्यांक ८.५९ इतका होता.**२.** गुणांकाचे विस्तरण हे विषमित वक्र व धन विषमित होते.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास प्रश्नांची भेदभाव क्षमता काय असावी, याचे ज्ञान मिळाले. चाचणी प्रमाणिकरणासाठी वापरावयाची पद्धती तसेच संख्याशास्त्रीय संस्करणासाठी वापरावयाची परिमाणे यांचे ज्ञान प्राप्त झाले.

२.८.१४ शर्मा, एस. एन.(१९६९).'प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी अभिक्षमता चाचणीचे विकसन करणे'

संशोधनाचे उद्दिष्ट : प्राथमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापन अभिक्षमता तपासण्यासाठी हिंदी भाषेतून चाचणी विकसित करणे.

संशोधनाची पद्धती : अध्यापन व्यवसायात यशस्वी होण्यासाठी २१ घटकांची आवश्यकता असते, हे व्यवसाय विश्लेषणातून प्रथमतः शोधून काढले. वरील २१ घटकांचे रूपांतर पाच घटकांत करण्यात आले. त्यासाठी एकूण २७५ व्यक्तींची मते विचारात घेतली, ज्यात प्राचार्य, मुख्याध्यापक, तज्ज्ञ व अनुभवी शिक्षक यांचा समावेश होता. अंतिमतः पाच उपकसोट्यांत त्यांचे रूपांतर करण्यात आले.

१. मानसिक क्षमता २. विद्यार्थ्याप्रती अभिवृत्ती ३. व्यावसायिक ज्ञान ४. व्यावसायिक रूची ५. समायोजन क्षमता

प्रारंभिक २/३ विधानांचे विकसन केले. त्यावर तज्ज्ञांच्या मतानुसार १४५ विधाने निश्चित केली.

न्यादर्श : यादृच्छिक रीतीने ३७० प्रशिक्षणार्थींवर वरील चाचणीचा पडताळा घेतला. यानंतर चाचणीचे प्रश्न पृथक्करण करण्यात आले व अंतिम चाचणीसाठी १२० प्रश्नांची निवड करण्यात आली. चाचणीचा अंतिम पडताळा घेण्यासाठी ३८० पुरूष व १२० स्त्री प्रशिक्षणार्थींची यादृच्छिकरित्या निवड करण्यात आली. गुणांकाची प्रसामान्यता व वितरणाचे मापन करण्यासाठी (काय स्कवेअर) या तंत्राचा वापर केला गेला.

निष्कर्ष : १. समांतर चाचणी पद्धतीने, चाचणी पुनर्चाचणी पद्धतीने व KR_{20} नुसार चाचणीची विश्वसनीयता ही अनुक्रमे ०.९८, ०.९७ व ०.८९ आली. २. चाचणीची भाकित सप्रमाणाता ही ०.३६ आली. ३. प्रमाणके तयार करण्यासाठी टी गुणांक, शततमक गुणांक व श्रेणी मूल्यांकन यांचा उपयोग करण्यात आला.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास चाचणीची विश्वसनीयता काढण्याच्या तसेच भाकीत सप्रमाणता काढण्याची पद्धती लक्षात घेता आली.

२.८.१५. नायर, पी. आर.(१९७७).'शिक्षक अभिवृत्ती मापन साधन तयार करणे'

संशोधनाचे उद्दिष्टे : या संशोधनाचे उद्दिष्ट म्हणजे शिक्षकाची अभिवृत्ती मापन करणारे साधन विकसित व प्रमाणित करणे होय. यासाठी त्यांनी चार शिक्षकांच्या चार प्रकारच्या अभिवृत्ती विचारात घेतल्या. १. शिक्षकाची अध्यापन व्यवसायाप्रती अभिवृत्ती, २. शिक्षकाची विद्यार्थ्याप्रती असणारी सामान्य अभिवृत्ती ३. शिक्षकाची शालेय कामांबद्दलची अभिवृत्ती. ४. शिक्षकाची व्यावसायिक विकासाबाबतची अभिवृत्ती.

संशोधनाची पद्धती : 'लिकर्ट' तंत्राने अभिवृत्ती मापिका तयार करण्यात आली. प्रत्येक अभिवृत्तीची किमान ३० विधाने तयार करण्यात आली व कमी अधिक प्रमाणात सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारची विधाने निवडली गेली.

न्यादर्श : न्यादर्श म्हणून ४०० विविध अनुभवी शिक्षकांचा समावेश करण्यात आला. (काय स्कवेअर) पद्धतीचा वापर करून चाचणीतील विधानांची भेदनक्षमता निश्चित करण्यात आली. अंतिम कसोटीत ११० विधानांचा समावेश केला व तिचा पुन्हा ४०० प्रातिनिधिक शिक्षकांवर पडताळा घेतला गेला.

निष्कर्ष : १. अर्ध समांतर चाचणी पद्धतीने चाचणीची विश्वसनियता काढण्यात आली. ती कसोटीनिहाय अनुक्रमे ०.७८, ०.८३, ०.७८, ०.९८ अशी आली. २. प्रमाणके तयार करताना शततमक प्रमाणके तसेच प्रणऊ प्रमाणके काढून वरिष्ठ व कनिष्ठ शलाकेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण काढले गेले.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधक ास प्रणऊ शलाकेत वरिष्ठ व कनिष्ठ शलाकेत विद्यार्थ्यांचे असणारे प्रमाण व त्याचा अन्वयार्थ लक्षात घेतला.

२.८.१६ मान, एस. एस. (१९८०).' माध्यमिक शिक्षकांना अध्यापन यशस्वितेसाठी काही संबंधित घटकांचे अध्ययन'

संशोधनाचे उद्दिष्टे : १. अध्यापन यशस्विता ही संकल्पना प्रशासक, शिक्षक, शिक्षक-प्रशिक्षक व विद्यार्थी च्यांच्याकरवी शोधून काढणे. २. इयत्ता नववी, दहावी व अकरावीला गणित व विज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी अध्यापन यशस्वीता मोजण्यासाठी मापन साधन विकसित करणे. ३. यशस्वी व अयशस्वी शिक्षक शोधणे. ४. अयशस्वी शिक्षकांचे व्यक्तिमत्व व यशस्वी शिक्षकांचे व्यक्तिमत्व यातील फरक स्पष्ट करणे. ५. यशस्वी व अयशस्वी शिक्षकांच्या शैक्षणिक संपादन व व्यावसायिक संपादनाची तुलना करणे. ६. यशस्वी व अयशस्वी शिक्षकांची अभिवृत्तीची, व्यावसायिक अभिवृत्ती, वर्गाध्यापन, विद्यार्थीकेंद्री अध्यापन, शैक्षणिक संपादन व व्यावसायिक संपादन यांच्याद्दष्टीने तुलना करणे.

संशोधनाची पद्धती : १) १६ पी.ए. टेस्ट (शिक्षक अभिवृत्ती शोधिका), २) अध्यापन क्षमता मापन साधन.

न्यादर्श : पंजाब शहरातील १८०० माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांवर अभ्यास करण्यात आला.

निष्कर्ष :१. व्यक्तिमत्वाचे A,B,C,G,H,N & Q हे अध्यापन यशस्वीतेसाठी आवश्यक घटक आहेत. F,I,O&Q, हे नकारात्मक घटक आहेत. **२.** अयशस्वी व यशस्वी शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूंचे ११ घटकात विभाजन करण्यात आले. यशस्वी शिक्षक ते जे त्यांच्या भावना स्पष्टपणे व्यक्त करतात. इतरांना मदत करण्यास तयार असतात. शिकण्यास सतत उत्सुक असतात. सामाजिक जाणिवा ठेवणारे असतात, ज्यांना जीवनाच्या सत्यतेविषयी जाणीव असल्याचे दिसते. **३.** यशस्वी शिक्षक हे अध्यापन व्यवसायाप्रति जास्त सकारात्मक वृत्तीचे असल्याचे दिसतात. **४.** शैक्षणिक संपादन व व्यावसायिक संपादन यात धन सहसंबंध आढळला. **५.** अध्यापनाच्या अनुभवाचा अध्यापनांच्या यशस्वीतेशी संबंध आढळून आला नाही. **६.** यशस्वी व अयशस्वी शिक्षणातील व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये त्यांची अध्यापनाबाबतची अभिवृत्ती तसेच शैक्षणिक व व्यावसायिक संपादन यात लक्षणीय फ रक जाणवला. **७.** व्यावसायिक अभिवृत्ती वर्गाध्यापन, विद्यार्थीकेंद्री अध्यापन, शैक्षणिक संपादन व व्यावसायिक संपादन हे अध्यापन यशस्वीतेसाठी आवश्यक घटक आहेत.

उपयोग : प्रस्तुत संशोधनातून संशोधकास अध्यापन अभिक्षमतेचे मापन करताना व्यक्तीच्या पूर्वानुभवाचा उपयोग होत नाही, हे लक्षात घेतले. अध्यापनाबाबतची अभिवृत्ती असेल तर व्यावसायिक रूची आणि व्यावसायिक संपादन आपोआप वाढेल, हे लक्षात घेतले. अध्यापन यशस्वीतेसाठी आवश्यक घटकांची नोंद करता आली.

२.८.१७ शेरी, जी. पी. (१९६४). 'अध्यापक यशस्वीतेचे भाकीत करणारा मानसशास्त्रीय कसोटी संच तयार करणे'

संशोधनाची उद्दिष्टये : १. शिक्षकाची अध्यापनाची प्रभावक्षमता ही त्याच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक व भावनिक घटकांवर अवलंबून असते. या परिकल्पनेचे परीक्षण

केले असता त्यात लक्षात घेण्याजोगी भविष्यकथनाबाबत सप्रमाणता आढळली. २. अध्यापनाची यशस्वीता म्हणजे शिक्षकाची विषयातील अभिरूची, मुलांमधील रूची व अध्यापनातील रूची होय. ३. शिक्षकाची अध्यापनातील रूची ही त्याच्या अध्यापनाकडे बघण्याच्या दृष्टीकोनाशी संबंधित असते. ४. कोणत्याही एका कसोटीपेक्षा बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व, अभिरूची व अभिवृत्ती या चार कसोट्यांचे एकत्रीकरण हे शिक्षकाच्या अध्यापन यशस्वीतेच्या भाकित क्षमतेसाठी आवश्यक असते. ५. पर्यवेक्षकांनी दिलेली श्रेणी ही अंतिम पाठात व प्रात्यक्षिकात तसेच लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांपेक्षा जास्त महत्वपूर्ण असते.

संशोधनाची पद्धती : चाचणीची विश्वसनीयता काढण्यासाठी चाचणी, पुनर्चाचणी व समांतर चाचणी पद्धतीचा वापर करण्यात आला.

न्यादर्श : शेरी यांनी या संशोधनासाठी आग्रा विद्यापीठातील सात महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींचा न्यादर्श म्हणून संशोधनात समावेश केला.

निष्कर्ष : चारही कसोट्यांची भाकित क्षमता ही पुढीलप्रमाणे आली. १. बुद्धिमत्ता कसोटीची विश्वसनीयता चाचणी पुनर्चाचणी पद्धतीने व समांतर चाचणी पद्धतीने ०.८९ व ०.९३ इतकी आली तर सप्रमाणता ०.४८ ते ०.७१ इतकी आली. २. अभिरूची शोधिका चाचणीची विश्वसनीयता ०.६४९ तर सप्रमाणता ०.२५ व ०.४९ इतकी आली. ३. व्यक्तिमत्व शोधिका चाचणी विश्वसनीयता चाचणी पुनर्चाचणी पद्धतीने व समारंतर चाचणी पद्धतीने अनुक्रमे ०.७६ ते ०.८० इतकी आली तर सप्रमाणता ०.२८ ते ०.५७ इतकी आली. ४. अभिवृत्ती मापिकेची विश्वसनीयता ०.६४ तर सप्रमाणता ०.१९८ व ०.५५४ इतकी होती.

अशाप्रकारे प्रत्येक बांधीलकी क्षेत्रांचे उपपैलू व उद्दिष्टे निश्चित करून त्यांच्यासाठी प्रश्नांची निर्मिती केली. यानुसार पूर्वचाचणी मध्ये शिक्षक- प्रशिक्षकाची अध्ययनार्थ्यांबाबत निष्ठा/बांधीलकी क्षेत्रासाठी ४० प्रश्न, व्यवसायाशी बांधीलकी क्षेत्रासाठी ४० प्रश्न, उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी क्षेत्रासाठी ४० प्रश्न, मूल्य, निष्ठा/बांधीलकी ४० प्रश्न, समाजाप्रति बांधीलकी ४० अशा प्रकारे एकूण २०० प्रश्नांची निर्मिती केली व त्याची न्यादर्शाच्या छोट्या गटावर पूर्वपडताळणी केली. ज्या प्रश्नांची काठिण्यपातळी ०.२० ते ०.८० च्या दरम्यान असतील अशाच प्रश्नांचा अंतिम चाचणीत समावेश करण्यात आला. ही अंतिम चाचणी न्यादर्शाच्या मोठ्या गटावर पडताळण्यात आली व प्राप्त माहितीच्या आधारे चाचणीची सप्रमाणता व विश्वसनीयताही निश्चित करण्यात आली. तसेच चाचणीची मानकेही तयार करण्यात आली.

प्रस्तुत संशोधनात चाचणीचा पडताळा घेणे हे एक उद्दिष्ट असल्याने एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ - मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - औरंगाबाद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ - नांदेड, शिवाजी विद्यापीठ - कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ - मुंबई आणि सोलापूर विद्यापीठांतर्गत प्रत्येकी तीन महाविद्यालयात चाचणीचा पडताळा घेण्यात आला तसेच एका प्रमाणित कसोटीशी तुलना करून त्यांच्यातील सहसंबंधही तपासण्यात आला.

वरील प्रमाणे प्रस्तुत संशोधनात मतावली, प्रश्नावली या दोन साधनांचा वापर करण्यात आला.

३.५ संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग

तक्ता क्रमांक ३.४

संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग दर्शविणारा तक्ता

प्रयोजन	संख्याशास्त्रीय तंत्र
चाचणीतील प्रश्नांच्या निश्चितीसाठी प्रश्न पृथक्करण करणे.	प्रश्नांची भेदनक्षमता व काठिण्यपातळी ठरविली
चाचणीतील माहितीचे वर्गीकरण दर्शविण्यासाठी सदर संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करणे.	केंद्रीय प्रवृत्ती व विचलनशीलतेच्या मापनाच्या साहाय्याने दर्शविलेल्या चाचणीतील गुणांचे वितरण, विषमितता व शिखरदोष यानुसार दर्शविले.
चाचणीतील फलांच्या अर्थनिर्वचनासाठी सदर संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करणे.	'प्रमाणित' गुण, 'झेड' गुण, 'टी' गुण, 'प्रणऊ' गुण तसेच शततमक प्रमाणक आणि प्रमाणित गुणांचा वापर केला. चाचणीची -सप्रमाणता व विश्वसनीयता निश्चित केली
चाचणीचा पडताळा अभ्यासासाठी सदर संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करणे.	केंद्रीय प्रवृत्ती व विचलनशीलतेची मापने तसेच 'झेड' व 'टी' गुणांक या प्रमाणित गुणांकाबरोबर प्रमाणक श्रेणीदान प्रतिमानाचाही वापर केला.

वरील संख्याशास्त्रीय तंत्रांच्या साहाय्याने चाचणी प्रमाणित केली.

३.६ संशोधनाची कार्यवाही : प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टानुसार कार्यवाही करण्यासाठी पुढील टप्प्यांचे आयोजन करण्यात आले[१].

तक्ता क्रमांक ३.५

संशोधनाची कार्यवाही दर्शविणारा तक्ता

प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा क्रमांक -१	
अ) नियोजन	**ब) निर्मिती**
१. क्षेत्र निश्चिती करणे	१. विधानांचे विकसन
२. उद्दिष्टे निश्चिती	२. चाचणीचे संपादन
३. क्षेत्रनिहाय विधान संख्या निश्चिती	३. विधानांना क्रमांकन
	४. वेळेचे नियोजन
	५. प्रतिसादक सूचना
	६. गुणदान योजना व उत्तरसूचीचे आयोजन
	७. चाचणीचे पुनरावलोकन
प्रतिसादांचे मूल्यांकन टप्पा क्रमांक -२	
१. पूर्वचाचणी घेणे	
२. वेळेचे नियोजन	
३. निरीक्षणे	
चाचणीचे प्रमाणीकरण टप्पा क्रमांक -३	
१. प्रश्न पृथक्करण करणे	
२. अंतिम चाचणीसाठी वेळेचे नियोजन व गुणदान योजना	
३. उत्तर चाचणी घेणे	
४. चाचणी तपासणे व मूल्यांकन	
५. संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर	
६. विश्वसनीयता काढणे	
७. सप्रमाणता ठरविणे	
८. प्रमाणके तयार करणे	
९. मार्गदर्शिका तयार करणे	
१०. प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.	

प्रस्तुत संशोधनात चाचणी तयार करताना तीन प्रमुख टप्प्यांत तिचे नियोजन केले आहे.[१] वरील तीन ही टप्प्यांतून होणारी संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही उद्दिष्टनिहाय पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे.

३.७ प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा

अ) नियोजन

३.७.१ क्षेत्र निश्चिती करणे.

सन १९९५ मध्ये 'एन.सी.टी.ई.' वैधानिक संस्था (Statutory body) म्हणून अस्तित्त्वात आल्यावर प्रामुख्याने हाती घेतलेल्या कामात अध्यापक शिक्षणक्रमांची पुनर्रचना या विषयाचा समावेश केला. नामवंत शिक्षण तज्ज्ञांच्या दोन अडीच वर्षे झालेल्या विस्तृत व देशव्यापी विचार मंथनाचे प्रतीक म्हणून 'Competency based and commitment oriented teacher education for quality school education' आणि 'Curriculum frame work for quality Teacher Education' या सन १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. राज्यस्तरावर काम करणाऱ्या अभ्यासक्रम पुनर्रचना समितीने त्यांचाच आधार घेतला व राज्याची परिस्थिती लक्षात घेऊन इष्ट ते बदल केले.[२] पायाभूत अशा या विचारधारेनुसार अध्यापकाच्या व्यावसायिक विकासासाठी तीन क्षेत्र कल्पिलेली आहेत.

१. क्षमता
२. निष्ठा/बांधीलकी
३. सचोटी/ प्रामाणिकपणा

सदर संशोधनासाठी अध्यापकाच्या व्यावसायिक विकासासाठी दिलेल्या तीन क्षेत्रांपैकी बांधीलकी हे क्षेत्र निवडण्यात आले.

३.७.१.१ बांधीलकी क्षेत्र :

शिक्षणतज्ज्ञ डॉ. दवे यांचे संशोधन कार्य व त्यांची पुस्तिका हे या संशोधनाचे प्रेरणास्त्रोत आहेत. १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या 'Compitency based and commitment oriented teacher education for quality school teacher' या पुस्तकात

शिक्षक कसा असावा, याबाबत त्यातील महत्त्वपूर्ण घटकांचे विवेचन आहे. त्यामुळे बांधीलकीची उपक्षेत्रे निश्चित करताना त्याचा उपयोग क रू न खालील उपक्षेत्रे निश्चित केली.

१. विद्यार्थ्यांशी बांधीलकी
२. व्यवसायाशी बांधीलकी
३. सर्वोत्कृष्टतेसाठी बांधीलकी
४. मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी
५. समाजाशी बांधीलकी

प्रित्येक क्षेत्रासाठी स्वतंत्र चाचणी तयार के ली. खालील प्रमाणे पाच चाचण्यांचा चाचणीसंच संशोधकाने तयार केला.

तक्ता क्रमांक ३.६

बांधीलकीची क्षेत्रे- पाच चाचण्यांचा चाचणीसंच

चाचणी क्रमांक	क्षेत्र
१	विद्यार्थ्यांशी बांधीलकी
२	व्यवसायाशी बांधीलकी
३	सर्वोत्कृष्टतेसाठी बांधीलकी
४	मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी
५	समाजाशी बांधीलकी

३.७.१.२ शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्राच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम व भारांश ठरविणे.

वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रस्तुत संशोधनात एका मतावलीचा वापर संशोधकाने केला. ज्याच्या आधारे वरील पाचही बांधीलकी क्षेत्रांचा भारांश निश्चित केला. (मतावली परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दिली आहे.)

प्रस्तुत संशोधनात वापरण्यात आलेल्या मतावलीची एका कोष्टकाच्या स्वरूपात मांडणी करण्यात आली. ज्यात वरील पाचही बांधीलकी क्षेत्रांची नावे देण्यात आली व त्या प्रत्येक बांधीलकी क्षेत्रास १०० पैकी एकूण किती गुणांक, भारांश द्यावेत, हे ६० प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावरून ठरविण्यात आले त्यासाठी न्यादर्शाची निवड असंभाव्य पद्धती मधील सहेतुक पद्धतीने करण्यात आली व पाचही क्षेत्रांचा भारांश निश्चित करण्यात आला.

मतावली भरून घेण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयात शिक्षक असणाऱ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. त्यासाठी न्यादर्श निवडीच्या असंभाव्य पद्धती मधील सहेतुक/उद्देशपूर्ण पद्धतीचा अवलंब संशोधकाने केला. ज्यामुळे शिक्षक-प्रशिक्षकाची व्यावसायिक बांधीलकी योग्य आणि सखोलपणे निश्चित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणे सहज शक्य होऊ शकते.

६० शिक्षक-प्रशिक्षकांकडून मतावली भरून घेण्यात आली त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून संशोधकास असे निदर्शनास आले की ६० पैकी ५४ प्रतिसादकांनी प्रत्येक क्षेत्रासाठी समान भारांश दिलेला आहे. त्यामुळे संशोधकाने शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकीच्या पाचही क्षेत्रासाठी समान गुणांकन चाचणी घेण्याचे ठरविले.

३.७.१.३ क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे : शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकीसाठी निश्चित केलेल्या वरील पाचही क्षेत्राच्या चाचण्या या संशोधनात माहिती संकलनासाठी आवश्यक आहेत त्यामुळे या उपविभागात चाचणीचे प्रत्यक्ष नियोजन कसे केले हे नमूद केले आहे.

प्रत्यक्ष चाचणीची निर्मिती खालील सहा पायऱ्यांच्या आधारे संशोधकाने केली.

१) चाचणीचे नियोजन

२) चाचणीसाठी प्रश्न तयार करणे.

३) प्रश्नांची मांडणी

४) सूचना पुरविणे/देणे

५) गुणदान योजना व उत्तरसूची तयार करणे.

६) चाचणीचे संपादन व पुनरावलोकन करणे.[१२]

वरील सहा पायऱ्यांचा विचार करून प्रत्यक्ष चाचणी विकसन करताना प्रस्तुत संशोधन अहवालातील पृष्ठ क्रमांक १८७ वरील टप्प्यांनुसार कार्यवाही केली आहे ती पुढीलप्रमाणे :

प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा यात चाचणीचे प्रत्यक्ष नियोजन - चाचणीच्या यशस्वीतेसाठी तिचे काळजीपूर्वक नियोजन करून विकसन करणे आवश्यक असते. या टप्प्यांवर चाचणीच्या महत्त्वाच्या गुणवैशिष्ट्यांचा म्हणजेच चाचणीची सप्रमाणता, विश्वसनीयता, वस्तुनिष्ठता, पर्याप्तता आणि उपयुक्तता या पाच महत्त्वपूर्ण गुणवैशिष्ट्यांचा समावेश आहे. जो चाचणीचे नियोजन करतानाच संशोधकाने केला आहे.

चाचणी तयार झाल्यानंतर केल्या जाणाऱ्या अनेक प्रक्रियांचा विचार चाचणी तयार करण्यापूर्वीच म्हणजे चाचणीच्या नियोजनाच्या वेळीच करावा लागतो. ज्यात प्रश्नांचा प्रकार आणि काठिण्यपातळी, प्रतिसादकांना द्यावयाच्या सूचना, चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठीचे नियोजन, चाचणी तयार करताना येणाऱ्या अडचणी, चाचणीबद्दलच्या तज्ज्ञांकडून घ्यावयाच्या मतांचे स्वरूप, उपयुक्त सोई-सुविधा इत्यादींचा चाचणी नियोजनात समावेश आहे.[६]

प्रस्तुत संशोधनात चाचणीसाठी विविध उपपैलूंची निश्चिती करताना आशय विश्लेषणाच्या आधारे निवडण्यात आलेल्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्रांच्या उपपैलूंच्या कार्यात्मक व्याख्या मांडल्या तसेच शिक्षक होण्यासाठी व्यक्तीत कोणकोणती गुणवैशिष्ट्ये असावीत याचा शोध वरील आशय विश्लेषणाच्या आधारे घेण्यात आला त्यासाठी ३८ पुस्तकांचे विश्लेषण केले. हा शोध घेताना विषय शिक्षक, विषयज्ञान, अध्यापन पद्धती, शिक्षकाची कार्ये, कर्तव्ये,

शिक्षकाच्या भूमिका, जबाबदाऱ्या, नीतीमूल्ये याबाबतच्या पुस्तकांचे वाचन केले त्यातून स्पष्ट होणारी शिक्षकाची २५० गुणवैशिष्ट्यांच्या नोंदी घेण्यात आल्या. शिक्षकासाठी आवश्यक क्षमतांची निवड व त्यांचे एकत्रीकरण करण्यासाठी या विविध पुस्तकांचे त्यातील आशयाचे विश्लेषण करण्यात आले. तसेच उपपैलूंचा मूल्यभाव ठरविताना प्रस्तुत संशोधनात मतावलीचा आधार घेण्यात आला. यात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांच्या मतांचा आधार घेण्यात आला. चाचणीतील प्रश्नांचा प्रकार ठरविणे, यात वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न निश्चित करण्याचे संशोधकाने ठरविले तसेच प्रत्येक कसोटीसाठी प्रश्नसंख्या ठरविताना कसोटीच्या अंतिम गुणांच्या संख्येच्या किमान तीन पट प्रश्नांचे विकसन करण्याचे प्रारंभिक टप्प्यात संशोधकाने ठरविले. तसेच चाचणीची दिशाही निश्चित केली. वरील सर्व घटकांचा विचार करून प्रस्तुत संशोधनात चाचणीचे प्रत्यक्ष नियोजन संशोधकाने केलेले आहे.

३.७.२. उद्दिष्टे निश्चिती :

बांधीलकीची क्षेत्रे निश्चित केल्यानंतर प्रस्तुत संशोधनात शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या विविध पैलूंशी संबंधित घटकांची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. यात विद्यार्थ्यांशी बांधीलकी, समाजाशी बांधीलकी, व्यवसायाशी बांधीलकी, सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी या पाच चाचणीची मुख्य उद्दिष्टे निश्चित करण्यात आली तसेच त्यांची सर्वसाधारण उद्दिष्टे निश्चित करून त्यांची स्पष्टीकरणे देण्यात आली व त्यांना द्यावयाचा एकूण भारांश (संविधान तक्त्यानुसार) सुद्धा निश्चित केला गेला तो पुढीलप्रमाणे :

३.७.२.१ चाचणी क्रमांक १ : विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणीचे नियोजन

या चाचणीचे नियोजन करताना प्रथमत: विद्यार्थ्यांशी बांधीलकी म्हणजे काय ? त्या चाचणीची उद्दिष्टे कोणती ? तसेच यात उद्दिष्टे , उपघटक आणि प्रश्नप्रकार यानुसार म्हणजेच संविधान तक्त्यानुसार चाचणीचा भारांश ठरविला. यानुसार कसोटीचे नियोजन केले.

विद्यार्थ्यांशी बांधीलकी म्हणजे विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांच्या भावनांची दखल, त्यांच्या विकासाची ओढ आणि सहकार्याची उर्मी मनापासून करणे.

अ)विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणीची उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे : शिक्षक-प्रशिक्षकांची विद्यार्थ्यांशी बांधीलकी पडताळणे.

विशिष्ट उद्दिष्टे : यात काही उपपैलू निश्चित करून या प्रारंभिक चाचणीची विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली. खालील बाबी पडताळणे हा विद्यार्थ्यांशी बांधीलकी या प्रारंभिक चाचणीचे उद्दिष्ट होते.

१. अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनविषयक गरजा भागविण्यासाठी अध्यापक त्यांच्याशी प्रेमाने व संवेदनशीलतेने वागतो का?
२. प्रत्येक अध्ययनार्थ्यांची वैयक्तिक ओळख करून त्यांच्या गरजेनुसार त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष पुरवून अध्ययनास प्रोत्साहन देणारा आहे का?
३. अध्ययनार्थ्यांमध्ये 'अध्ययन म्हणजे आनंददायी कृती' ही संकल्पना रूजवितो का?
४. अध्ययनार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची रूजवणूक करतो का?
५. अध्ययनार्थ्यांच्या खोड्या आणि चेष्टा यांच्याकडे दुर्लक्ष करून त्यांना विषयाच ज्ञान करून घेण्यास मदत करतो का?
६. अध्ययनार्थ्यांची प्रगती आणि मनुष्यबळ विकास यासाठी कार्यरतअसतो का?
७. स्वयंविकास साधण्यासाठी विद्यार्थ्यांशी असलेले नाते आणि वागणूक/आंतरक्रिया याबाबत स्वमूल्यमापन करणारा आणि सुधारणेसाठी आवश्यक ते प्रत्याभरण करून घेतो का?
८. अध्यापक व अध्ययनार्थ्यांमध्ये विश्वासाचे नाते प्रस्थापित करतो का?
९. अपवादात्मक विद्यार्थ्यांच्या वृत्तीचा अभ्यास करतो का?
१०. मार्गदर्शक आणि समुपदेशकाची भूमिका पार पाडतो का?

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्दयाला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले . पुढील संविधान तक्त्यात विद्यार्थ्यांशी बांधीलकीच्या प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला आहे.

ब) संविधान तक्ता : विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठी आवश्यक नमुन्याची संविधान तक्त्यात मांडणी केली ती पुढीलप्रमाणे

तक्ता क्र. ३.७

विद्यार्थ्यांशी बांधीलकी चाचणी संविधान तक्ता

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण प्रश्न	एकूण शेकडा प्रमाण
	उपघटक - प्रश्नप्रकार	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	प्रेमाने व संवेदनशीलतेची वागणूक	-	-	-	२(२)	-	-	२(२)	-	-	४	१०%
२	अध्ययनार्थ्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक लक्ष	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१०%
३	अध्ययन म्हणजे आनंददायी कृती	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५%
४	मानवी मूल्यांची रूजवणूक	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१०%
५	विषयज्ञान करून घेण्यास मदत	-	-	-	१(१)	-	-	२(२)	-	-	३	७.५%
६	मनुष्यबळ विकासासाठी कार्यरत	-	-	-	१(१)	-	-	४(४)	-	-	५	१२.५%
७	स्वयंविकासासाठी विद्यार्थ्यांशी आंतरक्रियेतून मूल्यमापन करून घेणे	-	-	-	१(१)	-	-	४(४)	-	-	५	१२.५%
८	विश्वासाचे नाते	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१०%
९	विद्यार्थ्यांच्या वृत्तीचा अभ्यास	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५%
१०	मार्गदर्शक आणि समुपदेशकाची भूमिका	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५%
	एकूण	-	-	-	५(५)	-	-	३५(३५)	-	-	४०	१००%

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ

(कंसातील अंक हे प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक हे गुण दर्शवितात)

३.७.२.२ चाचणी क्रमांक २ : व्यावसायिक बांधीलकी चाचणीचे नियोजन

या चाचणीचे नियोजन करताना प्रथमतः व्यावसायिक बांधीलकी म्हणजे काय? या चाचणीची उद्दिष्टे कोणती तसेच यात उद्दिष्टे, उपघटक आणि प्रश्नप्रकार यानुसार म्हणजेच संविधान तक्त्यानुसार कसोटीचा सारांश ठरविला यानुसार कसोटीचे नियोजन केले.

''परिणामकारक अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, यासाठी योग्य वातावरण निर्मिती व ती प्रक्रिया आनंददायी व्हावी यासाठी शिक्षकाची आपल्या व्यवसायवर निष्ठा असणे यालाच व्यावसायिक बांधीलकी असे म्हणतात.''[५]

शिक्षकी व्यवसाय, त्यातील जबाबदाऱ्या व कर्तव्ये, प्रभावी शिक्षक होण्यासाठी सुयोग्य अध्ययन अध्यापन कौशल्यांचे स्वप्रयत्नाने विकसन, शिक्षणाची उद्दिष्टे कमाल प्रमाणात साध्य करून विद्यार्थ्यांचा व्यक्तिविकास करण्याची आकांक्षा व प्रत्यक्ष अशा अनुभूतीत सातत्याने मग्न राहून मानसिक आनंद प्राप्त करणे म्हणजे व्यावसायिक रूची व तसेच प्रयत्न सतत चालू ठेवणे म्हणजे व्यावसायिक बांधीलकी होय.

अ)व्यवसायाशी बांधीलकी चाचणीची उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे : शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी पडताळणे.

विशिष्ट उद्दिष्टे : यात काही उपपैलू निश्चित करून या प्रारंभिक चाचणीची विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली. खालील बाबी पडताळणे हा व्यावसायिक बांधीलकी या प्रारंभिक चाचणीचे उद्दिष्ट होते.

१. आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी आणि व्यावसायिक विकास साधण्यासाठी विविध चर्चासत्रे कार्यशाळांमध्ये सहभागी होतो का?
२. व्यवसायाप्रति एकनिष्ठ राहून शिक्षणाची ध्येय प्राप्त करतो का?
३. व्यावसायिक नीतिमत्ता आणि आचारसंहितेचे पालन करतो का?
४. व्यवसायनिष्ठा म्हणजे ग्राहकाचे समाधान या नात्याने सतत प्रयत्नशील राहतो का?

७. अध्ययनार्थ्यांना अध्ययनासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि समाजाला उत्तम नागरिक पुरविण्यासाठी स्वतःचा आत्मविश्वास वाढवून व्यावसायिक कार्य पार पाडतो का?

६. अध्यापन व्यवसायाला आणि शिक्षकाच्या प्रतिमेला बाधा आणणारे घटक ओळखून त्यांचा बिमोड करण्यासाठी प्रयत्न करतो का?

७. अध्यापन हा एक श्रेष्ठ व्यवसाय आहे त्याचा सार्थ अभिमान आहे का?

८. अध्यापकांचा व्यावसायिक विकास व राष्ट्रीय कल्याणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन दाखविताना व्यवसाय संघटनेमध्ये सहभागी होतो का?

९. स्वतःचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी विविध ग्रंथालयांना भेटी देतो तसेच निरनिराळ्या माहिती स्त्रोतांद्वारे ज्ञान प्राप्त करतो का?

१०.स्वतःच्या आणि विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीचे मूल्यमापन करून व्यवसायाची गुणवत्ता निर्माण करतो का?

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्दयाला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले . पुढील संविधान तक्त्यात व्यावसायिक बांधीलकीच्या प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला आहे.

ब) संविधान तक्ता : व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठी आवश्यक नमुन्याची संविधान तक्त्यात मांडणी केली ती पुढीलप्रमाणे .

तक्ता क्रमांक ३.८

व्यावसायिक बांधीलकी चाचणी संविधान तक्ता

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण प्रश्न	एकूण शेकडा प्रमाण
	उपघटक - प्रश्नप्रकार	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	अद्ययावत ज्ञान	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
२	व्यवसायाप्रति एकनिष्ठ	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
३	व्यावसायिक नीतिमत्ता व आचारसंहिता	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
४	ग्राहकाच्या समाधानासाठी प्रयत्नशील	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
५	समाजासाठी उत्तम नागरिक पुरविणे	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
६	अध्यापन व्यवसायाला आणि शिक्षक प्रतिमेला बाधा आणणाऱ्या घटकांचा बिमोड	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
७	एकश्रेष्ठ व्यवसायाचा सार्थ अभिमान	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
८	राष्ट्रीय कल्याणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५ %
९	माहिती स्त्रोतांचा उपयोग	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
१०	स्वत: च्या आणि विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन	-	-	-	१(१)	-	-	३(३)	-	-	४	१०%
	एकूण	-	-	-	१(१)	-	-	३९(३९)	-	-	४०	१००%

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ

(कंसातील अंक हे प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक हे गुण दर्शवितात)

३.७.२.३ चाचणी क्रमांक ३ : सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणीचे नियोजन - या चाचणीचे नियोजन करताना प्रथम सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी म्हणजे काय? या चाचणीची उद्दिष्टे कोणती तसेच यात उद्दिष्टे, उपघटक आणि प्रश्नप्रकार यानुसार म्हणजेच संविधान तक्त्यानुसार चाचणीचा भारांश ठरविला यानुसार चाचणीचे नियोजन केले.

समाज, अध्ययनार्थी यांच्यासाठी शिक्षक हा ज्ञानाचा स्त्रोत असतो. शिक्षकाने आपली ही प्रतिमा कायम ठेवून आपला व्यवसाय उत्कृष्टपणे करण्यासाठी सातत्याने अध्ययनार्थी असावे यासाठी शिक्षकाने अध्यापन व्यवस्थेसाठी आवश्यक असणारी मूल्ये, क्षमता, गुणवैशिष्ट्ये आणि कौशल्ये प्राप्त करून आपली 'ज्ञानाचा स्त्रोत' ही प्रतिमा कायम टिकवावी. ज्ञानाचे संक्रमण हे केवळ शब्दांनी होत नाही तर त्यासाठी कृती, वर्तन आणि चारित्र्य यांचीही आवश्यकता असते. महाविद्यालय, वर्ग आणि समाजात वावरताना त्यांच्याविषयी आस्था वाटणे आणि जे काही करीन ते सर्वोत्कृष्टच असेल या जिद्दीने केलेली कृती म्हणजेच सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी होय.

अ)सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणीची उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे : शिक्षक-प्रशिक्षकांची सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी पडताळणे

विशिष्ट उद्दिष्टे : यात काही उपपैलू निश्चित करून या प्रारंभिक चाचणीची विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली. खालील बाबी पडताळणे हा सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी या प्रारंभिक चाचणीचे उद्दिष्ट होते.

१. आपल्या व्यवसायाला उत्कृष्टता प्रदान करण्यासाठी आणि शिक्षणाची ध्येय साध्य करण्यासाठी उच्च ज्ञान प्राप्त करतो का?
२. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करतो का?
३. उत्तम चारित्र्य, वर्तन आणि उत्कृष्ट कृती या माध्यमातून व्यावसायिक उत्कृष्टता गाठतो का?

४. ज्ञानी समाजाचा मार्गदर्शक, तत्त्वज्ञ व मित्र म्हणून कार्य करण्यासाठी उत्तम माणूस होण्यासाठी प्रयत्न करतो का?

५. आपल्या कार्याप्रति प्रामाणिकपणाने व सचोटीने आपले कार्य पूर्ण करतो का?

६. सर्व अध्ययनार्थी सर्व विषयांमध्ये उत्कृष्टता प्राप्त करतील या बाबतची जाणीव ठेवून त्यासाठी हेतुपुरस्सर प्रयत्न करतो का?

७. कृतिसंशोधन कार्याच्या माध्यमातून नवनवीन अध्यापन पद्धतीची व शैक्षणिक साधनांची निर्मिती व उपयुक्तता तपासून पाहतो का?

८. प्रत्येक कृती उत्कृष्ट करण्याची सवय स्वतःला लावून घेतो का?

९. कुशाग्र बुद्धिमत्ता असलेले आणि अध्ययन अकार्यक्षम असलेले अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन कृतींचा संच तयार करून त्याद्वारे अध्ययन उत्कृष्टता प्राप्त करतो का?

१०. सर्जनशीलता आणि परीक्षणात्मक विचार करण्यासाठी वेळ काढतो का?

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्दयाला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले . पुढील संविधान तक्त्यात सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकीच्या प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला आहे.

ब) संविधान तक्ता : सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठी आवश्यक नमुन्याची संविधान तक्त्यात मांडणी केली ती पुढीलप्रमाणे.

तक्ता क्र. ३.९

सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी चाचणी संविधान तक्ता

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण	एकूण शेकडा प्रमाण
	उपघटक - प्रश्नप्रकार	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	शैक्षणिक ध्येयासाठी उच्च ज्ञान प्राप्ती	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
२	वैज्ञानिक दृष्टिकोन	-	-	-	-	-	-	१(१)	-	-	१	२.५ %
३	उत्तम चारित्र्य, वर्तन	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
४	ज्ञानी समाजाचा मार्गदर्शक, तत्त्वज्ञ आणि मित्र	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
५	प्रामाणिक व सचोटीने कार्य	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५ %
६	अध्ययनार्थीच्या विकासासाठी हेतुपुरस्सर प्रयत्न	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
७	संशोधन	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
८	उत्कृष्टतेसाठी स्व वर्तनात बदल	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
९	अध्ययन कृतींचा संच	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
१०	सर्जनशील व परीक्षणात्मक विचार	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५ %
	एकूण	-	-	-	-	-	-	४०(४०)	-	-	४०	१००%

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ

(कंसातील अंक हे प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक हे गुण दर्शवितात)

३.७.२.४ चाचणी क्रमांक ४ : मानवी मूल्यांच्या प्रति असलेली बांधीलकी

चाचणीचे नियोजन : या चाचणीचे नियोजन करताना प्रथम मानवी मूल्यांच्याप्रति बांधीलकी म्हणजे काय? या चाचणीची उद्दिष्टे कोणती तसेच यात उद्दिष्टे, उपघटक व प्रश्नप्रकार यानुसार म्हणजेच संविधान तक्त्यानुसार चाचणीचा भारांश ठरविला यानुसार चाचणीचे नियोजन केले.

मानवाची प्रगती ही मानवी मूल्यांच्या विकासातून झालेली आहे. प्रामुख्याने वैयक्तिक मूल्ये, सामाजिक मूल्ये व वैश्विक मूल्ये या तीनही मूल्यांचा विचार शिक्षकाने करावा. 'मूल्य' संकल्पनाच मानवाच्या जन्मापासून अस्तित्वात आलेली दिसते. 'मानव' आणि 'मूल्य' या दोन संकल्पना एकमेकांपासून कधीच भिन्न नव्हत्या. त्रिकालाबाधित असणारी, कोणत्याही परिस्थितीत (काल, मान, देश परत्वे) न बदलणारी गोष्ट म्हणजे मूल्य. उदा. 'सत्य, शिवम् सुंदरम्'. या संकल्पना कोणत्या परिस्थितीत बदलणार नाहीत त्या मानवाला मात्र निश्चितपणे बदलून टाकतील. जसे वाल्या कोळ्याचा वाल्मीकि झाला तो मूल्यांमुळेच. मानवी जीवन हे या मूल्यांवरच आधारलेले आहे. वंशपरंपरेने ही मूल्ये अर्थात् उत्तम गोष्ट, आमरण, अजेय, अतुल्य अशा या अव्यक्त, अशब्द तरीही बुद्धीगम्य, मानवाच्या भावविश्वाला, तावून सुलाखून जीवन जगण्यास सुकर करतात जे घडविते ते मूल्य आणि आपल्या भारतीय संस्कृतीनुसार शिक्षक हा विद्यार्थ्याला घडवित असतो त्यामुळे शिक्षकाची मानवीमूल्यांप्रति असणारी बांधीलकी खरोखरीच महत्त्वपूर्ण.

अ) मानवी मूल्यांच्या प्रति बांधीलकी चाचणीची उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे : शिक्षक-प्रशिक्षकांची मानवी मूल्यांची प्रति बांधीलकी पडताळणे

विशिष्ट उद्दिष्टे : यात काही उपपैलू निश्चित करून या प्रारंभिक चाचणीची विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली. खालील बाबी पडताळणे हा मानवी मूल्यांच्याप्रति बांधीलकी या प्रारंभिक चाचणीचे उद्दिष्ट होते.

१. संपूर्ण मानवी विकासाकरिता अध्यापन व्यवसायाची मूल्ये समजून घेतो का?
२. भारतीय घटनेमध्ये नमूद केलेल्या आणि मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांच्याशी निगडित असणाऱ्या मूल्यानुसार वर्तन करतो का?
३. विविध शैक्षणिक धोरणांनी ठरविलेली शैक्षणिक मूल्ये समजून घेऊन त्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतो का?
४. अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन आणि स्वतःचे वर्तन याद्वारे अध्ययनार्थ्यांमध्ये मूल्य रूजवितो का?
५. मूल्यसंवर्धन करणारे विविध कार्यक्रम आयोजित करून त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रूजवणुक करतो का?
६. लोकशाही नागरिकत्वाचा विकास करतो का?
७. समाजातील अनिष्ट गोष्टींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करतो का?
८. मूल्याधिष्ठित वर्तन ठेवतो का?
९. विविध कार्यक्रमांद्वारे मानवी हक्कांबाबत जागृती निर्माण करतो का?
१०.सहकार्य आणि बंधुभाव या मूल्यांची रूजवणुक आणि विकास करतो का?

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्दयाला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले . पुढील संविधान तक्त्यात मानवी मूल्यांच्याप्रति बांधीलकीच्या प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला आहे.

ब) संविधान तक्ता

मानवी मूल्यांच्याप्रति बांधीलकी चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठी आवश्यक नमुन्याची संविधान तक्त्यात मांडणी केली ती पुढीलप्रमाणे .

तक्ता क्र. ३.१०

मानवी मूल्यांच्या प्रति बांधीलकी चाचणी संविधान तक्ता

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण	एकूण शेकडा प्रमाण
	उपघटक - प्रश्नप्रकार	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	अध्यापन व्यवसायाची मूल्ये	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
२	घटनेमध्ये नमूद मूल्यानुसार वर्तन	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
३	शैक्षणिक मूल्ये	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१० %
४	अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन, स्वतःचे वर्तनाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मूल्य रूजविणे	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५ %
५	मूल्यसंवर्धन करणारे उपक्रम	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
६	लोकशाही नागरिकत्वाचा विकास	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
७	अनिष्ट प्रथेसंबंधित जागरूकता	-	-	-	-	-	-	२(२)	-	-	२	५ %
८	मूल्याधिष्ठित वर्तन	-	-	-	-	-	-	८(८)	-	-	८	२० %
९	मानवी हक्कांबाबत जागृती	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५ %
१०	सहकार्य व बंधुभाव या मूल्यांची रूजवणूक	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५ %
	एकूण	-	-	-	-	-	-	४०(४०)	-	-	४०	१००%

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ

(कंसातील अंक हे प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक हे गुण दर्शवितात)

३.७.२.५ चाचणी क्रमांक ५ : समाजाच्या प्रति बांधीलकी चाचणीचे नियोजन : या चाचणीचे नियोजन करताना प्रथम समाजाच्या प्रति बांधीलकी म्हणजे काय? या चाचणीची उद्दिष्टे कोणती तसेच यात उद्दिष्टे, उपघटक आणि प्रश्नप्रकार यानुसार म्हणजेच संविधान तक्त्यानुसार चाचणीचा भारांश ठरविला यानुसार चाचणीचे नियोजन केले.

शाळा ही समाजाची प्रतिकृती म्हणून ओळखली जाते. म्हणून कोणत्याही संस्थेत काम करत असो शिक्षकाने संस्थेत सदस्य असण्या अगोदर आपण एक समाजाचा जबाबदार घटक आहोत याची जाणीव ठेवावी, शिक्षकाच्या कार्याचा कुटुंब, समाज, परिसर आणि राष्ट्राच्या प्रगतीवर परिणाम होत असतो. शिक्षकाचे काम विद्यार्थ्यांना ज्ञान देणे एवढेच अपेक्षित नाही तर शिक्षक समाजाचे काहीतरी देणे आहे त्यामुळे समाजाच्या विकासाची जबाबदारी योग्यरित्या पार पाडायची आहे. विद्यार्थी विविध स्तरातून आलेले असतात. प्रत्येकाची पार्श्वभूमी वेगळी असते. त्याचे प्रश्न, गरजा वेगळ्या असतात. त्यासाठी आपल्या समाजाची माहिती करून घेणे गरजेचे आहे. या विद्यार्थ्यांना नि:पक्षपाती शिक्षण देणे आवश्यक आहे. शिक्षक समाजप्रिय प्राणी आहे तो ज्या समाजातून येतो त्या समाजाची उन्नती करणे, समाजापुढील प्रश्न जाणून घेणे व आपल्या ज्ञानाचा उपयोग करून ते सोडविणे ही शिक्षकाची समाजाशी असलेली बांधीलकी होय.

अ)समाजाच्या प्रति बांधीलकी चाचणीची उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे : शिक्षक-प्रशिक्षकाची समाजाच्या प्रति बांधीलकी पडताळणे

विशिष्ट उद्दिष्टे : यात काही उपपैलू निश्चित करून या प्रारंभिक चाचणीची विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली. खालील बाबी पडताळणे हा समाजाच्या प्रति बांधीलकी या प्रारंभिक चाचणीचे उद्दिष्ट होते.

१. महाविद्यालय आणि समाज यात आंतरक्रिया प्रस्थापित करतो का?
२. समाजातील साधनस्त्रोतांचा उपयोग करून शिक्षणाचा विकास आणि शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक विकास साधतो का?

३. समाजातील समस्या ओळखून त्या सोडविण्यासाठी स्वतःचे योगदान देतो का?

४. अध्ययनार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महाविद्यालय आणि समाज यांच्यात सामंजस्यपूर्ण संबंध निर्माण करतो का?

५. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा कोणत्याही बाबतीत भेदभाव न करता समाजामध्ये आणि अध्ययनार्थ्यांमध्ये समानतेची भावना निर्माण करतो का?

६. समाजाचा एक अविभाज्य घटक या नात्याने समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या उन्नतीची काळजी करतो का?

७. समाजातील अनिष्ट, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, बालमजुरी यांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करून समाजाचा विकास करतो का?

८. पर्यावरण संरक्षणासाठी समाजाला मदत करतो का?

९. स्थानिक समाजाच्या आणि महाविद्यालयाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवितो का?

१०. समाजाचा उत्तम मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आणि वर्तन ठेवतो का?

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक मुद्द्याला अनुसरून प्रारंभिक चाचणी मधील प्रश्न निश्चित केले गेले . पुढील संविधान तक्त्यात समाजाच्या प्रति बांधीलकीच्या प्रारंभिक चाचणीतील प्रश्नांना उद्दिष्टवार भारंश दिलेला आहे.

ब) संविधान तक्ता : समाजाप्रति बांधीलकी चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यासाठी आवश्यक नमुन्याची संविधान तक्त्यात मांडणी केली ती पुढीलप्रमाणे .

तक्ता क्र ३.११

समाजाप्रति बांधीलकी चाचणी संविधान तक्ता

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण	एकूण शेकडा प्रमाण
	उपघटक	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	महाविद्यालय आणि समाज यातील आंतरक्रिया समाजातील साधन स्त्रोतांचा उपयोग	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१०%
२	सामाजिक समस्यांचे निराकरण	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५%
३	महाविद्यालय आणि समाज यांच्यातील सामंजस्य	-	-	-	१(१)	-	-	३(३)	-	-	४	१०%
४	देशाच्या उन्नतीची काळजी	-	-	-	-	-	-	६(६)	-	-	६	१५%
५	अनिष्ट रूढीना आळा	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५%
६	पर्यावरण संरक्षण	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५%
७	सामाजिक उपक्रम	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
८	समाजाप्रति सकारात्मक दृष्टिकोन	-	-	-	-	-	-	४(४)	-	-	४	१०%
९	स्थानिक समाज आणि महाविद्यालयाचा विकास	-	-	-	-	-	-	५(५)	-	-	५	१२.५%
१०	समाजाचा उत्तम मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक	-	-	-	-	-	-	३(३)	-	-	३	७.५%
	एकूण	-	-	-	१(१)	-	-	३९(३९)	-	-	४०	१००%

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ

(कंसातील अंक हे प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसा बाहेरील अंक हे गुण दर्शवितात)

३.७.३ क्षेत्रनिहाय विधान संख्या निश्चिती

प्रस्तुत संशोधनात वरील निकषांच्या आधारे शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे मापन करण्यासाठी या चाचणी संचातील प्रश्नांची मांडणी करण्यात आली.

प्रारंभिक चाचणीसाठी एकूण - २६५ प्रश्नांची निर्मिती करण्यात आली. ही प्रश्नावली २५ तज्ज्ञ व्यक्तींकडून तपासून घेण्यात आली. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार काही कठीण व सोपे प्रश्न किंवा संदिग्ध प्रश्न रद्द करण्यात आले व प्रारंभिक चाचणीत चाचणीनिहाय समान प्रश्नसंख्येची निर्मिती करण्यात आली.

मतावलीच्या आधारे चाचणी निहाय प्रारंभिक पडताळ्यासाठी पुढील भारांश निश्चित केला.

तक्ता क्र ३.१२

प्रारंभिक चाचणीत चाचणीनिहाय प्रश्नसंख्येचा भारांश दर्शविणारा तक्ता

क्रमांक	चाचणी	भारांश	प्रश्न संख्या
१	विद्यार्थ्यांशी बांधीलकी	२०%	०१-४०
२	व्यवसायाशी बांधीलकी	२०%	४१-८०
३	सर्वोत्कृष्टतेसाठी बांधीलकी	२०%	८१-१२०
४	मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी	२०%	१२१-१६०
५	समाजाशी बांधीलकी	२०%	१६१-२००
एकूण		**१००%**	**२००**

अशा रीतीने प्रस्तुत विभागात चाचणीचे उपपैलू, उद्दिष्ट, उपघटक आणि प्रश्नप्रकार यांचा विचार करून संपूर्ण चाचणीच्या पाचही बांधीलकी क्षेत्रांचे नियोजन करण्यात आले.

३.७.४ प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा

ब) चाचणीचे विकसन/निर्मिती

यामध्ये पाचही उपचाचण्यांच्या प्रत्यक्ष निर्मितीची प्रक्रिया केलेली आहे. ज्यात चांगल्या प्रश्नांचे निकष लक्षात घेऊन विधानांचे विकसन, विधानांना क्रमांकन, वेळेचे नियोजन, परीक्षार्थ्यांसाठी सूचना, गुणदान योजना व उत्तरसूची चाचणीचे पुनरावलोकन व संपादन या प्रक्रियेतून चाचणी विकसनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

३.७.४.१ विधानांचे विकसन आणि लेखन

चाचणी निर्मितीतील लेखन हा महत्त्वाचा टप्पा होय. संविधान तक्त्याला अनुसरून विधानांचे विकसन करण्यात आले. प्रस्तुत कसोटी संचात वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नप्रकार निश्चित करण्याचे कारण :-

१. दिलेले सर्व पर्याय विकर्षकाचे काम करतात.

२. हे विकर्षक उत्तराच्या जितके जवळचे असतील तितके ते परिणामकारक ठरतात .

३. सखोल ज्ञानाची तपासणी करता येते.

४. हा प्रश्न प्रकार ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्ये या सर्व उद्दिष्टांचे मापन करण्यासाठी योग्य ठरते.

५. या प्रश्नांमुळे प्रतिसादकातील भेद शोधून काढता येतो.

६. या प्रश्नात भेदन क्षमता जास्त असते.

७. या प्रश्नांमुळे अंदाजे उत्तर देण्याची प्रवृत्ती कमी होते.

८. या प्रश्नांची उत्तरे तपासणे सोपे असते.

९. या प्रश्नांमुळे वरच्या स्तरावरील उद्दिष्टांचे मापन तर होतेच पण त्या बरोबरच वस्तुनिष्ठताही येते.

१०. उत्तर का चुकले याचे निदान करता येते.

शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीची वर्गवारी निश्चित करण्यासाठी बहुपर्यायी प्रश्नांच्या सहाय्याने गुणांक देण्यात आले.

अ. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार चांगल्या प्रश्नांचे खालील निकष ठरविण्यात आले.

- प्रश्न वस्तुनिष्ठ प्रकाराचा असावा, ज्यातून शिक्षक प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी संदर्भात अपेक्षित वर्तन बदलाची नोंद घेता यावी.
- व्यावसायिक बांधीलकीशी संबधित असावा.
- प्रश्नाचे उत्तर एक आणि एकच असावे.
- ठराविक भेदन क्षमताही असावी.[१६]

या निकषांचा विचार करुन प्रस्तुत संशोधनासाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नप्रकार निश्चित करण्यात आला.

ब. बहुपर्यायी प्रश्न निर्मितीसाठी खालील निकष वापरण्यात आले.

१) उत्तरासाठी द्यावयाचे पर्याय योग्य असले पाहिजेत.

२) दिलेल्या पर्यायांपैकी बरोबर उत्तर असणारा पर्याय हा इतर पर्यायांच्या दृष्टीने लांबीने जास्त किवा कमी असू नये, कारण ती एक सूचना ठरते.

३) व्याकरणदृष्ट्या प्रश्नांची रचना निर्दोष असावी काही पर्याय एकवचनी व काही अनेकवचनी असतील तर त्यामुळे उत्तरासाठी सूचना मिळते.

४) अनेक बहुपर्यायी प्रश्न असलेल्या प्रश्नपत्रिकेत बरोबर उत्तराचा क्रम प्रत्येक प्रश्नासाठी तोच किंवा विशिष्ट पद्धतीने येऊ नये त्यामुळे उत्तरासंबंधी अंदाज करण्यास वाव मिळतो.

५) पर्याय जितके जास्त देता येतील तितके चांगले असते.

६) या प्रश्नांचा उपयोग प्रामुख्याने आकलन, उपयोजन या उद्दिष्टांसाठी करावा.[३]

वरील निकष लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनात वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असे प्रश्न तयार केले जे आकलन व उपयोजन यावर विशेषत: आधारित आहेत.

३.७.४.२ चाचणीचे संपादन

तसेच ज्या शिक्षक प्रशिक्षकांना या चाचण्या सोडवावयास द्यावयाच्या त्यांच्यासाठी या प्रश्नांची काठिण्य पातळी किती असावी हे निश्चित केले कारण अतिशय सोपे वा अतिशय कठीण प्रश्न असल्यावर चाचणीच्या विश्वसनीयतेवर परिणाम होतो. म्हणून

चाचणीतील प्रश्नांची काठिण्य पातळी कशी असावी, याचा अभ्यास करून पुढील भारांश निश्चित केला.

तक्ता क्रमांक ३.९३

प्रारंभिक नमुन्यासाठी प्रश्नांच्या काठिण्य पातळीचे प्रमाण दर्शविणारा तक्ता

क्रमांक	प्रश्नांची काठिण्य पातळी	शेकडेवारी
१	सोपे प्रश्न	२५%
२	मध्यम प्रश्न	५०%
३	कठीण प्रश्न	२५%
एकूण		१००%

वरील विविध संदर्भाचा वापर करून वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचे विकसन करण्यात आले.

३.७.४.३ विधानांना क्रमांकन

चाचणी निहाय प्रश्नांचे विकसन आणि त्यांची निवड केल्यानंतर संशोधकाने चाचणीतील प्रश्नांची मांडणी करण्यासाठी प्रश्नांची काठिण्य पातळी, प्रश्नांचा प्रकार, प्रश्नांचा आशय, क्रमबद्धता, आणि गुणांकाचा भार[१०] या पाच घटकांचा विचार केला. त्यानुसार प्रश्नांची मांडणी करून त्यांना क्रमांक दिले.

३.७.४.४ वेळेचे नियोजन

प्रस्तुत संशोधनात चाचणी सोडविण्यासाठी लागणाऱ्या वेळेचे नियोजन संशोधकाने केले मात्र हे नियोजन लवचिक ठेवले. कारण ज्यावेळी चाचणीचा प्रारंभिक पडताळा घेण्यात येईल. त्यावेळी सर्वच प्रश्नांना प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रश्न पृथक्करण करता येत नाही .

३.७.४.५ प्रतिसादकांसाठी सूचना

चाचणी सोडविताना प्रतिसादकांना काही सर्वसामान्य सूचना देणे आवश्यक असते त्याप्रमाणे प्रस्तुत संशोधनात पुढील सूचना प्रतिसादकांना देण्यात आल्या.

१) मुखपृष्ठावरील वैयक्तिक माहिती सर्वांनी भरावी.

२) सर्वच प्रश्नांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

३) एका प्रश्नासाठी एकच प्रतिसाद द्यावा.

४) एका प्रश्नास दोन प्रतिसाद आढळल्यास तो प्रतिसाद ग्राह्य धरले जाणार नाही.

५) प्रत्येक प्रश्नाला समान १ गुण आहे.

६) योग्य उत्तरापुढे √ अशी खूण करा.

७) एकदा लिहिलेले उत्तर रद्द करावयाचे असल्यास केलेल्या खूणेवर ≡ अशी खूण करा.

८) प्रत्येक प्रश्नाचे अचूक उत्तर एकच आहे

९) सर्व प्रश्नांची उत्तरे या प्रश्नपत्रिकेत दिलेल्या □ रकान्यातच लिहा.

अशा प्रकारच्या सूचना या तोंडी व लेखी स्वरुपात प्रतिसादकांना देण्यात आल्या. या सूचना देण्यामागचे कारण म्हणजे कनिष्ठ बुद्धिमत्तेचा प्रतिसादक कदाचित उत्तर देणार नाही. परंतु प्रतिसाद कसा द्यावा, हे मात्र प्रतिसादकास अचूक कळले पाहिजे. त्यासाठी प्रतिसादकास सूचना देणे अत्यावश्यक असते.[११]

सूचना देण्याचा हेतू चाचणीची सप्रमाणता व तिची विश्वसनीयता टिकून राहणे हा असतो.

३.७.४.६ गुणदान योजना व उत्तरसूची

अनेक परीक्षार्थी जेव्हा एका परीक्षेस बसतात तेव्हा परीक्षक सुद्धा अनेक असतात. अशावेळी उत्तरपत्रिका तपासण्यामध्ये एकसूत्रता रहावी, यासाठी या गुणदान योजनेचा तसेच आदर्श उत्तरसूचीचा उपयोग होतो म्हणून गुणदान योजना आणि उत्तर सूची तयार केली.

३.७.४.७ चाचणीचे पुनरावलोकन व संपादन

चाचणी विकसनातील ही शेवटची पायरी होय. चाचणी तयार झाल्यानंतर लगेच छपाईसाठी न पाठविता दोन-तीन दिवसांच्या कालावधीनंतर त्या चाचणीचे संशोधकाने पुन्हा एकदा वाचन करणे अपेक्षित असते. त्यामुळे प्रश्नपत्रिकेत काही उणिवा राहिल्या असल्यास त्या लक्षात येतात. त्यामुळे प्रश्नाची वाक्यरचना, शुद्धलेखन, तांत्रिक चूका अशा काढून टाकणे सोपे जाते.

अशा प्रकारे संशोधनातील प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्प्याचे काम पूर्ण करण्यात आले.

३.८ प्रारंभिक टप्पा २ : प्रतिसादांचे मूल्यांकन

यात पूर्वचाचणी घेणे, प्रतिसादांचे मूल्यांकन करणे. त्यांना गुणदान देणे ही प्रक्रिया समाविष्ट करण्यात आली.

१) उद्दिष्टे व उपघटकानुसार चाचणी तयार केल्यानंतर ती चाचणी खरोखरच योग्य आहे का ? तिच्यात उत्कृष्ट, मध्यम आणि कनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न किती असतील? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी चाचणीची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे गरजेचे ठरते हा हेतू लक्षात घेता चाचणीचा प्रारंभिक पडताळा घेण्यात आला.

२) ज्यामध्ये कसोटीची पूर्व चाचणी घेणे, प्रतिसादांचे मूल्यांकन करणे, त्यांना गुणदान देणे या प्रक्रिया समाविष्ट करण्यात आल्या.

३.८.१ पूर्वचाचणी घेणे

चाचणीच्या प्रमाणिकरणासाठी व अंतिम चाचणी तयार करण्यासाठी चाचणीचा प्रारंभिक पडताळा घेणे आवश्यक असते.[११] यावरून चाचणीतील प्रत्येक प्रश्नाचे पृथक्करण केल्याने तो प्रश्न उत्कृष्ट आहे की निकृष्ट आहे वा मध्यम स्वरूपाचा आहे हे तर कळतेच त्याचबरोबरच त्या प्रश्नाचे काठिण्य मूल्य व भेदभाव क्षमता ही समजते तसेच प्रत्येक प्रतिसादकाने प्रश्नासाठी कोणता पर्याय निवडला आहे हे देखील पर्यायाची विकर्षकता निश्चित केल्याने आपणाला समजते. यामुळेच प्रस्तुत संशोधनात चाचणीचा प्रारंभिक पडताळा घेण्यासाठी नाशिक, नगर आणि पुणे

जिल्ह्यातून सहज प्राप्त नमुना निवड पद्धतीने शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील निवड संशोधकाने केली. संशोधकाने त्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना वैयक्तिकरित्या भेटून चाचणीचा हेतू, चाचणीची उद्दिष्टे , चाचणीचा आशय, चाचणीची पद्धती व चाचणी सोडविण्यास लागणारा वेळ, या महत्त्वपूर्ण बाबींची माहिती दिली व सदर चाचणी सोडविण्यास त्यांच्या महाविद्यालयात येण्याची तारीख व वेळ त्यांच्या परवानगीने निश्चित केली आणि परवानगी पत्र घेतले.

यानंतर ठरलेल्या दिवशी, नियोजित वेळी संशोधक त्या त्या महाविद्यालयात गेले. प्रतिसादकांना स्वत:ची ओळख करून दिल्यानंतर चाचणी बाबतची माहिती त्यांना दिली. यात चाचणीचा हेतू, तिची उद्दिष्टे , तिचा आशय, प्रतिसाद देण्याची पद्धती, गुणदान योजना याबाबत तोंडी माहिती देऊन प्रतिसादकांची मानसिकता तयार केली.

चाचणी प्रतिसादकांना दिल्यानंतर त्यातील मुखपृष्ठावरील सूचना त्यांना वाचण्यास सांगितल्या. मुखपृष्ठावरील स्वत:ची माहिती प्रतिसादकांकडून भरून घेतली. ज्यात त्यांचे स्वत:चे नाव, शैक्षणिक पात्रता, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे नाव, वय, लिंग, कामाचा अनुभव, इत्यादीविषयी माहिती घेतली.

अचूक उत्तरास एक गुण, चुकीच्या उत्तरास वा एकावेळी एकापेक्षा अधिक उत्तरांना प्रतिसाद दिला जाणार नाही वा त्यांचे मूल्यमापन केल्यानंतर ते उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही; त्यासाठी कोणतेही गुण दिले जाणार नाहीत याचीही स्पष्ट सूचना लेखी व तोंडी दोन्ही स्वरूपात प्रतिसादकांना देण्यात आल्या ही सर्व प्रक्रिया संशोधकाने करून घेतली.

३.८.२ वेळेचे नियोजन

चाचणीच्या प्रश्न पृथक्करणातून प्रश्नांची काठिण्य पातळी व प्रश्नांची भेदभाव क्षमता ही निश्चित करता येते. मात्र त्यासाठी चाचणीतील प्रत्येक प्रश्नाला प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. चाचणी सोडविण्यासाठी कमीत कमी वेळ घेणारा प्रतिसादक व सर्वात जास्त वेळ घेणारा प्रतिसादक यांच्या वेळेची नोंद संशोधकाने केली. सर्वात कमी वेळ घेणारा प्रतिसादक व जास्त वेळ घेणारा प्रतिसादक यांच्या वेळेची सरासरी

करून वेळेचे नियोजन करण्यात आले. अशा रीतीने चाचणीचे नियोजन करण्यात आले.

चाचणी सोडविण्यासाठी लागणारा कमीत कमी वेळ + जास्तीत जास्त वेळ

२

वरील सूत्राचा वापर करून प्रारंभिक पडताळ्यासाठी प्रतिसादकांनी वापरलेल्या वेळेची माहिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

तक्ता क्र : ३.१४

प्रारंभिक पडताळ्यासाठी शिक्षक प्रशिक्षकांनी वापरलेला वेळ

अ.क्र	चाचणीचे नाव	चाचणीतील एकूण प्रश्न	चाचणी सोडविण्यासाठी वापरलेला वेळ (मिनिटात)		
			जास्तीत जास्त	कमीत कमी	सरासरी मिनिट
१	विद्यार्थ्यांशी बांधीलकी	४०	४६	३८	४२
२	व्यवसायाशी बांधीलकी	४०	४८	३९	४४
३	सर्वोत्कृष्ट बांधीलकी	४०	५२	४४	४८
४	मूल्याप्रति बांधीलकी	४०	४८	४२	४५
५	समाजाशी बांधीलकी	४०	४५	४१	४३
	एकूण	**२००**	**२३९**	**२०४**	**२२२**

३.८.३ निरीक्षणे : चाचणी संपल्यानंतर संशोधकाने प्रतिसादक शिक्षकांच्या चाचणीबाबतच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातून पुढील निरीक्षण समोर आली.

१. प्रतिसादकांना चाचणीचे घटक आवडले.

२. प्रतिसादाची पद्धती सोपी वाटली.

३. बऱ्याच प्रश्नांच्या पर्यायांमध्ये सूक्ष्म भेद असल्याने पर्याय निवडताना द्विधा मनस्थिती होत होती.

४. वेळ कसा गेला ते समजले नाही.

५. प्रत्येक प्रश्न वाचल्यानंतर स्व चे चिंतन झाल्यासारखे वाटले.

६. सरावाच्या प्रश्नांमुळे त्यांची भीती कमी झाली व त्यामुळे त्यांना प्रेरणा मिळाली.

७. प्रत्येक प्रश्न आत्मपरीक्षण करायला लावणारा असल्यामुळे चाचणीतील रूची वाढल्याचे त्यांनी सांगितले.

८. काही प्रतिसादकांनी चाचणीच्या एक एक ज्यादाच्या प्रती मागितल्या; परंतु चाचणी प्रमाणित झाल्याशिवाय देता येणे शक्य नसल्याने त्यांची मागणी सविनय नाकारण्यात आली.

३.९ अंतिम टप्पा ३ : चाचणीचे प्रमाणिकरण

यात चाचणीतील प्रश्नांचे पृथक्करण या महत्त्वाच्या प्रक्रियेचा समावेश आहे. कारण प्रश्न पृथक्करणाच्या साहाय्याने चाचणीच्या अंतिम नमुना निवड करता येते. प्रतिसादकांना गुणदान दिल्यानंतर चाचणीतील प्रत्येक प्रश्नाचे पृथक्करण करणे गरजेचे होते. "Item analysis is a post tryout of a test"[14]

प्रस्तुत संशोधनात चाचणीच्या प्रारंभिक पडताळ्यानंतर प्रत्येक चाचणीस गुणदान केले यानंतर चाचणीची गुणवत्ता तपासणे हे आवश्यक ठरले. चाचणी प्रमाणिकरणासाठी प्रश्नात सुधारणा करणे व अंतिम चाचणीत अशा सुधारित प्रश्नांचा समावेश करणे आवश्यक होते. आणि म्हणून प्रस्तुत संशोधनातही प्रश्न पृथक्करण प्रक्रिया पुढीलप्रमाणे करण्यात आली.

३.९.१ प्रश्न पृथक्करण प्रक्रिया

प्रश्न पृथक्करणासाठी खालील पद्धतीचा वापर केला.[९]

अ) गुणानुक्रमे सर्व उत्तरपत्रिकांचा क्रम लावला

हा क्रम लावताना ज्यांना संपूर्ण चाचणीत जास्तीत जास्त गुण मिळाले व ज्यांना चाचणीत कमीत-कमी गुण मिळाले त्यांची उतरत्या क्रमानुसार मांडणी केली.[८]

ब) उत्तरपत्रिकांची विभागणी

गुणानुक्रमे वरच्या २७% व खालच्या २७% उत्तरपत्रिका बाजूला काढल्या.

क) पर्यायांची विकर्षकता ठरविणे

वरील दोन्ही गटातील प्रतिसादकांनी उत्तरासाठी कोणती विकर्षक किंवा पर्याय निवडला ते पाहून प्रतिसादकांची संख्या प्रत्येक विकर्षकाखाली नोंदविली त्यासाठी पुढील कोष्टकाचा वापर केला. उदा.

चाचणीचे नाव	-	विद्यार्थ्यांशी बांधीलकी
चाचणीतील एकूण प्रश्न	-	४०
वरिष्ठ गटातील एकूण प्रतिसादक	-	२१
कनिष्ठ गटातील एकूण प्रतिसादक	-	१९
तुलना गट	-	वरिष्ठ/कनिष्ठ

तक्ता : ३.१५

पर्यायाची विकर्षकता दर्शविणारा तक्ता

प्रश्न क्र	योग्य उत्तराचे अक्षर	पर्याय					
		अ	ब	क	ड	गाळलेले	एकूण
१	अ	९	८	२	१	-	२०

वरील तक्त्याच्या आधार घेऊन प्रश्नांच्या पर्यायांची विकर्षकता ठरविली. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये तीन किंवा चार पर्याय दिलेले असतात. प्रतिसादकांना या पर्यायांमधून सहजासहजी अचूक उत्तर मिळू नये इतके ते पर्याय आकर्षक ठरले पाहिजेत. दिलेले पर्याय योग्य आहे की नाहीत, हे केवळ निरीक्षणानेही बऱ्याच वेळा आपण ठरवू शकतो. विशेषत: उच्च गटातील प्रतिसादकांपेक्षा निम्न गटातील प्रतिसादकांची चुकीचे पर्याय जास्त प्रमाणात निवडले तर पर्यायांची परिणामकारकता योग्य आहे व त्यांचे विकर्षक हे नाव सार्थ ठरते. पर्यायांची विकर्षकता तपासताना कनिष्ठ गटातील कमीत-कमी ५% प्रतिसादकांना तरी तो पर्याय निवडला पाहिजे तर तो प्रभावी आहे, असे मानता येते.

१) प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित केले. प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला आहे.

$$\mathbf{F = \frac{R_{H+R_L}}{2n} X\ 100\%}$$

Where – F = Facility index

N- Number of Respondent in upper or lower 27% group

R_H- Number of correct responces in upper group

R_L- Number of correct responces in lower 27% group

जर F ची किंमत जास्त आली तर प्रश्न सोपा.

जर F ची किंमत कमी झाली तर प्रश्न कठीण समजावा.[१३]

वरील निकषांचा वापर करून प्रस्तुत संशोधनात प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित केले.

२) प्रत्येक प्रश्नाची भेदनक्षमता (D) निश्चित करणे. एखाद्या गटातील बांधीलकी जास्त व कमी असणारे प्रतिसादक निवडून काढण्याची प्रश्नाची जी क्षमता असते त्या क्षमतेला भेदभाव क्षमता असे म्हणतात. यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$\mathbf{D = \frac{R_H - R_L}{N}}$$

Where – D - Difficulty Value

N – Number of respondent in upper or lower 27% group

R_H – Number of correct responces in upper 27% group

R_L – Number of correct responces in lower 27% group

या सूत्राचा वापर करून प्रस्तुत संशोधनात प्रत्येक प्रश्नाची भेदभाव क्षमता निश्चित केली. चाचणीतील प्रश्नाचे प्रश्नवार पृथक्करण केल्यानंतर अंतिम चाचणीसाठी प्रश्नांचे मूल्यमापन करून काही प्रश्न स्वीकारले हे मूल्यमापन करताना पुढील तक्त्याचा आधार घेतला.

तक्ता क्र : ३.१६

अंतिम चाचणीसाठी प्रश्न निवडण्याचा दिग्दर्शन तक्ता

भेदभाव क्षमता	काठिण्यपातळी		
D	४०% पेक्षा कमी	४०% ते ६०%	६०% पेक्षा अधिक
०.४० पेक्षा अधिक	कठीण	स्वीकारार्ह	सोपे
०.३० ते ०.३९	कठीण	सुधारणा करण्यायोग्य	सोपे
०.२० ते ०.२९	कठीण	कनिष्ठ	सोपे
०.१९ पेक्षा कमी	बाद करणे	बाद करणे	बाद करणे

वरील कोष्टकाच्या आधार घेऊन प्रारंभिक पडताळ्यात समाविष्ट एकूण २०० प्रश्नांचे भेदभाव क्षमता व काठिण्य पातळीनुसार केलेले मूल्यमापन दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्र ३.१७

भेदभाव क्षमता, काठिण्य पातळी दर्शविणारा तक्ता

अ.क्र	चाचणी	भेदभाव क्षमता	काठिण्य पातळी		
			४०% पेक्षा कमी	४०% ते ६०%	६०% अधिक
१	विद्यार्थ्यांशी बांधीलकी	४०% पेक्षा अधिक ०.३० ते ०.३९ ०.२० ते ०.२९ ०.१९ पेक्षा कमी	२ (२) ६ (६) ६ (७) -(१९)	४ (४) -(-) -(-) -(-)	२ (२) -(-) -(-) -(-)
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	४०% पेक्षा अधिक ०.३० ते ०.३९ ०.२० ते ०.२९ ०.१९ पेक्षा कमी	२(२) ३(४) १(६) -(१४)	१२(१२) -(-) -(-) -(-)	२(२) -(-) -(-) -(-)
३	उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी	४०% पेक्षा अधिक ०.३० ते ०.३९ ०.२० ते ०.२९ ०.१९ पेक्षा कमी	२(२) -(-) २(६) (१५)	१२(१२) १(१) -(-) -(-)	३(३) - (१) -(-) -(-)
४	मानवी मूल्यांप्रति बांधीलकी	४०% पेक्षा अधिक ०.३० ते ०.३९ ०.२० ते ०.२९ ०.१९ पेक्षा कमी	१(१) ४(४) -(५) -(१५)	१२(१२) -(१) -(-) -(-)	३(३) -(१) -(-) -(-)
५	समाजाप्रति बांधीलकी	४०% पेक्षा अधिक ०.३० ते ०.३९ ०.२० ते ०.२९ ०.१९ पेक्षा कमी	१(१) ४(६) -(५) -(१३)	१२(१२) -(-) -(-) -(-)	३(३) -(-) -(-) -(-)

सूची : (कंसातील अंक कसोटीची त्या त्या गटातील एकूण प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक त्या त्या गटातून अंतिम चाचणीसाठी निवडलेली प्रश्नसंख्या दर्शवितात)

वरील सर्व निकषांचा विचार करून व प्रत्यक्षात प्रश्न पृथक्करण करून भेदभाव क्षमता व काठिण्य पातळी तसेच पर्यायांची विकर्षकता ठरवून प्रश्नांचे

मूल्यमापन केले व त्यांच्या आधारे अंतिम प्रश्नावलीत समाविष्ट असणाऱ्या वा नाकारल्या जाणाऱ्या प्रश्नांची निश्चिती केली गेली. कसोटी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री पुढील प्रमाणे :

सारणी क्रमांक - ३.१

चाचणी क्रमांक १ - विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणी निहाय

प्रश्न पृथक्करण सामग्री

प्रश्न. क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
१	१२	२	१०	०.४०	१४	०.२८	स्वीकार
२	२४	२२	२	०.०८	४६	०.९२	बाद
३	२१	१०	११	०.४४	३१	०.६२	स्वीकार
४	२५	१९	६	०.२४	४४	०.८८	बाद
५	१३	११	२	०.०८	२४	०.४८	बाद
६	४	३	१	०.०४	७	०.१४	बाद
७	१३	४	९	०.३६	१७	०.३४	स्वीकार
८	५	७	-२	-०.०८	१२	०.२४	बाद
९	१९	४	१५	०.६०	२३	०.४६	स्वीकार
१०	२३	११	१२	०.४८	३४	०.६८	स्वीकार
११	२१	११	१०	०.४०	३२	०.६४	स्वीकार
१२	३	१	२	०.०८	४	०.०८	बाद
१३	१८	१२	६	०.२४	३०	०.६०	स्वीकार
१४	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१५	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
१६	१९	१२	७	०.२८	३१	०.६२	स्वीकार
१७	२१	५	१६	०.६४	२६	०.५२	स्वीकार
१८	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१९	१५	७	८	०.३२	२२	०.४४	स्वीकार
२०	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
२१	१४	३	११	०.४४	१७	०.३४	स्वीकार
२२	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
२३	१२	७	५	०.२०	१९	०.३८	स्वीकार
२४	१९	३	१६	०.६४	२२	०.४४	स्वीकार
२५	२०	११	९	०.३६	३१	०.६२	स्वीकार
२६	२१	१९	२	०.०८	४०	०.८०	बाद

प्रश्न. क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
२७	१४	५	९	०.३६	१९	०.३८	स्वीकार
२८	२३	२०	३	०.१२	४३	०.८६	बाद
२९	२४	२१	३	०.१२	४५	०.९०	बाद
३०	२४	२३	१	०.०४	४७	०.९४	बाद
३१	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
३२	७	३	४	०.१६	१०	०.२०	बाद
३३	२४	२०	४	०.१६	४४	०.८८	बाद
३४	१२	५	७	०.२८	१७	०.३४	स्वीकार
३५	५	४	१	०.०४	९	०.१८	बाद
३६	१३	७	६	०.२४	२०	०.४०	स्वीकार
३७	२३	२४	-१	-०.०४	४७	०.९४	बाद
३८	१७	९	८	०.३२	२६	०.५२	स्वीकार
३९	२१	१२	९	०.३६	३३	०.६६	स्वीकार
४०	१०	३	७	०.२८	१३	०.२६	स्वीकार

सारणी क्रमांक - ३.२

चाचणी क्रमांक २ - व्यवसायाप्रति बांधीलकी चाचणी निहाय

प्रश्न पृथक्करण सामग्री

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
४१	९	६	३	०.१२	१५	०.३०	बाद
४२	२३	७	१६	०.६४	३०	०.६०	स्वीकार
४३	१९	७	१२	०.४८	२६	०.५२	स्वीकार
४४	२४	१९	५	०.२०	४३	०.८६	बाद
४५	२५	१९	६	०.२४	४४	०.८८	बाद
४६	१९	१२	७	०.२८	३१	०.६२	स्वीकार
४७	२२	७	१५	०.६०	२९	०.५८	स्वीकार
४८	२४	२०	४	०.१६	४४	०.८८	बाद
४९	१६	८	८	०.३२	२४	०.४८	स्वीकार
५०	२५	२१	४	०.१६	४६	०.९२	बाद
५१	२१	२०	१	०.०४	४१	०.८२	बाद
५२	१९	९	१०	०.४०	२८	०.५६	स्वीकार
५३	२३	११	१२	०.४८	३४	०.६८	स्वीकार
५४	१७	८	९	०.३६	२५	०.५०	स्वीकार
५५	१६	५	११	०.४४	२१	०.४२	स्वीकार
५६	१९	७	१२	०.४८	२६	०.५२	स्वीकार
५७	२०	१०	१०	०.४०	३०	०.६०	स्वीकार
५८	१६	४	१२	०.४८	२०	०.४०	स्वीकार
५९	२१	१३	८	०.३२	३४	०.६८	स्वीकार
६०	२२	११	११	०.४४	३३	०.६६	स्वीकार
६१	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
६२	२३	१८	५	०.२०	४१	०.८२	बाद
६३	७	२	५	०.२०	९	०.१८	बाद
६४	२५	२१	४	०.१६	४६	०.९२	बाद
६५	१८	७	११	०.४४	२५	०.५०	स्वीकार
६६	८	५	३	०.१२	१३	०.२६	बाद
६७	२१	१०	११	०.४४	३१	०.६२	स्वीकार
६८	१०	२	८	०.३२	१२	०.२४	बाद
६९	२	४	-२	-०.०८	६	०.१२	बाद
७०	२५	१९	६	०.२४	४४	०.८८	बाद

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
७१	५	४	१	०.०४	९	०.१८	बाद
७२	२२	६	१६	०.६४	२८	०.५६	स्वीकार
७३	२५	२४	१	०.०४	४९	०.९८	बाद
७४	१९	६	१३	०.५२	२५	०.५०	स्वीकार
७५	२४	२२	२	०.०८	४६	०.९२	बाद
७६	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
७७	२१	६	१५	०.६०	२७	०.५४	स्वीकार
७८	१९	६	१३	०.५२	२५	०.५०	स्वीकार
७९	२	७	-५	-०.२	९	०.१८	बाद
८०	७	८	-१	-०.०४	१५	०.३०	बाद

सारणी क्रमांक - ३.३

चाचणी क्रमांक ३ - उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी चाचणी निहाय

प्रश्न पृथक्करण सामग्री

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
८१	२४	१९	५	०.२०	४३	०.८६	बाद
८२	२५	१६	९	०.३६	४१	०.८२	बाद
८३	२२	२०	२	०.०८	४२	०.८४	बाद
८४	२५	२०	५	०.२०	४५	०.९०	बाद
८५	२५	१९	६	०.२४	४४	०.८८	बाद
८६	१९	१०	९	०.३६	२९	०.५८	स्वीकार
८७	२३	१३	१०	०.४०	३६	०.७२	स्वीकार
८८	२५	२४	१	०.०४	४९	०.९८	बाद
८९	२४	१२	१२	०.४८	३६	०.७२	स्वीकार
९०	५	२	३	०.१२	७	०.१४	बाद
९१	१८	७	११	०.४४	२५	०.५०	स्वीकार
९२	२३	७	१६	०.६४	३०	०.६०	स्वीकार
९३	२५	१८	७	०.२८	४३	०.८६	बाद
९४	१९	६	१३	०.५२	२५	०.५०	स्वीकार
९५	२५	१६	९	०.३६	४१	०.८२	बाद
९६	१७	६	११	०.४४	२३	०.४६	स्वीकार
९७	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
९८	२१	९	१२	०.४८	३०	०.६०	स्वीकार
९९	१८	११	७	०.२८	२९	०.५८	स्वीकार
१००	२४	१२	१२	०.४८	३६	०.७२	स्वीकार
१०१	२४	११	१३	०.५२	३५	०.७०	स्वीकार
१०२	२३	११	१२	०.४८	३४	०.६८	स्वीकार
१०३	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१०४	२४	२०	४	०.१६	४४	०.८८	बाद
१०५	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१०६	२२	१९	३	०.१२	४१	०.८२	बाद
१०७	२५	२२	३	०.१२	४७	०.९४	बाद
१०८	१७	७	१०	०.४०	२४	०.४८	स्वीकार
१०९	२२	२२	०	०	४४	०.८८	बाद

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
११०	२५	२१	४	०.१६	४६	०.९२	बाद
१११	१६	४	१२	०.४८	२०	०.४०	स्वीकार
११२	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
११३	१६	९	७	०.२८	२५	०.५०	स्वीकार
११४	१९	७	१२	०.४८	२६	०.५२	स्वीकार
११५	२३	४	१९	०.७६	२७	०.५४	स्वीकार
११६	२३	२१	२	०.०८	४४	०.८८	बाद
११७	२४	१३	११	०.४४	३७	०.७४	स्वीकार
११८	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
११९	२१	५	१६	०.६४	२६	०.५२	स्वीकार
१२०	१९	६	१३	०.५२	२५	०.५०	स्वीकार

सारणी क्रमांक - ३.४

चाचणी क्रमांक ४ - मानवी मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी निहाय

प्रश्न पृथक्करण सामग्री

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
१२१	२१	२०	१	०.०४	४१	०.८२	बाद
१२२	१४	६	८	०.३२	२०	०.४०	स्वीकार
१२३	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१२४	२५	२०	५	०.२०	४५	०.९	बाद
१२५	१९	८	११	०.४४	२७	०.५४	स्वीकार
१२६	२२	६	१६	०.६४	२८	०.५६	स्वीकार
१२७	२५	२१	४	०.१६	४६	०.९२	बाद
१२८	१५	५	१०	०.४०	२०	०.४०	स्वीकार
१२९	१८	३	१५	०.६०	२१	०.४२	स्वीकार
१३०	१८	६	१२	०.४८	२४	०.४८	स्वीकार
१३१	२१	१०	११	०.४४	३१	०.६२	स्वीकार
१३२	१४	५	९	०.३६	१९	०.३८	स्वीकार
१३३	२२	१९	३	०.१२	४१	०.८२	बाद
१३४	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
१३५	२३	२३	०	०	४६	०.९२	बाद
१३६	१७	९	८	०.३२	२६	०.५२	स्वीकार
१३७	१९	८	११	०.४४	२७	०.५४	स्वीकार
१३८	२४	१०	१४	०.५६	३४	०.६८	स्वीकार
१३९	२३	११	१२	०.४८	३४	०.६८	स्वीकार
१४०	२	१	१	०.०४	३	०.०६	बाद
१४१	१७	४	१३	०.५२	२१	०.४२	स्वीकार
१४२	१८	२	१६	०.६४	२०	०.४०	स्वीकार
१४३	२०	१९	१	०.०४	३९	०.७८	बाद
१४४	२१	९	१२	०.४८	३०	०.६०	स्वीकार
१४५	२०	७	१३	०.५२	२७	०.५४	स्वीकार
१४६	२१	१७	४	०.१६	३८	०.७६	बाद
१४७	२०	५	१५	०.६०	२५	०.५०	स्वीकार
१४८	२३	१९	४	०.१६	४२	०.८४	बाद
१४९	२४	११	१३	०.५२	३५	०.७०	स्वीकार

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
१५०	२४	२२	२	०.०८	४६	०.९२	बाद
१५१	१२	६	६	०.२४	१८	०.३६	*
१५२	२४	२२	२	०.०८	४६	०.९२	बाद
१५३	२१	२२	-१	-०.०४	४३	०.८६	बाद
१५४	२४	८	१६	०.६४	३२	०.६४	स्वीकार
१५५	२१	१३	८	०.३२	३४	०.६८	स्वीकार
१५६	१९	१४	५	०.२०	३३	०.६६	*
१५७	२३	१६	७	०.२८	३९	०.७८	*
१५८	२४	२१	३	०.१२	४५	०.९	बाद
१५९	२५	२५	०	०	५०	१	बाद
१६०	२३	१८	५	०.२०	४१	०.८२	बाद

* अशी खूण असणाऱ्या प्रश्नांचा अंतिम चाचणीत समावेश नाही.

सारणी क्रमांक - ३.५

चाचणी क्रमांक ५ - समाजाप्रति बांधीलकी चाचणी निहाय प्रश्न पृथक्करण सामग्री

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
१६१	१७	६	११	०.४४	२३	०.४६	स्वीकार
१६२	२०	७	१३	०.५२	२७	०.५४	स्वीकार
१६३	२४	२५	-१	-०.०४	४९	०.९८	बाद
१६४	२२	१७	५	०.२	३९	०.७८	स्वीकार
१६५	२५	२३	२	०.०८	४८	०.९६	बाद
१६६	११	११	०	०	२२	०.४४	बाद
१६७	२३	१८	५	०.२०	४१	०.८२	बाद
१६८	२१	१२	९	०.३६	३३	०.६६	स्वीकार
१६९	१७	८	९	०.३६	२५	०.५०	स्वीकार
१७०	८	५	३	०.१२	१३	०.२६	बाद
१७१	२२	९	१३	०.५२	३१	०.६२	स्वीकार
१७२	१६	१०	६	०.२४	२६	०.५२	*
१७३	५	४	१	०.०४	९	०.१८	बाद
१७४	१७	८	९	०.३६	२५	०.५०	स्वीकार
१७५	११	३	८	०.३२	१४	०.२८	*
१७६	१९	८	११	०.४४	२७	०.५४	स्वीकार
१७७	६	८	-२	-०.०८	१४	०.२८	बाद
१७८	१९	१५	४	०.१६	३४	०.६८	बाद
१७९	१८	१०	८	०.३२	२८	०.५६	स्वीकार
१८०	२२	९	१३	०.५२	३१	०.६२	स्वीकार
१८१	२३	२१	२	०.०८	४४	०.८८	बाद
१८२	२३	२०	३	०.१२	४३	०.८६	बाद
१८३	२१	२०	१	०.०४	४१	०.८२	बाद
१८४	२३	१८	५	०.२०	४१	०.८२	बाद
१८५	२४	१९	५	०.२०	४३	०.८६	बाद
१८६	२१	८	१३	०.५२	२९	०.५८	स्वीकार
१८७	१८	६	१२	०.४८	२४	०.४८	स्वीकार
१८८	२२	११	११	०.४४	३३	०.६६	स्वीकार
१८९	१७	५	१२	०.४८	२२	०.४४	स्वीकार
१९०	२२	६	१६	०.६४	२८	०.५६	स्वीकार

प्रश्न.क्र	अचूक उत्तरे देणारा वरिष्ठ गट	अचूक उत्तरे देणारा कनिष्ठ गट	भेदभाव क्षमता	भेदन क्षमता गुणांक	सुकरता मूल्य	काठिण्य पातळी	प्रश्नाचे मूल्यमापन
	R_H	R_L	R_H-R_L	D	R_H+R_2	F%	
१९१	२४	२४	०	०	४८	०.९६	बाद
१९२	१३	८	५	०.२०	२१	०.४२	*
१९३	१३	१०	३	०.१२	२३	०.४६	बाद
१९४	२३	११	१२	०.४८	३४	०.६८	स्वीकार
१९५	२०	१०	१०	०.४०	३०	०.६०	स्वीकार
१९६	२२	९	१३	०.५२	३१	०.६२	स्वीकार
१९७	३	२	१	०.०४	५	०.१०	बाद
१९८	१६	३	१३	०.५२	१९	०.३८	स्वीकार
१९९	१६	८	८	०.३२	२४	०.४८	*
२००	२२	६	१६	०.६४	२८	०.५६	स्वीकार

*** अशी खूण असणाऱ्या प्रश्नांचा अंतिम चाचणीत समावेश नाही.**

३.९.१.२ चाचणीनिहाय प्रत्येक चाचणीतील प्रश्नांचा एकूण मूल्यभार :

हा मूल्यभार यापूर्वीच बांधीलकी क्षेत्रांचा भारांश ठरविणाऱ्या गटाकडून निश्चित केला आहे त्याचे सुरचित प्रमाण पुढीलप्रमाणे ठरविले

तक्ता क्र ३.१८

अंतिम चाचणीसाठी चाचणीनिहाय प्रश्नसंख्या दर्शविणारा तक्ता

अ.क्र	चाचणी	मूल्यभार देणारा शिक्षक वर्ग	मूल्यभाराचे सुरचित प्रमाण
१	अध्ययनार्थ्यांशी बांधीलकी	५६ (९३%)	२०
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	५८ (९३%)	२०
३	उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी	५६ (९३%)	२०
४	मूल्याप्रति बांधीलकी	५८ (९७%)	२०
५	समाजाप्रति बांधीलकी	५७ (९५%)	२०
	एकूण	**६०**	**१००**

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिक्षक-प्रशिक्षक बांधीलकी चाचणी संचात प्रत्येक चाचणीनिहाय अंतिम कसोटीत प्रश्नांची संख्या ही वरीलप्रमाणे निश्चित केली. तसेच प्रस्तुत संशोधनात शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी विकसित करणे व प्रमाणित करणे हे महत्त्वाचे काम आहे. येथे पाच चाचण्या विकसित करण्यात आलेल्या आहेत या पाच चाचण्या वेगवेगळ्या न वापरता त्या एका संचाच्या स्वरूपात वापरल्या जाव्यात हा उद्देश असल्याने त्या प्रत्येक चाचणीस या संपूर्ण चाचणी संचास किती भारांश दिला आहे. त्याचा संकलित आढावा वरील तक्त्यात घेतला. या पुढील टप्प्यात चाचणी निहाय अंतिम नमुन्याचे उद्दिष्टे, उपघटक आणि प्रश्नप्रकार म्हणजेच संविधान तक्ता यानुसार चाचणीस दिलेला भारांश निश्चित केला आहे. त्याची एका संकलित तक्त्यात माहिती दिलेली आहे ती पुढील प्रमाणे :

तक्ता क्र ३.१९
शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी संच
अंतिम पडताळ्यासाठी वापर

अ. क्र	उद्दिष्टे	ज्ञान			आकलन			उपयोजन			एकूण	शेकडा प्रमाण
	उपघटक	व	ल	दी	व	ल	दी	व	ल	दी		
१	विद्यार्थ्याप्रति बांधीलकी	-	-	-	२(२)	-	-	१८(१८)	-	-	२० (२०)	२०%
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	-	-	-	१(१)	-	-	१९(१९)	-	-	२० (२०)	२०%
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	-	-	-	१(१)	-	-	१९(१९)	-	-	२० (२०)	२०%
४	मूल्याप्रति बांधीलकी	-	-	-	-	-	-	२०(२०)	-	-	२० (२०)	२०%
५	समाजाप्रति बांधीलकी	-	-	-	-	-	-	२०(२०)	-	-	२० (२०)	२०%
	एकूण	-	-	-	**४(४)**	-	-	**४६(३६)**	-	-	**१००(१००)**	**१००%**

सूची : दी - दीर्घोत्तरी, ल - लघुत्तरी, व - वस्तुनिष्ठ (कंसातील अंक प्रश्नसंख्या दर्शवितात तर कंसाबाहेरील अंक त्या प्रश्नांना दिलेले गुण दर्शवितात)

३.९.२ अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन

प्रस्तुत संशोधनात अंतिम चाचणीच्या वेळेचे नियोजन करताना संचातील प्रत्येक चाचणी सोडवायला लागणारा वेळ विचारात घेऊन एकूण शिक्षक प्रशिक्षक बांधीलकी चाचणीच्या वेळेचे नियोजन करण्यात आले. प्रारंभिक पडताळ्याच्यावेळी वापरण्यात आलेल्या सूत्राचाच पुन्हा वापर केला.

चाचणी सोडविण्यासाठी लागणारा कमीत कमी वेळ व जास्तीत जास्त वेळ

२

या सूत्राचा वापर करून अंतिम चाचणीसाठी वेळेचे नियोजन केले ते पुढील कोष्टकात दर्शविले आहे.

तक्ता क्रमांक - २०

अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	चाचणी	चाचणीतील प्रश्नसंख्या	चाचणी सोडविण्यास दिलेला वेळ (मिनिट)
१	विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी	२०	२५
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	२०	२५
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२०	२५
४	मूल्याप्रति बांधीलकी	२०	२५
५	समाजाप्रति बांधीलकी	२०	२५
	एकूण	**१००**	**१२५**

३.९.२.१ गुणदान योजना व उत्तरसूचीचे नियोजन

गुणदान योजना आणि उत्तरसूची याबद्दल यापूर्वीच चर्चा केली आहे. प्रारंभिक पडताळ्यासाठी चाचणीची गुणदान योजना व उत्तरसूची यापूर्वीच तयार करण्यात आली आहे. मात्र ती येथे तशीच्या तशी वापरण्यात येणार नाही. कारण प्रारंभिक चाचणीतील अनेक प्रश्न आता बाद झाले आहे व अंतिम नमुन्यात त्यातील काही प्रश्नांचा समावेश

केलेला असल्याने चाचणी निहाय नवीन उत्तरसूची व गुणदान योजना तयार करणे क्रमप्राप्त ठरले ती उत्तरसूची परिशिष्टात देण्यात आली आहे.

३.९.३ उत्तरचाचणी घेणे

चाचणी प्रमाणिकरण प्रक्रियेतील हा शेवटचा टप्पा होय. चाचणीच्या अंतिम पडताळ्यासाठी मोठ्या व प्रतिनिधिक अशा न्यादर्शाची निवड करण्यात आली व चाचणीचा पडताळा घेण्यात आला. प्रस्तुत उपटप्प्यातून चाचणीचा अंतिम पडताळा घेण्याचा हेतू त्यासाठी न्यादर्शाची निवड व कार्यपद्धती याबाबत चर्चा करण्यात आली आहे.

३.९.३.१ चाचणीचा अंतिम पडताळा घेण्याचा हेतू

प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख हेतू शिक्षक प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी प्रमाणित करणे हा आहे. यात पाच विविध उपकसोट्यांचा समावेश आहे. चाचणी प्रमाणिकरणात प्रमाणकांची निर्मिती करणे, चाचणीची विश्वसनीयता ठरविणे, चाचणीची सप्रमाणता निश्चित करणे, चाचणीची मार्गदर्शिका तयार करणे या गोष्टींचा अंतर्भाव होता.[१५]

चाचणीच्या अंतिम पडताळ्यातून वरील सर्व बाबी संशोधकास निश्चित करता आल्या.

३.९.३.२ चाचणीच्या अंतिम पडताळ्यासाठी न्यादर्शाची निवड

ही निवड करताना न्यादर्शाचे स्वरूप कसे असावे, न्यादर्शाचा आकार किती असावा, प्रत्यक्ष न्यादर्श निवडण्याची पद्धती व प्रक्रिया कशी असावी याबाबतचे विवेचन करण्यात आले आहे.

अ) न्यादर्शाचे स्वरूप

चाचणी प्रमाणिकरणात चाचणीची प्रमाणके तयार करण्यासाठी पर्याप्त प्रतिनिधिक न्यादर्श निवडला जाणे गरजेचे ठरले.

''A norm group to be appropriate must be recent, representative of relevant.''[9]

It means the sample that was to be selected for the final administration had to possess three characteristics which is recency representativeness and relevance.

प्रस्तुत संशोधनात न्यादर्शाची निवड करताना न्यादर्शाच्या पुढील तिन्ही गुणवैशिष्ट्यांचा वापर करण्यात आला.

१) न्यादर्श हा अलिकडचा असावा

या वैशिष्ट्यासाठी प्रस्तुत संशोधन चाचणीचा प्रारंभिक पडताळा हा मे २०१४ मध्ये घेण्यात आला असून अंतिम पडताळा हा त्याच शैक्षणिक वर्षात ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ या काळात घेण्यात आला. यात चाचणीच्या प्रारंभिक पडताळा व अंतिम पडताळ्यात कमीत कमी सहा महिन्याचे अंतर ठेवण्यात आले. या सर्व बाबींचा विचार करता प्रस्तुत संशोधनातील न्यादर्शाचा अलिकडीलचा 'Recency' हा गुण लक्षात येतो.

२) न्यादर्श प्रतिनिधिक असावा

न्यादर्शाची प्रतिनिधिकता निश्चित करताना संशोधकाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचा समावेश केला. संभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धतीतील लॉटरी (सुगम यादच्छिक पद्धत) पद्धतीने शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड करून महाविद्यालयांतील शिक्षक प्रशिक्षकांवर अंतिम चाचणीचा पडताळा घेतलेला असल्याने न्यादर्श हा प्रतिनिधिक असल्याचे लक्षात येते.

३) न्यादर्श विविध गुणवैशिष्ट्यांनी युक्त असावा

प्रस्तुत संशोधनात न्यादर्शाची निवड करताना शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षकांची निवड करण्यात आली. तसेच चाचणी सोडविण्यासाठी वेळेचे बंधन होते. वस्तुनिष्ठ प्रकारची गुणदान योजना आखण्यात आली होती. शिक्षक प्रशिक्षकांना चाचणी संदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. यादृष्टीने कसोटीच्या

प्रमाणिकरण प्रक्रियेसाठी आवश्यक सर्व सूचनांचे पालन याठिकाणी न्यादर्शाची निवड करताना करण्यात आले होते. त्या वरून चाचणीतील न्यादर्श हा अनेक गुणवैशिष्ट्यांनी युक्त होता असे म्हणता येते.

अशा रीतीने वरील तिन्ही गुणवैशिष्ट्यांनी युक्त अशा न्यादर्शाची निवड चाचणीच्या अंतिम पडताळ्यासाठी करण्यात आली.

ब) न्यादर्शाचा आकार

प्रस्तुत संशोधनात जनसंख्येचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अनेक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षक होते व चाचणीच्या प्रमाणिकरणासाठी प्रमाणके तयार करण्यासाठी मोठ्या न्यादर्शाची आवश्यकता होती. कारण "Smaller the sample, larger is the error and larger the sample, smaller is the error."[5] या संदर्भाचा विचार करता न्यादर्शाचा आकार कमीत कमी किती असावा. याबाबत खालील तीन गोष्टी विचारात घेतल्या.

१) स्वीकारार्ह उच्चतम मापन त्रुटी

२) सार्थकता स्तरावर स्वीकारार्ह मापन त्रुटी[१०]

वरील दोन्ही घटकांचे विश्लेषण करून न्यादर्शाचा आकार निश्चित करण्यात आला.

१) स्वीकारार्ह उच्चतम मापन त्रुटी

यात पहिली पायरी म्हणजे जास्तीत जास्त किती मापन त्रुटी ही स्वीकारता येऊ शकते? याचे मापन करणे होय. याची निश्चिती करताना अंतिम चाचणीसाठी चाचणीनिहाय निर्धारित केलेल्या जास्तीत जास्त गुणांच्या एक पट इतकी मापन त्रुटी ही स्वीकारता येऊ शकते. प्रस्तुत संशोधनात स्वीकारण्यात येणाऱ्या मापन त्रुटीच्या प्रमाणाबाबतची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

तक्ता क्र ३.१९

स्वीकारता येण्यायोग्य मापन त्रुटीचे कसोटीनिहाय प्रमाण दर्शविणारा तक्ता

अ.क्र	चाचणी	चाचणी निहाय निर्धारित जास्तीत जास्त गुण	स्वीकाहार्य मापन त्रूटी
१	विद्यार्थ्याप्रति बांधीलकी	२०	०.२०
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	२०	०.२०
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२०	०.२०
४	मूल्याप्रति बांधीलकी	२०	०.२०
५	समाजाप्रति बांधीलकी	२०	०.२०

२) सार्थकता स्तरावर स्वीकारण्यायोग्य मापन त्रुटी

यासाठी ०.९५ स्तरावरील ५% मापन त्रुटी स्वीकारार्ह राहील असे संशोधकाने निश्चित केले म्हणून ०.९५% सार्थकता स्तरावर स्वीकारार्ह मापन त्रुटी स्वीकारण्यासाठी खालील सूत्राचा अवलंब केला.

$$L = \frac{1.96\sigma}{\sqrt{N}}$$

जेव्हा -L = स्वीकारार्ह त्रुटी

σ = न्यादर्शाचे प्रमाणविचलन

N = न्यादर्शाचा आकार

३.९.३.३ प्रत्यक्ष चाचणीचा अंतिम पडताळा घेण्याची पद्धती

अ) जेव्हा प्रतिसादक प्रतिसाद देण्यासाठी बसलेले होते त्यावेळी संशोधकाने सांगितले की, तुम्हाला एक चाचणीसंच सोडविण्यास दिला जाणार आहे; ती लगेच उघडू नका, ज्यावेळी तुम्हाला चाचणी दिली जाईल त्यावेळी तिच्या मुखपृष्ठावर आपले नाव व इतर माहिती लिहा तसेच मुखपृष्ठावरील सूचना ही वाचण्यास प्रतिसादकांना सांगण्यात आले.

ब) प्रतिसादकांना प्राथमिक माहिती भरण्यासाठी पुरेसा वेळ दिल्यानंतर संशोधकाने तोंडी सूचना देतानाच प्रतिसादकांच्या शंकांचे निरसन केले.

क) प्रतिसादकांच्या शंकांची उत्तरे देऊन झाल्यानंतर त्यांना पहिले पान उलटण्यास सांगितले जाईल त्याचवेळी त्यांनी लगेच लवकरात लवकर कोणत्याही चुका न करता सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत, असे संशोधकाने सुचविले.

ड) प्रत्यक्षात पहिले पान उलटवण्याची सूचना दिली व लागलीच वेळेची नोंद संशोधकाने घेतली. वेळ संपल्यानंतर प्रतिसाद देणे थांबविण्याची सूचना देण्यात आली. प्रतिसादकांची कसोटी पूर्ण सोडवून झालेली असेल वा नसेल आता त्यांनी प्रतिसाद देणे थांबवावे, अशी सूचना देऊन संशोधकाने प्रतिसादकांकडून त्यांच्याकडील उत्तरपत्रिका जमा केल्या.

इ) उत्तर पत्रिका जमा करतानाच प्रतिसादकांनी प्राथमिक माहिती व्यवस्थित भरली की नाही याची ही खात्री करण्यात आली.

उ) मध्यंतरी ज्या ज्या वेळी प्रत्येक चाचणी सोडविण्यासाठी निश्चित केलेल्या निर्धारित वेळेची सूचना दिली त्याचवेळी ती तोंडी व फळ्यावरही लिहून दिली ज्यामुळे प्रतिसाद देण्यासाठी कसोटीनुसार वेळ व नियोजन करणे प्रतिसादकांना सोपे झाले.

३.९.४ चाचणी तपासणे व मूल्यांकन

चाचणीसाठी प्रमाणके तयार करणे, तिची सप्रमाणता व विश्वसनीयता ठरविणे, यासाठी चाचणीला गुणदान करणे व प्रतिसादकांना क्रमांक देणे आवश्यक असते. ज्यावेळी चाचणी अंतिम पडताळ्यासाठी निश्चित केली जाते त्याचवेळी तिची गुणदान योजना व उत्तरसूची ही तयार केली जाते हे यापूर्वीच नमूद केले आहे.

तयार झालेल्या उत्तरसूचीच्या आधारे चाचण्यांची तपासणी करण्यात आली यात प्रत्येक पानावरील प्रश्नाच्या उत्तराचा भाग हा एका कार्डशीटवर त्या त्या मापात कापून घेण्यात आला म्हणजेच चाचणीच्या पानाच्या मापाचे कार्डशीट घेऊन प्रत्येक

उत्तराची जागा या स्वरूपात कापून घेण्यात आली व प्रत्येक पानावर ते कार्डशीट ठेवून बरोबर उत्तरांची संख्या नोंदविण्यात आली व एकूण प्रत्येक विद्यार्थ्याला गुणदान करण्यात आले. ज्या प्रश्नांना एकापेक्षा अधिक प्रतिसाद दिलेले आहे अशा प्रश्नांना गुण देण्यात आले नाही याची खात्री करून दोनदा गुणदान तपासण्यात आले.

शेवटी चाचणीनिहाय गुणदान साचा तयार करण्यात आल्या. या गुणांचा वापर पुढे करण्यात आला. पुढील प्रकरणात आपण प्रतिसादकांनी मिळविलेल्या या गुणांकाच्या आधारे चाचणीतील सहभागी प्रतिसादकांची केंद्रीय प्रवृत्ती व विचलनशीलता यांचे मापन करणार आहोत तसेच चाचणी प्रमाणिकरणाची ही महत्त्वपूर्ण प्रक्रिया कशी केली त्याची माहिती पुढील प्रकरणात नमूद केली आहे.

३.१० संदर्भसूची

१) दांडेकर, वा. ना. (२००४). ***शैक्षणिक मूल्यमापन*श्रीविद्या प्रकाशन.** नागपूर -२. पृष्ठ २६९.

२) खांदेवाले,श्री.रा. (१९९१). ***संशोधनासाठी विविध चाचण्यांचे उपयोजन.*** नाशिक : यशवंतराव चव्हाणमहाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. पृष्ट क्रमांक -७-१०

३) नरवणे, मीनल. (२०१६). ***संशोधन पद्धती : शैक्षणिक व सामाजीक.*** पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ट क्रमांक -११५-१२०

४) वाघ,नलिनी. दीपक. (जुलै २००५). ***अध्यापक शिक्षण पदविका.*** जीवन शिक्षण प्रकाशन अभ्यासक्रम. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. पुणे - ३०

५) उपासनी, ना. के. व कुलकर्णी के. व्ही. (२००७). ***शैक्षणिक मूल्यमापन.*** पृष्ठ ३७.

इंग्रजी संदर्भ :

1) Houston, J. G. (1970). ***The principles of objective testing in Physics***. London : Heinemann Educational Books, Page 82.

2) Karlinger, F. N. (1985). ***Foundations of behavioural research*** (3rd ed. Bangalore Prism books private limited) Page 17.

3) Lindquist, E. G. (1970). ***Statistical analysis in educational research***. Bombay : Oxford and IBH Publishing Limited. Page 159.

4) Macintosh, H. G. and Morrison, R. B. (1969). ***Objective testion***. London : University of London Press Limited. Page 121.

5) Micheels, W. J. and Ray Karnes, M. (1950). ***Measuring educational achievement***. New York : McGraw-Hill Book Company Inclusive. Page 460.

6) Mehrens, W. J. and Lehmann, I. J. (1973). ***Measurement and evaluation in education and psychology in V. Z. Sali.*** (1982)

Principles and techniques of unit testing, New Delhi, National Publishing House, Page 140.

7) Noll, V. H. (1965). ***Introduction to educational measurement***. Boston : Houghton Mifflin Company. Page 165.
8) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***, New Delhi: National Publishing House – 133. Page 64.
9) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133. Page 33.
10) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi: National Publishing House-133. Page 75.
11) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133. Page 76.
12) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133. Page 132.
13) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi: National Publishing House-133. Page 55.
14) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi: National Publishing House-133. Page 136.
15) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi, National Publishing House-133. Page 137.

प्रकरण चौथे

संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन

४.१ प्रास्ताविक

मागील प्रकरणात संशोधनाच्या कार्यपद्धतीचा विचार करण्यात आला. यात प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा क्र -१, प्रतिसादांचे मूल्यांकन टप्पा क्र -२ आणि चाचणीचे प्रमाणीकरण अंतिम टप्पा क्र -३ यातील प्रथम चार मुद्यांचा विचार केला गेला.

प्रस्तुत प्रकरणात चाचणीचे प्रमाणीकरण अंतिम टप्पा -३ मधील उर्वरित पुढील मुद्यांचा विचार केला आहे. अंतिम चाचणीच्या पडताळ्यातील प्राप्त माहितीचे वर्गीकरण संशोधकाने केले आहे. चाचणीची सप्रमाणता, चाचणीची विश्वसनीयता, भेदभाव क्षमता, चाचणीची वस्तुनिष्ठता, पर्याप्तता, उपयोगिता या चाचणीच्या गुण-वैशिष्ट्यांचे संपादन करण्यासाठी चाचणीचे प्रमाणिकरण ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे ज्याद्वारे हे सिद्ध होते त्याद्दष्टीने Standardization is the essence of testing असे म्हणता येईल. प्रस्तुत प्रकरण हे पुढील उपविभागात मांडले आहे.

अ) माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण.

ब) उत्तम चाचणीची गुणवैशिष्ट्ये.

यात चाचणीच्या प्रमाणिकरण प्रक्रियेतून चाचणीची खालील गुणवैशिष्ट्ये सिद्ध करण्यात आली.

१. चाचणीची सप्रमाणता
२. चाचणीची विश्वसनीयता
३. चाचणीची वस्तुनिष्ठता
४. चाचणीची भेदभाव क्षमता
५. चाचणीची पर्याप्तता
६. चाचणीची उपयोगिता

क)मार्गदर्शिका तयार करणे

४.२ अ) माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण

संशोधकाने चाचणीच्या अंतिम नमुन्याचा पडताळा घेऊन, प्राप्त माहितीचे पृथक्करण करून, संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करून, माहितीचे पुढीलप्रमाणे सादरीकरण केले.

यात केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे व विचलनशीलता तसेच गुणांकाचे वितरण दर्शविताना विषमितता आणि शिखरदोष यांचे मापन केले आहे ते पुढीलप्रमाणे .

४.२.१ केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलता

सारणी क्रमांक ४.१

केंद्रिय प्रवृत्ती व विचलनशीलता दर्शविणारी सारणी

अ.क्र	चाचणी	न्यादर्श (प्रतिसादक)	केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे			विचलनशीलतेचे परिमाणे	
			मध्यमान	मध्यांक	बहुलक	प्रमाण विचलन	चतुर्थक विचलन
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	२४९	१०.१५	१०	१०	४.५१	२.००
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	२४९	११.१३	११	११	४.१४	२.००
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२४९	१०.६६	१०	१०	४.५७	२.५०
४	मूल्यांप्रति बांधीलकी	२४९	१०.२९	१०	१०	४.११	२.००
५	समाजाप्रति बांधीलकी	२४९	१०.७०	१०	१०	४.२६	२.५०

वरील सारणीत शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचाची केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचे मापन करण्यात आले आहे. यावरुन खालील बाबी दिसून येतात.

१) अध्ययनार्थ्याप्रति बांधीलकी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी चाचणीची केंद्रिय प्रवृत्ती ही सारखीच दिसते. गुणांकाचे विचलनही जास्त प्रमाणात या दोन चाचणी झालेले दिसते.

२) व्यवसायाप्रति बांधीलकी चाचणी, समाजाप्रति बांधीलकी चाचणी, मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी या तिन्ही चाचणीची केंद्रिय प्रवृत्ती ही सारखीच दिसते आणि त्यांच्या गुणांकाचे विचलन अध्ययनार्थ्याप्रति बांधीलकी चाचणी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी चाचणीच्या तुलनेत कमी दिसते.

३) गुणांकांची केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेच्या आलेल्या मापनाचा आधार घेऊन प्रसामान्य संभाव्य वक्र काढल्यास तो धन विषमित मिळतो.

४) मध्यमान हे पाचही चाचण्यांत मध्यांकापेक्षा मोठे दिसून आले.

४.२.२ गुणांकाचे वितरण विषमितता

सारणी क्रमांक ४.२

गुणांकाचे वितरण दर्शविणारी सारणी

अ.क्र	चाचणी	विषमितता	शिखरदोष
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	०.१८	०.०५
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	०.००	०.१४
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	०.१३	०.०४
४	मूल्यांप्रति बांधीलकी	०.३५	०.१८
५	समाजाप्रति बांधीलकी	०.२३	०.२१

वरील सारणीत पाचही कसोट्यांची विषमितता ही निश्चित केली असून, ती ०.०० ते ०.३५ या दरम्यान असून शिखरदोष ०.०५ ते ०.२१ या दरम्यान दिसतो. व्यवसायाप्रति बांधीलकी आणि अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी यांची विषमितता खूप कमी आहे. ती अनुक्रमे ०.०० व ०.१८ इतके आहे ती किंचित धन विषमित दिसते.


यावरुन खालील बाबी दिसून येतात.

१) वरील सारणीत अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी या तिन्ही चाचण्यांची विषमितता ही किंचित धन असल्याचे दिसून येते. तर मूल्यांप्रति बांधीलकी आणि समाजाप्रति बांधीलकी या दोन्ही कसोट्यांची विषमितता इतर तीन चाचण्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसते. ती ही धन विषमितच आहे. एकूण धन विषमिततेचा विचार करता ती कोठेही ०.३५ पेक्षा जास्त दिसत नाही. म्हणजेच ती अतिशय कमी आहे.

२) अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी, उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी, मूल्यांप्रति बांधीलकी आणि समाजाप्रति बांधीलकी या पाचही चाचण्यांचा शिखर दोष अनुक्रमे ०.०५, ०.१४, ०.०४, ०.१८, ०.२१ आहे. म्हणजे Ku= ०.२६४ पेक्षा या पाचही चाचण्यांचे शिखरदोष मूल्य लहान असल्याने पाचही चाचण्यांचा मिळणारा वक्र हा उच्चशिखरी असल्याचे दिसते. पाचही चाचण्यांत गुणांकाचे विभाजन हे केंद्रिय प्रवृत्तीच्या मध्यावर केंद्रित झालेले दिसते.


१. प्राप्त माहितीचे प्रसामान्य संभव वक्राद्वारे सादरीकरण

प्रमाण : X अक्ष २ से.मी. = ५ गुण
Y अक्ष १ से.मी. = ५ वारंवारिता




आकृती क्रमांक : १ अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी चाचणीचा प्रसामान्य संभाव्य वक्र

प्रमाण : X **अक्ष २ से.मी. = ५ गुण**
Y **अक्ष १ से.मी. = ५ वारंवारिता**




आकृती क्रमांक : २ व्यवसायाप्रति बांधीलकी चाचणीचा प्रसामान्य संभाव्य वक्र

प्रमाण : X **अक्ष २ से.मी. = ५ गुण**
Y **अक्ष १ से.मी. = ५ वारंवारिता**




आकृती क्रमांक : ३ उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी चाचणीचा प्रसामान्य संभाव्य वक्र

प्रमाण : X **अक्ष २ से.मी. = ५ गुण**
Y **अक्ष १ से.मी. = ५ वारंवारिता**



आकृती क्रमांक : ४ मूल्यांप्रति बांधीलकी चाचणीचा प्रसामान्य संभाव्य वक्र

प्रमाण : X **अक्ष २ से.मी. = ५ गुण**
Y **अक्ष १ से.मी. = ५ वारंवारिता**



आकृती क्रमांक : ५ समाजाप्रति बांधीलकी चाचणीचा प्रसामान्य संभाव्य वक्र

४.३ ब) उत्तम चाचणीची गुणवैशिष्ट्ये

४.३.१ चाचणीची सप्रमाणता

चाचणीची सप्रमाणता म्हणजे चाचणीच्या साहाय्याने ज्या घटकाचे मापन करावयाचे आहे त्याच घटकाचे मापन होत असल्यास ती चाचणी सप्रमाण समजली जाते.[१]

American Psychological Association, American Educational Research Association and National Counsilon Measurements used in Education. [2]

प्रस्तुत संशोधनात **सप्रमाणता** काढण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

१. आशय सप्रमाणता : प्रस्तुत संशोधनात आशय सप्रमाणतेच्या दृष्टीने बांधीलकी क्षेत्रांच्या उपपैलूंची निश्चिती उपपैलूंच्या केलेल्या कार्यात्मक व्याख्या व उद्दिष्टांची निश्चिती तसेच उद्दिष्टांना दिलेला भारांश व उद्दिष्टानुसार बांधीलकीचे मोजमाप करणारी प्रश्नावलीची रचना पाहता चाचणी ही आशय सप्रमाण आहे. आशय सप्रमाणता सिद्ध करण्यासाठी तयार केलेली चाचणी २५ तज्ज्ञ व्यक्तींना तपासण्यास दिली त्यांची नावे परिशिष्ट क्रमांक-४ मध्ये देण्यात आली आहेत.

४.४ चाचणीची विश्वसनीयता : चाचणीची विश्वसनीयता हा उत्तम चाचणीचा एक आवश्यक गुण मानला जातो. विश्वसनीयता मापन करण्याच्या विविध पद्धती आहेत. यात चाचणी पुनर्चाचणी पद्धत, दोन समांतर चाचणीचा उपयोग करण्याची पद्धत. एक च चाचणीचे दोन समान अर्धभाग करण्याची पद्धती, अर्थविच्छेदन पद्धती.[६]

अर्थविच्छेदन पद्धती : या पद्धतीचा वापर करताना प्रस्तुत संशोधनात विश्वसनीयता काढण्यासाठी खालील दोन सूत्राचा वापर केला. यात 'कुडर रिचर्डसन' के आर - २० आणि

'क्रोनबाक अल्फा' फॉर्म्यूला यांचा वापर केला आहे. जेव्हा चाचणी बहुपर्यायी असते व उत्तर बरोबर किंवा चूक यामध्ये मापन केले जाते तेव्हा 'कुडर रिचर्डसन' के आर - २० सूत्राचा वापर केला जातो.

$$PKR_{20} = \left(\frac{k}{k-1}\right)\left(1-\frac{\Sigma pq}{\sigma^2}\right)$$

PKR_{20}	**=**	**Kuder Richardson Coefficient of correlation**
K	**=**	**Total No. of questions.**
P	**=**	**Proportion of the test takers who passed an item.**
Q	**=**	**Proportion of the test takers who failed an item.**
S2	**=**	**Variation of the entire test[6]**

' क्रोनबाक अल्फा' सूत्र :

$$\alpha = \frac{N.\bar{C}}{\bar{V} + (N-1).\bar{C}}$$

N = Equal to the Number of Items

? = Average inter-item covariance among the items

? = Equal the Average Variance

(if you increase the number of items you increase cronbachis Alpha Additionally, if the average inter-item correlation is low, Alpha will be low. As the average inter-item correlation increases cronbachis Alpha increases as well cholding the number of items constant.[12]

वरील सूत्रांचा वापर करून प्रस्तुत संशोधनात चाचणीची विश्वसनीयता निश्चित करण्यात आली. चाचणीची विश्वसनीयता क ाढण्यासाठी एकू ण २४९ शिक्षक - प्रशिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचा वापर करण्यातआला.

सारणी क्रमांक ४.३

विश्वसनीयता गुणांक दर्शविणारी सारणी

अ.क्र.	चाचणी	कुडर रिचर्डस के.आर. २०	क्रोनबाक अल्फा
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	०.७६	०.७९
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	०.७५	०.७८
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	०.७७	०.८०
४	मूल्यांप्रति बांधीलकी	०.७५	०.७८
५	समाजाप्रति बांधीलकी	०.७६	०.७९

वरील सारणीत विश्वसनीयता गुणांक 'कुडर रिचर्डसन' के आर - २० आणि 'क्रोनबाक अल्फा' पद्धतीने निश्चित करण्यात आली.

यावरुन खालील बाबी दिसून येतात.

१) 'कुडर रिचर्डसन' के आर - २० व्यावसायिक बांधीलकी सरासरी चाचणीची विश्वसनीयता ०.७६६ असल्याने ती उच्च असल्याचे दिसते.

२) 'क्रोनबाक अल्फा' पद्धतीने निश्चित करण्यात आली व्यावसायिक बांधीलकी चाचणीची सरासरी विश्वसनीयता ०.७८८ असल्याने ती उच्च असल्याचे दिसते.

३) चाचणीची सरासरी विश्वसनीयता ही ०.७६५ ते ०.७७५ या गुणांका दरम्यान आलेली दिसते.

४.५. चाचणीची इतर गुणवैशिष्ट्ये

४.५.१ चाचणीची वस्तुनिष्ठता

चाचणीची वस्तुनिष्ठता ठरविताना संपूर्ण चाचणीचे विकसन करतानाच ती वस्तुनिष्ठ असावी असा विचार केलेला आहे. त्यामुळे बांधीलकीचे योग्य मोजमाप करण्याच्या दृष्टीने प्रश्नांची निर्मिती केली. चाचणीतील संपूर्ण प्रश्न हे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीशी निगडित असल्याची खात्री केली. तसेच प्रत्येक प्रश्नाचे एक आणि एकच उत्तर निश्चित केले. प्रश्न निश्चित करताना त्यांची

काठिण्य पातळीही ठरविली. तसेच प्रत्येक प्रश्नाची भेदन क्षमता ही निश्चित केली. पर्यायांची विकर्षकताही तपासण्यात आली. व्याकरणदृष्ट्या प्रश्नांची रचना निर्दोष आहे की नाही हे ही तपासले. तसेच एकाच प्रश्नासाठी जास्तीत जास्त पर्याय देता यावे म्हणून प्रत्येक प्रश्नासाठी चार पर्यायी उत्तरे देण्यात आली. या दृष्टिकोनातून संपूर्ण चाचणी ही वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

बहुपर्यायी प्रश्न :- प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माहिती संकलनासाठी बहुपर्यायी प्रश्नांची निवड केली,कारण

१. दिलेले सर्व पर्याय विकर्षकाचे काम करतात.

२. हे विकर्षक उत्तराच्या जितके जवळचे असतील तितके ते परिणामकारक ठरतात.

३. सखोल ज्ञानाची तपासणी करता येते.

४. हे प्रश्न प्रकार ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य या सर्व उद्दिष्टांचे मापन करण्यासाठी योग्य ठरते.

५. या प्रश्नामुळे प्रतिसादकातील भेद शोधून काढता येतो.

६. या प्रश्नात भेदभाव क्षमता जास्त असते.

७. या प्रश्नामुळे अंदाजे उत्तर देण्याची प्रवृत्ती कमी होते, प्रत्येक पर्यायावर थोडातरी विचार करावा लागतो.

८. या प्रश्नांची उत्तरे तपासणे सोपे असते.

९. या प्रश्न प्रकारामुळे वरच्या स्तरावरील उद्दिष्टांचे मापन तर होतेच पण त्या बरोबरच वस्तुनिष्ठताही येते.

१०. उत्तर का चुकले याचे निदान करता येते.

सदर संशोधना मध्ये संशोधकाला व्यावसायिक बांधीलकी मोजायची होती. अशा प्रकारच्या संशोधनात पद्‌निश्चयन श्रेणीचा बहुतांश वापर केला जातो परंतु त्यांची विश्वसनीयता मर्यादित असते. सदर संशोधनाद्वारे संशोधकाला व्यावसायिक बांधीलकीच्या सर्व पैलूंवर भर देऊन (२५० गुणवैशिष्ट्यांचे) अचूक माहिती मिळवायची होती. २५० गुणवैशिष्ट्यांवर विधानांची पद्‌निश्चयन श्रेणी दीर्घ झाली असती व

प्रतिसादावर परिणाम झाला असता म्हणून संशोधकाने सर्व पैलूचा विचार करुन बहुपर्यायी प्रश्नांची प्रश्नावली तयार करुन माहिती संकलन करण्याचे ठरविले आहे. बहुपर्यायी प्रश्न उत्तरांमधील अवांतर भाग कमी करण्यास मदत करतात व अचूक उत्तर देण्याची दिशा देतात त्यामुळे संशोधन प्रक्रियेला वेग येतो व विश्लेषण करणे सोपे होते. संशोधनाची गुणवत्ता ही केवळ नमुना व्यक्ती कडून मिळालेल्या उत्तरांवर अवलंबून नसते तर संशोधक कशा प्रकारे प्रश्न विचारतो हे देखील तितकेच महत्त्वाचे असते.

४.६ चाचणीची भेदभाव क्षमता

एखाद्या गटातील हुशार व सामान्य विद्यार्थी निवडून काढण्याची प्रश्नांची जी क्षमता असते. तिला चाचणीची भेदभाव क्षमता असे म्हणतात.[३]

प्रकरण -३ मधे नमूद केल्यानुसार प्रस्तुत चाचणीच्या माध्यमातून संपूर्ण चाचणी सोडविताना प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावरून आणि त्यांना मिळालेल्या गुणांकावरून त्यांचे गट करण्यात आले. व संपूर्ण चाचणीतील प्रश्नांचे पृथक्करण करण्यात आले. ज्याच्या साहाय्याने चाचणीतील सर्व प्रश्नांची भेदभाव क्षमता ही निश्चित करण्यात आली आणि या भेदभाव क्षमतेच्या आधारे योग्य भेदनक्षम व योग्य काठिण्यपातळी असणाऱ्या प्रश्नांच्या अंतिम चाचणीत समावेश केला. या अंतिम चाचणीत प्रतिसादकांनी दिलेल्या प्रतिसादावरून योग्य प्रतिसादकांची निवड करणे शक्य झाले. ज्याची प्रचिती पडताळा अभ्यास गटात दिसून आली

४.७. प्रमाणकांची निर्मिती

यात शततमक प्रमाणके व प्रमाणित गुण यांचा विचार केलेला आहे.

४.७.१. शततमक प्रमाणके

शततमक म्हणजे दिलेल्या वारंवारिता विभाजनातील असा एक बिंदू की ज्याच्याखाली विशिष्ट टक्के प्राप्तांक येतात.[४]

प्रस्तुत संशोधनात काही शततमक प्रमाणके काढण्यात आलेली आहेत. ती कसोटीनिहाय पुढील सारणीत दर्शविली आहेत

सारणी क्रमांक ४.४

शततमक प्रमाणके दर्शविणारी सारणी

शततमक प्रमाणके	अध्ययनार्थ्यां-प्रति बांधीलकी	व्यवसाया-प्रति बांधीलकी	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	मूल्यांप्रति बांधीलकी	समाजाप्रति बांधीलकी	संपूर्ण कसोटी
P९०	१७.००	१७.००	१८.००	१७.००	१७.००	७२.४
P८०	१३.००	१४.००	१३.००	१२.००	१३.००	५४.६
P७५	१२.००	१३.००	१३.००	१२.००	१३.००	५२.६
P७०	१२.००	१३.००	१२.००	१२.००	१२.००	५१.४
P६०	११.००	१२.००	११.००	११.००	११.००	४७.२
P५०	१०.००	११.००	१०.००	१०.००	१०.००	४३
P४०	१०.००	१०.००	१०.००	१०.००	१०.००	४२
P३०	८.००	१०.००	९.००	९.००	९.००	३७.८
P२५	८.००	९.००	८.००	८.००	८.००	३४.६
P२०	७.००	८.००	७.००	७.००	७.००	३०.४
P१०	४.००	६.००	५.००	५.००	५.००	२१

१. वरील सारणीत संपूर्ण कसोटीचे शततमक गुणांत रूपांतर करण्यात आलेले आहे. $P_{२५}$= ३४.६० म्हणजे २५% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही ३४.६० या गुणांकाखाली आहेत. म्हणजेच उरलेल्या ७५% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी एकूण ३५% पेक्षा जास्त गुणांक आहे.

या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीच्या जवळपास आहे.

२. $P_{५०}$= ४३.०० म्हणजे ५०% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही ४३.०० या गुणांकाखाली आहेत. म्हणजेच उरलेल्या ५०% शिक्षक- प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी एकूण ४४% पेक्षा जास्त गुणांक आहेत.

या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरी दर्जाची आहे.

३. $P_{७५}$= ५२.६० म्हणजेच ७५% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ५२.६० या गुणांकाखाली आहेत. म्हणजेच उरलेल्या २५% शिक्षक- प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी एकूण ५३% पेक्षा जास्त गुणांक आहेत.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसते.

४. $P_{९०}$= ७२.४० म्हणजे ९०% शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ७२.४० या गुणांकाखाली येतात.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही उच्च असल्याचे दिसते.

४.७.२ प्रमाणित गुण

प्रस्तुत संशोधनात प्रमाणित गुण निर्धारित करताना 'झेड' गुण, 'टी' गुण व 'प्रणऊ' गुण या प्रमाणित गुणांचा विचार केला आहे. या तिन्ही प्रमाणित गुणांचा वापर प्रस्तुत संशोधनात प्रमाणके म्हणून केला आहे.

'झेड' गुण काढण्यासाठी या सूत्राचा वापर केला.

$$Z = \frac{X - M}{\sigma}$$

येथे, X = कच्चे गुण

M = मध्यमान

σ = प्रमाण विचलन[10]

'टी' गुण काढण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला.

$$T = 10Z + 50$$

प्रस्तुत संशोधनास वरील 'झेड' आणि 'टी' या प्रमाणित गुणांचा विचार करून संपूर्ण चाचणीसाठी प्रमाणित गुणांचे प्रमाणक तयार केले. त्याची माहिती पुढील सारणीत दिलेली आहे.

सारणी क्रमांक ४.५

चाचणीच्या कच्च्या गुणांकांचे 'झेड' व 'टी' गुणांत केलेले रूपांतर

M = 52.60, σ =17

कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक	कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक
१	-३.०४	१९.६५	५१	-०.०९	४९.०६
२	-२.९८	२०.२४	५२	-०.०४	४९.६५
३	-२.९२	२०.८२	५३	०.०२	५०.२४
४	-२.८६	२१.४१	५४	०.०८	५०.८२
५	-२.८०	२२.००	५५	०.१४	५१.४१
६	-२.७४	२२.५९	५६	०.२०	५२.००
७	-२.६८	२३.१८	५७	०.२६	५२.५९
८	-२.६२	२३.७६	५८	०.३२	५३.१८
९	-२.५६	२४.३५	५९	०.३८	५३.७६
१०	-२.५१	२४.९४	६०	०.४४	५४.३५
११	-२.४५	२५.५३	६१	०.४९	५४.९४
१२	-२.३९	२६.१२	६२	०.५५	५५.५३
१३	-२.३३	२६.७१	६३	०.६१	५६.१२
१४	-२.२७	२७.२९	६४	०.६७	५६.७१
१५	-२.२१	२७.८८	६५	०.७३	५७.२९
१६	-२.१५	२८.४७	६६	०.७९	५७.८८
१७	-२.०९	२९.०६	६७	०.८५	५८.४७
१८	-२.०४	२९.६५	६८	०.९१	५९.०६
१९	-१.९८	३०.२४	६९	०.९६	५९.६५
२०	-१.९२	३०.८२	७०	१.०२	६०.२४
२१	-१.८६	३१.४१	७१	१.०८	६०.८२
२२	-१.८०	३२.००	७२	१.१४	६१.४१
२३	-१.७४	३२.५९	७३	१.२०	६२.००
२४	-१.६८	३३.१८	७४	१.२६	६२.५९
२५	-१.६२	३३.७६	७५	१.३२	६३.१८
२६	-१.५६	३४.३५	७६	१.३८	६३.७६
२७	-१.५१	३४.९४	७७	१.४४	६४.३५
२८	-१.४५	३५.५३	७८	१.४९	६४.९४
२९	-१.३९	३६.१२	७९	१.५५	६५.५३
३०	-१.३३	३६.७१	८०	१.६१	६६.१२

कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक	कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक
३१	-१.२७	३७.२९	८१	१.६७	६६.७१
३२	-१.२१	३७.८८	८२	१.७३	६७.२९
३३	-१.१५	३८.४७	८३	१.७९	६७.८८
३४	-१.०९	३९.०६	८४	१.८५	६८.४७
३५	-१.०४	३९.६५	८५	१.९१	६९.०६
३६	-०.९८	४०.२४	८६	१.९६	६९.६५
३७	-०.९२	४०.८२	८७	२.०२	७०.२४
३८	-०.८६	४१.४१	८८	२.०८	७०.८२
३९	-०.८०	४२.००	८९	२.१४	७१.४१
४०	-०.७४	४२.५९	९०	२.२०	७२.००
४१	-०.६८	४३.१८	९१	२.२६	७२.५९
४२	-०.६२	४३.७६	९२	२.३२	७३.१८
४३	-०.५६	४४.३५	९३	२.३८	७३.७६
४४	-०.५१	४४.९४	९४	२.४४	७४.३५
४५	-०.४५	४५.५३	९५	२.४९	७४.९४
४६	-०.३९	४६.१२	९६	२.५५	७५.५३
४७	-०.३३	४६.७१	९७	२.६१	७६.१२
४८	-०.२७	४७.२९	९८	२.६७	७६.७१
४९	-०.२१	४७.८८	९९	२.७३	७७.२९
५०	-०.१५	४८.४७	१००	२.७९	७७.८८

वरील सारणीत संपूर्ण कसोटीतील कच्च्या गुणांचे 'झेड' आणि 'टी' याप्रमाणे गुणांकात रूपांतर केलेले आहे. 'झेड' गुणाचा विस्तार हा -३.०४ ते २.७९ यादरम्यान आलेला आहे तर 'टी' गुणांचा विस्तार हा १९.६५ ते ७७.८८ या गुणांच्या दरम्यान आलेला दिसतो.

अर्थनिर्वचनाच्या दृष्टीने सुलभतेसाठी पुढील कोष्टकात प्रमाणित चाचणीच्या कच्च्या गुणांकाचे 'झेड' आणि 'टी' गुणात रूपांतर केलेले असून, त्यांच्याही निश्चित गुणांच्या वर्गांतराच्या स्वरूपात मांडणी करण्यात आली आहे आणि त्याचे चार विभाग करण्यात आले आहे.

सारणी क्रमांक ४.६

'झेड' आणि 'टी' गुणांचा निश्चित वर्गांतरातील विस्तार दर्शविणारी सारणी

कच्चे गुण	'झेड' गुण	'टी' गुण	बांधीलकी बाबत अभिप्राय
१ ते ४०	-३.०४ ते -०.७४	१९.६५ ते ४२.५९	सरासरीपेक्षा कमी
४१ ते ६०	-०.६८ ते ०.४४	४३.१८ ते ५४.३५	सरासरी
६१ ते ७५	०.४९ ते १.३२	५४.९४ ते ६३.१८	समाधानकारक
७६ ते १००	२.१५ ते २.७९	६३.७६ ते ७७.८८	उच्च

१. वरील सारणीत कच्च्या गुणांची निश्चित वर्गांतराच्या स्वरूपात मांडणी केलेली आहे ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत १ ते ४० इतके कच्चे गुण मिळाले आहेत व त्यांच्या गुणांचा विस्तार १९.६५ ते ४२.५९ या दरम्यान आहे.
अशा प्रकारच्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी पेक्षा कमी असल्याचे लक्षात येते.

२. ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत ४१ ते ६० इतके कच्चे गुण मिळाले आहेत त्यांच्या 'टी' गुणांचा विस्तार ४३.१८ ते ५४.३५ या दरम्यान आहे.
अशा प्रकारच्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी इतकी असल्याचे लक्षात येते.

३. ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत ६१ ते ७५ इतके कच्चेगुण मिळाले आहेत व त्यांच्या 'टी' गुणांचा विस्तार ५४.९४ ते ६३.१८ या दरम्यान आहे.
अशा प्रकारच्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही समाधानकारक आहे.

४. ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत ७६ ते १०० इतके कच्चे गुण मिळाले आहेत व त्यांच्या 'टी' गुणांचा विस्तार ६३.७६ ते ७७.८८ या दरम्यान आहे
अशा प्रकारच्या शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी उच्च असल्याचे लक्षात येते.

४.७.३ 'प्रणऊ' गुणांक/'स्टॅनाईन' गुणांक

प्रस्तुत संशोधनात प्रमाणके तयार करताना 'प्रणऊ' गुण या प्रमाणित गुणांकाचाही वापर प्रमाणके म्हणून करण्यात आलेला आहे. त्यासाठी 'प्रणऊ' गुणांकाची निश्चिती केली. 'प्रणऊ' शलाकेतील १ ते ९ गुणांचे प्रतिशत प्रमाणे हे अनुक्रमे ४, ७, १२, १७, २०, १९, १२, ७, ४ असे असते.[८] 'प्रणऊ' गुणांचा अर्थनिर्वचन करण्यासाठी पुढील निकषांचा आधार घेतला.

तक्ता क्रमांक ४.१

'प्रणऊ' गुणांकाचे अर्थनिर्वचन दर्शविणारा तक्ता

'प्रणऊ' शलाका	प्रत्येक वितरणातील प्रतिशत	संचयी प्रतिशत	अर्थनिर्वचन
९	वरिष्ठ ४%	९६% च्या वर	उच्च
८	पुढचे ७%	८९% पेक्षा अधिक व ९६% पेक्षा कमी	समाधानकारक सरासरीच्या आसपास
७	पुढचे १२%	७७% पेक्षा अधिक व ८९% पेक्षा कमी	
६	पुढचे १७%	६०% पेक्षा अधिक व ७७% पेक्षा कमी	सरासरी/ सर्वसाधारण
५	मधले २०%	४०% पेक्षा अधिक व ६०% पेक्षा कमी	
४	पुढचे १७%	२३% पेक्षा अधिक व ४०% पेक्षा कमी	
३	पुढचे १२%	११% पेक्षा अधिक व २३% पेक्षा कमी	असमाधानकारक / सरासरीच्या खाली
२	पुढचे ७%	४% पेक्षा अधिक व ११% पेक्षा कमी	
१	कनिष्ठ ४%	४% पेक्षा कमी	निम्न

वरील सारणीचा आधार घेऊन प्रस्तुत संशोधनातील 'प्रणऊ' गुणांकाचे मापन पुढीलप्रमाणे दर्शविले आहे.

शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीची 'प्रणऊ' शलाका

सारणी क्रमांक ४.७

'प्रणऊ'शलाकेतील प्रत्येक विभाजनात येणारे गुण दर्शविणारी सारणी

'प्रणऊ' शलाका	विद्यार्थ्यांशी बांधीलकी गुण	समाजाशी बांधीलकी गुण	व्यवसायाशी बांधीलकी गुण	सर्वोत्कृष्टतेसाठी बांधीलकी गुण	मानवी मूल्यांशी बांधीलकी गुण	एकूण सरासरी गुण
९	२०	२०-१९	२०-१८	२०-१९	२०	९९
८	२०-१६	१९-१७	१८-१७	१९-१७	२०-१६	९६
७	१५-१२	१७-१३	१७-१३	१६-१२	१६-१३	८१
६	१२-११	१३-१२	१३-११	१२-११	१३-११	६३
५	११-१०	१२-१०	११-१०	११-१०	११-१०	५६
४	१०-७	८-१०	१०-८	१०-८	१०-८	३९
३	७-१४	६-८	८-६	८-५	८-५	४०
२	४-२	३-६	५-२	५-३	५-३	२७
१	२-०	१-३	२-०	३-१	३-१	१८

१. वरील सारणीत पाच ही चाचण्यांच्या एकूण गुणांकाचे 'प्रणऊ' शलाकांचे विभाजन दर्शविण्यात आलेले आहे. 'प्रणऊ' शलाकेतील पहिल्या विभाजनात शिक्षक-प्रशिक्षकांनी मिळविलेल्या पाच ही चाचणीतील एकूण 'प्रणऊ' गुणांकाची सरासरी १८ आहे.

अशा शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी निम्न प्रतीची दिसते.

२. दुसऱ्या व तिसऱ्या स्टॅनाईनमध्ये येणाऱ्या पाचही चाचण्यांतील मिळविलेल्या गुणांकातील सरासरी ही ३४ इतके 'प्रणऊ' गुण आहेत.

या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी असमाधानकारक असल्याचे दिसते.

३. चौथ्या, पाचव्या व सहाव्या स्टॅनाईनमध्ये येणाऱ्या पाचही चाचण्यांतील एकूण गुणांकाची सरासरी ही ५३ इतके 'प्रणऊ' गुण आहेत.
शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी दर्जाची आहे.

४. सातव्या व आठव्या स्टॅनाईनमध्ये येणाऱ्या पाचही चाचण्यांतील मिळविलेल्या एकूण गुणांकाची सरासरी ८९ इतके 'प्रणऊ' गुण आहेत.
शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी समाधानकारक दिसते.

५. नवव्या स्टॅनाईनमध्ये येणाऱ्या पाचही चाचण्यांतील मिळविलेल्या एकूण गुणांकाची सरासरी ही ९९ इतके 'प्रणऊ' गुणांक आहे.
शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी उच्च असल्याचे दिसते.

एकूणच स्टॅनाईन १ ते ५ मध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चाचणीतील गुणांकाच्या सरासरीचा विचार करता १ ते ३६ च्या दरम्यान येत असल्याने शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरी व सरासरीपेक्षा कमी असल्याचे दिसते. तर सहा ते नऊ या स्टॅनाईनमध्ये येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ८५ च्या दरम्यान येत असल्याने सरासरीपेक्षा जास्त व उच्च असल्याचे दिसते.

४.७.४ चाचणीच्या वापराच्या सुलभतेसाठी वापरलेले प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान

प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमानाचा वापर करून अंतिम न्यादर्श गटाच्या गुणांसंबंधी निष्कर्ष काढण्यात आले ते पुढीलप्रमाणे .

सारणी क्रमांक ४.८

प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान दर्शविणारी सारणी

अ.क्र	गुणपरिक्षेत्र	गुणपरिक्षेत्रात येणारे प्रतिसादक	शेकडा प्रमाण	अक्षर श्रेणी	वर्णन बांधीलकी	गुणांक
१	८०% व जास्त	१८	७.२२%	A1	A अतिउच्च	१
२	७०-७९	११	४.४१%	A2	AB उच्च	२
३	६३-६९	३१	१२.४४%	A1	B सरासरीपेक्षा जास्त	३
४	५९-६२	१९	७.६३%	B2	BC सर्वसाधारण पेक्षा बरा	४
५	५५-५८	१९	७.६३%	C1	C सरासरी	५
६	५०-५४	४६	१८.४७%	C2	CD सर्वसाधारण	६
७	४५-४९	३१	१२.४४%	D1	D सर्वसाधारण पेक्षा कमी	७
८	४०-४४	३०	१२.०४%	D2	DF कमी	८
९	३९% व कमी	४४	१७.६७%	F	F बरा	९
		२४९	१००%			

प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमाने Normative Standard Grading Model प्रा. वा. ना. दांडेकर यांच्या मते प्रसामान्यता वक्राच्या आधार घेऊनच श्रेणी पद्धती ठरविणे अधिक योग्य होते. त्यासाठी गुणांकांच्या किमतीनुसार उच्च गुणांकाकडून नीच्चतम गुणांकाकडे प्रतिसादकांच्या उत्तरपत्रिकांचा क्रम लावावा आणि त्यानुसार गुणांकांच्या विशिष्ट गटात किती प्रतिसादक व त्यांचे शेकडा प्रमाण दर्शविणारे सारणी तयार करावे.

वरील सारणीत दुसऱ्या स्तंभावरून प्रतिसादकांचे नऊ गट केलेले आहेत. तसेच त्या प्रत्येक गटातील प्रतिसादकाचे शेकडा प्रमाणही त्या स्तंभात दिलेले आहे. तिसऱ्या स्तंभात गुणांचा आलेख प्रत्यक्ष विस्तार दर्शविलेला आहे तो ठरविताना पडताळा गटास प्राप्त बांधीलकी चाचणीतील गुणांच्या आधारे निश्चित केलेला आहे. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीतील प्रत्यक्ष गुणांच्या विस्तारावरून त्यांना प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमानाचा वापर करून वरीलप्रमाणे श्रेणीत विभाजन करता येते व त्यात येणाऱ्या प्रतिसादाचे प्रमाणही सांगितले आहे.

१) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात १ ते ३९ या दरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'F' हे अक्षर श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण १७.६७% म्हणजे ४४ इतके आहे.
'F' श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी बरी नसल्याचे प्रतिमानावरून दिसते.

२) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ४० ते ४४ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'D2' ही अक्षर श्रेणी देण्यात आली आणि अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण १२.०४% म्हणजेच ३० इतके आहे.
४० ते ४४ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या बांधीलकीचे वर्णन 'DF' श्रेणीत केलेले आहे व 'DF' श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारणपेक्षा कमी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

३) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ४५ ते ४९ दरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'D1' ही अक्षर श्रेणी देण्यात आली आणि अशा शिक्षक- प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण १२.४४% म्हणजे ३१ इतके आहे.
४५ ते ४९ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'D' श्रेणीत केले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही कमी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

१, २, ३ वरून असे म्हणता येते की, जे शिक्षक-प्रशिक्षक श्रेणी 'F', 'D2', 'D1' मध्ये येतात त्यांना अध्यापक महाविद्यालय शिक्षक-प्रशिक्षक म्हणून नेमणूक करू नये. कारण मानसशास्त्रीय तत्त्वानुसार ज्ञान, क्षमता व दृष्टिकोन हा कोणत्याही व्यावसायिक कौशल्यात किमान ५०% इतका पूर्ववत असणे आवश्यक आहे व प्रशिक्षणातून तो काही प्रमाणातच म्हणजेच जास्तीत जास्त ३३% इतकाच वाढविता येतो.

४) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५० ते ५४ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'C2' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण १८.४७% म्हणजे ४६ इतके आहे.
५० ते ५४ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'C2' श्रेणीत केलेले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारण असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

५) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५५ ते ५८ इतके गुण मिळाले आहेत त्यांना 'C1' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक- प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण ७.६३% म्हणजेच १९ इतके आहे.
५५ ते ५८ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'C' श्रेणीत केलेले आहे या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

६) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५९ ते ६२ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'B2' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण ७.६३% म्हणजेच १९ इतके आहे.
५९ ते ६२ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'BC' श्रेणीत केलेले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारणपेक्षा बरी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

७) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ६३ ते ६९ दरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'B1' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण १२.४४% म्हणजेच ३१ इतके आहे.

६३ ते ६९ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'B' श्रेणीत केलेले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीपेक्षा जास्त असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

८) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ७० ते ७९ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'A2' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण ४.४१% म्हणजेच ११ इतके आहे.

७० ते ७९ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'AB' श्रेणीत केलेले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही उच्च असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

९) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत त्यांना 'A1' ही श्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण ७.२२% म्हणजेच १८ इतके आहे.

८०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीचे वर्णन 'A' श्रेणीत केले आहे. या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक- प्रशिक्षकाची व्यावसायिक बांधीलकी अति उच्च असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

४.८ चाचणीच्या वापरातील सुलभतेसाठी मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत संशोधनात तयार केलेली चाचणी ही वेळ, पैसा व श्रम यादृष्टीने वापरण्यास सुलभ असावी, याचा विचार करून प्रस्तुत चाचणी ही प्रमाणित करण्यात आली आहे व संपूर्ण चाचणीसाठी प्रमाणके तयार करण्यात आली आहेत. चाचणीच्या वापरासाठी मार्गदर्शिका तयार करण्यात आली.

प्रत्येक प्रमाणित चाचणीबरोबर मार्गदर्शक पुस्तिका देणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनातही अशी मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. चाचणीचे उद्दिष्ट ती तयार करण्याची पद्धती, चाचणी वापरण्यासंबंधीच्या सूचना, गुणदान योजना व गुणांचा अर्थ लावणे इत्यादी सर्व बाबींचा उल्लेख या पुस्तिकेत केला आहे. ही चाचणी कोणत्या गटाला देण्यात आली, नमुना कसा निवडला, प्रमाणके कोणत्या पद्धतीने तयार केली इत्यादी सर्व विवेचन या पुस्तिकेत दिलेले आहे. चाचणीच्या काही उणिवा असल्या तरी त्यांचे ही दिग्दर्शन करणे आवश्यक असते. या दृष्टीने मार्गदर्शिकेचे महत्त्व आपल्या लक्षात येते व कसोटी वापरताना मार्गदर्शिकेच्या आधारे योग्य ती दक्षता घेता येते ही मार्गदर्शिका पुढीलप्रमाणे

४.८ मराठी संदर्भ :

१) दांडेकर, वा. ना. (१९८२). ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र.*** नागपूर : श्रीविद्या प्रकाशन. पृष्ठ -१०८-५६

२) दांडेकर, वा. ना. (२००४). ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र.*** नागपूर : श्रीविद्या प्रकाशन. पृष्ठ २७४-२७५.

३) देसले, भदाणे, (२००९). ***शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र.*** पुणे : रेशमाई पब्लिकेशन, पृष्ठ -५६

४) नरवणे, मीनल. (२०१६). ***संशोधन पद्धती : शैक्षणिक व सामाजीक.*** पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. पृष्ट क्रमांक -२३२

• इंग्रजी संदर्भ :

5) Garrett, H. E. (1985). ***Statistics in Psychology and Education*** (11th Edi.) Bombay : Vakils, Feffar and Simons Limited Page 349

6) Garrett, H. E. (1985). ***Statistics in Psychology and Education*** (11th Edi.) Bombay : Vakils, Feffar and Simons Limited Page 126

7) Karlinger, F. N. (1985) ***Foundations of behavioural research*** (3rd Edi, Bangalore Prism books private limited) Page 417

8) Lenon, R. T. (1956), ***A glossary of 100 measurement terms.*** In G.S. Adams (1966) ***Measurement and evaluation in education, psychology and guidance***, New York : Holt, Rinehart and winston. Page 627

9) Lindquist, E. G. (1966). ***Educational Measurement Washington***. American Council of Education.

10) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133, Page 182

11) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133, Page 185

12) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***, New Delhi : National Publishing House-133, Page 193

13) Sali, V. Z. (1982). ***Principles and techniques of unit testing***. New Delhi : National Publishing House-133, Page 199

प्रकरण पाचवे

पडताळा अभ्यास

५.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट प्रमाणित केलेल्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचाचा पडताळा घेणे हे असल्याने या प्रकरणात शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या पडताळा अभ्यासाची माहिती या प्रकरणात दिली आहे. माहितीच्या विश्लेषणात चाचणीचे प्रमाणिकरण करून चाचणीची विश्वसनीयता व सप्रमाणता ठरविली. या प्रकरणात प्रमाणित चाचणीच्या पडताळा अभ्यासाविषयी माहिती नमूद केली आहे.

उद्दिष्ट क्रमांक २ - प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.

५.२ चाचणीचा पडताळा घेण्याचा हेतू

संशोधकाने जी प्रमाणित चाचणी या संशोधनाच्या माध्यमातून तयार केली ती प्रत्यक्ष व्यवहारात किती उपयुक्त व व्यवहार्य आहे?. तिचे निष्कर्ष काय येतील, याचा अभ्यास चाचणीचा पडताळा घेऊन येथे नमूद केला आहे.

५.३ प्रत्यक्ष पडताळा अभ्यास प्रक्रिया

प्रमाणित चाचणीचा पडताळा घेताना विविध विद्यापीठांतर्गत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांसाठी हा पडताळा घेतला. आराखड्यात नमूद केल्याप्रमाणे एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ - मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - औरंगाबाद, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ - नांदेड, शिवाजी विद्यापीठ - कोल्हापूर, आणि सोलापूर विद्यापीठ या सहा विद्यापीठांतर्गत येणाऱ्या प्रत्येक तीन अध्यापक महाविद्यालयांची सहेतुक पद्धतीने निवड करण्यात आली आणि त्या अध्यापक महाविद्यालयातील एकूण-१२२ शिक्षक-प्रशिक्षकांवर चाचणी घेण्यात आली.

५.४ संकलित माहितीचे वर्गीकरण

शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी तयार करण्यात आलेली प्रमाणित चाचणी सोडविल्यानंतर त्यांना गुणदान करण्यात आले व प्राप्त माहितीचे वर्गीकरण केंद्रिय प्रवृत्तीचे मापन, गुणांकाचे वितरण तसेच 'झेड' गुण, 'टी' गुण आणि 'प्रणऊ' गुण स्वरूपात सादर केले.

५.४.१ पडताळा अभ्यासातून प्राप्त वरील पाच ही चाचण्यांचे केंद्रिय प्रवृत्ती, विचलनशीलता व विषमितता यांचे संकलित सारणीत मापन पुढीलप्रमाणे दर्शविले आहे.

सारणी क्रमांक ५.१
पडताळा अभ्यास गटाची केंद्रिय प्रवृत्ती, विचलनशीलता आणि विषमितता दर्शविणारी सारणी

अ क्र	चाचणी	न्यादर्श (प्रतिसा -दक)	केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे			विचलनशीलतेची परिमाणे		विषमितता	
			मध्यमान	मध्यांक	बहुलक	प्रमाण विचलन	चतुर्थक विचलन	विषमितता	शिरस्थोष
१	अध्ययनार्थ्यां-प्रति बांधीलकी	१२२	१०.८२	१०	९	४.६३	०२	०.१०	०.०१
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	१२२	१०.९८	१०	१०	४.३६	१.८७	०.०६	०.०१
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	१२२	११.४९	१०	१०	४.४५	२.५	०.०१	०.०२
४	समाजाप्रति बांधीलकी	१२२	११.१६	१०	९	३.८१	२.५	०.१५	०.१४
५	मूल्यांप्रति बांधीलकी	१२२	११.६५	१०	१०	४.१८	२.८७	०.०३	०.०१

वरील सारणीत शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या पडताळ्याचे केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचे मापन करण्यात आले आहे. वरील सारणीत पाचही कसोट्यांची विषमितता ही निश्चित केली असून ती ०.९ ते ०.९५ या दरम्यान असून, शिखरदोष ०.०९ ते ०.९४ या दरम्यान दिसतो.

खालील मुद्दे लक्षात येतात.

गुणांची केंद्रिय प्रवृत्ती व प्रसामान्य संभाव्य वक्रावरून खालील मुद्दे लक्षात येतात.

१) गुणांकांच्या केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचा आलेल्या मापाचा आधार घेऊन प्रसामान्य संभाव्य वक्र काढल्यास तो धन विषमित मिळतो.

२) गुणांकाचे विभाजन उच्च श्रेणीत अधिक संचयित झालेले असून ते डावी आणि उजव्या बाजूस त्यांची मात्रा तुरळक झालेली दिसते.

३) वरील कोष्टकात विद्यार्थ्यांशी बांधीलकी, व्यावसायिक बांधीलकी, उत्कृष्ट कार्यासंबंधित बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी आणि समाजाशी बांधीलकी चाचणीची विषमितता ही धन असल्याचे दिसते.

४) विद्यार्थ्यांशी बांधीलकी, व्यवसायाशी बांधीलकी, सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी आणि समाजाशी बांधीलकी या पाचही चाचण्यांचा शिखरदोष अनुक्रमे ०.०९, ०.०९, ०.०२, ०.९४, ०.०९ आहे म्हणजेच ky = ०.२३ पेक्षा या विद्यार्थ्यांशी बांधीलकी, व्यवसायाशी बांधीलकी, सर्वोत्कृष्टता मिळविण्याची बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्यांशी बांधीलकी आणि समाजाशी बांधीलकी या पाच चाचण्याच्या शिखरदोषाचे मूल्य लहान असल्याने पाचही चाचण्यांचा मिळणारा वक्र ही उच्चशिखरी असल्याचे दिसते. म्हणजेच या पाच ही चाचण्यात गुणांकाचे विभाजन हे केंद्रिय प्रवृत्तीच्या मध्यावर केंद्रित झालेले दिसते.

५.४.२ पडताळा अभ्यासात प्राप्त गुणांचे 'झेड' आणि 'टी' गुणांत केलेले रूपांतर

सारणी क्रमांक ५.२

पडताळा अभ्यासात प्राप्त गुणांचे 'झेड' आणि 'टी' गुणांत केलेले रूपांतर

कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक	कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक
१	-४.८५	१.५२	५१	-०.३८	४६.२
२	-४.७६	२.४१	५२	-०.२९	४७.१
३	-४.६७	३.३०	५३	-०.२१	४७.९
४	-४.५८	४.२०	५४	-०.१२	४८.८
५	-४.४९	५.०९	५५	-०.०३	४९.७
६	-४.४०	५.९८	५६	०.०६	५०.६
७	-४.३१	६.८८	५७	०.१५	५१.५
८	-४.२२	७.७७	५८	०.२४	५२.४
९	-४.१३	८.६६	५९	०.३३	५३.३
१०	-४.०४	९.५५	६०	०.४२	५४.२
११	-३.९६	१०.४५	६१	०.५१	५५.१
१२	-३.८७	११.३४	६२	०.६०	५६.०
१३	-३.७८	१२.२३	६३	०.६९	५६.९
१४	-३.६९	१३.१३	६४	०.७८	५७.८
१५	-३.६०	१४.०२	६५	०.८७	५८.७
१६	-३.५१	१४.९१	६६	०.९६	५९.६
१७	-३.४२	१५.८०	६७	१.०४	६०.४
१८	-३.३३	१६.७०	६८	१.१३	६१.३
१९	-३.२४	१७.५९	६९	१.२२	६२.२
२०	-३.१५	१८.४८	७०	१.३१	६३.१
२१	-३.०६	१९.३८	७१	१.४०	६४.०
२२	-२.९७	२०.२७	७२	१.४९	६४.९
२३	-२.८८	२१.१६	७३	१.५८	६५.८
२४	-२.७९	२२.०५	७४	१.६७	६६.७
२५	-२.७१	२२.९५	७५	१.७६	६७.६
२६	-२.६२	२३.८४	७६	१.८५	६८.५
२७	-२.५३	२४.७३	७७	१.९४	६९.४
२८	-२.४४	२५.६३	७८	२.०३	७०.३
२९	-२.३५	२६.५२	७९	२.१२	७१.२
३०	-२.२६	२७.४१	८०	२.२१	७२.१
३१	-२.१७	२८.३०	८१	२.२९	७२.९

कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक	कच्चे गुणांक	'झेड' गुणांक	'टी' गुणांक
३२	-२.०८	२९.२०	८२	२.३८	७३.८
३३	-१.९९	३०.०९	८३	२.४७	७४.७
३४	-१.९०	३०.९८	८४	२.५६	७५.६
३५	-१.८१	३१.८८	८५	२.६५	७६.५
३६	-१.७२	३२.७७	८६	२.७४	७७.४
३७	-१.६३	३३.६६	८७	२.८३	७८.३
३८	-१.५४	३४.५५	८८	२.९२	७९.२
३९	-१.४६	३५.४५	८९	३.०१	८०.१
४०	-१.३७	३६.३४	९०	३.१०	८१.०
४१	-१.२८	३७.२३	९१	३.१९	८१.९
४२	-१.१९	३८.१३	९२	३.२८	८२.८
४३	-१.१०	३९.०२	९३	३.३७	८३.७
४४	-१.०१	३९.९१	९४	३.४६	८४.६
४५	-०.९२	४०.८०	९५	३.५४	८५.४
४६	-०.८३	४१.७०	९६	३.६३	८६.३
४७	-०.७४	४२.५९	९७	३.७२	८७.२
४८	-०.६५	४३.४८	९८	३.८१	८८.१
४९	-०.५६	४४.३८	९९	३.९०	८९.०
५०	-०.४७	४५.२७	१००	३.९९	८९.९

वरील सारणीत समाविष्ट शिक्षक-प्रशिक्षकांच्या कच्च्या गुणांचे 'झेड' गुण आणि 'टी' गुणांत रूपांतर करण्यात आलेले आहे. या 'झेड' गुणांचा विस्तार हा -४.८५ ते ३.९९ यादरम्यान आला तर 'टी' गुणांचा विस्तार हा १.५२ ते ८९.९० यादरम्यान आलेला दिसतो.

५.४.३ पडताळा अभ्यास गटाच्या गुणांचे प्रमाणित चाचणीतील गुणांशी तुलना

शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या प्राप्त 'टी' गुणांच्या सरासरीची तुलना पडताळा अभ्यास गटाच्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या प्राप्त 'टी' गुणांशी

केली असता पडताळा गटाच्या शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी संबंधित पुढील निष्कर्ष काढता येतात.

सारणी क्रमांक ५.३

पडताळा अभ्यास गटाच्या गुणांचे प्रमाणित चाचणीतील गुणांशी तुलना दर्शविणारी सारणी

कच्चे गुण	'टी' गुण	सरासरी	'टी' गुण	सरासरी	बांधीलकीबाबत अभिप्राय
१ ते ४०	१९.६५ ते ४२.५९	३२	१.५२ ते ३६.३४	३४	सरासरीपेक्षा कमी
४१ ते ६०	४३.१८ ते ५४.३५	५१	३७.२३ ते ५४.२	५२	सरासरी
६१ ते ७५	५४.९४ ते ६३.१८	६५	५५.१ ते ६७.६	६७	समाधानकारक
७६ ते १००	६३.७६ ते ७७.८८	७८	६८.५ ते ८९.९	९१	उच्च

१) १ ते ४० गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे प्रमाणित चाचणीतील सरासरी 'टी' गुण मूल्य ३२ आहे तर पडताळा अभ्यासात हेच गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे सरासरी 'टी' मूल्य ३४ आहे.

यावरून शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत १ ते ४० इतके कमी गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

२) शिक्षक- प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत ४१ ते ६० इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी 'टी' मूल्य ५१ आहे तर पडताळा अभ्यासात याच गटाचे सरासरी 'टी' मूल्य ५२ आहे.

यावरून ४१ ते ६० इतके म्हणजे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत सरासरी गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी प्रमाण हे पडताळा गटात जवळपास सारखे आहेत. या गटास शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत सरासरी गुण प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

३) शिक्षण-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत ६१ ते ७५ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी 'टी' मूल्य ६७ आहे तर पडताळा अभ्यासात याच गटाचे सरासरी 'टी' मूल्य ६५ आहे यावरून ६१ ते ७५ इतके म्हणजे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत सरासरी पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी प्रमाण हे दोन्ही गटात सारखे आहे.

या शिक्षक-प्रशिक्षकांना सरासरीपेक्षा अधिक गुण शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत मिळविल्याचे दिसून येते.

४) शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत ७६ ते १०० इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी 'टी' मूल्य ७८ आहे तर पडताळा अभ्यासात याच गटाचे सरासरी 'टी' मूल्य ९१ आहे. यावरून ७६ ते १०० इतके म्हणजे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत सरासरीपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे सरासरी प्रमाण हे पडताळा गटात १३ इतक्या 'टी' गुणांनी जास्त आहे.

या शिक्षक-प्रशिक्षकांना शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीत उच्च गुण असल्याचे दिसून येते.

१, २, ३, ४ यावरून असे म्हणता येते की, प्रमाणित चाचणीतून प्राप्त 'टी' गुणांशी पडताळा अभ्यास गटात प्राप्त शिक्षक-प्रशिक्षकांच्या 'टी' गुणांशी तुलना करता प्रमाणित गटाचे आणि पडताळा गटाचे 'टी' मूल्य यात काही अंतर दिसून येत नाही म्हणजेच प्रमाणित चाचण्यांचा निकष पडताळा गटास तंतोतंत लागू होतो. यावरून चाचणीची सप्रमाणता ही उच्च असल्याचे दिसते.

५.४.४ शततमक प्रमाणके

सारणी क्रमांक ५.४

संपूर्ण चाचणीची काही निवडक शततमक प्रमाणके

शततमक प्रमाणके	कच्चे गुण
$P_{९०}$	८८.००
$P_{८०}$	७५.००
$P_{७५}$	६९.००
$P_{७०}$	६३.००
$P_{६०}$	५८.००
$P_{५०}$	५०.००
$P_{४०}$	५०.००
$P_{३०}$	४७.००
$P_{२५}$	४५.००
$P_{२०}$	४३.००
$P_{१०}$	३१.००

१. वरील सारणीत संपूर्ण कसोटीचे शततमक गुणांत रूपांतर करण्यात आलेले आहे. $P_{२५}$ = ४५ म्हणजेच २५% शिक्षक-प्रशिक्षक हे ४५ या गुणांकाखाली आहेत म्हणजेच २५% शिक्षक-प्रशिक्षकांना ४५ पेक्षा जास्त गुणांक आहेत.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीच्या जवळपास आहे.

२. $P_{५०}$ = ५० म्हणजेच ५०% शिक्षक-प्रशिक्षक हे ५० या गुणांकाखाली आहे. म्हणजेच उरलेल्या ५०% शिक्षक-प्रशिक्षकांना एकूण शेकडा ५० पेक्षा जास्त गुणांक आहेत.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरी दर्जाची आहेत.

३. $P_{७५}$ = ६९ म्हणजेच २५% शिक्षक-प्रशिक्षक हे ६९ या गुणांकाखाली आहेत म्हणजेच २५ % शिक्षक-प्रशिक्षकांना ६९ पेक्षा जास्त गुणांक आहेत.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसते.

४. $P_{१००}$ = ८८ म्हणजेच १००% शिक्षक-प्रशिक्षक हे ८८ या गुणांकाखाली आहेत म्हणजेच या चाचणीत शिक्षक-प्रशिक्षकांना मिळणारे अत्युच्च गुण हे वा इतके असल्याचे दिसते.
या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही उच्च आहे.

वर्णन ४ वरून असे दिसते की, $P_{१००}$ = ८८ म्हणजेच १००% शिक्षक-प्रशिक्षक हे ८८ या गुणांकाखाली आहेत. याचाच अर्थ या चाचणीत ८८ पेक्षा अधिक गुण कुणालाही मिळालेले नाहीत. अत्युच्च गुण हे ८८ इतकेच मिळाल्याचे दिसते. पडताळा अभ्यासात प्राप्त 'टी' गुणांचा विचार करता १०० इतके कच्चे गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकाचा 'टी' गुणांक ८९ इतका आहे. थोडक्यात शंभरावे शततमक व अत्युच्च प्राप्त 'टी' गुण यात फारसा फरक आढळत नाही. त्यावरून आलेले निष्कर्ष हे सप्रमाण असल्याचे दिसते.

५.४.५ चाचणीच्या वापराच्या सुलभतेसाठी वापरलेले प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान :- प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमानाचा वापर करून पडताळा अभ्यास गटाच्या गुणांसंबंधी निष्कर्ष काढण्यात आले ते प्रतिमान पुढीलप्रमाणे :

सारणी क्रमांक ५.५

प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमान दर्शविणारी सारणी

क्रमांक	गुणपरिक्षेत्र	गुणपरि-क्षेत्रात येणारे प्रतिसादक	शेकडा प्रमाण	अक्षर श्रेणी	वर्णन बांधीलकी	गुणांक
१	८०% व जास्त	०१	०.८१ %	A1	A अतिउच्च	१
२	७०-७९	०७	५.७३ %	A2	AB उच्च	२
३	६३-६९	२५	२०.४९ %	B1	B सरासरीपेक्षा जास्त	३
४	५९-६२	१८	१४.७५ %	B2	BC सर्वसाधारण पेक्षा बरा	४
५	५५-५८	१८	१४.७५ %	C1	C सरासरी	५
६	५०-५४	१६	१३.११ %	C2	CD सर्वसाधारण	६
७	४५-४९	१७	१३.९३ %	D1	D सर्वसाधारण पेक्षा कमी	७
८	४०-४४	९	७.३७ %	D2	DF कमी	८
९	३९% व कमी	११	९.०१ %	F	F बरा	९
		१२२	१०० %			

१) वरील सारणीत तिसऱ्या स्तंभावरून शिक्षक-प्रशिक्षकांचे नऊ गट केलेले आहेत. तसेच त्या प्रत्येक गटातील शिक्षक-प्रशिक्षकांचे शेकडा प्रमाणही चौथ्या स्तंभात दिलेले आहे. दुसऱ्या स्तंभात गुणांचा आलेला प्रत्यक्ष विस्तार दर्शविलेला आहे. तो ठरविताना पडताळा गटास प्राप्त शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणीतील गुणांच्या आधारे निश्चित केलेला आहे. पडताळा अभ्यास गटातील शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीतील प्रत्यक्ष गुणांच्या

विस्तारावरून त्यांना प्रमाणकानुसार श्रेणीदान प्रतिमानाचा वापर करून वरीलप्रमाणे श्रेणीत विभाजन करता येते व त्यात येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांचे प्रमाणही आपणास सांगता येते.

ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात १ ते ३९ यादरम्यान गुण मिळाले आहेत. त्यांना 'F' ही श्रेणी देण्यात आली. अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण शेकडा ९.०१ म्हणजेच ११ इतके आहे.
'F' श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही बरी नसल्याचे प्रतिमानावरून दिसते.

२) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ४० ते ४४ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'D_2' अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील प्रमाण शेकडा ७.३७ म्हणजे ९ इतके आहे. ४० ते ४४ इतके कमी गुण मिळविण्याचे शिक्षक-प्रशिक्षकास 'DF' वर्णन श्रेणी दिली.
'DF' श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही कमी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

३) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ४५ ते ४९ यादरम्यान गुण मिळाले आहेत. त्यांना 'D_1' ही अक्षरश्रेणी देण्यात आली. अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण १३.९३ म्हणजेच १७ इतके आहे. ४५ ते ४९ इतके कमी गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'D' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारणपेक्षा कमी असल्याचे दिसते.

१, २, ३ वरून असे म्हणता येते की, जे शिक्षक-प्रशिक्षक F, DF, D यामध्ये येतात. त्यांना शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयात नोकरी देऊ नये. कारण मानसशास्त्रीय तत्त्वानुसार ज्ञान, क्षमता, दृष्टिकोन हा कोणत्याही व्यावसायिक कौशल्यात किमान

५०% इतका पूर्ववत असणे आवश्यक आहे व प्रशिक्षणातून स्वअनुभवातून, काम करत असलेल्या वातावरणातून तो काही प्रमाणातच वाढविता येतो.

४) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५० ते ५४ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'C$_2$' ही अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण १३.११ म्हणजेच १६ इतके आहे. ५० ते ५४ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकास 'CD' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारण असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

५) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५५ ते ५८ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'C$_1$' ही अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण १४.७५ म्हणजेच १८ इतके आहे. ५५ ते ५८ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकास 'C' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

६) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ५९-६२ यादरम्यान गुण मिळाले आहेत त्यांना 'B$_2$' ही अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण १४.७५ म्हणजेच १८ इतके आहे. ५९ ते ६२ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'BC' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सर्वसाधारणपेक्षा बरी असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

७) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ६३ ते ६९ यादरम्यान पडताळा गटातील शेकडा प्रमाण २०.४९ म्हणजेच २५ इतके आहे. ६३ ते६९ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'B' वर्णन श्रेणी दिली.

या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरी पेक्षा जास्त असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

८) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ७० ते ७९ यादरम्यान गुण मिळाले आहेत. त्यांना 'A$_2$' ही अक्षरश्रेणी देण्यात आली. अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण ५.७३ म्हणजेच ७ इतकी आहे. ७१ ते ७९ इतके गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'AB' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी उच्च असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

९) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांस व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचात ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. त्यांना 'A1' ही अक्षरश्रेणी देण्यात आली व अशा शिक्षक-प्रशिक्षकांचे पडताळा गटातील शेकडा प्रमाण ०.८१ म्हणजेच १ इतके आहे. ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांस 'A' वर्णन श्रेणी दिली.
या श्रेणीत येणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी अति उच्च असल्याचे प्रतिमानावरून दिसते.

एकूणच ५० व त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या शिक्षक-प्रशिक्षकांना शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयात नोकरी द्यावी. कारण हे शिक्षक-प्रशिक्षक उच्च व्यावसायिक बांधीलकीमुळे शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करण्याची शक्यता असते. अशा दर्जाचे शिक्षक-प्रशिक्षक महाविद्यालयात बहुसंख्येने असतील तर शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयाचा व शिक्षणाचा दर्जा उंचविण्यास मदत होईल.

५.५ यावरून प्रमाणित चाचणीच्या सर्व वैशिष्ट्यांची पूर्तता करणारी एक उत्तम चाचणी आहे असे म्हणता येते. कारण प्रमाणित चाचणीची सर्व वैशिष्ट्ये या चाचणीत पूर्ण करण्यात आलेली आहे त्याचा सारांश पुढीलप्रमाणे :

५.५.१ विश्वसनीयता

'कुडर रिचर्डसन' के. आर-२०, 'क्रोनबाकअल्फा' फॉर्म्यूला यांचा वापर करून सदर चाचणीची विश्वसनीयता काढण्यात आली.

५.५.२ भेदभाव क्षमता

सदर चाचणीची भेदभाव क्षमता निश्चित करताना संपूर्ण चाचणीतील प्रत्येक प्रश्नाचे भेदनमूल्य काढण्यात आलेले आहे व योग्य भेदनक्षम प्रश्नांनाच समावेश अंतिम चाचणीत केलेला आहे.

५.५.३ वस्तुनिष्ठता

सदर चाचणीत बहुपर्यायी प्रश्नांची योजना केल्यामुळे वस्तुनिष्ठता ही निश्चितच दिसून येते.

५.५.४ सप्रमाणता

प्रस्तुत संशोधनात आशय सप्रमाणतेच्या दृष्टीने बांधीलकी क्षेत्रांच्या उपपैलूंची निश्चिती उपपैलूंच्या केलेल्या कार्यात्मक व्याख्या व उद्दिष्टांची निश्चिती तसेच उद्दिष्टांना दिलेला भारांश व उद्दिष्टानुसार बांधीलकीचे मोजमाप करणारी प्रश्नावलीची रचना पाहता चाचणी ही आशय सप्रमाण आहे.

५.५.५ पर्याप्तता

प्रस्तुत चाचणीत शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या पाच महत्त्वपूर्ण बांधीलकी क्षेत्रांची व त्यांच्या उपक्षेत्रांची निश्चिती ५० अनुभवी शिक्षक-प्रशिक्षकांची व तज्ज्ञांची मते घेऊन ही क्षेत्रे निश्चित केलेली असल्याने ही चाचणी शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी मापनास पर्याप्त असल्याचे लक्षात येते.

५.५.६ उपयोगिता

प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षणशास्त्र महाविद्यालयास शिक्षक-प्रशिक्षकांची निवड करण्यासाठी उत्तम मापन साधन मिळणार आहे. अशा प्रमाणित चाचणीचा वापर करून ज्यांची व्यावसायिक बांधीलकी उच्च किंवा सरासरी पेक्षा अधिक गुणांक ज्यांना आहेत त्यांची निवड शिक्षक-प्रशिक्षक म्हणून करण्यास हरकत नाही.

प्रकरण सहावे

सारांश, सूचना व शिफारशी

६.१ प्रास्ताविक

शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसयिक बांधीलकी चाचणीचे विकसन व प्रमाणिकरण करणे हा चाचणीचा हेतू असल्याने प्रस्तुत संशोधनात या समस्येस अनुसरून माहिती संकलनासाठी तयार केलेल्या साधनांची निर्मिती, संशोधनाची कार्यपद्धती पहिल्या तीन प्रकरणात मांडली आहे. प्राप्त माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि चाचणीचे प्रमाणिकरण याविषयाची माहिती प्रकरण चारमध्ये दिलेली आहे. प्रमाणित चाचणीच्या पडताळ्याविषयी प्राप्त माहितीचे विश्लेषण प्रकरण पाचमध्ये दिलेले आहे. प्रस्तुत प्रकरणातून आलेल्या निष्कर्षातून काही सूचना पुढे केल्या आहेत. यात शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसह बी.एड्. प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी या सूचना आणि शिफारशी देण्यात आलेल्या आहेत.

६.२ सारांश

६.२.१ संशोधनाची गरज

१. शिक्षक-शिक्षणातून सामाजिक व राष्ट्रीय बांधीलकीच्या भावनेने, आवश्यक त्या समस्यांचे समाधान शोधून काढण्याच्या हेतूने, संशोधनाच्या उत्कृष्टतेसंबंधी कोणतीही तडजोड न करता संशोधन करुन राष्ट्राचे व समाजाचे हित साधून विकासाच्या कार्यात मदत होण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.

२. शिक्षक-शिक्षणातून समाजाच्या प्रगतीच्या प्रक्रियेचे पृथक्करण करून कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम समाजाला भविष्यकाळात प्रगतिपथावर नेतील याचा विचार करून शिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी विकसित करणे.

३. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांना व्यवसायाशी बांधीलकी असणे गरजेचे आहे.

४. जेव्हा शिक्षक-प्रशिक्षक व्यावसायिक क्षमता विकसित करेल तेव्हाच तो यशस्वी होईल. म्हणूनच माध्यमिक शिक्षक घडविणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील

शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या सद्यस्थितीचा अभ्यास होणे आवश्यक वाटले.

५. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीचा अभ्यास करुन त्यांच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे व त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे गरजेचे वाटल्याने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

६. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी मूल्यमापनातून तपासता येत नाही म्हणून प्रमाणीत चाचणी विकसित करने गरजेचे आहे.

७. शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित प्रमाणीत चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

८. ज्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्रत शिक्षक-प्रशिक्षकाची बांधीलकी क मीआहे त्यात सुधारणा करता येईल.

९. सुसमायोजन व्यक्तिमत्त्व विकसन इत्यादी गुणांच्या विकासासाठी, सहकार्यांशी नाते संबंध कशा स्वरूपाचे आहेत हे जाणून घेण्यासाठी, व्यक्तीच्या वर्तनातील भावना अविष्कार जाणून घेण्यासाठी, स्वत:शी असलेल्या व इतरांशी असलेल्या व्यक्तीच्या आंतरक्रिया कशा आहेत हे जाणून घेण्यासाठी, व्यक्तीचे निर्णय विचार करण्याची पद्धती, दृष्टिकोन इत्यादी विषयी माहिती घेणे. शिक्षक हा केवळ स्वत:साठी नसतो तर तो समाजासाठी असतो हे समजावून घेण्यासाठी, वैयक्तिक सामाजिकमूल्य विकासासाठी म्हणजे थोड्क्यात, शिक्षक-प्रशिक्षकांमधील सामर्थ्य, प्रसन्नता, प्रगल्भता, संवेदनशीलता, समायोजनशीलता इत्यादी गुण जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

आजच्या ज्ञानधिष्ठित समाजव्यवस्थेत समाजाला गतिमान ठेवण्यासाठी शिक्षण पद्धती समाजापेक्षा गतिशील ठेवण्याचे महत्त्वपूर्ण क ार्य शिक्षक ाचे असते. म्हणून पूर्वीपेक्षा आज शिक्षक ांची समाजाप्रति जबाबदारी वाढलेली दिसते. आजच्या विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देऊन चालणार नाही तर मुलांचा सर्वांगीण विकास हे ध्येय समोर ठेवून त्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकास

करण्याची जबाबदारी शिक्षकाला पेलावी लागणार आहे म्हणून शिक्षक-शिक्षणाच्या संकल्पनेलासुद्धा व्यापकता प्राप्त झाली आहे. सध्या देशापुढे शिक्षणाचा विस्तार, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकीकरण, उच्चशिक्षणाची सर्वंकष गुणवत्ता ही महत्त्वाची आव्हाने आहेत. परिणामत: शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षकांचा दर्जा आणि शिक्षक-प्रशिक्षण प्रणाली यांचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे. विसाव्या शतका अखेरपर्यंत 'ज्ञानासाठी ज्ञान' असे म्हटले जात होते; २१ व्या शतकात ज्ञान जर उपयोगी पडत नसेल तर ते कशासाठी संपादन करायचे? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आणि त्यातून शिक्षणाच्या उपयुक्ततेचा विचार अस्तित्वात आला. शिक्षण हे शाळेच्या चार भिंतीत शिक्षकांच्या माध्यमातून संपादन करावयाची बाब आहे अशी शिक्षणाविषयीची धारणा कालबाह्य होऊ लागली.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासनामार्फत राबविल्या गेलेल्या योजनांमुळे शिक्षणाचे महत्त्व पटले आहे. सांप्रत काळी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षणाचा दर्जा सुधारणे महत्त्वाचे आहे. कारण शिक्षणाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे तर शिक्षक तयार करण्याची जबाबदारी शिक्षक-प्रशिक्षण संस्थांची आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीसाठी प्रयोगशील, प्रगतीशील, उपक्रमशील शिक्षक तयार होणे गरजेचे आहे यासाठी शिक्षक-प्रशिक्षण आवश्यकच आहे.

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा आधारस्तंभ आहे. शिक्षणावर भावी पीढी अवलंबून आहे. विद्वान, वर्तणूकीचा आदर्श, स्वविषयात पारंगत असलेला, विविध अध्यापन पद्धती, तंत्रे वापरण्यात जागरूक आणि विद्यार्थी मानसशास्त्राची जाण असणारा आणि आपल्या व्यवसायाशी बांधीलकी असणारा शिक्षक, प्रशिक्षक-महाविद्यालयातून बाहेर पडावा अशी अपेक्षा असते. शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी त्यामुळेच उच्च दर्जाची असणे गरजेचे वाटते; तरच तो शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, राष्ट्रप्रेम, समर्पणवृत्ती, ध्येयनिष्ठा, प्रामाणिकपणा, मूल्याधिष्ठितता हे गुण प्रतिबिंबित करू शकेल. सृजनशीलतेचा विकास, उच्च ध्येयाशी बांधीलकी आणि सर्वगुण संपन्नता निर्माण करण्याचे सामर्थ्य या शिक्षकांमध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी उच्च असणे गरजेचे आहे. आव्हाने पेलणे आणि ज्ञान

शाखेचा गुणात्मक दर्जा सुधारण्याची जबाबदारी ही त्यांच्याशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येकाचीच आहे.

शिक्षक-प्रशिक्षकांना व्यवसायाशी बांधीलकी राखताना जी कार्ये पार पाडावी लागतात त्यावर अनेक अंतर्गत आणि बाह्य घटकांचा परिणाम होत असतो. अध्यापनाचे कार्य प्रभावीपणे पार पाडतानाच; त्यांना आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य ही सांभाळावे लागतेच पण समायोजन ही करावे लागते. शिक्षण प्रक्रियेत जसा भविष्यकालीन शिक्षक, त्यापेक्षा अधिक शिक्षक-प्रशिक्षक हा महत्त्वाचाच आधारस्तंभ मानावा लागेल किंबहुना भविष्यकालीन शिक्षकापेक्षा ही शिक्षक-प्रशिक्षक अधिक जबाबदार, स्वक्षेत्राशी नितांत बांधीलकी असणारा, अधिक अनुभवी, प्रभावी अध्यापनकार्य करणारा, ज्ञानी, प्रयोगशील, तत्त्वज्ञानी, समाजसेवी, मार्गदर्शक, समुपदेशक इत्यादि गुणांनीयुक्त असण्याची आवश्यक्ता आहे. कारण तो भावी पीढी तयार करणाऱ्या शिक्षकांना घडवित असतो. म्हणूनच शिक्षक-प्रशिक्षकांच्याच व्यावसायिक बांधीलकीचे अचूक मापन करणाच्या दृष्टीने प्रमाणित चाचणीचे विकसन करणे गरजेचे वाटते. चाचणीच्या अंमलबजावणीतून प्राप्त झालेल्या निकषांवरून काही बदल घडवून आणता आले तर शिक्षक प्रशिक्षणास एक नवी दिशा प्राप्त होईल असा विश्वास नक्की वाटतो. प्रत्येक व्यक्तीच्या मनाचा कल हा एखाद्या क्षेत्राकडे अधिक झुकणारा असतो. त्यामध्ये यशस्वी होण्यासाठी येणाऱ्या अडचणी तसेच प्रतिकूल परिस्थिती यावर मात करणे आवश्यक असते. त्यावेळी व्यक्त होण्यासाठी स्व-प्रतिमेशी सुसंगत आणि वैशिष्ट्यपूर्ण लक्षणांचे संघटन त्या व्यक्ती मध्ये असणे गरजेचे असते.

एखाद्या व्यक्तीला शिक्षक व्हावयचे आहे. प्रथम त्यासाठी त्याला स्वतःची अभिवृत्ती तपासावी लागेल. पुढच्या पायरीवर त्याला शिक्षक होण्यासाठी एखाद्या चांगल्या शिक्षक-प्रशिक्षकाच्या हाताखाली प्रशिक्षण घ्यावे लागेल. हा प्रशिक्षक निवडताना; शिक्षकी व्यवसाय विकासासाठी लागणारी वैयक्तिक आणि सामाईक कौशल्ये त्याच्या अंगी आहेत का? शिक्षक प्रशिक्षित करताना त्या व्यवसायासंबंधीची बांधीलकी या बदल त्याची कल्पना काय? त्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तो स्वतःला किती बांधील समजतो? ह्या सर्व गोष्टी तपासून पाहणे गरजेचे ठरते.

त्यासाठी एखादी मान्यताप्राप्त चाचणी असणे आवश्यक आहे अन्यथा या सर्वांचे मापन करणेच अशक्य होईल. त्यासाठी अशी मापन चाचणी म्हणजे, 'शिक्षक- प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी' होय.

शिक्षकी पेशाशी संबंधित सर्व क्षेत्रांना अनुरूप असे काही प्रश्न एकत्रीत करून एक चाचणी तयार केल्यास तितकी विश्वसनीय आणि सार्थ असेलच असे नाही, पण एखादी चाचणी जर चांगल्या मूल्यमापन साधनांचे सर्व निकष (विश्वसनीयता, सप्रमाणता, भेदभाव क्षमता, पर्याप्तता वस्तुनिष्ठता, सुलभता) वापरून प्रमाणित केल्यास अशा चाचणीची विश्वसनीयता उच्च प्रतिची निश्चीतच होईल.

शिक्षकी पेशामध्ये शिक्षक हा पेशा निवडताना व्यवसायाप्रति असणाऱ्या बांधीलकीची तपासणी करता येऊ शकते का ? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो. कदाचित याचे कारण अशा चाचण्यांचा असणारा अभाव होय. इंग्रजीत बांधीलकीचे मापन करणाऱ्या चाचण्या उपलब्ध आहेत पण शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी तपासणारी मराठीतील चाचणी उपलब्ध नाही. म्हणूनच शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या चाचणीची निर्मिती आणि तिचे प्रमाणिकरण करण्याचे प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ठरविले.

६.३ संशोधन समस्या

'शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणीचे विकसन'

६.४ संशोधन विधानाचे स्पष्टीकरण

प्रत्येक व्यक्तीच्या मनाचा एखादा व्यावसायिक कल असतो त्यानुसार व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि प्रतिकूल परिस्थितीमध्येही व्यक्त होणाऱ्या व्यक्तीच्या स्वप्रतिमेशी सुसंगत अशा वैशिष्ट्यपूर्ण लक्षणाचे संघटन त्या व्यक्तीत असायला हव्यात.

एखाद्या व्यक्तीला शिक्षक व्हावयचे आहे. प्रथम त्यासाठी त्याला स्वतःची अभिवृत्ती तपासावी लागेल. पुढच्या पायरीवर त्याला शिक्षक होण्यासाठी एखाद्या चांगल्या शिक्षक-प्रशिक्षक ाच्या हाताखाली प्रशिक्षण घ्यावे लागेल. हा प्रशिक्षक निवडताना; शिक्षकी व्यवसाय विकासासाठी लागणारी वैयक्तिक आणि सामाईक कौशल्ये त्याच्या अंगी आहेत का? शिक्षक प्रशिक्षित करताना त्या व्यवसायासंबंधीची बांधीलकी या बदल त्याची कल्पना काय? त्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तो स्वतःला कि ती बांधील समजतो? ह्या सर्व गोष्टी तपासून पाहणे गरजेचे ठरते. त्यासाठी एखादी मान्यताप्राप्त चाचणी असणे आवश्यक आहे अन्यथा या सर्वाचे मापन करणेच अशक्य होईल. त्यासाठी अशी मापन चाचणी म्हणजे, 'शिक्षक- प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी' होय.

शिक्षकी पेशाशी संबंधित सर्व क्षेत्रांना अनुरूप असे काही प्रश्न एकत्रीत करून एक चाचणी तयार केल्यास तितकी विश्वसनीय आणि सार्थ असेलच असे नाही, पण एखादी चाचणी जर चांगल्या मूल्यमापन साधनांचे सर्व निकष (विश्वसनीयता, सप्रमाणता, भेदभाव क्षमता, पर्याप्तता वस्तुनिष्ठता, सुलभता) वापरून प्रमाणित केल्यास अशा चाचणीची विश्वसनीयता उच्च प्रतिची निश्चीतच होईल.

शिक्षकी पेशामध्ये शिक्षक हा पेशा निवडताना व्यवसायाप्रति असणाऱ्या बांधीलकीची तपासणी क रता येऊ शक ते का ? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत राहतो. कदाचित याचे कारण अशा चाचण्यांचा असणारा अभाव होय. इंग्रजीत बांधीलकीचे मापन करणाऱ्या चाचण्या उपलब्ध आहेत पण शिक्षक-प्रशिक्षकांची बांधीलकी तपासणारी मराठीतील चाचणी उपलब्ध नाही. म्हणूनच शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या चाचणीची निर्मिती आणि तिचे प्रमाणिकरण करण्याचे प्रस्तुत संशोधनात संशोधकाने ठरविले.

६.५ संशोधनातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

६.५.१ शिक्षक-प्रशिक्षक :- अध्यापक महाविद्यालयात अध्यापनाचे काम क रण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण असणारा शिक्षक म्हणजे शिक्षक - प्रशिक्षक.

६.५.२ व्यावसायिक बांधीलकी :- विद्यार्थ्यांच्या प्रति, समाजाच्या प्रति, व्यवसायाच्या प्रति, श्रेष्ठता प्राप्त करण्यासाठी, जुनी मानवी मूल्ये यांच्या प्रति व्यवसायात उत्कृष्टता आणण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करणे म्हणजे व्यावसायिक बांधीलकी.

६.५.३ प्रमाणित चाचणी :- खालील निकषांचा वापर करून तयार केलेली शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी म्हणजे प्रमाणित चाचणी होय.

१. चाचणीच्या प्रश्नावर पृथक्करण करने.

२. त्याची काठिण्यपातळी व भेदनक्षमता निश्चित करणे आणि त्याच्या आधारे योग्य काठिण्य मूल्याचे भेदनक्षम प्रश्न निवडून अंतिम चाचणी तयार करणे.

३. या अंतिम चाचणीची सप्रमाणता व विश्वनीयता ठरविणे तसेच चाचणीची वस्तुनिष्ठता, चाचणीची पर्याप्तता, चाचणीची उपयोगिता निश्चित करणे,

४. मार्गदर्शिका तयार करणे.

६.६ संशोधनाची उद्दिष्टे

१. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणी विकसित करणे.

२. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.

३. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

६.७ संशोधनाची गृहीतके

१. शिक्षकी व्यवसाय दर्जेदारपणे करण्यासाठी शिक्षकाची व्यवसायाप्रति बांधीलकी असणे खूप गरजेचे आहे. (Fifth survey of educational research : 1988-92, Volume 1. (1997), New Delhi : National Council of Educational Research and Training.).[32]

२. शिक्षक-प्रशिक्षकांची निवड बांधीलकीच्या निकषावर करणे इष्ट असते. (National curriculum Framework-2005).[33]

६.८ संशोधनाची व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रातील अध्ययनार्थ्यांबाबत बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी, उत्कृष्ठ कार्याबाबत बांधीलकी, मूलभूत मानवी मूल्याप्रति बांधीलकी, समाजाप्रति बांधीलकी, या उपक्षेत्रांशी संबंधित आहे.

३. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित केलेल्या चाचणीशी संबंधित आहे.

६.९ संशोधनाची मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष शिक्षक-प्रशिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाच्या विश्लेषणावर आधारित आहे.

२. प्रस्तुत संशोधनातून शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी या क्षेत्रातील अध्ययनार्थ्यांबाबत बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी , उत्कृष्ट कार्याबाबत बांधीलकी , मूलभूत मानवी मूल्याप्रति बांधीलकी , समाजाप्रति बांधीलकी , या पाच उपक्षेत्रांचेच मापन केले जाणार आहे. 'बांधीलकीची' इतरही अनेक उपक्षेत्र आहेत. त्या सर्व उपक्षेत्रांचा सदर संशोधनात विचार केला जाणार नाही.

६.१० संशोधनाची परिमर्यादा

१. प्रस्तुत संशोधनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ३६ अध्यापक महाविद्यालयातील २५२ शिक्षक-प्रशिक्षकांचा विचार संशोधनात केला आहे.

२. चाचणीचा पडताळा घेताना सहा विद्यापीठातून प्रत्येकी तीन अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक-प्रशिक्षकांचा समावेश केला आहे. इतर अध्यापक महाविद्यालयांचा विचार केला जाणार नाही.

६.११ संबंधित संशोधनाचा आढावा

तक्ता क्रमांक - ६.१ - संबंधित संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा

अ.क्र.	पुस्तक		नियतकालिके		भारतीय आणि पाश्चिमात्य चाचण्या		भारतीय, पाश्चिमात्य आणि इतर पूर्वसंशोधने	
माध्यम	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी	मराठी	इंग्रजी
संख्या	२९	०९	१६	१५	५	८	२२	८+१४+१
एकूण	३८		३१		१३		४५	

हा आढावा घेताना व्यवासायिक बांधीलकीची संकल्पना, बांधीलकीबाबतची मूलभूत गृहितके तसेच पाश्चात्य आणि भारतीय तज्ज्ञांनी प्रमाणित केलेल्या व्यावसायिक बांधीलकी संदर्भात तयार केलेल्या चाचण्यांचा विचार करणे उपयुक्त ठरते.

याच बरोबर प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साहित्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला.

अ.क्र. संदर्भ प्रकार

१. संबंधित ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, मासिक, वर्तमानपत्रे

२. विविध बांधीलकीच्या कसोट्या-पाश्चिमात्य आणि भारतीय संशोधकाच्या चाचण्या.

३. संबंधित संशोधनाचे सारांश - 'एम.बी.बूच' यांचे खंड.

४. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेले संशोधन सारांश.

५. इंटरनेटवरील संशोधने.

६.१२ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

१. मराठी भाषेत व्यावसायिक बांधीलकी चाचणी संच्याचे विकसन व त्यांचे प्रमाणिकरण प्रथमच करण्यात आले.

२. या चाचणीत शिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकीच्या उपपैलूंची निवड करताना आशय विश्लेषण या नवीन पद्धतीचा वापर करून सुमारे ३८ पुस्तकांचे यात विश्लेषण करण्यात आले. एकूण शिक्षकाच्या २५० गुणवैशिष्ट्यांची नोंद केली. शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम ठरविणे. क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे. क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे यासाठी सदर पद्धतीचा उपयोग करण्यातआला.

३. बी. एड्. प्राध्यापक यांच्या दिलेल्या भारांशानुसार कसोटीतील विविध बांधीलकीच्या क्षेत्राचे भारांश निश्चित केले व त्यानुार बांधीलकी चाचणीचे पाच उपपैलू निश्चित करण्यात आले.

४. बांधीलकी क्षेत्रांची निश्चिती करताना डॉ. दवे यांच्या 'क्षमतापूर्ण शिक्षक' या संकल्पनेचाही विचार येथे मोठ्या प्रमाणात करण्यात आला. एकूण पाच चाचण्या विकसित करून त्यांचे प्रमाणिकरण करण्यात आले.

५. चाचणीत पद्धती वापरताना एकूण तीन पद्धतींचा वापर करण्यात आला. यात आशय विश्लेषण पद्धती, सर्व्हेक्षण पद्धती तसेच चाचणीचा पडताळा घेण्यासाठी अनुधावन अभ्यास पद्धत.

६. प्रमाणिकरण करतान कसोटीसाठी मानकेही तयार केली गेली. यात ही माहितीचे विश्लेषण करताना 'झेड' गुण, 'टी' गुण, 'प्रणऊ' गुण यासारख्या प्रमाणित गुणांचा वापर करण्यात आला. तसेच शततमक प्रमाणकही काढण्यात आली व वा. ना. दांडेकरांनी सूचविलेल्या प्रमाणित श्रेणीदान प्रतिमानाचा वापर करून मानके निश्चित करण्यात आली.

७. शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीच्या उपयोगीतेसाठी मार्गदर्शिका तयार करण्यात आली.

८. एकंदरीत शिक्षक व्यवसायात पदार्पण करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रस्तुत प्रमाणित चाचणी उपयुक्त ठरते.

९. विशिष्ट व्यवसायातील शिक्षकी पेशा, अध्यापन कार्य, शिक्षक विद्यार्थी संबंध, सहकारी संबंध, शिक्षक-पालक संबंध, शिक्षक व्यक्तिमत्व, व्यावसायिक रूची, शिक्षकाचे व्यक्तिमत्व अशा पैलूंची निवड केली आहे. त्या पैलूंच्या आधारे शिक्षक प्रशिक्षणाबाबत दृष्टिकोन, विषयज्ञान, अभिवृत्ती, अध्यापन क्षमता, उपक्रमशीलता, शैक्षणिक साधनांचा वापर, कृतीप्रवणता, निर्णय क्षमता, निरीक्षण क्षमता, समायोजन क्षमता, शिस्तपालन, विद्यार्थी व समाजाभिमुखता याबाबतच्या गुणवैशिष्ट्यांचे परीक्षण करण्यासाठी सप्रमाण प्रश्नांची योजना केली आहे.

१०. प्रस्तुत चाचणी प्रमाणित करण्यासाठी विविध विद्यापीठातील शिक्षक-प्रशिक्षक ांचा न्यादर्श घेतला आहे.

११. एकंदरीत शिक्षक व्यवसायात पदार्पण करणाऱ्या आणि करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी प्रस्तुत प्रमाणित चाचणी उपयुक्त आहे.

६.१३ संशोधन पद्धत निश्चित क रताना उद्दिष्टंचाचा विचार करण्यात आला.

तक्ता क्रमांक ६.२

उद्दिष्टंनुसार संशोधन पद्धती

उद्दिष्ट क्रमांक १ - शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी प्रमाणित चाचणी विकसित करणे.		
अ.	शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकीच्या क्षेत्रांच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम ठरविणे.	**आशय पृथक्करण पद्धत**
ब	क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे.	
क	क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करणे.	
ड	क्षेत्रानुसार चाचणीसाठी प्रश्नांची निवड करणे.	**सर्वेक्षण पद्धत**
उद्दिष्ट क्रमांक २ - शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी तपासण्यासाठी विकसित कलेल्या प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.		
अ	विक सित क लेल्या प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.	**अनुधावन पद्धत**

६.१४ संशोधनाची कार्यपद्धती खालील प्रमाणे

तक्ता क्रमांक ६.३

प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा क्रमांक -१	
अ) नियोजन	**ब) निर्मिती**
१. क्षेत्र निश्चिती करणे	१. विधानांचे विकसन
२. उद्दिष्टे निश्चिती	२. चाचणीचे संपादन
३. क्षेत्रनिहाय विधान संख्या निश्चिती	३. विधानांना क्रमांकन
	४. वेळेचे नियोजन
	५. प्रतिसादक सूचना
	६. गुणदान योजना व उत्तरसूचीचे आयोजन
	७. चाचणीचे पुनरावलोकन
प्रतिसादांचे मूल्यांकन टप्पा क्रमांक -२	
१. पूर्वचाचणी घेणे	
२. वेळेचे नियोजन	
३. निरीक्षणे	
चाचणीचे प्रमाणीकरण टप्पा क्रमांक -३	
१. प्रश्न पृथक्करण करणे	
२. अंतिम चाचणीसाठी वेळेचे नियोजन व गुणदान योजना	
३. उत्तर चाचणी घेणे	
४. चाचणी तपासणे व मूल्यांकन	
५. संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर	
६. विश्वसनीयता काढणे	
७. सप्रमाणता ठरविणे	
८. प्रमाणके तयार करणे	
९. मार्गदर्शिका तयार करणे	
१०. प्रमाणित चाचणीचा पडताळा घेणे.	

६.१४.१ .प्रारंभिक अन्वेषणात्मक टप्पा क्रमांक -१

अ) चाचणीचे नियोजन

बांधीलकी चाचणीसाठी प्रश्नांची निर्मिती करण्यापूर्वी तिचे नियोजन करताना खालील गोष्टी विचारात घेतल्या.

बांधीलकी क्षेत्र निश्चिती व भारांशसाठी मतावली साधन वापरासाठी पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातील प्रत्येकी २० शिक्षक-प्रशिक्षक या प्रमाणे ६० शिक्षक-प्रशिक्षक ांची निवड **असंभाव्यतेवर आधारित पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने** करण्यात आली.

१. क्षेत्र निश्चिती केले.

- चाचणीसाठी बांधीलकीनिहाय उपपैलूंची निश्चिती केली.
- शिक्षक-प्रशिक्षकाच्या व्यावसायिक बांधीलकी क्षेत्राच्या उपयोगितेच्या दृष्टीने क्रम व भारांश ठरविणे.

२. उद्दिष्टे निश्चिती

- प्रश्नांचा प्रकार निश्चित करून वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश करण्याचे ठरविले त्याच बरोबर चाचणी निहाय संविधान तक्ता तयार केला.

३. चाचणी निहाय एकूण प्रश्न संख्येची निश्चिती केले.

ब) चाचणीची निर्मिती

बांधीलकी चाचणीची निर्मिती करण्यासाठी खालील गोष्टी विचारात घेतल्या.

१. विधानांचे विकसन आणि लेखन : संविधान तक्त्याला अनुसरून चाचणीतील विधानांचे विकसन करण्यात आले. यानुसार वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी प्रश्न तयार करण्यात आले. नमुना चाचणीत एकूण २०० प्रश्न निश्चित केले. संपूर्ण चाचणीत २७% सोपे, २७% कठीण, ४६% मध्यम प्रश्न ठेवण्याचा प्रयत्न केला. यानुसार सर्व प्रश्नांची सरासरी काठिण्य पातळी निश्चित केली. तसेच चाचणीतील प्रश्नांचा आशय, त्याची क्रमबद्धता ठरवली. प्रश्नांसाठी गुणांकाचा भार निश्चित केला.

२. चाचणीचे संपादन- चाचणीतील प्रश्नांची काठिण्य पातळी कशी असावी हे निश्चित केला

३. विधानांना क्रमांकन दिले.- चाचणी निहाय प्रश्नांचे विकसन आणि त्यांची निवड केल्यानंतर संशोधकाने चाचणीतील प्रश्नांची मांडणी करण्यासाठी प्रश्नांची काठिण्य पातळी, प्रश्नांचा प्रकार, प्रश्नांचा आशय, क्रमबद्धता, आणि गुणांकाचा भार[१०] या पाच घटकांचा विचार केला. त्यानुसार प्रश्नांची मांडणी करून त्यांना क्रमांक दिले.

४. चाचणीसाठी वेळेचे नियोजन केले परंतु ते प्रश्न पृथक्करणाच्यादृष्टीने लवचिक ठेवले. कारण ज्यावेळी चाचणीचा प्रारंभिक पडताळा घेण्यात येईल. त्यावेळी सर्वच प्रश्नांना प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रश्न पृथक्करण करता येत नाही .

५. प्रतिसादकांना सूचना पुरविल्या.

६. एका प्रश्नास एक गुण यानुसार गुणदान योजना आणि उत्तरसूचीचे आयोजन केले.

७. चाचणीचे पुनरावलोकन आणि संपादन केले.

६.१४.२ प्रतिसादकांचे मूल्यांकन

१. पूर्वचाचणी घेणे

पूर्वचाचणी : शिक्षक-प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणीच्या पथदर्शी अभ्यासासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील एकूण ५० शिक्षक- प्रशिक्षकांची **असंभाव्यतेवर आधारित पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने** निवड करुन चाचणी घेण्यात आली.

- **प्रतिसादांचे मूल्यांकन आणि गुणदान :** प्रत्येक प्रश्नास एक गुण यानुसार संपूर्ण कसोटीस गुणदान करण्यात आले.
- **प्रश्न पृथक्करण :** प्रश्न पृथक्करणासाठी पुढील टप्प्यांचा वापर केला.

अ) गुणानुक्रमे सर्व उत्तरपुस्तिकांचा उतरता क्रम लावला.

ब) गुणानुक्रमे वरिष्ठ, कनिष्ठ उत्तरपत्रिका विचारात घेतल्या.

क)वरील दोन्ही गटातील शिक्षक प्रशिक्षकांनी उत्तरासाठी कोणता पर्याय निवडला हे पाहून प्रतिसादकांची संख्या प्रत्येक निष्कर्षाखाली पुढील तक्त्यात नोंदवली.

प्रश्न क्रमांक	योग्य उत्तराचे अक्षर					पर्याय
	अ	ब	क	ड	गाळलेले	एकूण
१						

ड) प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला.

$$F = \frac{R_H + R_L}{n} \times 100\%$$

इ) प्रत्येक प्रश्नाची भेदनक्षमता निश्चित करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला.

$$D = \frac{R_H + R_L}{\frac{1}{2}n}$$

ई) प्रश्न निवडण्याचे निकष : ज्या प्रश्नांची भेदनक्षमता ही ०.१९ पेक्षा जास्त ०.८० पेक्षा कमी अशाच प्रश्नांची अंतिम चाचणीसाठी निवड करण्यात आली.

फ) अंतिम चाचणीसाठी प्रश्नांची निश्चिती केली.

२. वेळेचे नियोजन : प्रश्नांसाठी लागणारा वेळ निश्चित केला

३.निरीक्षणे : चाचणी संपल्यानंतर संशोधकाने प्रतिसादक शिक्षकांच्या चाचणीबाबतच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

६.१४.३ चाचणीचे प्रमाणिकरण करणे - चाचणीच्या अंतिम नमुन्याचा वापर

शिक्षक-प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी चाचणी संच्याची अंतिम चाचणी घेण्यासाठी पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील एकूण ३६ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची निवड **संभाव्यतेवर आधारित पद्धतीतील यादच्छिक नमुना निवड पद्धतीने** केली. या शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील २४९ शिक्षक-प्रशिक्षकांवर चाचणीचा अंतिम पडताळा घेण्यात आला आणि प्रतिसादांचे मूल्यांकन केले.

१. प्रश्न पृथक्करण प्रक्रिया

- **गुणानुक्रमे सर्व उत्तरपत्रिकांचा क्रम लावला :** हा क्रम लावताना ज्यांना संपूर्ण चाचणीत जास्तीत जास्त गुण मिळाले व ज्यांना चाचणीत कमीत-कमी गुण मिळाले त्यांची उतरत्या क्रमानुसार मांडणी केली.[८]
- **उत्तरपत्रिकांची विभागणी :** गुणानुक्रमे वरच्या २७% व खालच्या २७% उत्तरपत्रिका बाजूला काढल्या.
- **पर्यायांची विकर्षकता ठरविणे :** वरील दोन्ही गटातील प्रतिसादकांनी उत्तरासाठी कोणती विकर्षक किंवा पर्याय निवडला ते पाहून प्रतिसादकांची संख्या प्रत्येक विकर्षकाखाली नोंदविली.

तक्ता : ६.४

पर्यायाची विकर्षकता दर्शविणारा तक्ता

प्रश्न क्र	योग्य उत्तराचे अक्षर	पर्याय					
		अ	ब	क	ड	गाळलेले	एकूण
१	अ	९	८	२	१	-	२०

- प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित केले. प्रत्येक प्रश्नाचे काठिण्यमूल्य निश्चित करण्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला आहे.

$$F = \frac{R_{H+R_L}}{2n} \text{ X } 100\%$$

- प्रत्येक प्रश्नाची भेदनक्षमता (D) निश्चित करणे. एखाद्या गटातील बांधीलकी जास्त व कमी असणारे प्रतिसादक निवडून काढण्याची प्रश्नाची जी क्षमता असते त्या क्षमतेला भेदभाव क्षमता असे म्हणतात. यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$D = \frac{R_H - R_L}{N}$$

तक्ता क्र : ६.५

अंतिम चाचणीसाठी प्रश्न निवडण्याचा दिग्दर्शन तक्ता

भेदभाव क्षमता	काठिण्यपातळी		
D	४०% पेक्षा कमी	४०% ते ६०%	६०% पेक्षा अधिक
०.४० पेक्षा अधिक	कठीण	स्वीकारार्ह	सोपे
०.३० ते ०.३९	कठीण	सुधारणा करण्यायोग्य	सोपे
०.२० ते ०.२९	कठीण	कनिष्ठ	सोपे
०.१९ पेक्षा कमी	बाद करणे	बाद करणे	बाद करणे

- **चाचणीनिहाय प्रत्येक चाचणीतील प्रश्नांचा एकूण मूल्यभार :** हा मूल्यभार यापूर्वीच बांधीलकी क्षेत्रांचा भारांश ठरविणाऱ्या गटाकडून निश्चित केला आहे त्याचे सुरचित प्रमाण पुढीलप्रमाणे ठरविले

तक्ता क्र ३.६

अंतिम चाचणीसाठी चाचणीनिहाय प्रश्नसंख्या दर्शविणारा तक्ता

अ.क्र	चाचणी	मूल्यभार देणारा शिक्षक वर्ग	मूल्यभाराचे सुरचित प्रमाण
१	अध्ययनार्थ्यांशी बांधीलकी	५६ (९३%)	२०
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	५८ (९३%)	२०
३	उत्कृष्ट कार्यासाठी बांधीलकी	५६ (९३%)	२०
४	मूल्याप्रति बांधीलकी	५८ (९७%)	२०
५	समाजाप्रति बांधीलकी	५७ (९५%)	२०
	एकूण	**६०**	**१००**

२. अंतिम चाचणीसाठी वेळेचे नियोजन आणि गुणदान योजना

- **वेळेचे नियोजन**

प्रस्तुत संशोधनात अंतिम चाचणीच्या वेळेचे नियोजन करताना संचातील प्रत्येक चाचणी सोडवायला लागणारा वेळ विचारात घेऊन एकूण शिक्षक प्रशिक्षक बांधीलकी चाचणीच्या वेळेचे नियोजन करण्यात आले. प्रारंभिक पडताळ्याच्यावेळी वापरण्यात आलेल्या सूत्राचाच पुन्हा वापर केला.

चाचणी सोडविण्यासाठी लागणारा कमीत कमी वेळ व जास्तीत जास्त वेळ

२

या सूत्राचा वापर करून अंतिम चाचणीसाठी वेळेचे नियोजन केले ते पुढील कोष्टकात दर्शविले आहे.

तक्ता क्र ३.७

अंतिम कसोटीसाठी वेळेचे नियोजन दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	चाचणी	चाचणीतील प्रश्नसंख्या	चाचणी सोडविण्यास दिलेला वेळ (मिनिट)
१	विद्यार्थ्यांप्रति बांधीलकी	२०	२५
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	२०	२५
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२०	२५
४	मूल्याप्रति बांधीलकी	२०	२५
५	समाजाप्रति बांधीलकी	२०	२५
	एकूण	**१००**	**१२५**

- **गुणदान योजना आणि उत्तरसूचीचे नियोजन**

गुणदान योजना आणि उत्तरसूची याबद्दल यापूर्वीच चर्चा केली आहे. प्रारंभिक पडताळ्यासाठी चाचणीची गुणदान योजना व उत्तरसूची यापूर्वीच तयार करण्यात आली

आहे. मात्र ती येथे तशीच्या तशी वापरण्यात येणार नाही. कारण प्रारंभिक चाचणीतील अनेक प्रश्न आता बाद झाले आहे व अंतिम नमुन्यात त्यातील काही प्रश्नांचा समावेश केलेला असल्याने चाचणी निहाय नवीन उत्तरसूची व गुणदान योजना तयार करणे क्रमप्राप्त ठरले ती उत्तरसूची परिशिष्ट ात देण्यात आली आहे.

३. उत्तरचाचणी घेणे

४. चाचणी तपासणे व मूल्यांकन करणे

५. संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर

५.१ केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलता

संपूर्ण चाचणी संचाची चाचणी निहाय केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचे मापन करण्यात आले.

सारणी क्रमांक -६.१

केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलता दर्शविणारी सारणी

अ.क्र	चाचणी	ल्याद्र्शे (प्रतिसादक)	केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे			विचलनशीलतेचे परिमाणे	
			मध्यमान	मध्यांक	बहुलक	प्रमाण विचलन	चतुर्थक विचलन
१.	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	२४९	१०.१५	१०	१०	४.५१	२.००
२.	व्यवसायाप्रति बांधीलकी	२४९	११.१३	११	११	४.१४	२.००
३.	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	२४९	१०.६६	१०	१०	४.५७	२.५०
४.	समाजाप्रति बांधीलकी	२४९	१०.२९	१०	१०	४.११	२.००
५.	मूल्यांप्रति बांधीलकी	२४९	१०.७०	१०	१०	४.२६	२.५०

वरील सारणीत शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक बांधीलकी चाचणी संचाची केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचे मापन करण्यात आले आहे.

यावरून खालील मुद्दे लक्षात येतात.

१) अध्ययनार्थ्याप्रति बांधीलकी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी चाचणीची केंद्रिय प्रवृत्ती ही सारखीच दिसते. गुणांकाचे विचलनही जास्त प्रमाणात या दोन चाचणीत झालेले दिसते.

२) व्यवसायाप्रति बांधीलकी चाचणी, समाजाप्रति बांधीलकी चाचणी, मूल्यांप्रति बांधीलकी चाचणी या तिन्ही चाचणीची केंद्रिय प्रवृत्ती ही सारखीच दिसते आणि त्यांच्या गुणांकाचे विचलन अध्ययनार्थ्याप्रति बांधीलकी चाचणी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी चाचणीच्या तुलनेत कमी दिसते.

३) गुणांकांची केंद्रिय प्रवृत्ती आणि विचलनशीलतेचा आलेल्या मापनाचा आधार घेऊन प्रसामान्य संभाव्य वक्र काढल्यास तो धन विषमित मिळतो.

४) मध्यमान हे पाचही चाचण्यांत मध्यांकापेक्षा मोठे दिसून आले.

५.२. गुणांकाचे वितरण आणि विषमितता

सारणी क्रमांक -६.२

गुणांकाचे वितरण आणि विषमितता दर्शविणारी सारणी

अ.क्र	चाचणी	विषमितता	शिखरदोष
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	०.१८	०.०५
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	०.००	०.१४
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	०.१९	०.०४
४	समाजाप्रति बांधीलकी	०.३५	०.१८
५	मूल्यांप्रति बांधीलकी	०.२९	०.२१

वरील सारणीत पाचही कसोट्यांची विषमितता ही निश्चित केली असून, ती ०.०० ते ०.३५ या दरम्यान असून शिखरदोष ०.०५ ते ०.२१ या दरम्यान दिसतो. व्यवसायाप्रति बांधीलकी आणि अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी यांची विषमितता खूप कमी आहे. ती अनुक्रमे ०.०० व ०.१८ इतके आहे ती किंचित धन विषमित दिसते.

यावरून खालील बाबी दिसून आल्या.

१) वरील सारणीत व्यवसायाप्रति बांधीलकी अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी आणि उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी या तिन्ही चाचण्यांची विषमितता ही किंचित धन असल्याचे दिसून येते तर समाजाप्रति बांधीलकी आणि मूल्यांप्रति बांधीलकी या दोन्ही कसोट्यांची विषमितता इतर तीन चाचण्यांपेक्षा जास्त असल्याचे दिसते. तीही धन विषमितच आहे. एकूण धन विषमिततेचा विचार करता ती कोठेही ०.३५ पेक्षा जास्त दिसत नाही म्हणजेच ती अतिशय कमी आहे.

२) अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी, व्यवसायाप्रति बांधीलकी, उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी, समाजाप्रति बांधीलकी, मूल्यांप्रति बांधीलकी या पाचही चाचण्यांचा शिखर दोष अनुक्रमे ०.०५, ०.१४, ०.०४, ०.१८, ०.२१ आहे. म्हणजे Ku=०.२६४ पेक्षा या पाचही चाचण्यांचे शिखरदोष मूल्य लहान असल्याने पाचही चाचण्यांचा मिळणारा वक्र हा उच्चशिखरी असल्याचे दिसते. पाचही चाचण्यांत गुणांकाचे विभाजन हे केंद्रिय प्रवृत्तीच्या मध्यावर केंद्रित झालेले दिसते.

५.३. गुणांकाचे वितरण आणि विषमितता दर्शविणारी सारणी

सारणी क्रमांक -६.३

गुणांकाचे वितरण आणि विषमितता दर्शविणारी सारणी

अ.क्र	चाचणी	मध्यमान	मध्यांक	विषमितता	शिखरदोष	वक्राचा प्रकार
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	१०.१५	१०	०.१८	०.०५	उच्चशिखरी
२	व्यवसायाप्रति बांधीलकी	११.१३	११	०.००	०.१४	उच्चशिखरी
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	१०.६६	१०	०.१९	०.०४	उच्चशिखरी
४	समाजाप्रति बांधीलकी	१०.२९	१०	०.३५	०.१८	उच्चशिखरी
५	मूल्यांप्रति बांधीलकी	१०.७०	१०	०.२९	०.२१	उच्चशिखरी

६.चाचणीची सप्रमाणता निश्चित करणे

प्रस्तुत संशोधनात **सप्रमाणता** काढण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

१) आशय सप्रमाणता : प्रस्तुत संशोधनात आशय सप्रमाणतेच्या दृष्टीने बांधीलकी क्षेत्रांच्या उपपैलूंची निश्चिती उपपैलूंच्या केलेल्या कार्यात्मक व्याख्या व उद्दिष्टांची निश्चिती तसेच उद्दिष्टांना दिलेला भारांश व उद्दिष्टानुसार बांधीलकीचे मोजमाप करणारी प्रश्नावलीची रचना पाहता चाचणी ही आशय सप्रमाण आहे. आशय सप्रमाणता सिद्ध करण्यासाठी तयार केलेली चाचणी २५ तज्ज्ञ व्यक्तींना तपासण्यास दिली त्यांची नावे परिशिष्ट क्रमांक-४ मध्ये देण्यात आली आहेत.

७. चाचणीची विश्वसनीयता

चाचणीची विश्वसनीयता हा उत्तम चाचणीचा एक आवश्यक गुण मानला जातो. विश्वसनीयता मापन करण्याच्या विविध पद्धती आहेत. यात चाचणी पुनर्चाचणी पद्धत. दोन समांतर चाचणीचा उपयोग करण्याची पद्धत. एकच चाचणीचे दोन समान अर्धभाग करण्याची पद्धती, अर्थविच्छेदन पद्धती.

अर्थविच्छेदन पद्धती :

या पद्धतीचा वापर करताना प्रस्तुत संशोधनात विश्वसनीयता काढण्यासाठी खालील दोन सूत्राचा वापर केला. यात 'कुडर रिचर्डसन' के आर - २०, 'क्रोनबाक अल्फा' फॉर्म्यूला यांचा वापर केला आहे. जेव्हा चाचणी बहुपर्यायी असते व उत्तर बरोबर किंवा चूक यामध्ये मापन केले जाते तेव्हा 'कुडर रिचर्डसन' के आर - २० सूत्राचा वापर केला जातो.

'कुडर रिचर्डसन' के आर - २० सूत्र :

$$PKR_{20} = \left(\frac{k}{k-1}\right)\left(1-\frac{\Sigma pq}{\sigma^2}\right)$$

PKR_{20} = Kuder Richardson Coefficient of correlation

K = Total No. of questions.

P = Proportion of the test takers who passed an item.

Q = Proportion of the test takers who failed an item.

S2 = Variation of the entire test

' क्रोनबाक अल्फा' सूत्र :

$$\alpha = \frac{N.\overline{C}}{\overline{V} + (N-1).\overline{C}}$$

N = Equal to the Number of Items

? = Average inter-item covariance among the items

? = Equal the Average Variance

(if you increase the number of items you increase cronbachis Alpha Additionally, if the average inter-item correlation is low, Alpha will be low. As the average inter-item correlation increases cronbachis Alpha increases as well cholding the number of items constant.

वरील सूत्रांचा वापर करून प्रस्तुत संशोधनात चाचणीची विश्वसनीयता निश्चित करण्यात आली.

सारणी क्रमांक - ६.४

विश्वसनीयता गुणांक दर्शविणारी सारणी

अ. क्र.	चाचणी	'कुडर रिचर्डस' के.आर. - २०	' क्रोनबाक अल्फा'	सरासरी
१	अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी	०.७६	०.७९	०.७७५
२	व्यावसायाप्रति बांधीलकी	०.७५	०.७८	०.७६५
३	उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी	०.७७	०.८०	०.७८५
४	मूल्यांप्रति बांधीलकी	०.७५	०.७८	०.७६५
५	समाजाप्रति बांधीलकी	०.७६	०.७९	०.७७५

वरील सारणीत विश्वसनीयता गुणांक 'कुडर रिचर्डसन' के.आर.-२० आणि क्रोनबाक अल्फा' पद्धतीने निश्चित करण्यात आला चाचणीची सरासरी विश्वसनीयता ही ०.७६५ ते ०.७७५ या गुणांका दरम्यान आलेली दिसते.

यावरून खालील बाबी दिसूनआल्या.

१) अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी, उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी, समाजाप्रति बांधीलकी चाचणीची विश्वसनीयता ही अनुक्रमे ०.७७५, ०.७८५, ०.७७५ असल्याने ती उच्च असल्याचे दिसते.

२) व्यवसायाप्रति बांधीलकी आणि मूल्यांप्रति बांधीलकी ०.७६५, ०.७६५ असून, ही विश्वसनीयता अध्ययनार्थ्यांप्रति बांधीलकी, उत्कृष्ट कार्याप्रति बांधीलकी, समाजाप्रति बांधीलकी चाचणीच्या विश्वसनीयतेपेक्षा कमी असली तरी लक्षात घेण्यासारखी आहे.

८. प्रमाणके तयार करणे

८.१ प्रमाणित गुण

तक्ता क्र -६.८

'झेड' आणि 'टी' गुणांचा निश्चित वर्गांतरातील विस्तार दर्शविणारा तक्ता

कच्चे गुण	'झेड' गुण	'टी' गुण	बांधीलकीबाबत अभिप्राय
१ ते ४०	-३.०४ ते -०.७४	१९.६५ ते ४२.५९	सरासरीपेक्षा कमी
४१ ते ६०	-०.६८ ते ०.४४	४३.१८ ते ५४.३५	सरासरी
६१ ते ७५	०.४९ ते १.३२	५४.९४ ते ६३.१८	समाधानकारक
७६ ते १००	२.१५ ते २.७९	६३.७६ ते ७७.८८	उच्च

प्रस्तुत संशोधनात प्रमाणित गुण निर्धारित करताना 'झेड' गुण, 'टी' गुण आणि 'प्रणऊ' गुण या प्रमाणित गुणांचा विचार केला आहे. या तिन्ही प्रमाणित गुणांचा वापर प्रस्तुत संशोधनात प्रमाणके म्हणून केला आहे.

यावरून खालील मुद्दे लक्षात येतात.

१) वरील तक्त्यात कच्च्या गुणांची निश्चित वर्गांतराच्या स्वरूपात मांडणी केलेली आहे. ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत १ ते ४० इतके कच्चे गुण मिळाले आहेत आणि त्यांच्या गुणांचा विस्तार १९.६५ ते ४२.७९ या दरम्यान आहे.
अशा प्रकारच्या शिक्षक प्रशिक्षकांची व्यावसायिक बांधीलकी ही सरासरीपेक्षा कमी असल्याचे लक्षात येते.

२) ज्या शिक्षक-प्रशिक्षकांना संपूर्ण कसोटीत ४१ ते ६० इतके कच्चे गुण मिळाले आहेत त्यांच्या 'टी' गुणांचा विस्तार ४३.१८ ते ५४.३५ या दरम्यान आहे.
